(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

(सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे माननीय सदस्य घोषणा देत असतात)

सभापती : मी प्रश्नोत्तराचा तास पुकारला आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, काल सभागृहाचे कामकाज स्थगित होत असताना आज सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.00 वाजता सुरु होईल असे जाहीर केले होते. असे असताना आज सभागृहाची बैठक दुपारी 12.00 वाजता सुरु होत आहे. आज सकाळी 10.00 वाजता विशेष बैठक सुरु होणार होती, त्यामुळे मला सकाळी 9.00 वाजता विधानभवनामध्ये यावे लागले. पहिल्यांदा असा बदल घडला आहे. रेशीमबाग येथे बैठक होती म्हणून सभागृहाचे कामकाज उशिरा सुरु होत आहे का?

(सभागृहामध्ये विरोधी पक्षाचे माननीय सदस्य घोषणा देत असतात)

सभापती : माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सकाळी 9.00 वाजता विधानभवनात येण्याचे कारण नव्हते. सभागृहाच्या बैठकीच्या संदर्भात झालेला बदल एसएमएसच्या माध्यमातून सर्वच माननीय सदस्यांना कळविण्यात आला होता. आता दिनांक 21 जुलै, 2015 रोजी राखून ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.8164 चर्चेला घेण्यात येत आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात महिला वसतीगृहांची संख्या अत्यंत अपुरी असल्याने महिलांची होणारी गैरसोय

(2) * 8164 श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, ॲड.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात दिवसेंदिवस नोकरीसाठी व शिक्षणासाठी महिलांना अनेकदा दुसऱ्या शहरांमध्ये वास्तव्य करावे लागत असून राज्यात महिला वसतीगृहांची संख्या अत्यंत कमी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, राज्यातील नवीन महिला वसतीगृहांची निर्मिती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(4) असल्यास, याबाबतचे शासनाचे धोरण काय आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे : (1) अंशतः खरे आहे.

(2) नोकरी करणाऱ्या महिलांच्या वसतिगृहांचे प्राप्त प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी शिफारस करुन पाठविण्यात येतात. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) सदरील योजना ही केंद्र शासन पुरस्कृत योजना असल्याने आवश्यकतेनुसार प्रस्ताव केंद्र शासनाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येतात.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, केंद्र पुरस्कृत योजनेकरिता 2014-15 मध्ये 2015-16 करिता किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे, केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत राज्यात कोणत्या शहरातील महिला वसतिगृहाचे प्रस्ताव केंद्र शासनास सादर केले आहेत, याकरिता बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे काय?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, ही योजना पूर्णपणे केंद्र शासनाची आहे. 75 टक्के केंद्र शासनाचा वाटा आणि 25 टक्के वाटा एनजीओ किंवा राज्य शासन देते. दुर्दैवाने एकही वसतिगृह राज्य शासनाचे नाही. 2014 मध्ये 5 प्रस्ताव पाठविले होते, त्यापैकी एक प्रस्ताव परत आला असून 4 वसतिगृहे विविध एनजीओना केंद्र शासनाकडून मंजूर झाली आहेत. माझा असा मानस आहे की, राज्य शासनाने भाग घेऊन स्वतः राज्य शासनाचा 25 टक्के वाटा उचलून 75 टक्के केंद्र शासनाचा निधी मिळवून पूर्णपणे शासनाचे वसतिगृह चालवावे, असा प्रस्ताव वित्त विभागाला पाठवित आहोत. जेणेकरुन शासनाची सेवा लोकांना उपलब्ध करुन देता येईल. एकूण 114 वसतिगृहे एनजीओ व विविध सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून चालविली जात आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A.3

SGB/ ST/ AKN/ 12:00

ता.प्र.क्र.8164...

श्रीमती पंकजा मुंडे.....

सभापती महोदय, सिडको आणि महिला बालकल्याण विभागाने नवी मुंबई येथे वसतिगृहासाठी जमीन आरक्षित ठेवली असून ती खरेदी करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठवित आहोत. जेणेकरुन बजेट उपलब्ध झाले तर ती जमीन खरेदी करुन शासनाने तेथे वसतिगृह उभारावे असा आमचा मानस आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, 114 वसतिगृहे चालविली जात असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. या वसतिगृहामध्ये किती महिला वास्तव्य करीत आहेत, त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नेमकी काय उपाययोजना करण्यात आली आहे? शासनाने या योजनेमध्ये सहभाग घेऊन वसतिगृह उभारण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे, तो निश्चित किती कालावधीत मूर्त स्वरुपात येईल?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, 114 वसतिगृहे राज्य शासनाची नसून केंद्र शासनाकडून त्यासाठी 75 टक्के निधी आलेला आहे. विविध सेवाभावी संस्थांनी ही वसतिगृहे चालविण्यास घेतली आहेत. सुरक्षिततेची व्यवस्था तेथील व्यवस्थापनाकडून केली जाते. सेन्सेटिव्ह विषय असेल तर पोलिसांकडून संरक्षण मागितले जाते. 114 वसतिगृहांची 9308 महिलांना सामावून घेण्याची क्षमता आहे. आज प्रत्यक्ष 5500 महिला विविध वसतिगृहांमध्ये रहात आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अनेक वर्षापासून नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे केंद्र शासनाच्या मदतीने चालविण्यात येत आहेत. समाजाची आणि शहराची परिस्थिती बदलते त्यानुसार नोकरी करणाऱ्या महिलांसाठी कोणत्या भागात अधिक वसतिगृहांची आवश्यकता आहे याचे असेसमेंट करणे आवश्यक आहे. विशेषत: अनेक मोठया शहरांमध्ये आयटी सेक्टरमध्ये काम करणाऱ्या महिलांवर एकटे राहण्याची वेळ येते. पुण्यामध्ये परवडत नाही म्हणून 3-4 महिला मिळून फ्लॅट भाड्याने घेऊन एकत्र राहतात. आयटी सेक्टर किंवा अन्य क्षेत्रात काम करणाऱ्या महिला किंवा अधिक संख्येने ज्या ठिकाणी महिला काम करतात अशा ठिकाणी वसतिगृह बांधण्याचा प्रस्ताव मागवून त्याला मान्यता देण्याबाबत वेगाने पावले उचलली जातील काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती पंकजा मुंडे : माझी अशीच मानसिकता आहे की, सर्वेक्षण झाले पाहिजे. सध्या जे मोठे जिल्हे आहेत किंवा मेट्रो शहरे आहेत त्या ठिकाणी नोकरी करणाऱ्या महिलांचे प्रमाण खूप

आहे. प्रायव्हेट सेक्टर, कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या महिलांसाठी निवासाची, वाहतुकीची व्यवस्था केली जाते. त्या शिवाय इतर क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना अकोमोडेशन मिळत नाही, भाड्याने घर घेऊन राहण्याची त्यांची आर्थिक परिस्थिती नसते, अशा महिलांना निवासाची चांगली सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मी मंत्री झाल्यावर विचार सुरु झाला आहे. राज्य शासनाने 25 टक्के वाटा उचलून प्रायोगिक तत्वावर प्रामुख्याने नवी मुंबईत सिडकोने जी जागा आरक्षित ठेवली आहे त्या ठिकाणी वसतिगृह उभारण्याचा प्रयोग केला तर त्या ठिकाणच्या बऱ्याच महिलांचा प्रश्न मार्गी लागू शकतो. केंद्र सरकारची मंजुरी मिळण्याकरिता जो वेळ लागेल तेवढा वेळ द्यावा लागेल. 2014 मध्ये पाठविलेले प्रस्ताव आता मंजूर झाले. म्हणजे 9 ते 10 महिन्यांचा कालावधी परवानगी मिळण्यासाठी लागतो.

ॲड.हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहाची आवश्यकता आहे. केंद्र शासनाकडून मंजुरी मिळाल्यानंतर एनजीओकडून वसतिगृह चालविले जाते. त्या ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न येतो. राज्य शासनातर्फे प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी नोकरदार महिलांसाठी वसतिगृह बांधण्याची योजना आहे का?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, अशी कोणती योजना आता कार्यान्वित नाही. केंद्र सरकारकडून 75 टक्के अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. त्या माध्यमातून प्रभावी योजना राबवू शकतो. जिल्हयाच्या ठिकाणी वसतिगृह करण्याचा मानस जरूर आहे. त्यासाठी वित्तीय तरतूद लागते किंवा इन्फ्रास्ट्रक्चर लागते. ते उपलब्ध करण्यासाठी तत्काळ यश येणे अवघड आहे. परंतु लवकरच प्रायोगिक तत्वावर काही जिल्हयांचा सर्व्हे करून तेथे वसतिगृह करण्याचा आमचा मानस आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, चर्चगेट, मुंबई येथे महिलांच्या वसतिगृहासाठी एक प्लॉट आरक्षित आहे. त्या ठिकाणी वसतिगृह बांधण्यात आले आहे काय? तालुक्याच्या आणि शहराच्या ठिकाणी केंद्र शासनाची मदत आली तर वसतिगृह बांधू असे उत्तर दिले आहे. राज्य शासनाने यासाठी स्वत:चा राखीव निधी उपलब्ध करुन देऊन नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे बांधण्याचा प्रयत्न करण्यात येईल काय? ...बी.1....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, यात केंद्र शासनाचा 75 टक्के तर राज्य शासनाचा 25 टक्के निधी आहे. त्याद्वारे आपल्याला इन्फ्रास्ट्रक्चर पटकन उभे करणे शक्य होईल म्हणून त्यास फोर्स करून त्याची अंमलबजावणी करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. तसेच, यास जास्त वेग देण्याचा देखील प्रयत्न करीत आहोत. मी मघाशीच सांगितले आहे की, 4 एन.जी.ओं.ना मान्यता मिळालेली आहे. येथे चर्चगेट येथील आरक्षित असलेल्या जागेसंबंधी प्रश्न विचारला आहे. सदर जागा ही आमच्या विभागाची नाही. ती जागा कॉर्पोरेशनची आहे. त्यामुळे त्या जागेसंबंधी निर्णय घेण्याचा अधिकार आम्हाला नाही. विविध स्थानिक स्वराज्य संस्था महिला बाल कल्याणासाठी जागा देत असतील तर तेथे आम्ही वसतिगृह बांधण्यास तयार आहोत.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आम्ही चौकशी केली असता, तपासणी केली असता गावाच्या बाहेर वसतिगृह असल्याचे आढळून आलेले आहे. महिलांच्या सुरक्षिततेच्या दुष्टीने गावाच्या बाहेर वसतिगृह होऊ शकत नाही. तेव्हा माझी शासनाला विनंती आहे की, भविष्यात बांधण्यात येणारी वसतिगृहे ही गावाच्या जवळ बांधण्यात येऊन महिलांना सुरक्षिततेची हमी शासन देणार आहे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची सूचना चांगली असून त्यावर आम्ही सकारात्मक विचार करू.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या या अनुदानातून आता पर्यंत किती वसतिगृहे बांधली गेली आहेत ? राज्याचा 25 टक्के हिस्सा एखाद्या एन.जी.ओ.ने उचलला तर 75 टक्के केंद्र शासनाचा हिस्सा मिळू शकतो काय, यासाठी केंद्र शासनाने किती रूपयांची तरतूद केलेली आहे ?

श्री.पंकजा मुंडे : सभापती महोदय, यात राज्य शासनाचा हिस्सा आहे. यात एन.जी.ओ.किंवा राज्य शासन असा ऑप्शन आहे. त्यामुळे यात आता पर्यंत एन.जी.ओ.चा प्रतिसाद आलेला आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी प्रश्न विचारला होता तेव्हा 114 वसतिगृहे आहेत व आता आणखी 4 वसतिगृहांना मंजुरी मिळाली आहे असे सांगितले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मंत्री महोदय आता झालेल्या चर्चेतून मला स्वतःला असे जाणवते की, महिला सुरक्षिततेचा प्रश्न हा आता शहरी आणि ग्रामीण भागात सगळीकडेच ऐरणीवर आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी आय.टी.क्षेत्रातील महिला रात्री, बेरात्री मोठ्या प्रमाणावर ये-जा करीत असतात असे सांगितले आहे. त्यातूनच नैना पुजारी सारखी प्रकरणे घडतात. सर्वात मूलभूत अडचण ही जागेची आहे. आता स्मार्ट सिटीसंबंधी चर्चा होत आहे. मोठ्या शहरात महिलांच्या वसतिगृहांसाठी आरक्षण आपण का ठेवत नाही ? ते बांधण्यासाठी सरकारी निधी अपुरा पडत असेल तर एन.जी.ओ.किंवा ज्या कंपनीमध्ये महिला जास्त नोकरीला आहे ती कॉर्पोरेट एन्टीटी आणि सरकार अशी एक यंत्रणा उभारून हा प्रश्न सोडवावा असे माझे स्वतःचे मत आहे. आपण त्याचा विचार करावा. असे धोरण होऊ शकले तर निश्चित स्वरूपात पुढच्या अधिवेशनात याचा आढावा सादर करावा.

.....

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 7209

(प्रेस : येथे सोबत जोडलेला तारांकित प्रश्न क्रमांक 7209 छापावा.)

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आता दिनांक 21 जुलै 2015 रोजी पुढे ढकलण्यात आलेला ता.प्र.क्र.7209 घेण्यात येईल.

श्रीमती हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, माझा हा प्रश्न मागील अधिवेशनील आहे. मागच्या अधिवेशनापासून ते आजच्या अधिवेशनापर्यंत अंगणवाडीसेविकांना त्यांचे नियमित वेतन मिळालेले नाही. वाढीव मानधन मिळालेले नाही. त्याच बरोबर त्यांना भाऊबीज भेटही मिळालेली नाही. निधीची कमतरता होती. आम्ही दोन वेळा पुरवणी मागण्या मंजुर केलेल्या आहेत. या अंगणवाडीसेविकांचे मानधन, भाऊबीज त्यांना केव्हा पर्यंत अदा करणार आहात ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, हा मागच्या अधिवेशनातील राखून ठेवलेला प्रश्न आहे. हे सरकार गतिमान आहे. मागच्या अधिवेशनात राखून ठेवलेल्या प्रश्नाचे उत्तर आपण या अधिवेशनात मागे पर्यंत प्रलंबित ठेवलेले नाही. आपण प्रश्न उपस्थित करण्याच्या आधीच आम्ही निधी वितरित केलेला आहे सन 2015-16 या वर्षातील . जवळपास 176 कोटी रूपयाचे वाढीव मानधन अंगणवाडीसेविकांकडे जमा झालेले आहे. मागच्या सरकारने एप्रिल 2014 मध्ये जी.आर.काढला होता. त्या जी.आर.मध्ये अंगणवाडीसेविकांना मानधन देण्यात येईल असे नमूद करण्यात आले होते. पण त्याच सरकारच्या वित्त विभागाने त्यासाठी तरतूद केली नव्हती. त्यामुळे तो निर्णय तसाच राहीला. त्यासंबधी देखील आम्ही सकारात्मक निर्णय घेतलेला आहे. मी आपले वित्त मंत्री श्री.सुधीरभाऊ मुनगंटीवार यांचे जाहीर आभार मानते. मागच्या सरकारने निर्णय घेऊन वित्तीय तरतूद केली नाही. पण आम्ही आता 113.69 कोटी रुपयाची तरतूद केली असून ती कालच्या पुरवणी मागणीमध्ये मान्य झालेली आहे. तसेच दोन वर्षाची 42 कोटी रूपयांची थकित भाऊबीज त्यांना देण्यात आलेली आली आहे. या महिलांनी माझ्या घरी येऊन माझे स्वागत केले आहे, सत्कार केला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7209...

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ही खूप दिलासा देणारी गोष्ट आहे. आताच सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, रक्कम आदा केली आहे. मी आपले लक्ष लेखी उत्तराकडे वेधत आहे. क्रमांक दोनमध्ये असे नमूद केले आहे की, दिनांक 1 एप्रिल 2014 पासून अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांच्या मानधनामध्ये केलेली वाढ निधीची तरतूद न झाल्याने अदा करता आली नाही." त्यात आपण दुरूस्ती करावी व ती रक्कम अदा केली आहे असे दुरूस्ती केलेले उत्तर आपण सभागृहामध्ये दिले तर आपले सरकार गतिमान आहे असे म्हणता येईल.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, सन 2014-15 ची पुरवणी मागणी आता मंजूर झालेली आहे. त्यांना सन 2015-16 चे रूटीन मानधन दिनांक 8 मार्च 2015 रोजी आम्ही मान्य केलेले आहे. ते आम्ही त्यांना मागच्याच वर्षी दिलेले आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, एकूण 8 लेखी प्रश्न विचारण्यात आलेले असून त्यांना जे उत्तर देण्यात आलेले आहे त्यात वेगवेगळी विसंगती आहे. कुठल्या महिन्यापर्यंत मानधन आपण अदा केलेले आहे ? कारण रत्नागिरी जिल्ह्यातील मानधन अदा केल्याचे लेखी उत्तरामध्ये कुठेच स्पष्ट नाही. त्यामुळे कुठल्या महिन्या पर्यंतचे, कुठल्या तारखे पर्यंतचे मानधन राज्यातील अंगणवाडीसेविकांना देण्यात आले आहे ? तसेच त्यांना जे वाढीव मानधन देण्यात आले आहे ते किती आहे? सन 2015-16 या आर्थिक वर्षात करण्यात आलेली तरतूद ही काल पुरवणी मागण्यांद्वारे मंजूर करण्यात आली आहे. तेव्हा यापूर्वीच्या प्रलंबित असलेल्या मानधनासंबधातील नेमकी स्थिती काय आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, किती महिन्यांपर्यंत मानधन देण्यात आले आहे यासंबंधातील प्रत्येक जिल्ह्याची आकडेवारी वेगवेगळी आहे. याचे कारण असे आहे की, सन 2014 मध्ये मानधन वाढ मान्य झाली तेव्हा काही जिल्ह्यांनी, ज्या जिल्ह्यांची जास्त ताकद होती त्यांनी वाढीव मानधनाचे परस्पर वाटप केले आहे. काही जिल्ह्यांना रूटीन मानधन मिळालेले नाही. त्यात करेक्शन करण्यामध्ये आम्हाला वेळ लागलेला आहे. त्यामुळे आम्ही तो निधी परत जमा करून नंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती पंकजा मुंडे....

सगळ्या जिल्ह्यांना योग्य पद्धतीने वाटप केले आहे आणि वाढीव मानधन दिले आहे. काही जिल्ह्यांमध्ये 3 ते 4 महिन्यांचे वाढीव मानधन मिळाले नाही हे मी मान्य करते. यापुढे ऑनलाईन पद्धतीने मानधन वाटप करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. दिनांक 1 नोव्हेंबर रोजी या संघटनेचे प्रतिनिधी मला भेटले होते. मी त्यांना आश्वासन दिले आहे की, येणाऱ्या 1 तारखेपासून त्यांचे मानधन नियमितपणे जमा होणार आहे. कारण आता आम्ही ऑनलाईन पद्धती स्वीकारली आहे. आता अंगणवाडी सेविकांचे मानधन त्यांचा बँक खात्यामध्ये थेट जमा होणार आहे. यापूर्वी यात कार्यपद्धतीमुळे जो विलंब होत होता तो आता भविष्यामध्ये होणार नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हे आम्ही करून घेतले आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. मला त्यांना आठवण करून द्यायची आहे की, काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारचे आघाडी सरकार असताना अगंणवाडीसेविका आपल्या मागण्यांसाठी आझाद मैदान येथे बसल्या होत्या. त्यावेळी मी स्वतः त्यांना तत्कानील वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार आणि महिला व बालविकास मंत्री श्रीमती वर्षाताई गायकवाड यांच्याकडे घेऊन गेले होते. त्यावेळी त्यांच्या सगळ्या मागण्या मान्य करण्यात आल्या होत्या व त्यांच्या निर्णयावर सही देखील झाली होती. आता पाचवा, सहावा, सातवा वेतन आयोग दिला जात आहे. परंतु, अंगणवाडीसेविकांना दरवर्षी भाऊबीज, मानधनासाठी आंदोलन करावे लागते. तेव्हा शासन त्यांच्या मानधनामध्ये भरीव वाढ करणार आहे काय ?

C-1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.:7209....

श्रीमती पंकजा मुंडे :सभापती महोदय, आता जर वाढ केली, आपण आता ज्या मोर्चाचा उल्लेख केलेला आहे त्याचे उत्तर मी देऊ शकणार नाही. तेव्हाचे अर्थमंत्री आणि तेव्हाचे महिला बाल कल्याण मंत्रीच देऊ शकतील की, त्यांनी असा खोटा जीआर कशामुळे काढला आणि त्यासाठी फायनांशिल तरतूद का केली नाही ? खोटा म्हणजे ज्या जीआरसाठी फायनांशिअल तरतूद केली नाही तर त्या जीआरला अर्थ राहत नाही याची सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे साहेबांना सुध्दा कल्पना असेल. त्यांना फायनांशिअल तरतूद का केली नाही ...(अथडळा)

श्री.जयंत प्र.पाटील : या ठिकाणी मंत्री महोदय शासन म्हणून उत्तर देत असतात. तेव्हाचे मंत्री कोण होते काय होते याचा संबंध येत नाही.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, मी असे म्हणाले नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी काही मंत्र्यांची नावे घेतली तसेच त्यांनी सही केली असा त्यांनी उल्लेख केला आहे. त्यामुळे त्याचे उत्तर मी कसे काय देऊ शकते ? त्यांनी सांगितले की, त्यांनी सही केली आणि त्यांचे पैसे नाही मिळाले तर .....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदया सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. सरकार एखाद्या निर्णयाच्या बाबतीत आदेश काढत असते. तुम्ही काल पुरवणी मागण्या मंजूर केल्या त्यामुळे तुम्ही अगोदर काढलेला आदेश खोटा होता काय ? काल माननीय मुख्यमंत्र्यांनी 10 कोटीचे पॅकेज जाहीर केले त्यासाठी तुम्ही तरतुद करुन ठेवली होती काय, त्या पॅकेजला आम्ही खोटे पॅकेज म्हणावयाचे काय ? त्यामुळे मंत्री महोदया यांनी जो शब्द वापरला आहे तो शब्द त्यांनी मागे घ्यावा. सरकारच्या वतीने काढण्यात आलेला जीआरला नंतर तुम्ही तरतुद केली नाही. सरकार ही निरंतर चालत असलेली प्रक्रिया असते. त्यामुळे मंत्री महोदया यांनी या ठिकाणी "खोटा" हा जो शब्द वापरला आहे तो त्यांनी मागे घेतला पाहिजे.

श्रीमती पंकजा मुंडे : खोटा असा शब्द नाही. ज्याला फायनांशिअल तरतूद नाही असा जीआर काढला अशी त्यामध्ये दुरुस्ती करावी.

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना न्याय देण्यासाठी या प्रश्नाचा जास्त उपयोग केला तर ते चांगले राहील असे मला वाटते. शब्दच्छल करण्यामध्ये काही तात्पर्य नाही. (अडथळा) जेव्हा सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण हे स्वत: उपोषण कर्त्यांच्या मंडपात गेले होते. त्यांच्या मागणी नुसार ....(अडथळा) ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मला दोन गोष्टी कळतात त्यातील पहिली बाब म्हणजे सत्तांतर झाले ही वस्तुस्थिती आहे. परंतु लोकशाहीमध्ये गव्हर्नमेंट सक्सेशन नावाचा एक भाग असतो. मागच्या सरकारने निर्णय केले नसतील आणि ते निर्णय नवीन सरकारला पटत नसतील, तर हा एक विषय होतो. जर "खोटा" या शब्दाला विरोधी पक्षाच्या सदस्यांचा आक्षेप असेल तर मी स्वत: रेकॉर्ड तपासून तसा शब्द असेल तर तो शब्द कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पती-पत्नी एकत्रिकरणाच्या धोरणानुसार शिक्षकांच्या आंतर जिल्हा

बदलीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

(१) * ११९८१प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे` : सन्माननीय ग्रामविकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) पती-पत्नी एकत्रिकरणाच्या धोरणानुसार शिक्षकांच्या आंतर जिल्हा बदलीचे सुमारे १२ हजार दांपत्यांचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सुमारे ७ ते १५ वर्षे सेवा झालेल्या दांपत्यांना सुध्दा पती-पत्नी एकत्रिकरणाखाली आंतर जिल्हा बदली मिळत नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, लग्न होऊनही वेगवेगळे राहणाऱ्या शिक्षक दांपत्यांना एकत्र येऊन सुखाने संसार करता यावा यासाठी आंतर जिल्हा बदलीच्या निकषामध्ये बदल करण्याची मागणी होत असून याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) आंतर जिल्हा बदलीसाठी समान जात संवर्गाची अट रद्द करणे, रिक्त पदांवर पती-पत्नी दांपत्यांचा प्राधान्यांने विचार करणे, खाजगी शिक्षकांचे समायोजन जिल्हा परिषदेच्या शाळेत न करणे इत्यादी मागण्यांबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१), ***(२) व*** (३) ***जिल्हा परिषद शिक्षकांचे नियुक्ती प्राधिकारी हे संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे आहेत. त्यामुळे संबंधित शिक्षक आंतर जिल्हा बदलीकरिता त्यांच्याकडे अर्ज करीत असतात. त्यानंतर यांसदर्भातील राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संबंधित जिल्हा परिषदांकडून कार्यवाही करण्यात येते. सबब, यासंदर्भात प्रलंबित प्रस्तावांसंबंधीची नेमकी संख्या सध्या शासनस्तरावर उपलब्ध नसून सदर माहिती संकलित करण्याची कार्यवाही सुरु आहे.***

आंतर जिल्हा बदली ही दोन जिल्हा परिषदांमधील कार्यवाहीची बाब आहे राज्य शासनाच्या धोरणानुसार पती-पत्नी एकत्रिकरणासाठी संबंधित जिल्हा परिषदेमध्ये ३ वर्षांचा कार्यकाल पूर्ण केल्यानंतर आंतर जिल्हा बदलीस पात्र होतात. तद्नंतर अशा बदलीचे प्रस्ताव तपासताना संबंधित जिल्ह्यांतील शाळांची संख्या, या शाळांमधील विद्यार्थी संख्या, सदर शाळांमध्ये संबंधित शिक्षकाच्या नियुक्ती प्रवर्गाचे पद उपलब्ध असणे, प्राधान्य क्रम, अट शिथील केल्याचा प्राधान्यक्रम आणि सेवाज्येष्ठता या बाबी विचारात घ्याव्या लागतात.

(४) व (५) ***जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या आंतर जिल्हा बदलीबाबत या विभागाच्या दिनांक*** २९.९.२०११ ***च्या शासन परिपत्रकातील विहित मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात येते. समान जात संवर्गाची अट रद्द करता येणार नाही. कारण त्याचा परिणाम पदांच्या आरक्षणावर होऊ शकतो.***

राज्यातील अनुदानित खाजगी शाळेतील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाबाबत शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक २८.११.२०१४ ***च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही केली जाते.***

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या प्रश्नाला मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते अतिशय संदिग्ध आहे. मी पहिला प्रश्न असा विचारला होता की, पती-पत्नी एकत्रिकरणाच्या धोरणानुसार शिक्षकांच्या अंतरजिल्हा बदलीचे 12 हजार दांपत्यांचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे हे खरे आहे काय ? परंतु या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले नाही. उलट प्रश्न क्रमांक 1,2,3 यांना क्लब करुन जिल्हा परिषद शिक्षकांची नियुक्ती प्राधिकारी संबंधित जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे आहेत.त्यामुळे संबंधित शिक्षक आंतर जिल्हा बदलीकरिता त्यांच्याकडे अर्ज करीत असतात. खरे म्हणजे मंत्री महोदयांनी हे सांगण्याची काही गरज नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे .....

कारण बदली कोण करते हे सर्वांना माहिती आहे. त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, त्यानंतर यासंदर्भातील राज्य शासनाच्या मार्गदर्श सूचनानुसार संबंधित जिल्हा परिषदाकडून कार्यवाही करण्यात येते. सबब यासंदर्भात प्रलंबित प्रस्तावासंबंधी नेमकी संख्या सध्या शासनस्तरावर उपलब्ध नसून सदर माहिती संकलित करण्याची कार्यवाही सुरु आहे अशी माहिती दिलेली आहे. सभापती महोदय, ही गंभीर बाब आहे. आम्ही प्रश्न केव्हा विचारला आहे ? असे असताना शासनाकडे पती-पत्नी एकत्रीकरणाची प्रस्ताव 12000 आले आहेत याची माहिती आम्हाला माहिती आहे आणि ती माहिती शासनाला माहिती नसावी ही बाब योग्य नाही. त्यामुळे पती-पत्नी एकत्रिकरणाचे एकंदर किती प्रस्ताव आले आहेत याची माहिती आम्हाला किती दिवसात उपलब्ध करुन दिली जाणार आहे ? माझा दुसरा महत्वाचा प्रश्न असा आहे की, पती-पत्नी एकत्रिकरणासाठी संबंधितांनी जिल्हा परिषदेमध्ये 3 वर्षाचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर आंतरजिल्हा बदलीस पात्र होत असतात. आयपीएस आणि आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या मात्र पती-पत्नी एकत्रिकरणातून त्यांच्या ताबडतोब बदल्या होतात. परंतु आमच्या गरीब शिक्षकांच्या पती-पत्नी एकत्रिकरणाच्या बदल्या होत नाहीत. त्यामुळे शिक्षकांच्या पती-पत्नी एकत्रिकरणाच्या बदल्या करुन त्यांचे संसार सुखाचे होतील असा प्रश्न शासन करणार आहे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, माझ्यामते त्यांनी शेवटचा प्रश्न विचारला आहे की,शिक्षकांच्या पती-पत्नी एकत्रिकरणाच्या बदल्या करुन त्यांचे संसार सुखाचा होईल यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय ? पती-पत्नी एकत्रिकरणाच्या संदर्भात मी बदली करु शकते परंतु सुखाचा संसार त्यांचा त्यांनाच करावा लागेल व त्यासाठी शासन सकारात्मक आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शासनाकडे पती-पत्नी आंतरजिल्हा एकत्रिकरण बदलीच अनेक प्रस्ताव प्रलंबित आहेत. पती-पत्नी एकत्रिकरणाच्या बदल्यांमध्ये शासनाचा कोणताही रोल नसतो. यासंदर्भातील सर्व अधिकार शासनाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. नियुक्ती अधिकारी सीईओ असतात त्यामुळे त्यांना हे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यामुळे "अ" ठिकाणावरुन "ब" ठिकाणी जाणारा व "ब" ठिकाणावरुन "अ" ठिकाणी येणाऱ्या पती-पत्नी एकत्रिकरणाच्या संदर्भात संबंधित सीईओ निर्णय घेत असतात. शिक्षकाची 7 वर्षे सेवा झाली किंवा 10 वर्षे सेवा झाली तरी त्याचा विचार संबंधित सीईओ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

करीत नाहीत व त्यामुळे बदल्या रखडल्या जातात. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, आपण बदलीच्या संदर्भातील पूर्ण अधिकार सीईओ यांना दिलेले आहेत परंतु त्यावर सहनियंत्रण करणारी समिती असणे आवश्यक आहे. त्यामुळे सहनियंत्रण समिती गठीत केली जाणार आहे काय ?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, शालेय शिक्षण विभागाचा दिनांक 28.11.2014 रोजीचा जीआर असून त्यानुसार खाजगी शाळेतील अनुदानित संस्थेतील शिक्षक जिल्हापरिषदेच्या शाळेत घेतले जातात परंतु आमच्या जिल्हा परिषदेचा कर्मचारी दुसऱ्या जिल्हापरिषदेत पती-पत्नी एकत्रिकरणासाठी नियमानुसार जाऊ शकतो परंतु त्याला जर संधी मिळत नसेल, त्याचा जर विचार होत नसेल तर ते योग्य नाही. त्यामुळे यासंदर्भातही शासन फेर विचार करणार आहे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे साहेबांनी विचारले होते की, पती-पत्नी एकत्रिकरणाचे एकंदर किती प्रस्ताव आले त्या प्रश्नाला "सदर माहिती संकलित करण्याचे काम सुरु आहे" असे उत्तर देण्यात आलेले होते. परंतु हा प्रश्न जेव्हा छापण्यात आले तेव्हा संकलन करण्याचे काम सुरु होते परंतु आज संकलितची माहिती आलेली असून त्यानुसार 4500 अर्ज प्रलंबित असून ते ऑनगोईंग प्रोसेसमध्ये आहेत. सन्माननीय सदस्य श्री.मोते साहेबांनी प्रश्न विचारला आहे की, पती-पत्नी एकत्रिकरणाच्या बदल्यासंदर्भात सहनियंत्रण समितीची नियुक्ती केली जाईल काय? खरे तर शिक्षक हे जिल्हा परिषदेचे कर्मचारी असतात. शिक्षकांच्या बदल्यांचा डायरेक्ट अधिकार राज्य शासनाला नाही. शिक्षकांचे बदल्याचे रोस्टर प्रत्येक जिल्हया प्रमाणे ठरलेले असते. जर आरक्षणातून एखादा शिक्षकाची नियुक्ती झाली असेल तर त्या आरक्षणाची जागा पती किंवा पत्नी मागणी करीत असलेल्या ठिकाणी अशा प्रकारच्या आरक्षणाची जागा रिक्त नसल्यामुळे हे प्रश्न प्रलंबित राहत असतात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11981....

श्रीमती पंकजा मुंडे....

जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याचे प्रमुख आहेत. त्यांच्यावर विभागीय आयुक्तांचे संनियंत्रण आहे. आरक्षणाची जागा उपलब्ध नसल्यामुळे बऱ्यावेळा हे प्रश्न प्रलंबित राहतात.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी अत्यंत स्पेसिफीक प्रश्न विचारतो. रोष्टरमुळे बदल्या होण्यास विलंब लागतो असे मंत्री महोदयांनी सांगितले. राज्यातील जिल्हापरिषदेच्या शिक्षक्ांचा संवर्ग एकच असल्यामुळे त्यांचे रोष्टरसुद्धा एकच असले पाहिजे. बदली प्रकरणामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो म्हणून एकच रोष्टर केले जात नाही. या प्रश्नामुळे अनेक शिक्षकांचे संसार तुटलेले आहेत. पत्नी 700 कि.मी.वर काम करीत असते तर पती दुसरीकडे 700 कि.मी.वर काम करीत असतो. पती-पत्नींची चार चार महिने भेट होत नाही. मुलांची तर परिस्थिती आण्खी वेगळी असते, ही वस्तुस्थिती आहे. आपण या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे. अधिवेशन सुरु झाल्यापासून येथील यशवंत स्टेडियमवर शिक्षक उपोषणास बसले आहेत. त्यांचे धरणे आंदोलन सुरु आहे. ते शिक्षक मंत्री महोदयांना देखील भेटले आहेत. राज्य रोष्टर एक करावे अशी या शिक्षकांची मागणी आहे. तेव्हा राज्य रोष्टर एक करण्याबाबत शासन ठोस निर्णय घेणार आहे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, राज्य रोष्टर एक करण्यासंदर्भात काही अडचणी आहेत. या विषयावर खोलात जाऊन विचार करण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक जिल्ह्याची जातीनिहाय लोकसंख्या वेगवेगळी असल्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरीय संवर्ग आहे. एखाद्या जिल्ह्यामध्ये एस.टी.सवंर्गाची जास्त लोकसंख्या असेल तर त्याप्रमाणे तेथे संवर्ग तयार केला जातो. त्याप्रमाणे काही जिल्ह्यांमध्ये एन.टी.ची तर काही जिल्ह्यांमध्ये एस.सी.ची लोकसंख्या जास्त असेल त्याप्रमाणे रोष्टर तयार केले जाते. आपण राज्याचे एकच रोष्टर तयार केले तर आपणास जिल्हावाईज न्याय देता येईल काय असाही प्रश्न आहे. आमचा एक रोष्टर करण्यास नकार नाही. त्यासाठी समाज कल्याण विभाग, शिक्षण विभाग आणि ग्राम विकास विभागांनी एकत्रित बसून निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. या संदर्भातील निर्णय फक्त ग्राम विकास विभाग घेऊ शकत नाही. शिक्षक या टॉर्चरमधून कधी मुक्त होतील आणि शिक्षकांच्या संघटना विद्यार्थ्यांच्या मेरीच्या बाबतीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कधी काम करतील अशीही आमची इच्छा आहे. तेव्हा आम्ही त्या पद्धत्ीने जरुर वाटचाल करु परंतु या संदर्भातील निर्णय फक्त ग्राम विकास विभागाच्या हाती नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, पती-पत्नी एकत्रिकरणाच्या विषयात शिक्षकांची मागासलेल्या जिल्हयामध्ये नियुक्ती झाली असेल ती सुधारित गावामध्ये बदली करावी अशी त्यांची मागणी असते. त्यामुळे आदिवासी भागांतील शाळांमध्ये शिक्षक उपलब्ध होत नाहीत. आता मोठ्या प्रमाणात शाळेला कुलूप लावण्याची पद्धत सुरु झालेली आहे. पती-पत्नी एकत्रिकरण करीत असताना आपण कमीत कमी ग्रामीण भागाचा विचार करणार आहे काय ?

सभापती : ग्रामीण भागात, दुर्गम भागामध्ये पती-पत्नी एकत्रिकरणाच्या संदर्भातील अडचणी जास्त येतात आणि त्या ठिकाणी शिक्षक उपलब्ध होत नसल्यामुळे शाळेला कुलूप लावण्याची वेळ येते असे सन्माननीय सदस्यांना म्हणावयाचे आहे.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, पती-पत्नी एकत्रिकरण हा बदलीच्या बाबतीत प्रॉयॉरिटीचा मुद्दा आहे. पूर्वी यासाठी दहा वर्षाची अट होती. सन 2011 मध्ये नवीन गाईड लाईन्स काढण्यात आल्या त्यामध्ये ही अट तीन वर्षाची केलेली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा प्रश्न तीन वर्षे दहा वर्षे या संबंधातील नाही. पती-पत्नी एकत्रिकरणामध्ये जर पत्नी शहरामध्ये काम करीत असेल तर पती शहरामध्ये बदली मागतो आणि पती शहरामध्ये काम करीत असेल तर पत्नी शहरामध्ये बदली मागते. ग्रामीण भागामध्ये रिक्त जागांवर नियुक्ती झाल्यावर पती-पत्नी एकत्रिकरणाचा नियम लावून बदली मागतात. त्यामुळे ग्रामीण भागातील शाळांना कुलूप लागत आहेत. तेव्हा पती-पत्नी एकत्रिकरण करीत असताना पत्नी जर खेड्यामध्ये काम करीत असेल तर पतीची खेड्यामध्ये बदली करावी जेणेकरुन ग्रामीण भागातील शाळांना कुलूप लागणार नाहीत. तेव्हा याबाबत शासन विचार करील काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी अतिशय चांगली सूचना केलेली आहे. ग्रामीण भाग शिक्षणापासून वंचित राहू नये,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11981....

श्रीमती पंकजा मुंडे...

जिल्हापरिषदेच्या शाळांना कुलूप लागू नये आणि ग्रामीण भागातील मुलांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी ज्या ठिकणी मागासलेला भाग आहे त्या ठिकाणी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यास सुरुवात केलेली आहे. आम्ही डिसेन्ट्रलायझेशन सुरु केलेले आहे. त्याच धर्तीवर पती-पत्नी शिक्षकांना एकत्रिकरण पाहिजे असेल तर सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना अतिशय चांगली आहे, आम्ही ती सूचना इनकॉर्पोरेट करु

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, अनुसूचित क्षेत्रांचे अधिकार सुरक्षित ठेवून राज्याचे एक रोष्टर करणे शक्य आहे, तसे रोष्टर शासन करणार आहे काय ? लिग्वीजिस्टीक डिसॲडव्हेन्टेज ग्रुप आणि जिओग्राफीक डिसॲडव्हेन्टेज ग्रुप या दोन ग्रुपसाठी जे जे शिक्षक त्या त्या भागामध्ये जाण्यासाठी तयार असतील तर त्यांना आपण प्राधान्य दिले तर हा प्रश्न सुटू शकतो. तेव्हा शासन राज्याचे एक रोष्टर करणार का ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, राज्याचे रोष्टर एक करण्याच्या संदर्भात मी अगोदरच उत्तर दिलेले आहे की हा निर्णय फक्त ग्राम विकास विभाग घेऊ शकणार नाही. लिग्वीजिस्टीक डिसॲडव्हेन्टेज ग्रुप आणि जिओग्राफीक डिसॲडव्हेन्टेज ग्रुपची बाब विचारात घेऊन त्यांना प्राधान्य देण्याची भूमिका आहे. हा विषय जास्त संवेदनशीलतेने हाताळण्याची गरज आहे. त्या त्या भागातील शिक्षक त्या त्या भागात जाण्यास तयार असतील तर त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गेवराई (जि.बीड) तालुक्यातील अमृता नदीचे पुनर्जीवन करणेबाबत

(2) * ११८३० श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गेवराई तालुक्यातील अमृता नदीचे पुनर्जीवन करुन नदी पात्रात साखळी बंधाऱ्याची कामे मंजूर करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २ सप्टेंबर, २०१५ रोजी बीड येथील दुष्काळ आढावा बैठकीत या कामाचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले होते, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, अमृता नदीच्या पुनर्जीवन कामाचे सर्व्हेक्षण करण्यास प्रत्यक्ष केव्हा सुरुवात होणार आहे,

(4) असल्यास, सदर कामास शासनाच्या कोणत्या योजनेतून निधी मंजूर केला जाणार आहे,

(5) असल्यास, दुष्काळी प्रदेशातील नदीचे पुनर्जीवन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(6) नसल्यास, सर्व्हेक्षण व अंदाजपत्रक तयार करण्याच्या कामास झालेल्या विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री.विजय शिवतारे, श्रीमती पंकजा मुंडे यांच्याकरिता : (१) हे, खरे आहे.

गेवराई तालुक्यामध्ये अमृता नदीचे पुर्नज्जीवन करण्याबाबत लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी कार्यालयास निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

(2) सर्वसाधारण सूचना देण्यात आलेली आहे.

(3) सदर नदीवर सिमेंट नाला बांध या माध्यमातून पाणी अडविण्याकरीता आराखडा सादर केला आहे. कार्यकारी अभियंता, लघु सिंचन जलसंधारण यांना सदर कामाचे सर्वेक्षण करुन सविस्तर आराखडा सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी बीड यांच्याकडून देण्यात आलेले आहेत.

(4) नदीपुनर्जीवन कार्यक्रमातील सिमेंट नालाबांधास साखळी सिमेंट नाला बांध कार्यक्रमातुन निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असुन उर्वरीत कामे अभिसरनातुन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11830...

श्री.विजय शिवतारे...

(5) जलयुक्त शिवार अभियाना अंतर्गत तसेच नदी पुनर्जीवन करण्यासंदर्भात शासन निर्णय, दि.८ डिसेंबर, २०१५ रोजी निर्गमित केला आहे.

(6) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, अमृदा नदीचे पुनर्जीवन करण्यासंदर्भातील हा महत्वाचा प्रश्न आहे. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या अमृता नदीवर 45 खेडी अवलंबून आहेत. तसेच जवळपास 34 ग्रामपंचायती अवलंबून आहेत. 34 ग्रामपंचायती पैकी 29 ग्रामपंचायतींना टँकरने पाणी पुरवठा होत आहे. माननीय मुख्यमंत्री बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते त्यावेळी त्यांनी बैठक घेतली होती. त्यावेळी मंत्री महोदया देखील उपस्थित होत्या. त्या बैठकीमध्ये मी माननीय मुख्यमंत्र्यांना अमृता नदीच्या पुनर्जीवनासंबधी विचारणा केली होती. त्यावेळी त्यांनी या कामाच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले होते. परंतु दुर्दैवाने अमृता नदीच्या पुनर्जीवनाच्या संदर्भातील अंदाजपत्रकाच्या कामास अजून सुरुवात झालेली नाही. लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, नदीचे पुनर्जीवन करण्याचे तसेच त्या ठिकाणी साखळी बंधारे बांधण्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे आदेश संबंधित यंत्रणेला दिलेले आहेत. परंतु त्या कामांची अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली नाहीत. त्याठिकाणी पोखरण-1 काम सुरु झालेले आहे आणि ते काम आता बंद पडलेले आहे. अंदाजपत्रक तयार न होता सुरु झालेले काम बंद पडलेले आहे. माझा प्रश्न आहे की, अमृता नदीच्या पुनर्जीवनाच्या कामाचे अंदाजपत्रक एक महिन्यात करण्याचे आदेश शासन देईल काय ? अमृता नदीच्या उगमापासून ते गोदावरी नदीपर्यंतचे अंतर 17 कि.मी. आहे. अमृता नदीचे रुंदीकरण आणि खोलीकरण एवढ्या पुरता काम मर्यादित न ठेवता बंधाऱ्याच्या कामासहित ही कामे पूर्ण करण्याचा निर्णय तातडीने घेणार आहात काय ?

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, अमृता नदीचे पुनर्जीवन करण्याच्या कामाचे आदेश माननीय मुख्यमंत्र्यांनी भेटीच्या वेळीच दिले होते. या कामाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी दिनांक 12.10.15 आणि 23.10.2015 रोजी पत्र दिली होती. तसेच अन्य लोकप्रतिनिधींची पत्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11830...

श्री.विजय शिवतारे...

देखील आलेली आहेत. या ठिकाणी 17 कि.मी.चे सर्वेक्षण करायचे आहे. नदीचे खोलीकरण, रुंदीकरण करणे, कुठे सिंमेट बंधारा बांधता येईल, कुठे कोल्हापुर पद्धतीचा बंधारा बांधता येईल या सर्व गोष्टींचे सर्वेक्षण करण्यासाठी महिना ते दीड महिन्याचा कालावधी लागेल. अमृता नदीच्या पुनर्जीवनाच्या कामासंबंधीचा प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्यात आलेला असून त्याचे प्रेझेन्टेशन देखील काही दिवसांपूर्वी दाखविण्यात आले होते. आपणा सर्वांना कल्पना आहे की, राज्य शासनाने जलयुक्त शिवार अभियानामध्ये नदी पुनर्जीवनाच्या योजनेचा समावेश केलेला आहे. त्यानुसार तसा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. खळेगाव-सीना बंधारा-1, खळेगाव-सीना बंधारा-2, खळेगाव-सीना बंधारा-3 आणि खळेगाव-सीना बंधारा-4 या कामासाठी 56.81 लाख रुपये खर्च आहे आणि त्याची क्षमता साठवणूक क्षमता 23.86 इतकी आहे तर जवळपास 6 हेक्टरला या पाण्याचा उपयोग होईल.

....E-1

,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय शिवतारे....

सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, जलसंपदा विभागाची यंत्रसामुग्री, डिझेल देऊन काही काम निश्चित स्वरूपात झालेले आहे. ते काम किती प्रमाणात झाले याची माहिती माझ्याकडे आहे. शासनाने मध्यंतरी एक शासन निर्णय काढला आहे. हे खरे आहे की, आपण नदी पुनर्जीवन प्रकल्प राबवित आहोत. परंतु यामध्ये एक अट अशी आहे की, ज्या ठिकाणी लोकसहभागातून मोठ्या प्रमाणात नदी खोलीकरण व रुंदीकरणाचे काम झाले असेल त्या ठिकाणी सरकारकडून सिमेंट बंधारे बांधण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी लोकसहभागातून तेवढ्या मोठ्या प्रमाणात काम झालेले नाही. जलसंपदा विभागाच्या यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून काम होत आहे. त्या ठिकाणी संपूर्ण 17 कि.मी.पर्यंतचा पुनर्जीवनाचा प्रकल्प तयार आहे. पुढील काम हे मान्यता मिळाल्यानंतर त्वरित सुरु करण्यात येईल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या नदीचे अंतर 17 कि.मी. आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देताना चार बंधाऱ्यांचा उल्लेख केला. वास्तविक पाहता संपूर्ण 17 कि.मी. अंतरावर साधारणात: 9 बंधाऱ्यांची कामे होणे आवश्यक आहे. मी विचारु इच्छितो की, खोलीकरण आणि रुंदीकरणाबरोबरच 9 बंधाऱ्यांचे काम करण्यात येईल काय ? माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, या विषयी अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरु आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, सदरहू कामाचे अंदाजपत्रक लवकरात लवकर तयार करुन दिनांक 30 मे पूर्वी खोलीकरण व रुंदीकरणाच्या कामांसह बंधाऱ्याची कामे पूर्णत्वाकडे नेण्याचा शासन निर्णय घेईल काय ?

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, डीपीआर हा संपूर्ण नदीच्या पनुर्जीवनाचा केला जातो. सन्माननीय सदस्यांनी मागणी केली की, एकाच टप्प्यात संपूर्ण काम करावे. परंतु असे होत नाही. संपूर्ण 17 कि.मी. च्या कामासाठी 8-9 कोटी रुपये खर्च येणार आहे. आता पहिल्या टप्प्यात चार-पाच बंधाऱ्याचे आणि त्यानंतर करावयाच्या बंधाऱ्याचे काम काही टप्प्यात हाती घेऊन पूर्ण करण्यात येईल. कारण अशाप्रकारे टप्प्याटप्प्याने संपूर्ण राज्यात काम करण्याबाबतची घोषणा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11830....

श्री.विजय शिवतारे....

राज्य सरकारने केलेली आहे. बीड जिल्ह्यातील गेवराई हा डीपीएपी मध्ये येत असल्यामुळे आणि माननीय मंत्री महोदया त्या जिल्ह्यातील असल्यामुळे या कामावर निश्चितपणे प्राधान्याने लक्ष देण्यात येत आहे. त्यामुळे मी पुनश्च सांगू इच्छितो की, हे संपूर्ण काम टप्प्याटप्प्याने करण्यात येईल, त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी काळजी करता कामा नये.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंदूरबार जिल्ह्यात तापी नदीवरील बॅरेजचे पाणी उपसा सिंचन योजनेतंर्गत शेतीला देण्याबाबत

(३) * ११६९२ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त : सन्माननीय जलसंपदा मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदूरबार जिल्ह्यात तापी नदीवर बॅरेज बांधून अडविलेले पाणी शेतक-यांच्या शेतात उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून पोहचविण्याचे आश्वासनास एक वर्ष होऊनसुद्धा कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान उपोषणाला बसले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांचे त्वरित उपोषण सोडवावे व सहकारी उपसा सिंचन योजना त्वरित सुरु करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५ रोजी जलसंपदा मंत्री महोदयांकडे निवेदनाद्वारे मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) ***होय***
(२) होय.
(३) धुळे व नंदूरबार जिल्ह्यातील २२ सहकारी उपसा सिंचन योजना कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक दुरुस्तीचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून पुढील प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, नंदूरबार व धुळे जिल्ह्याला तापी नदी ही एक वरदान ठरलेली आहे. या नदीवर नंदूरबार व धुळे जिल्ह्यात शासनाने प्रकाशा, सुलवाडा आणि सारंगखेडा असे तीन बॅरेज बनविले आहेत. या तीन बॅरेजमध्ये साधारणत: दरवर्षी 30-30 फूट पाणी अडविले जाते. त्यानंतर ते गुजरात राज्यासाठी सोडून दिले जाते ही वस्तुस्थिती आहे. त्या पाण्याचा उपयोग केवळ मासे पकडण्यासाठी होत आहे. त्या पाण्याचा प्रत्यक्ष शेतीला उपयोग होत नाही हे आमचे दुर्दैव आहे. त्यामुळे तापी नदीवर सहकाराच्या माध्यमातून पूर्वीच्या काळात सुरु असलेल्या उपसा सिंचना योजना तत्काळ सुरु कराव्यात असा प्रस्ताव मागच्या शासनापासून होता. आताच्या सरकारने सुध्दा नंदूरबार व धुळे जिल्ह्यातील जनतेला मार्च-2015 पर्यंत 64 उपसा सिंचन योजनांपेक्षी 22 योजना सुरु करण्यात येतील असे अभिवचन दिले हाते. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, अजूनपर्यंत या कामाला प्रशासकीय मंजुरी मिळाली नाही, परिणामी कामाला सुरुवात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) E-4

SJB/ ST/ AKN/ 12:40

ता.प्र.क्र.11692....

श्री.चंद्रकांत रघुवंशी....

झाली नाही. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, 22 उपसा सिंचन योजनांच्या कामाला किती दिवसात प्रशासकीय मंजुरी मिळेल आणि कामास कधी सुरुवात होईल, तसेच या योजनेचे काम खाजगी यंत्रणेला देणार आहात, तापी महामंडळाकडे सोपविणार आहात की अन्य कोणत्या विभागाच्या माध्यमातून हे काम करण्यात येणार आहे ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, नंदूरबार आणि धुळे जिल्ह्याच्या दृष्टीने उपसा सिंचन योजना अतिशय महत्त्वाची आहे. प्रकाशा बॅरेजवर 22 उपसा सिंचन योजना आहेत, या संदर्भातील हा मुख्य प्रश्न आहे. या विषयी सन्माननीय सदस्यांनी मला दोन वेळा पत्र दिलेले आहे. या विषयी सर्व संबंधितांची बैठक आयोजित केली होती. परंतु सन्माननीय सदस्यांना वेळ नसल्यामुळे सदरहू बैठक पुढे ढकलण्यात आली होती. परंतु नंतर ती होऊ शकली नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्या भागामध्ये 22 उपसा सिंचन योजना आहेत. त्या कालखंडात नदीच्या वाहत्या पाण्यावर या योजना झाल्या आहेत. 1980 ते 1986 च्या दरम्यान या योजना झालेल्या आहेत. परंतु कालांतराने नदीचे पाणी कमी झाले वा आटले. त्यामुळे या योजना कार्यान्वित झाल्या नाही. त्या योजना तशाच पडून राहिल्या व नंतर त्या योजनेवरील मोटारी व ट्रान्सफॉर्मर्स नादुरुस्त झाले. परंतु आमच्या पक्षाचे सरकार आल्यानंतर आम्ही अगोदर तेथील बॅरेजचे काम पूर्ण केले. त्या ठिकाणी 60 टीएमसी पाणी साठले. त्यानंतर या योजनांच्या बाबतीत पुन्हा प्रश्न निर्माण झाला की, या योजना पुन्हा कार्यान्वित झाल्या पाहिजे. सध्या 22 उपसा सिंचन योजना असून, 60 टीएमसी पाणी उपलब्ध आहे. यातून 14500 हेक्टर क्षेत्र म्हणजेच 35 हजार एकर शेतीला पाणी मिळणार आहे. हे खरे आहे की, मोटारी व ट्रान्सफॉर्मर्स नादुरुस्त असल्यामुळे त्या योजना तशाच पडून आहेत. या विषयी शेतकऱ्यांनी सुध्दा आंदोलन केले आहे. या प्रकल्पाच्या दुरुस्तीच्या कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार केले आहे. तो प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबित आहे. त्या प्रस्तावाला लवकरात लवकर प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर कामाला सुरुवात करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) E-5

SJB/ ST/ AKN/ 12:40

ता.प्र.क्र.11692....

श्री.गिरीष महाजन....

सभापती महोदय, सदरहू काम कोणत्या एजन्सीला देण्यात येईल अशी सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली आहे. मी सांगू इच्छितो की, हे काम ई-निविदा पध्दतीने देण्यात येईल किंवा आमच्या मेकॅनिकल विभागाच्या माध्यमातून हे काम पूर्ण करण्यात येईल. सदरहू योजनेच्या दुरुस्ती कामाचे 41 कोटी 80 लाख रुपये रकमेचे प्राथमिक अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या रकमेमध्ये काटकसर करता येईल काय, हे बघितले जाईल. कारण सदरहू प्रस्तावात मोटारी व ट्रॉन्सफॉर्मर्सची नव्याने खरेदी करण्याचे सुचविले आहे. त्या ठिकाणी जुन्याच मोटारी व ट्रॉन्सफॉर्मर्स दुरुस्त करुन ते वापरता येईल काय, हे बघितले जाईल. ही बाब शक्य झाल्यास त्यातून 7-8 कोटी रुपयांची बचत होऊ शकेल, असा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे विभागाला सादर करण्यात आलेला प्रस्ताव संबंधितांना पुन्हा तपासण्यास सांगितलेले आहे. अधिवेशनानंतर मी आणि संबंधित अधिकारी प्रत्यक्ष योजनेच्या ठिकाणी जाऊन पाहणी करणार आहेत. त्यानंतर त्या प्रस्तावाला तत्काळ मंजुरी देण्यात येईल. ही योजना कशी पूर्ण करता येईल या बाबत शासन गंभीर आहे.

श्री.मुझफ्फर हुसैन : सभापती महोदय, मी स्पेसिफिक विचारतो की, तापी आणि बुराई उपसा सिंचन योजनेचे काम अत्यंत धिम्या गतीने सुरु आहे, हे खरे आहे काय, असल्यास, उपसा सिंचन योजनेचे काम शासन किती दिवसांत पूर्ण करणार आहे ? सभापती महोदय, राज्यभरात उपसा सिंचना योजनांची कामे पूर्ण करण्यात येतात. परंतु या कामाला पाहिजे त्या प्रमाणात गती मिळत नाही. तसेच जी कामे झालेली आहेत त्या ठिकाणी बऱ्याच वेळा पाणी सोडले जात नाही, हे खरे आहे काय ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, 1996 पासून ही योजना बंद आहे. आमचे सरकार आल्यानंतर मी त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. सदरहू काम लवकरात लवकर करण्यात येईल असे मी आश्वासन सुध्दा दिलेले आहे. मी पुन्हा सांगतो की, या कामाच्या दुरुस्तीचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अंदाजपत्रक तयार झाले आहे. त्याला आता प्रशासकीय मान्यता द्यावयाची आहे. महोदय, दुरुस्तीच्या अंदाजपत्रकाला मान्यता मिळाल्यानंतर हे काम तत्काळ सुरु करण्यात येईल.

17-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) E-6

SJB/ ST/ AKN/ 12:40

ता.प्र.क्र.11692....

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, चुकीचे उत्तर रेकॉर्डवर येऊ नये. तापी आणि बुराई ही आताच्या सरकारने सुरु केलेली योजना आहे. या योजनेचे काम 8-10 कि.मी. पर्यंत झालेले आहे. परंतु ते काम एक वर्षापासून बंद पडलेले आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, ते काम तत्काळ सुरु करण्यात येईल काय ? तसेच 22 उपसा सिंचन योजनांची कामे तापी महामंडळानेच करावी आणि त्यांनीच या योजना चालवाव्यात अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. हे काम शासनाने खाजगी ठेकेदाराला दिले तर त्यात भ्रष्टाचार झाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे तापी महामंडळाच्या माध्यमातून ही कामे किंवा कामाची दुरुस्ती करण्यात येईल काय ?

सभापती : सन्माननीय सदस्य, असे कधी होत नाही. एजन्सी नेमल्याशिवाय काम कसे करता येईल ? तापी महामंडळ जर तयार झाले तर...

श्री.चंद्रकांत रघुवंशी : महोदय, तापी महामंडळाकडे मेकॅनिकल डिव्हीजन आहे. ते हे काम करु शकतात.

सभापती : ठीक आहे. तशी सोय असेल तर त्या दृष्टीने विचार करावा.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, या योजना अल्प खर्चात सुरु झालेल्या आहेत. त्यामुळे या योजनांची दुरुस्ती सुध्दा अल्प खर्चात होणार आहे. त्यामुळे मी माननीय मंत्र्यांना स्पेसिफिक विचारतो की, मार्च-2016 च्या आत योजनांच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल काय ?

श्री.गिरीष महाजन : सभापती महोदय, प्रकाशा आणि बुराई या योजनांच्या बाबतीत प्रश्न विचारण्यात आला आहे. ही शासकीय योजना आहे. परंतु हा प्रश्न सहकारी उपसा सिंचन योजनांचा आहे. हे काम वेगाने सुरु आहे आणि ते लवकरात लवकर करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांना सांगू इच्छितो की, या योजनेच्या दुरुस्ती कामाचे 40 कोटी रुपये रकमेचे अंदाजपत्रक सादर केले आहे. त्यामुळे हे काम ई-निविदा पध्दतीने देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : ठीक आहे. मला वाटते माननीय मंत्र्यांनी नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

..ई...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11692 ....

श्री. गिरीष महाजन : सभापती महोदय, हे काम ई-टेंडरने देण्यात येईल किंवा स्वतः विभागाच्या तर्फे करतील. सन्माननीय सदस्यांनी भीती बाळगू नये.

सभापती : ठीक आहे. सन्माननीय सदस्यांना उत्तर मिळाले आहे. आता पुढील प्रश्न घेण्यात आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंधुदुर्ग जिल्हयात डॉक्टरांची रिक्त पदे, आरोग्य यंत्रणेतील त्रुटी तसेच दर्जेदार औषधांचा तुटवडा यामुळे रुग्णांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत

*(४) * ११९४८ श्री.विजय गिरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये: सन्माननीय सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-*

(१) सिंधुदुर्ग जिल्हयात डॉक्टरांची रिक्त पदे, आरोग्य यंत्रणेतील त्रुटी तसेच दर्जेदार औषधांचा तुटवडा यामुळे अत्याधुनिक उपचारपध्दती नसल्याने रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, साथीच्या रोगांची सातत्याने वाढ होत असून लेप्टो, डेंग्यू, स्वाईन-फ्ल्यू सारख्या आजाराने बरेच रुग्ण दगावत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कणकवली उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांची रिक्त पदे तसेच अत्याधुनिक सेवा उपलब्ध नसल्याने रुग्णांना बाबुळी, गोवा व कोल्हापूर या ठिकाणी जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर किंवा गोवा या ठिकाणी रुग्णांना उपचारासाठी नेताना रुग्णांचा मृत्यू होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) *व* (२) *हे खरे नाही.*

सिंधुदुर्ग जिल्ह्यात १ जिल्हा रुग्णालय, ३ उपजिल्हा रुग्णालय, ७ ग्रामीण रुग्णालय व ३८ प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित असून वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या १८८ मंजूर पदांपैकी १०५ पदे भरलेली आहेत. रिक्त पदावर १७ वैद्यकीय अधिकारी कंत्राटी पध्दतीने व ५ आयुष वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे. सदर आरोग्य संस्थामध्ये साधनसामुग्री, उपकरणे, साहित्य, औषधे यांचा नियमित व पुरेसा पुरवठा करण्यात आला आहे. लेप्टो स्पायरोसीस, डेंग्यु, स्वाईन फ्ल्यू या आजारावरील उपचारांची सोय जिल्हा, उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयात उपलब्ध आहे. या आजारांचा फैलाव होऊ नये, याकरिता आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना पावसाळ्याच्या सुरुवातीपासूनच केल्या आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

अपघातात मेंदुला गंभीर इजा झालेल्या रुग्णांच्या विशेष उपचारासाठी आवश्यक असलेली सुविधा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शासकीय तसेच खाजगी रुग्णालयात उपलब्ध नसल्याने अशा रुग्णांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोवा येथे पाठविण्यात येते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातून तापाने आजारी असलेल्या गंभीर रुग्णांना शासकीय महाविद्यालय गोवा व कोल्हापूर येथे संदर्भित करण्यात येते. सदर रुग्णांना मदत मिळण्यासाठी औषधे उपलब्ध करणे व समन्वय करण्यासाठी मदत कक्षाची स्थापना केलेली आहे.

(४) उपजिल्हा रुग्णालय कणकवली येथून एप्रिल, २०१५ ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत विविध आजारांचे एकूण ३१ रुग्ण शासकीय रुग्णालय बाबुळी, गोवा येथे पाठविण्यात आले असून त्यापैकी कोणत्याही रुग्णाचा उपचारासाठी नेताना मृत्यू झाल्याची नोंद नाही.

(५) व (६) *प्रश्न उद्भवत नाही.*

श्री. भाई गिरकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सकारात्मक उत्तर दिले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड सार्वजनिक रुग्णालय आहे तसेच पडेलचेही रुग्णालय आहे. देवगड व पडेल अंतर खूप आहे. अजुनही तेथे आवश्यक सुविधा नाहीत. शासनाची अडचण आहे. कोकणात

अशुद्धीसह प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11948 ....

श्री. भाई गिरकर ....

मुलांना शाळा नाही म्हणून डॉक्टर जात नव्हते. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, काही डॉक्टर गेले आहेत. परंतु तरी सुध्दा अजून 80 डॉक्टरांची आवश्यकता आहे. माझी या संदर्भात विनंती आहे. सर्व डॉक्टरांचे नियोजन होऊन रुग्णालये किंवा आरोग्य केंद्रे चांगल्याप्रकारे चालण्यासाठी माननीय मंत्र्यांची काय योजना आहे ?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात डॉक्टरांची कमतरता आहे हे जरी खरे असले तरी आम्ही प्रामाणिकपणे डॉक्टरांची पदे भरण्यासाठी खूप प्रयत्न करत आहोत. पण सिंधुदुर्ग जिल्ह्यात डॉक्टर जाण्यास तयार नाहीत ही गोष्टही खरी आहे. आम्ही अस्थायी डॉक्टर नेमण्यासाठी विशेष तरतूद देखील केली आहे आणि त्यानुसार आम्हाला फक्त 11 डॉक्टर मिळाले आहेत. आमची गरज यातून भागत नाही. मी आपल्याला थोडक्यात आडेवारी देतो. सिंधुदुर्ग जिल्ह्यात रुग्णालयासांठी मंजूर पदे 85 आहेत आणि प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी मंजूर पदे 84 आहेत. एकूण 169 पदे आहेत, त्यापैकी भरलेली पदे 124 आहेत, रिक्त पदांची संख्या 45 आहे, पीजीसाठी गेलेल्या डॉक्टरांची संख्या 10 आहे, ॲब्स्कॉंडेड डॉक्टर 9 आहेत आणि प्रत्यक्ष कार्यरत डॉक्टर 105 आहेत. पोकळी भरून काढण्यासाठी एनआरएचएम मार्फत 42 डॉक्टर घेतले आहेत. त्यामुळे डॉक्टरांची संख्या जवळपास 147 वर पोहचत आहे. पीजीला गेलेल्या डॉक्टरांसाठी एक गोष्ट करणे आवश्यक आहे. कारण डॉक्टर पीजीला जातात, त्यामुळे तिकडचे पद भरलेले दिसते, पण ते पद प्रत्यक्षात रिक्त असते. त्यामुळे त्यासाठी आपण शासनाकडे अधिक संख्येची पद भरती करण्यासाठी विनंती केली आहे. ती फाईल लवकरच क्लिअर होईल असे आम्हाला वाटते. आपण निश्चितपणे ही पदे भरणार आहोत.

सभापती महोदय, शासनाचा 4 टक्के भरतीचा निर्णय होता. एकूण रिक्त पदांच्या 4 टक्के पद भरती करावी या शासन निर्णयामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीने शिथिलता आणून आरोग्य खात्यासाठी 75 टक्के पद भरतीसाठी नुकतीच मान्यता मिळाली आहे. जानेवारी महिन्यापासून रिक्त पदांच्या 75 टक्के पद भरती करण्यात येईल. आपण 'क' व 'ड' गटाची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11948 ....

डॉ. दीपक सावंत ....

देखील भरती करू शकू. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील स्थिती थोडीशी सुधारेल असे वाटते.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय मंत्री विरोधी पक्षात होते, त्यावेळी सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या बाबतीत त्यांनी पुष्कळ प्रश्न विचारले होते. आज उत्तरात असे दिसत आहे की, प्राथमिक आरोग्य केंद्र 38 असताना वेगवेगळ्या गावांत जाण्यासाठी तिकडे वाहने होती. आपण आता प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी, उप जिल्हा रूग्णालयासाठी, जिल्हा रूग्णालयासाठी किती वाहने सुरू आहेत ते पहावे. मुंबई व गोवा हायवेवर अपघातांचे प्रमाण जास्त आहे असे निदर्शनास आले आहे. आपल्या उत्तरात आपण सांगत आहात की, अपघात होऊन मेंदूला गंभीर इजा झाल्यास रूग्णाच्या विशेष उपचारासाठी आवश्यक ती सुविधा सिंधुदुर्ग जिल्ह्यात नाही. रूग्णांना गोवा व कोल्हापूरला न्यावे लागत आह. आपण उत्तरात असे सांगत आहात. आपल्याला या सुविधा देण्यासाठी किती काळ लागणार आहे. आपण उत्तरात सांगत आहात की, बाधित रूग्णांची संख्या कमी आहे. आपण या सदनाची दिशाभूल करत आहात. आपणाला यावर खऱ्या अर्थाने काम करायचे असेल तर वाहनांची संख्या सांगावी. हायवेवर होणाऱ्या अपघातांच्या संदर्भात सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी काय व्यवस्था करणार आहात ? सिंधुदुर्ग जिल्ह्यात जाण्यास डॉक्टर तयार नसतात, ही बाब धादांत खोटी आहे. डॉक्टरांना राहण्यास प्राथमिक आरोग्य केंद्रात घरे देखील ठेवली नाहीत, वाहने देखील ठेवलेली नाहीत. मग डॉक्टर कशाला जातील ? डॉक्टरांसाठी, स्टाफसाठी सोयीसुविधा होत्या, त्या पूर्ववत किती दिवसांत करणार आहात ?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी विरोधी पक्षात असताना सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या प्रश्नांसाठी आग्रही होतो ही गोष्ट खरी आहे. पण तीच कमतरता लक्षात घेऊन हे सर्व प्रयत्न करत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात 108 क्रमांकाच्या रूग्णवाहिकांची संख्या वाढली आहे. आपण बाकीचे नॉर्म्स बाजूला ठेवून सिंधदुर्गात एखादा रूग्ण आजारी पडला तर त्याला मुंबईपर्यंत आणण्यासाठी 108 क्रमांकाची सेवा देतो. वास्तविक शासनाने केलेल्या 108 क्रमांकाच्या करारात ही सुविधा नाही. पण आपण रूग्णाला मुंबईपर्यंत विनामूल्य आणण्यासाठी परवानगी देतो. तसेच आपल्याकडे ज्या-ज्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11948 ....

डॉ. दीपक सावंत ....

शस्त्रक्रिया होत नाहीत, मेंदूच्या सर्जरी होत नाहीत त्यासाठी बॅम्बोलिम रुग्णालयात देखील पाठविण्यासाठी परवानगी देतो. आता राजीव गांधी योजनेमध्ये बॅम्बोलिम रुग्णालय तसेच बेळगावचे केएलएस रुग्णालय यांच्याशी टायप करून अशा प्रकारच्या जोखमीच्या शस्त्रक्रिया तेथे देखील विनामूल्य करण्याची सोय केली आहे. त्यामुळे 108 क्रमांकाचा करार असला तरी देखील आपण मोठ्या प्रमाणात त्यात शिथिलता आणली आहे. मी माहिती देऊ इच्छितो की, एकंदर 10 ॲम्ब्यूलन्स फिरत आहेत तसेच रक्तसंकलनासाठी मोबाईल रक्तसंकलन तयार केले आहे. 7 बेसिक ॲम्ब्युलन्स आहेत आणि 3 एएलएस ॲम्ब्युलन्स आहेत म्हणजेच ॲडव्हान्स ॲम्ब्युलन्स आहेत. सर्व ॲम्ब्युलन्सेस चालू स्थितीत आहेत. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे 31 रुग्णांपैकी एकालाही हेड इन्ज्युरी झालेली नाही. 31 जण बॅम्बोलिम रुग्णालयामध्ये गेले हे खरे आहे. मात्र त्यामध्ये हेड इन्जुरी होऊन रस्त्यात दगावण्याचा एकही प्रकार घडलेला नाही हे मी तुम्हाला जाणीवपूर्वक व प्रामाणिकपणे सांगतो. मला कोणत्याही गोष्टी लपवायच्या नाहीत. सन्माननीय सदस्य सिंधुदुर्गचे आहेत, तसा मी देखील आहे, त्यांचे दु:ख ते माझे दु:ख आहे. आम्ही या गोष्टींकडे संवेदनशीलपणे पाहत आहोत.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या अगोदरच सांगितले आहे की, माननीय आरोग्य मंत्री विरोधी पक्षात असताना या संदर्भात प्रश्न मांडत होते. आरोग्य सुविधा देण्यामध्ये राज्यात सर्वात दुर्बल जिल्हा कोणता असेल तर तो सिंधुदुर्ग जिल्हा आहे. योगयोगाने तो माननीय आरोग्य मंत्र्याचाही जिल्हा आहे. त्यामुळे या जिल्ह्याकडे अतिशय बारकाईने लक्ष देऊन या जिल्ह्याचे मॉडेल करण्याची आवश्यकता आहे. माननीय मंत्री सांगत आहेत की, आपण या बाकीच्या रुग्णालयांचा वापर करून सोय करत आहोत. ही सर्व तात्पुरती सोय झाली. पदे भरल्यानंतर येथील इन्फ्रास्ट्रक्चर प्राधान्याने उभे केले पाहिजे, डॉक्टर तेथे राहण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या केल्या तर बरे होईल. दुर्दैवाने कोकणात एकही मेडिकल कॉलेज नाही हेही आपल्याला माहीत आहे. आपल्या जिल्ह्याच्या या सबंध परिसरात एखादी मोठी इन्स्टिट्यूट मग ते सरकारचे मेडिकल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11948 ....

श्री. हेमंत टकले ....

कॉलेज असेल किंवा दुसरे कोणते मेडिकल कॉलेज असेल त्या निमित्ताने इन्फ्रास्ट्रक्चर उभे राहू शकते आणि त्यातून या प्रश्नांची निश्चितपणे सोडवणूक होण्यास मदत होणार आहे. शासन त्या दृष्टीने प्रयत्न करणार आहे का ?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची सूचना नक्कीच स्वागतार्ह आहे. आपल्या मताशी मी सहमत आहे. जोपर्यंत कोकणात स्पेशली सिंधुदुर्गमध्ये मेडिकल कॉलेज होत नाही, तोपर्यंत तेथील आरोग्य व्यवस्था सुधारणार नाही ही गोष्ट बरोबर आहे. राज्य सरकारने पीपीपी मॉडेलवर देखील प्रत्येक जिल्ह्यामध्ये मेडिकल कॉलेज करावे अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत आणि त्यासाठी सरकार कटिबध्द देखील आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 16 नवीन डायलेसिस सेंटर सुरू केली. माफ करा. डायलेसिस मशिन दिल्या. पूर्वी फक्त 6 होत्या. कोकणात किडणीचे आजार जास्त होतात. त्यामुळे ही सुध्दा सुविधा केली आहे. प्रत्येक वेळी शिबिरे घेऊन अशा प्रकारे रूग्णांची सेवा करत आहोत.

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नातील, अत्याधुनिक उपचारपध्दती नसल्याने रूग्णांची गैरसोय होत आहे हे खरे आहे का, या प्रश्नाला उत्तर देताना, हे खरे नाही, असे सांगितले आहे. तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर देताना, सिंधुदुर्ग जिल्ह्यातून तापाने आजारी असलेल्या गंभीर रूग्णांना शासकीय महाविद्यालय गोवा व कोल्हापूर येथे पाठविले जात आहे, असे सांगितले आहे. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, त्यांना सिंधुदुर्गामध्ये सोयीसुविधा मिळत नाहीत, त्यामुळे कोल्हापूर, गोव्याला जात आहेत. दोन्ही उत्तरांमध्ये वेगळेपणा, विषमता आहे. गैरसोय आहे ही वस्तुस्थिती आहे.

....G

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11948.....

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. तथापि, तारांकित प्रश्न क्रमांक 11379 पूर्ण होईपर्यंत मी प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ वाढवीत आहे.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात असे सांगितले की, काही डॉक्टर्स ॲबस्कॉंडिंग आहेत. शासन म्हणून आपण त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करणार आहात ? डॉक्टरांच्या मुलांचे शिक्षण आणि अन्य सुविधा शासन उपलब्ध करुन देणार आहे का ? मुंबई-गोवा हाय-वे असल्यामुळे त्या ठिकाणी घडणाऱ्या अपघातांचे प्रमाणही मोठे आहे. त्यामुळे त्या ठिकाणी इंटेन्सिव्ह केअर युनिट आणि ट्रॉमा केअर युनिट आपण कधी सुरु करणार आहात ?

डॉ.दिपक सावंत : सभापती महोदय, मागील सरकारच्या काळातच तेथे ट्रॉमा केअर युनिट सुरु झालेले आहे. त्या ठिकाणी दर्जेदार आरोग्य सुविधा, एसएनसीयु उपलब्ध असून त्यामध्ये 85 दर्जेदार सुविधांचा समावेश आहे. ट्रॉमा केअर युनिट हा देखील दर्जेदार सुविधांचाच भाग आहे.

सभापती महोदय, ॲबस्कॉंडिंग डॉक्टरांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. अशा डॉक्टरांची संख्या 450 हुन अधिक असून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करुन त्यांना बडतर्फ करण्यात येणार आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात डॉक्टरांची कमतरता आहे, असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. हे डॉक्टर त्या ठिकाणी का रुजू होत नाहीत, याचा शासनाने शोध घ्यावा आणि सिंधुदुर्ग मधील जनतेला जास्तीत जास्त चांगल्या वैद्यकीय सुविधा कशा उपलब्ध होतील, हे सांगावे.

सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या प्रश्न भाग दोन ला शासनाने ""अंशतः खरे आहे" असे उत्तर दिलेले आहे. म्हणजेच, साथीच्या रोगाने बरेच रुग्ण दगावत आहेत, हे शासनाने मान्य केले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शासकीय आणि खाजगी रुग्णालयांमध्ये हेड एंज्युरी झालेल्या रुग्णांवर उपचार करणाची सुविधा उपलब्ध नाही व त्यामुळे त्यांना गोवा किंवा कोल्हापूर येथे

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11948.....

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

पाठवावे लागते. शासनाच्या वतीने ही सुविधा या जिल्ह्यात उपलब्ध करुन देण्यात येणार आहे का ?

डॉ.दिपक सावंत : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात हेड एंज्युरी झालेल्या रुग्णांना गोवा किंवा कोल्हापूर येथे पाठवावे लागते, ही वस्तुस्थिती आहे. सिटीस्कॅन, एमआरआय ही सुविधा देखील उपलब्ध नाही, हे देखील मी मान्य केले आहे. तथापि, ही सुविधा उपलब्ध करुन देण्याचे प्रयत्न सुरु आहेत. शिर्डी संस्थांनच्या माध्यमातून सिटीस्कॅन मशिन उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व सन्माननीय सदस्यांना मी आपल्या माध्यमातून विनंती करु इच्छितो की, डीपीडीसीमधून सिटीस्कॅन मशिन आपण घेऊ शकतो. सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.दिपक केसरकर यांनीही या प्रस्तावाला समर्थन दिले आहे. सन्माननीय सदस्यांनीही याबात आग्रह धरावा. भविष्यात आपण डीपीडीसी मधून सिटीस्कॅन मशिन घेणार आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात ग्रामपंचायतींना लाखांवरील कामे दरकरार पध्दतीने करण्यासाठी अनुमती मिळण्याबाबत

(5) * ११३७९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात लाखांवरील कामे ई-निविदेद्वारा करण्याचा निर्णय राज्यातील काही ग्रामपंचायतींना अडथळा निर्माण करीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, अशा ग्रामपंचायतींना दरकरार पध्दतीने कामे करण्यात अनुमती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) खरे नाही.

सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.मातंसं/नस्ती-२०१२/प्र.क्र.२७३/३९, दि.२६.११.२०१४ व दि.१८.१२.२०१४ अन्वये रु. ३ लाखापेक्षा अधिक खर्चाच्या कामांना ई.निविदा कार्यप्रणाली लागू करण्यात आली आहे. सदर शासन निर्णय सर्व शासकीय विभागाच्या अधिनस्त कार्यालये तसेच ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम आणि मंडळे (माहिती अधिकार कायदा अधिनियम-२००५ मधील कलम ४ प्रमाणे) यांना बंधनकारक राहील असे नमूद केले आहे. तसेच ग्राम विकास विभागाचा शासन निर्णय क्र.निविदा-२०१४/प्र.क्र.२६०/पंरा-७, दिनांक २७.५.२०१५ अन्वये जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत स्तरावरील रु.३ लाख व त्यापेक्षा अधिक किंमतीच्या विविध विकास कामांना ई-निविदा कार्यप्रणाली लागू करण्यात आली आहे.
(2) सामान्य प्रशासन विभाग यांचा शासन निर्णय असल्याने तो सर्व प्रशासकीय विभागांना बंधनकारक असल्याने अशी कोणतीही कार्यवाही केलेले नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

ॲड.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, शासनाने 3 लक्ष रुपयांवरील कामांसाठी ई-निविदा बंधनकारक केलेली आहे, त्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. या प्रश्नाला उत्तर देत असताना शासकीय निर्णय काय आहे आणि आता काय पध्दत आहे, याबाबतची माहिती देण्यात आली आहे. या अटीमुळे ग्राम पंचायतींच्या कामांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर अडथळे येत आहेत. 3 लक्ष रुपयांवरील कामांसाठी ई-निविदा बंधनकारक करण्यात आल्यामुळे अनेकवेळा निविदा 25 ते 30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ११३७९.....

ॲड.रामहरी रूपनवर.....

टक्के बिलो भरल्या जात आहेत. त्यामुळे ही कामे कोणीही करीत नाहीत. यामुळे 70 ते 80 टक्के कामे प्रलंबित आहेत. अनेक वेळा असेही होते की, नागपूरचा कंत्राटदार सोलापूर येथील ई-निविदा भरतो, ते काम घेतो, स्थानिक सबकॉंट्रॅक्टरला ते काम देऊन 5-10 टक्के पैसे घेऊन मोकळा होतो.

सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, ग्रामपंचायतींच्या कामांमध्ये यामुळे अडथळा निर्माण होत आहे. त्यामळे ई-टेंडरिंगसाठीची मर्यादा 15 लक्ष रुपयांपर्यंत शासन वाढविणार आहे का ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न-वजा-सूचना केली आहे. या संदर्भात विविध विभागांची बैठक घेऊन आणि सन्माननीय सदस्यांची सूचना लक्षात घेऊन योग्य ती कार्यवाही करू.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी ग्रामीण भागातील वस्तुस्थिती या प्रश्नाच्या माध्यमातून मांडली आहे. मागील सरकारने आणि या सरकारने पारदर्शकतेचे धोरण घेतले, ही आनंदाची गोष्ट आहे. तथापि, यामुळे दोन गोष्टी होत आहेत. मी मंत्री मंडळात असताना मलाही या गोष्टी जाणवत होत्या. आपण फक्त पारदर्शकता ही एकच बाजू पहात आहोत. परंतु, निविदा किती बिलो असावी, यालाही काही मर्यादा असल्या पाहिजेत. भौगोलिकदृष्ट्याही यामध्ये काही अडचणी आहेत. नागपूरच्या कंत्राटदाराने माळशिरस तालुक्यातील 3 लक्ष रुपयांची निविदा भरली तर अवघड होऊन जाते. हेल्दी कॉम्पिटिशन कशी करता येईल किंवा जिल्ह्यातच ही स्पर्धा कशी होईल, यासाठी जिल्ह्याची मर्यादा आपल्याला घालता येईल का, याचा विचार करून या माध्यमातून ओपन कॉम्पिटिशन आणि ट्रान्फरन्सी राखता आली तर अधिक चांगले होईल. माझ्याकडे एक शिष्टमंडळ आले होते. राज्यात सुशिक्षित बेरोजगार आणि मजुर सहकारी सोसायट्या आहेत व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ११३७९.....

सभापती.....

त्यांनाही अशाच प्रकारची अडचण येत आहे. सुशिक्षित बेरोजगार संस्था आणि मजुर सोसायट्या कोणा एका पक्षाच्या नाहीत, केवळ पोटासाठी काम करणारी ही मंडळी आहेत. त्यामुळे शासन स्तरावर या प्रश्नाचा विचार करीत असताना या गोष्टीशी संबंधित लोकांवर कोणता निगेटिव्ह परिणाम होत आहे, हे जाणून घेऊन उचित निर्णय घ्यावा, असे निदेश आहेत.

श्रीमती पंकजा मुंडे : होय.

...6.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय पीठासीन अधिकाऱ्यांची कामकाजाबाबत घोषणा

सभापती : आजच्या कामकाजासंदर्भात मी निर्णय घेतला असून तो मी आता जाहीर करीत आहे. यानंतर कागदपत्रे पटलावर ठेवणे, त्यानंतर शोक प्रस्ताव हे कामकाज होईल. सदरचा शोक प्रस्ताव मी स्वत: मांडणार आहे, तो मंजूर व्हावा, अशी माझी विनंती राहील. शोक प्रस्तावाचे गांभीर्य जाऊ नये, यासाठी मी हा निर्णय घेतला आहे. त्यानंतर नियम 93 च्या सूचना आणि त्यानंतर लक्षवेधी सूचनांवरील चर्चा आपण घेऊ. हे कामकाज संपल्यानंतर आपण संविधान प्रस्ताव चर्चेला घेऊ.

...7.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

सभापती : आज दिनांक 17 डिसेंबर, 2015 रोजी सर्वश्री.संजय दत्त, शरद रणपिसे, प्रा.जनार्दन चांदुरकर, सर्वश्री अनंतराव गाडगीळ, ॲड.रामहरी रूपनवर, वि.प.स.यांनी सकाळी 9.00 वाजता "महाराष्ट्र राज्याचे महाधिवक्ता ॲड.श्रीहरी अणे यांनी महाराष्ट्रातून विदर्भ वेगळा करण्याच्या जाहीरपणे केलेल्या मागणीच्या वक्तव्यावर माननीय मुख्यमंत्री यांनी दिनांक 16 डिसेंबर, 2015 रोजी सभागृहात निवेदन करणे, निवेदनात तो खाजगी कार्यक्रम असल्याबाबत स्पष्ट करणे, परंतु पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम सार्वजनिक असून महाधिवक्ता यांनी त्या ठिकाणी केलेले वक्तव्य खाजगी नसून सार्वजनिक असणे, यासाठी राज्याची विभागणी करणारे मत मांडणाऱ्या व महत्वाचे सांविधानिक पद सांभाळणाऱ्या महाधिवक्ता यांना बडतर्फ करण्याची होत असलेली मागणी" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील एखादा नियम स्थगित करणे या संबंधाचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल.

यावरून असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे.

हा विषय या अधिवेशनात दिनांक 8 डिसेंबर, 2015 पासून माननीय सदस्यांनी म.वि.प.नियम 289 अन्वये, औचित्याच्या मुद्याव्दारे व इतर आयुधांमार्फत सभागृहामध्ये सतत मांडण्याचा प्रयत्न केला होता. त्या संदर्भात मी शासनाने निवेदन करावे, असे निदेशही दिले होते. काल दिनांक 16 डिसेंबर, 2015 रोजी माननीय मुख्यमंत्री यांनी सभागृहामध्ये या अनुषंगाने सविस्तर निवेदन केलेले आहे. हे लक्षात घेता माननीय सदस्यांची ही सूचना मी नाकारीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी या विषयावर म.वि.प. नियम 289 ची सूचना दिली होती. सन्माननीय श्री.अणे यांनी शेवटचे वक्तव्य असे केले की, मुंबईसाठी 6 हुतात्मे झाले आणि हुतात्मे झाले हे थोतांड आहे. याबाबत या ठिकाणी खुलासा आलेला नाही. हुतात्म्यांना थोतांड म्हणण्याची हिम्मत जर ॲडव्होकेट जनरल करीत असतील तर ते बरोबर नाही आणि हे सर्व वर्तमानपत्रात छापून आलेले आहे. त्याच्या ते इन्कार करीत नाहीत आणि त्याबद्दल या ठिकाणी बोलले पाहिजे. ज्या हुतात्म्यांनी आपले रक्त सांडले आणि त्यातील बहुसंख्य हुतात्मे कामगार होते. त्या कामगारांनी संघटित होऊन महाराष्ट्र समितीला मोठे बळ दिले. महाराष्ट्र निर्माण करण्यामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. म्हणून याचा खुलासा झाला पाहिजे, याची चर्चा झाली पाहिजे. आपण आज संपूर्ण महाराष्ट्रात बसलेलो आहोत. हुतात्म्यांचा अनादर होत आहे, हे चुकीचे होणार आहे. म्हणून याचा खुलासा झाला पाहिजे आणि याबाबत विचारणा झाली पाहिजे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेब आपल्या भावना माझ्या लक्षात आलेल्या आहेत.

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, मला हे मान्य आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी त्यांचे समर्थन केले आणि ते बरोबर आहे. परंतु, प्रश्न असा आहे की, मी आपल्याला केरळ राज्याच्या ॲडव्होकेट जनरल यांचे उदाहरण देऊ इच्छितो. केरळ राज्याचे ॲडव्होकेट जनरल श्री.दादापाणी यांनी केलेल्या मिसबिहेविअर बद्दल केरळ हायकोर्टात केस दाखल झाली होती. भारतीय संविधानामध्ये ॲडव्होकेट जनरल यांना नियुक्त करण्याची तरतूद आहे. परंतु, ॲडव्होकेट जनरल यांना पदावरून काढण्याची तरतूद नाही. घटनेमध्ये असे लिहिलेले आहे की, The Advocate General will remain in office as long as he enjoys the pleasure of the Governor. ते बरोबर आहे, प्रश्न तो नाही. प्रश्न असा आहे की, जर मुख्यमंत्री महोदयांच्या इच्छेप्रमाणे ॲडव्होकेट जनरल वागत असतील आणि भारतीय संविधानामध्ये अशी कोणत्याही प्रकारची तरतूद नसेल, तर मग अशा मिसबिहेविअर करणाऱ्या, हुतात्म्यांचा अपमान करणाऱ्या, महाराष्ट्राला विभागू पाहणाऱ्या, ॲडव्होकेट जनरल यांच्याविरुद्ध काय करावयाचे याबाबत आपण आम्हाला सल्ला द्यावा आणि हे फार महत्वाचे आहे. कारण, महाराष्ट्राच्या जनतेचे जे मत आहे, त्या मताचा मान आपल्याला राखलाच पाहिजे. त्यांना पदावरून काढता येत नाही, कोर्टाला देखील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदूरकर.....

त्यांना पदावरुन काढता येत नाही आणि सुप्रिम कोर्टाला देखील त्यांना पदावरुन काढता येत नाही. त्यांना फक्त माननीय राज्यपाल पदावरुन काढू शकतात आणि माननीय राज्यपालांनी जरी त्यांना पदावरुन काढले तरी सभगृहात त्या संबंधिचा ठराव आणून तो 2/3 मतांनी संमत करावा लागतो. अशा कॉम्प्लीकेटेड परिस्थितीत भारतीय संविधान लिहिणाऱ्या फाऊंडर्सना त्यावेळी या गोष्टीची आवश्यकता भासली नसेल. घटना अस्तित्वात आल्यानंतर जेव्हा जेव्हा असे प्रसंग घडतात तेव्हा अशा प्रसंगावर उपाय सुचविणे हे लेजिस्लेचरचे काम आहे. म्हणून या संधीचा फायदा घेऊन मी आपल्याला अशी सूचना करु इच्छितो की, भारतीय संविधानामध्ये तरतूद नसल्यामुळे आपण त्यासंबंधी कायदा करु शकत नाही. म्हणून आपण अशी एखादी रिकमेंडेशन विधान सभेमार्फत पार्लमेंटला करावी की, अशा पद्धतीची प्रोव्हिजन भारतीय संविधानामध्ये झाली पाहिजे. फक्त केरळ राज्यातील प्रकरणामध्ये हायकोर्टाने असे सांगितले की, आमच्या ज्युरिस्डीक्शनमध्ये नाही. देशातील अशा बऱ्याच ॲडव्होकेट जनरल यांनी मिसबिहेविअर केलेले आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य प्रा.जनार्दन चांदूरकर साहेब आपली भावना माझ्या लक्षात आलेली आहे. आपण घटनेत सुधारणा करण्याबाबत जे सुतोवाच केले त्यासाठी आपल्याला तसा प्रस्ताव द्यावा लागेल. आपण त्यावर निश्चित विचार करु. दोन्ही सभागृहाने जर हे केले तर कदाचित घटनेमध्ये सुधारणा होईल.

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, आपला निर्णय मला मान्य आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी याबाबत निवेदन करावे, असे आपण निर्देश दिले होते याबद्दल मी सर्वप्रथम आपले आभार मानते. विधान सभा आणि विधान परिषद ही दोन्ही सभागृहे सार्वभौम आहेत, याची आपल्या सर्वांना जाणीव आहे. त्यामुळे विधान सभेच्या संदर्भात मी कोणतीही प्रतिक्रिया देणार नाही, देऊ शकत नाही, याची मला पूर्ण जाणीव आहे. परंतु, संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष ज्या विषयाकडे लागलेले आहे त्या संदर्भात काल जेव्हा मुख्यमंत्री महोदयांनी निवेदन केले, मुख्यमंत्री स्वतः प्रामाणिक आहेत, यात शंकाच नाही. मुख्यमंत्री

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

महोदयांनी काल एवढ्या गोंधळात निवेदन केले. परंतु, हे निवेदन होत असताना सभागृहातील आमचे सर्व सहकारी ज्या घोषणा देत होते त्या घोषणांमध्ये त्यांनी एक मिनिट निवेदन ऐकून तेथल्या तेथेच जर संयुक्त महाराष्ट्राच्या निवेदनाच्या संदर्भात काही प्रश्न विचारले असते तर जास्त चांगले झाले असते. परंतु, ते आरडाओरड करीत होते.

सभापती महोदय, माझे दोन मुद्दे आहेत. माझा पहिला मुद्दा असा आहे की, ॲडव्होकेट जनरल पदावर असणाऱ्या व्यक्तीने हे विधान केले, सरकारने त्यावर निवेदन केले. परंतु, 105 हुतात्म्यांच्या संदर्भात मी असे बोललो नाही अशा पद्धतीचे विधान त्यांनी या निवेदनात उद्धृत केले आहे. मग प्रश्न असा निर्माण होतो की, माध्यमांमध्ये जेथे रिपोर्टींग झाले त्या माध्यमांनी असत्य बातमी छापली काय, का ॲडव्होकेट जनरल श्री.अणे यांनी तसे विधान केले होते, याबद्दल सरकारने काहीच चौकशी केलेली नाही. त्यामुळे सर्वसामान्य लोकांमध्ये असा संदेश जातो की, मराठीमध्ये एक म्हण आहे, सर्वच प्रांतात ती म्हण वापरली जाते आणि ती म्हणजे "तू मारल्यासारखे कर, मी रडल्यासारखे करतो" अशी संदिग्धता या निवेदनातून तयार होत आहे, असे मला वाटते. आज आम्ही सभागृहात शिवसेना पक्षाचे दोन सदस्य आहोत. सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांना देखील या विषयावर बोलावयाचे आहे. आपण कोणत्या पद्धतीने संयुक्त महाराष्ट्राच्या भावनेचा आदर करु शकू, हे मोठे आवाहन आहे. शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष विरोधी पक्षात असताना बेळगाव आणि महाराष्ट्रातील प्रश्नांच्या संदर्भात आम्ही शेकडो वेळा माननीय राज्यपालांकडे गेलो होतो. विदर्भाच्या विकासासाठी सर्वांची बांधिलकी आहे आणि जे अनुशेषग्रस्त भाग आहेत, मग त्यामध्ये मराठवाडा असेल, कोकण असेल, उत्तर महाराष्ट्र असेल, पश्चिम महाराष्ट्रामध्ये सुद्धा जे 3-4 तालुके अनुशेषग्रस्त आहेत त्यासाठी सर्वांची बांधिलकी आहे. आपण आमच्या भावनांचे संरक्षण केले पाहिजे, अशी आमची भूमिका आहे. माननीय संसदीय कार्यमंत्र्यांना माझी मन:पूर्वक विनंती आहे की, प्रत्येक पक्षाची भूमिका वेगळी असली तरी इतिहासाने, नियतीने आणि महाराष्ट्रातील जनतेने जी जबाबदारी आपल्यावर सोपविली आहे त्यामध्ये आडपडद्यातून कोणतेही राजकारण होता कामा नये, अशी आमची अपेक्षा आहे. शिवसेना प्रमुख श्री.उद्धवजी ठाकरे यांनी कालच स्पष्ट केले आहे की, ॲडव्होकेट जनरल श्री.अणे यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

जोपर्यंत बडतर्फ करत नाही तोपर्यंत सभागृहाच्या आत आणि सभागृहाच्या बाहेर आम्ही आमची भूमिका मांडत राहणार आहोत. आपण आमच्या भूमिकेचा आदर करुन आम्हाला वेळ दिला त्याबद्दल आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आपले कायम महत्वपूर्ण योगदान आहे, याबद्दल मी आपलेही आभार मानते.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेतील अ.क्र.4 वर "भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीचे औचित्य साधून डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संविधान या विषयावर चर्चा" हा महत्वाचा विषय आपण घेतलेला आहे आणि आता आम्ही म.वि.प. नियम 289 अन्वयेच्या सूचनेद्वारे आपल्याकडे यासाठी आग्रही आहेत की, भारतीय संविधानाप्रमाणेच दोन्ही सभागृहांचे काम चालावे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, काल मुख्यमंत्री महोदयांचे या विषयावरील निवेदन गोंधळात झाले. निवेदन गोंधळात झाले, ही गोष्ट खरी आहे. परंतु, तो गोंधळ कशासाठी होता, त्याला जबाबदार कोण होते, याचीही कारणमिमांसा आपण तपासली पाहिजे. आपण सध्या तो विषय बाजूला ठेऊ. परंतु, ज्या पद्धतीने याची क्रोनॉलॉजी आहे, राज्याचे ॲडव्होकेट जनरल खाजगी कार्यक्रम आहे असे सांगून असे वक्तव्य करतात. ज्या नागपूर शहरात हिवाळी अधिवेशन होणार आहे त्या नागपूर शहरात तो विषय ते उपस्थित करतात. ते प्रसार माध्यमांना मुलाखत देतात. त्या विधानावर ते ठाम राहतात. हे सरकार आम्हाला त्यांना पदावरुन काढण्याचा अधिकार नाही, असे ठामपणे सांगते. संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांचा ते अपमान करतात, एवढे सर्व वर्तन झालेले असताना या विषयावर आपल्याला जर काही करताच येणार नसेल तर ही हतबलता आणि सार्वभौमता, मग या सभागृहाचा काय उपयोग होणार आहे, असा फार मोठा प्रश्न या निमित्ताने निर्माण होतो. आम्ही सर्व याबाबतीत अत्यंत आग्रही आहोत. घटनात्मक तरतुदीनुसार जे करण्याची आवश्यकता आहे, आपल्याला जे करणे शक्य आहे त्याचा तातडीने विचार व्हायला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

हा विषय स्थगन प्रस्तावाच्या सूचनेद्वारे उपस्थित करण्यात आलेला आहे, त्याचा आपण गांभीर्याने विचार करावा, अन्यथा असे विषय का काढले जातात, कोणत्या वेळेला काढले जातात, योग्य वेळी ते लोकांसमोर आणून सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे म्हणाल्या प्रमाणे कोणी कोणाला मारले आणि कोणी रडण्याचे सोंग घेतले हा प्रकार कोठे तरी थांबविला पाहिजे, ही नाटक बंद झाली पाहिजेत, यावरचा उपाय शोधायला पाहिजे, अशी सर्व सन्माननीय सदस्यांची आपणाकडे आग्रही मागणी आहे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल श्री.श्रीहरी अणे, यांच्याबाबत अविश्वासाची भावना महाराष्ट्रात निर्माण झाली आहे. सभापती महोदय, या निमित्ताने मी एक मुद्दा उपस्थित करु इच्छितो की, महाराष्ट्र सरकारच्या विरोधात ॲडव्होकेट जनरल श्री.श्रीहरी अणे यांनी किती तरी केसेस लढल्या आहेत. अत्यंत महत्वाचे म्हणजे महाराष्ट्र राज्याने मागासवर्गीयांसाठी सन 2004 मध्ये कायदा पास केला होता, तो कायदा रद्द करुन घेतला आहे. मागासवर्गीयांच्या विरोधात...

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड मी आपणाला नम्रपणे सांगतो की, वकील कायदा कसा रद्द करतील. आपण असे कसे म्हणता. कायदा कोर्टाच्या निर्णयामुळे रद्द होतो.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, मागासवर्गीयांच्या केसेस आज देखील हायकोर्टात चालू आहेत, असे असताना यांच्यावर विश्वास कसा ठेवायचा असा प्रश्न निर्माण होतो. माननीय मुख्यमंत्री यांनी मागासवर्गीयांच्या अनेक कल्याणकारी योजना राबविल्या आहेत. मागासवर्गीयांच्या अनेक केसेस कोर्टात चालू आहेत, हे ॲडव्होकेट जनरल कोर्टात उभे राहिले तर आमचे काय होईल हा मुद्दा आहे, त्यामुळे यांच्यावर विश्वास कसा ठेवायचा. आम्ही चांगले वकील द्या म्हणतो याचा अर्थ काय होतो. जे ॲडव्होकेट जनरल मागासवर्गीयांच्या विरोधात लढतात ते महाराष्ट्राचे ॲडव्होकेट जनरल राहिले तर मागासवर्गीयांच्या योजना राबविता येणार नाहीत, म्हणून ॲडव्होकेट जनरल यांना बरखास्त केले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी ऑलरेडी ही स्थगन प्रस्तावाची सूचना नाकारलेली आहे.

आज दिनांक 17 डिसेंबर, 2015 रोजी सर्वश्री. धनंजय मुंडे, हेमंत टकले, वि.प.स. यांनी सकाळी 9.35 वाजता "जागतिक हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर फ्रान्स येथे नुकत्याच झालेल्या परिषदेने हवामान बदलामुळे शेतीवर व पाण्याच्या उपलब्धतेवर होणारे परिणाम यांची घेतलेली गंभीर दखल, हवामान बदलामुळे महाराष्ट्रातील शेतीवर व उत्पादनावर झालेला परिणाम" या विषयाबाबत महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये सूचना दिली आहे. ही सूचना मी माझ्या दालनात नाकारली आहे. परंतु याबाबत आपण उचित मार्गाने ही चर्चा सभागृहात घडवून आणावी असा माझा आग्रह राहील. शासनाने जरी ही चर्चा घडवून आणली तरी माझी हरकत नाही. यासाठी वेगळा वेळ देण्यात येईल. ही चर्चा व्हायला पाहिजे असे माझे व आपणा सर्वांचे मत आहे.

यानंतर आज दिनांक 17 डिसेंबर, 2015 रोजी श्री.जयंत पाटील, वि.प.स. यांनी सकाळी 10.40 वाजता "राज्यातील राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांनी दिनांक 17 डिसेंबर, 2015 रोजी नागपूर येथे वेतनवाढ व अन्य प्रलंबित मागण्यांसाठी भव्य मोर्चाचे आयोजन करणे, राज्यातील परिवहन सेवा यामुळे ठप्प झाली असून प्रवाशांचे मोठ्या प्रमाणात हाल होणे." या विषयाबाबत महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये सूचना दिली आहे. ही सूचना मी दालनात नाकारली आहे. या विषयाचे महत्व लक्षात घेऊन शासनाने दखल घ्यावी.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, एस.टी.बस वाहतुकीच्या संदर्भातील महत्वाचा विषय आहे.

सभापती : याबाबत शासनाने दखल घ्यावी असे मी सांगितले आहे. शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.रणजित पाटील (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचा सन 2014-2015 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सातारा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, सातारा यांचा सन 1998-1999 व 1999-2000 या वर्षांचा अनुक्रमे आठवा व नववा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने जळगांव जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जळगाव यांचा सन 2002-2003 या वर्षाचा वैधानिक लेखापरीक्षण व वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वैधानिक लेखापरीक्षण व वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अहमदनगर यांचा सन 2009-2010 व 2010-2011 या वर्षांचा अनुक्रमे एकोणिसावा व विसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नांदेड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नांदेड यांचा सन 2009-2010 व 2010-2011 या वर्षांचा अनुक्रमे अठरावा व एकोणिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नाशिक जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, (लासलगांव) यांचा सन 2011-2012, 2012-2013 व 2013-2014 या वर्षांचा अनुक्रमे तेविसावा, चोविसावा व पंचविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने जालना जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, जालना यांचा सन 2012-2013 व 2013-2014 या वर्षांचा अनुक्रमे चोविसावा व पंचविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नाशिक माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, नाशिक यांचा सन 2012-2013 व 2013-2014 या वर्षांचा अनुक्रमे अठ्ठाविसावा व एकोणतिसावा लेखापरीक्षण अहवालासह वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : लेखापरीक्षण अहवालासह वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मराठी भाषा समिती गठीत करणे

मु.शी. : मराठी भाषा समिती गठीत करण्याबाबत मंत्र्यांचा प्रस्ताव

श्री. विनोद तावडे (मराठी भाषा मंत्री) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानपरिषद नियम 158 (1) अन्वये मराठी भाषा समिती गठीत करावी असा प्रस्ताव मांडतो.

राज्याचे राज भाषा मराठीचे धोरण ठरविण्याकरिता केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यातील शासकीय कार्यालयीन कामकाजामध्ये मराठी भाषेच्या वापराबाबतच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची समिती, जसे लोकसभा व राज्यसभा हिंदी भाषा समिती गठीत करते तशीच आपण मराठी भाषेकरिता समिती गठीत करण्याचा प्रस्ताव दिनांक 20 डिसेंबर 2011 रोजी दोन्ही सभागृहामध्ये मांडला. सदर प्रस्ताव दोन्ही सभागृहामध्ये संमत करण्यात आला. परंतु सदर समिती नियमित असल्याने समितीचे नियम तयार करण्यासाठी विधानसभा व विधानपरिषद नियम समितीस कळविण्यात आले. परंतु दरम्यानच्या काळात बाराव्या विधानसभेचा कार्यकाळ संपुष्टात आल्यामुळे म्हणजेच मधल्या काळात सदरहू नियम केलेच नाही. त्यामुळे मागील प्रस्ताव लॅप्स झाला. त्यामुळे नियम समितीकडे सोपविलेले अनुषंगिक काम व्यवगत झाले आहे. यास्तव नव्याने गठीत झालेल्या तेराव्या विधानसभेत मराठी भाषा समिती गठीत करण्याबाबतचा प्रस्ताव पुन्हा मांडून संमत करणे आवश्यक झाले आहे, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना मी सांगू इच्छितो की, ही सर्व कामे आम्हाला करावी लागतील कारण चांगली कामे आमच्याच हातून होतील. वरील बाबी विचारात घेता मी असा प्रस्ताव मांडतो की, "महाराष्ट्र राजभाषा अधिनियम 1964 अन्वये मराठी ही शासन व्यवहारासाठी राजभाषा म्हणून स्वीकारण्यात आली आहे. सर्व क्षेत्रात मराठी भाषेचा वापर करण्याच्या दृष्टीने मराठीच्या वापराचा आढावा घेण्यासाठी राज्यातील राज्य शासकीय, निमशासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेच्या वापरासंदर्भात आढावा घेऊन याबाबत राज्य शासनाला सूचना देण्यासाठी व उपाययोजना सूचविण्यासाठी राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांचा समावेश असलेली संयुक्त मराठी भाषा समिती गठीत करण्यात यावी."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सदर समितीच्या एकूण सदस्यांची संख्या 15 असेल. या समितीवर विधानसभेचे 11 सदस्य व विधानपरिषदेचे 4 सदस्य असतील. समितीचे नियम ठरविण्याची बाब विधानपरिषदेच्या नियम समितीकडे सुपूर्द करण्यात यावी. मला वाटते हे पुरेसे आहे, यावर वेगळे भाषण करण्याची गरज नाही.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाची बैठक काही काळासाठी स्थगित करण्याबाबतची विनंती

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात दुष्काळाचा विषय आणि कर्जमाफी यावर सभागृहाचे कामकाज होऊ शकले नाही. त्यानंतर सभागृहात चर्चा झाली व सभागृह नेत्यांनी शासनाच्या वतीने काय करण्यात येणार आहे याचे उत्तर दिले. त्या उत्तरामुळे सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले नाही. अशा वेळी ही मागणी अतिशय प्रखरपणे मांडण्यासाठी आम्ही राज्यपाल महोदयांकडे वेळ मागितला होता. राज्यपाल महोदयांनी आम्हाला भेटीसाठी वेळ दिलेला आहे. आमचे म्हणणे राज्यपाल महोदयांकडे मांडण्यासाठी सन्माननीय सदस्यांना अर्धा तास जाण्याची आवश्यकता आहे. आपण आमची विनंती मान्य केली तर सभागृहाचे कामकाज अर्धा तास स्थगित करावे, अशी मी आपणाला विनंती करतो.

सभापती : ठीक आहे, सभागृहाची बैठक अर्धा तास स्थगित करण्यात येत आहे. 2 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल. पुढील सर्व कामकाज आपणाला आज पूर्ण करावयाचे आहे. ही जबाबदारी आपली राहील.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.28 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

...J-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

नियम 289 अन्वयेच्या सूचनेसंबंधी

सभापती : आज दिनांक 17 डिसेंबर, 2015 रोजी माननीय सदस्या ॲड.हुस्नबानू खलिफे यांनी सकाळी 10.56 वाजता "यवतमाळ जिल्हयात अवैध दारु निर्मिती होऊन मोठया प्रमाणावर दारु विक्री सुरु असणे, स्वामिनी जिल्हा दारूबंदी अभियानाच्या माध्यमातून कळंब ते नागपूर विधानभवन असा 150 कि.मी.चा पायी प्रवास करुन धडक मोर्चा काढणे, दारुमुळे कुटुंबच्या कुटुंबे उद्ध्वस्त होणे" या विषयाबाबत म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील एखादा नियम स्थगित करणे या संबंधाचा नियम 289 हा आहे. कोणत्याही सदस्यास माननीय सभापतींच्या अनुमतीने कोणताही नियम स्थगित करण्यासंदर्भात सूचना देता येईल.

यावरुन असे दिसून येते की, प्रश्नोत्तराचा तास किंवा इतर सगळे कामकाज स्थगित करण्यासाठी त्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात असे काम किंवा एखादा विशिष्ट प्रस्ताव सभागृहासमोर असणे आवश्यक आहे.

वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे. तथापि, या विषयावर माननीय सदस्यांना दोन मिनिटे बोलण्याची अनुमती देत आहे.

ॲड.हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, स्वामिनी जिल्हा दारूबंदी अभियानाच्या माध्यमातून कळंब ते नागपूर असा जवळजवळ 150 कि.मी. प्रवास करुन हजारो महिलांचा या ठिकाणी साडीवर महिलांच्या सह्या घेऊन मोर्चा आला होता. यवतमाळ जिल्हयात अवैध दारु निर्मितीचे प्रमाण वाढले आहे. त्याचा परिणाम गरीब कुटुंबातील महिला व मुलींवर होत असतो. जो पैसा कमावला जातो तो दारुमध्ये घालविल्यामुळे घरातील कुटुंबीयांची अन्न व शिक्षणाची व्यवस्था होत नाही. त्यामुळे मोठया प्रमाणात महिला व्यथित झालेल्या आहेत. बुलडाणा जिल्हयात सुध्दा अस्तित्व संघटना व इतर सामाजिक संघटनांनी मागील दोन वर्षे सातत्याने मोर्चे काढून, निरनिराळी आंदोलने करुन दारूबंदी करण्यासंबंधी स्वतंत्रपणे त्या जिल्हयाचा सुध्दा लढा चालू आहे. याकरिता मागील अधिवेशनात माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी हा प्रश्न उपस्थित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) J.2

SGB/ ST/ AKN/ 14:00

ॲड.हुस्नबानू खलिफे.....

केला होता. या संदर्भात बैठक घेण्याचे निश्चित केले होते. परंतु अशा प्रकारची कोणतीही बैठक घेण्यात आलेली नाही. याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. यवतमाळ व बुलडाणा जिल्हयात दारूबंदी होण्यासाठी निर्णय घेण्यात यावा अशी मी विनंती करते.

सभापती : मी सूचनेला अनुमती नाकारली असली तरी माझी शासनाला सूचना आहे की, या प्रश्नाचे गांभीर्य आणि व्याप्ती पाहून पुढील महिन्यात माझ्या दालनात माननीय महिला सदस्या व सर्व संबंधितांची एक बैठक आयोजित करण्यात येईल आणि त्या बैठकीमध्ये धोरण ठरवू.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भुसावळ न्यायालयाच्या आवारात झालेल्या गोळीबारासंबंधी

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, भुसावळ न्यायालयाच्या परिसरात आज मिथुन बारसे या व्यक्तीने नंदू चावरिया व विनोद चावरिया या दोन व्यक्तींवर गोळीबार केला. या दोन व्यक्ती डुक्कर पालनाचा व्यवसाय करणाऱ्या आहेत. राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती बिकट झालेली आहे. न्यायालयाच्या परिसरात गोळीबार करण्यास गुन्हेगार कचरत नसतील तर भविष्यात विधानभवनाच्या परिसरात सुध्दा गोळीबार करण्यास गुन्हेगार येऊ शकतील अशी साधार भीती वाटते.

राज्यात कायदा व सुव्यवस्था आहे की नाही असा प्रश्न सामान्य जनतेच्या मनात उभा राहिला आहे. जखमी झालेल्या दोन्ही व्यक्तीपैकी एक व्यक्ती मयत झाल्याची मला माहिती मिळाली आहे, दुसरी जखमी व्यक्ती अत्यवस्थ असल्याची पोलिसांची माहिती आहे. कोणत्याही परिस्थितीत या घटनेसंबंधी शासनाने निवेदन करण्याची आवश्यकता आहे. राज्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहणार आहे की नाही या प्रश्नाचे उत्तर या सदनामध्ये आजचे कामकाज संपेपर्यंत शासनाने द्यावे.

सभापती : माननीय सभागृह नेते हे जळगाव जिल्हयाचे प्रतिनिधी आहेत. आज सायंकाळपर्यंत आपण निवेदन करावे.

श्री.एकनाथराव खडसे : ठीक आहे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शोक प्रस्ताव

मु.शी.: श्री.शरद अनंतराव जोशी, शेतकरी संघटनेचे नेते यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव

सभापती : श्री.शरद अनंतराव जोशी, शेतकरी संघटनेचे नेते यांच्या दु:खद निधनाबद्दल अपवाद म्हणून मी स्वत: शोक प्रस्ताव मांडतो.

"श्री.शरद अनंतराव जोशी, शेतकरी संघटनेचे नेते यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

(प्रेस : येथे सोबतचे अल्प चरित्र छापावे)

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सादर करणे

श्री.आनंद ठाकूर (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

सभापती : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

के.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयक आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

प्रा.अनिल सोले (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 18 डिसेंबर, 2015 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 17 डिसेंबर, 2015 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनीटांचा वेळ उपलब्ध आहे. 1 अशासकीय विधेयक पुरःस्थापनेसाठी दर्शविण्यात येणार असून मंगळवार, दिनांक 15 डिसेंबर, 2015 रोजी बॅलटमधील प्राथम्यक्रमानुसार आलेल्या 4 अशासकीय विधेयकांना चर्चेसाठी खालीलप्रमाणे वेळ नेमून देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

पुरःस्थापनार्थ

1.	सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 17 - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, 2015	5 मिनीटांपेक्षा जास्त नाही.

बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय विधेयके

1.	सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 6 - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक, 2013 - श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांचे.	40 मिनीटांपेक्षा जास्त नाही.
2.	सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 17 - मुंबई दारुबंदी (सुधारणा) विधेयक, 2014 - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.	35 मिनीटांपेक्षा जास्त नाही.
3.	सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 2 - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, 2015 - श्री.संजय दत्त, वि.प.स. यांचे	35 मिनीटांपेक्षा जास्त नाही.
4.	सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 3 - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, 2014 - श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचे - चर्चा अपूर्णावस्थेत.	35 मिनीटांपेक्षा जास्त नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : अशासकीय विधेयक आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

प्रा.अनिल सोले (समिती सदस्य) : सभापती महोदय, अशासकीय विधेयक आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मांडून संमत झाला.

.....

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना

सभापती : माझ्याकडे नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या आहेत त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील :

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी "राज्यात खाजगी संस्थांतर्गत वरिष्ठ महाविद्यालयातील तासिका तत्वावर भरण्यात आलेल्या सहायक प्राधापकांच्या मानधनात वाढ करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "राज्यातील सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरणात होत असलेला अन्याय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री.संजय दत्त, प्रकाश गजभिये यांनी "राज्यातील मध्यवर्ती कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात कैद्यांची झालेली भरती" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी "मांडवा बंदर येथील विविध समस्यांचे निराकरण करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "श्री.दोसू अर्धेसीर भिवंडीवाला व मे.अथर्व डेव्हलपर्स यांनी बेकायदेशीररित्या भूखंड प्राप्त करून सिडकोची केलेली आर्थिक फसवणूक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी "कल्याण-डोंबिवली म.न.पा.हद्दीतील माणिक कॉलनी संकुलाच्या पुनर्विकास कामात झालेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.संदीप बाजोरिया यांनी "महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी पुनर्रचना समितीमध्ये गुजरात मधील सदस्यांच्या झालेल्या नेमणुकीमुळे महाराष्ट्रातील गुजराती समाजावर झालेला अन्याय " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी "मलबार हिल (वाळकेश्वर) येथील श्री.श्रॉफ यांच्या मालकीच्या इमारत पुनर्विकासात विकासकाने केलेला गैरप्रकार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "मौजे आगरनांदूर (ता.गेवराई,जि.बीड) येथील महेमोद्दीन इनामदार यांची जमीन वहितीदाराने बनावट दस्तऐवज करून बळकावणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी "भगवतीपूर (ता.राहता,जि.अहमदनगर) येथील भगवतीमाता ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेवर पडलेला दरोडा प्रकरणाची सी.बी.आय.मार्फत चौकशी होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : मौजे गोट (ता.कराड,जि.सातारा) येथील नागरिकांना वितरीत करण्यात आलेले शासकीय प्लॉट त्यांच्या नावे करण्याबाबत श्री.आनंदराव पाटील,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.दिलीप कांबळे (मदत व पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 21 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आनंदराव पाटील : सभापती महोदय, गोटे तालुका कराड, जिल्हा सातारा गावचे 1976-68 सालच्या कोयना भूकंपामुळे नवीन पुनर्वसन झाले असून अद्याप शासनाने गावठाण मंजूर न केल्याने अनेक नागरी सुविधांचा लाभ घेता आलेला नाही. 1968 साली सातारा जिल्ह्यातील अनेक नदी काठची गावे भूकंपामुळे विस्थापित झाली. त्या गावांचे पुनर्वसन करण्यात आले. परंतु, शासनाची गावठाण प्लॉट नोंद न झाल्यामुळे शासनाच्या विकास कामामध्ये अनेक अडथळे निर्माण झाले आहेत. शासनाचा निधी सुद्धा वापरता येत नसल्याने उदा.नळपाणी योजना, अंगणवाडी, समाजमंदिर. रस्ते इत्यादी निधी परत जात असल्यामुळे यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे, असे मी या निवेदनामार्फत शासनाला विचारीत आहे.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, मौजे गोटे गाव हे सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात आहे. त्या काळातील भूकंप व एकूण परिस्थितीचा विचार करून त्या गावच्या सर्व नागरिकांनी आपआपसात विचार करून गट क्रमांक 768 आणि 769 या ठिकाणी गाव स्थलांतरित केलेले आहे. हे गाव शासनाने वसविलेले नाही. त्यामुळे या गावाच्या विकासामध्ये आजतागायत अडचणी येत आहेत. एकूण 8 हेक्टर 24 आर इतकी ही जमीन आहे. यापैकी 1 हेक्टर 58 आर जमिनीची खरेदी नियमाप्रमाणे झालेली आहे. उर्वरित जमीन शासन खरेदी करून त्या गावातील सर्व नागरिकांच्या नावे भूखंड करून देणार आहे. यातील काही जमीन ही संस्थानच्या नावे आहे. त्यामुळे अडचण निर्माण झाली आहे. शासन लवकरात लवकर उर्वरित जमीन खरेदी करणार आहे आणि मग गावातील सर्व नागरिकांच्या नावे भूखंड करणार आहे. जेणे करून भविष्यात या गावाच्या विकासासाठी शासनाचा सर्व निधी वापरता येईल. तसेच अन्य सोयी-सुविधा देखील देण्यात येतील.

श्री.आनंदराव पाटील : सभापती महोदय, माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, असे एक गाव नसून कराड तालुक्यामध्ये 14 गावे आहेत. त्यासंबंधी आम्ही माननीय महसूल मंत्री श्री.खडसे साहेबांना ग्रामपंचायती मार्फ निवेदन दिलेले आहे. तेव्हा सर्वच गावांमध्ये गावठाण घोषित करण्यात यावे अशा प्रकारची विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी मंत्री महोदयंना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे बऱ्याच वेळा यासंबंधातील मागणी केलेली आहे. कोयना प्रकल्पग्रस्त हे दोन कोकण व पुणे विभागीय आयुक्तांच्या अखत्यारित येतात. या दोन ठिकाणी हे प्रकल्पग्रस्त स्थायिक झालेले आहे. त्यात काय अडचणी आहेत हे आपल्याला देखील माहीत आहे. कारण मागे आपण हे सर्व काही बघितले आहे. या प्रकल्पग्रस्तांना न्याय द्यायचा असेल तर माझे असे मत आहे की, एक विभागीय किंवा उचित अशी बैठक घ्यावी. मला असे कळले होते की, आपण पुनर्वसनासंबंधी जिल्हावार बैठका घेणार आहात. आपण आपल्या सोयीने या बैठकीचे आयोजन करावे. आपण कोयना प्रकल्पग्रस्तांमसाठी मध्यवर्ती बैठक घेतली तर यातील बरेचसे प्रश्न सुटू शकतील. तेव्हा याचा आपण उचित विचार करावा.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, एका तासापूर्वीच मी पुण्याच्या विभागीय आयुक्तांशी चर्चा केली आहे. एका महिन्याच्या आत पुणे विभागातील सर्व प्रकल्पांची माहिती घेऊन प्रकल्पनिहाय तेथे पुनर्वसनाची, नागरी सुविधांची किती कामे झाली, प्लॉटधारकांचे काय प्रश्न आहेत, यासंबंधातील माहिती गोळा करण्यास सांगितले आहे. ही माहिती गोळा झाल्यानंतर फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यामध्ये पुण्याला बैठक घेण्यात येईल. भूकंपामुळे 14 गावांचे पुनवर्सन करावे लागले आहे असे आपण आताच सांगितले आहे. या 14 गावांच्या संबंधातील प्रत्येक प्रस्ताव केस टू केस तपासण्यात येईल. भूकंपामुळे सुरक्षिततेसाठी गावकरी आणि शासनाने मिळून या जागा निवडलेल्या आहेत व तेथे ते रहिवासी गेलेले आहेत. या जमिनी संपादित केलेल्या नव्हत्या. काही जमिनी संपादित करून त्यांना पैसे देण्यात आले आहेत. काही जमिनी संपादित करायच्या राहिल्या आहेत. यातील काही जमिनी या औंध संस्थानिकांच्या आहेत. त्यामुळे यात अन्य देखील त्रुटी आहेत. आताच आपल्याला माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे या सर्व 14 गावांसाठी जमीन संपादित करावी लागली तरी ती राज्य सरकार संपादित करणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे .....

ज्या ठिकाणी जमीन भूसंपादन करावयाचे असेल त्या ठिकाणी जमिनी भूसंपादित केल्या जातील. ज्या ठिकाणी नावावर करावयाच्या राहिल्या असतील त्या नावावर लावल्या जातील. ही सर्व माहिती केस टू केस तपासून त्यासंदर्भात आवश्यक तो निर्णय सरकार घेईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझी 14 क्रमांकाची सूचना आहे ती घेण्यात यावी.

सभापती: आपली सूचना पुढे ढकलण्याच्या संदर्भात मंत्री महोदयांनी विनंती केली असल्यामुळे आपली सूचना उद्या घेण्या येईल.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, कार्ल्याच्या संदर्भातील सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांची सूचना पुढे ढकलण्याची सूचना यासाठी केली होती की, या विषयाच्या संदर्भातील निवेदन मी या सभागृहात या अगोदरही केलेले होते. परंतु याविषयाच्या संदर्भात अधिकची माहिती हवी होती. या निवेदनाच्या संदर्भात सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिले होते व त्यानुसार या सभागृहात निवेदन करण्यात आले होते. या विषयाच्या संदर्भात आजही माझ्याकडे माहिती आहे त्या आधारावर आपण प्रश्न विचारले तर मी माहिती देण्यास तयार आहे. परंतु या विषयाचे निवेदन सर्वत्र सर्क्युलेट झालेले नाही. त्यामुळे हे निवेदन उद्या करण्यात येईल.

सभापती : ठीक आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. :राज्यातील वनविकास महामंडळाच्या बारमाही रोजंदारी वनमजुरांना सेवेत कायम करण्याबाबत श्री.हरिसिंग राठोड, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सुधीर मुनगंटीवार (मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 13 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हरिसिंग राठोड : राज्यातील वनविकास महामंडळाच्या बारमाही रोजंदार वन मजूरांना कायम करण्याचा प्रश्न गेल्या 10 वर्षापासून प्रलंबित आहे. उत्तरामध्ये मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, वन मजूरांना दिनांक 16.10.2012 च्या निर्णयानुसार कायम करण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे. गेल्या 10 वर्षापासून हा प्रश्न विचाराधीन आहे, विचाराधीन आहे हेच ऐकत आलेलो आहे. परंतु एक गोष्ट निश्चित आहे की, या विषयाच्या संदर्भात मंत्री महोदयांची थोडी सकारात्मक भूमिका दिसत असल्यामुळे मी वन मंत्र्यांना ॲडव्हान्समध्ये धन्यवाद देतो. माननीय वन मंत्री हे वित्त मंत्रीही आहेत. आता वित्त विभाग अडवणुकीचे धोरण अवलंबवित आहे. सामाजिक न्याय विभाग असो, कंत्राटी कामगारांचा विषय असो असे हजारो कामगारांचे प्रश्न वित्त विभाग अडवित आहे. मंत्री महोदय ज्या प्रकारे त्यांच्या विभागाच्या बाबतीत भुमिका घेतात तशीच भूमिका त्यांनी इतर विषयाच्या बाबतीतही घेण्याची आवश्यकता आहे. आपले सरकार गतीमान सरकार हे आपण सिध्द केले तर आम्ही आपल्या पाठीशी उभे राहू. त्यामुळे माननीय मंत्री या विषयाची सोडवणूक किती दिवसात करणार आहे याची माहिती दिली तर बरे होईल.

श्री. सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सन विभागात आजपर्यंत 16810 रोजंदारी कर्मचाऱ्यांना स्थायी केलेले आहे. या कर्मचाऱ्यांना स्थायी करताना विविध संघटनेच्या व विविध लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून 16810 रोजंदारीच्या मजूरांना कायम केल्यानंतर त्यातून काही लोक सुटले अशी निवेदने प्राप्त झाल्यानंतर आपण यासंर्भात त्रयस्त समिती नियुक्त केली होती. या त्रयस्त समितीने यासंदर्भात मुल्यांकन केले असून यामध्ये एकंदर 738 लोक सुटले अशा प्रकारचा अहवाल या त्रयस्त समितीने दिलेला आहे. 738 लोक सुटले होते त्यापैकी 9 व्यक्ती मृत पावलेल्या आहेत व 44 लोकांचे वय 60 वर्षाच्या वरील आहेत. म्हणून आपण 734 पैकी 675 लोक कायम करण्यास योग्य आहेत. या 675 लोकांना आपण जर कायम केले तर 30 कोटी 12 लाख 81 हजार 525 रुपये यांच्या पगारावर खर्च होणार आहेत. परंतु आयुक्तांकडून आपल्याकडे जो अहवाल आलेला आहे त्या अहवालानुसार 675 रोजंदार मजुरांना कायम करण्याची प्रक्रिया सुरु आहे. वन मंत्री म्हणून मी जितक्या लोकांना न्याय देता येईल तेवढयांना न्याय देण्याचा प्रयत्न करीत असतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांची सूचना आहे परंतु संबंधित मंत्री महोदय, सभागृहात उपस्थित नसल्यामुळे त्यांना सभागृहात उपस्थित राहण्याची सूचना देण्यात येईल. मंत्री महोदय आल्यानंतर आपली सूचना घेण्यात येईल. आता सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांची सूचना क्रमांक 16 घेण्यात येईल.

....6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. :राज्यातील अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय बिलाची प्रतीपुर्ती नाकारल्याबाबत श्री.डॉ.सुधीर तांबे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.विष्णु सवरा (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 16 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...7....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर तांबे : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांच्य उत्तराने समाधानी आहे. परंतु मध्यंतरीच्या काळात बरीच प्रकरणे प्रलंबित होती. परंतु आता मंत्री महोदयांनी यामध्ये लक्ष् घातले असल्यामुळे मी त्यांचा आभारी आहे.

श्री.विष्णु सवरा : मी या विषयामध्ये पूर्णपणे लक्ष घातलेले आहे.

....8....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

7 **पृ.शी./मु.शी.** :डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाला केंद्रीय विद्यापीठाचा दर्जा मिळवून देण्याबाबत श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.,यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.विनोद तावडे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 7 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...9....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण :सभापती महोदय, माझे मंत्री महोदयांना केवळ दोन प्रश्न आहेत. मंत्री महोदयांनी उत्तरात असे म्हटले आहे की, आंबेडकर विद्यापीठाचा प्रस्ताव अद्याप प्राप्त झालेला नाही. परंतु कुलगुरुंनी वर्तमानपत्रात स्टेटमेंट केले आहे की, हा प्रस्ताव आम्ही मुख्यमंत्र्यांना दिलेला आहे. यामध्ये जी विसंगती दिसते त्यांची मंत्री महोदयांनी माहिती द्यावी. आज वर्तमान पत्रात बातमी छापून आली आहे की, नागपूर येथे लॉ स्कूल सुरु होणार आहे. त्यामुळे औरंगाबदचे लॉ स्कूल केव्हा सुरु होणार आहे ? औरंगाबाद येथे लॉ स्कूलचे इन्फ्रास्ट्रक्चर तयार आहे. आपण आयआयएम घेऊन गेला, एम्स आपण नागपूर येथे आणले. आपल्याला जे काही न्यावयाचे आहे ते एकदाच न्या. परंतु औरंगाबादला लॉ स्कूल कधी सुरु होणार आहे याची माहिती मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण साहेबांनी केंद्रीय विद्यापीठाच्या संदर्भात वर्तमानपत्राच्या आधारे या ठिकाणी बोलणे बरोबर नाही. आपण जर आपल्याकडील माहिती माझ्याकडे पाठवली तर मी त्यासंदर्भात निश्चितपणे माहिती घेईन. मुळात सेंट्रल युनिर्व्हसीटी ॲक्ट,2009 ....(अडथळा) बाराव्या पंचवार्षिक योजनेच्या अनुषंगाने राष्ट्रीय विकास परषिदेने मंजूर केल्या प्रमाणे नवीन सेंट्रल युनिर्व्हसीटी मंजूर करु नये असे म्हटलेले आहे. त्यांनी रुसा मधून अशा प्रकारची व्यवस्था केली आहे. सेंट्रल युनिर्व्हसीटी झाली तर कॅम्पस युनिर्व्हसीटी होणार की, ॲफिलेटेड कॉलेजेसही येणार असे अनेक प्रश्न त्यामध्ये आहेत. आता कोणतेही केंद्रीय विद्यापीठे मागत असतांना ॲफिलेटेड कॉलेजेसचे काय होणार. केंद्रीय विद्यापीठ झाल्यानंतर आपल्याला चार पाचशे कोटी रुपये मिळतील या भ्रमात जे लोक असतात (अडथळा) या पध्दतीने केंद्रीय विद्यापीठ करुन घेण्यात केंद्राचा प्रचंड निधी मिळेल असा मानस असतो. मुळात केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने माझे 20 हजार कोटी रुपये कमी केले आहेत. विद्यापीठाने शिक्षणाचा पैसा कमी दिला आहे परंतु त्यामध्ये हळू हळू वाढ होईल. तरीही बाराव्या वित्त आयोगाच्या पंचवाषिक योजनेप्रमाणे ते देता येत नाही ही त्यातील अडचण आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो मुद्दा मांडला त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आपण कालच विधि विद्यापीठाच्या विषयाच्या संदर्भातील विधेयक येथे संमत केले आहे. लॉ युनिर्व्हसीटीला कुलगुरु मिळण्यामध्ये अडचण येत होती. यामध्ये 'and' होते ते आता 'or, either' केल्यामुळे आता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

बऱ्यापैकी कुलगुरु पदासाठी सर्व कमिटीला माणसे मिळतील. त्यामुळे आपण ते येत्या काळात सुरु करु. लॉ युनिर्व्हसीटी औरंगाबाद येथे व्हावी अशी कै.माननीय विलासराव देशमुखांचे मुळ स्वप्न होते. परंतु काही सन्माननीय न्यायमुर्ती आणि इतरांच्या आग्रहाखातर ती मुंबई आणि नागपूर येथे गेली. परंतु औरंगाबादला त्यांच्या शिक्षणाचा पूर्ण वाटा दिल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी निश्चिंत रहावे.

M-1/...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: इतर महामंडळाप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांच्या वेतन आणि भत्त्याची जबाबदारी शासनाने घेणे याबाबत श्री.धनंजय मुंडे, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.बबनराव लोणीकर (पाणी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 5 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे एकूण मनुष्यबळ 14 हजार असून सध्या 6 हजार 351 कर्मचारी कार्यरत आहेत. जलसंपदा विभागाच्या दिनांक 28.4.2005 च्या शासन निर्णयानुसार कृष्णा खोरे, विदर्भ, तापी, कोकण, गोदावरी, मराठवाडा महामंडळातील कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्याची जबाबदारी शासनाने घेतलेली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांच्या वेतन आणि भत्त्याची जबाबदारी शासनाने घ्यावी. निवेदनात असे नमूद केले आहे की, असे केल्यास शासनावर 250 कोटी रुपयांचा बोजा पडेल. या विषयी वित्त मंत्र्यांकडे बैठक घेण्यात आली. इतिवृत्तात माननीय वित्तमंत्र्यांची स्वाक्षरी असून वित्त मंत्र्यांनी दिलेल्या निर्देशानुसार माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे बैठक घेण्यात आली. माननीय मुख्यमंत्र्यांनी सदर प्रस्तावास तत्वतः मान्यता दिली. सदर बैठकीचे इतिवृत्त माननीय मुख्यंत्री कार्यालयाकडे सादर करण्यात आले असून, माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वाक्षरी झाल्यानंतर सदरचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात येईल." माझा प्रश्न आहे की, आगामी मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा प्रस्ताव सादर करुन या कर्मचाऱ्यांना तात्काळ दिलासा देण्यात येईल काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची अनेक वर्षापासूनची ही मागणी आहे. या मागणीच्या संदर्भात त्यांनी अनेकवेळा लोकशाहीच्या मार्गाने आंदालने देखील केलेली आहेत. या संदर्भात माननीय वित्तमंत्री यांच्या दालनात चर्चा झाली. असा निर्णय घेतल्यास सरकारवर वार्षिक 350 कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडणार आहे. माननीय वित्त मंत्र्यांच्या दालनात झालेल्या बैठकीत वित्त विभागाने काही हरकती आणि मुद्दे उपस्थित केले होते त्याची पूर्तता करण्याचे काम सुरु आहे. या संदर्भातील प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर केला जाईल. माननीय मुख्यमंत्री यांना जीवन प्राधिकरणाचे शिष्टमंडळ भेटले होते. या प्रकरणात मार्ग काढण्यात येईल असे आश्वासन माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले आहे. या संदर्भातील प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या संदर्भातील प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येईल असे मंत्री महोदयांनी उत्तर दिले. या प्रश्नाच्या बाबतीत सरकार आणि मंत्री महोदय सकारात्मक आहेत हे स्पष्ट होते. पण हा 6 हजार 351 कर्मचा-यांचा प्रश्न आहे. या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जो प्रश्न निर्माण झालेला आहे तसाच प्रश्न अनेक महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत झाला होता त्यांना शासनाने सामावून घेतले. त्याच धर्तीवर या महामंडळातील कर्मचाऱ्यांना सामावून घ्यायचे आहे. फक्त आर्थिक बोजासंदर्भातील प्रश्न सुटल्यानंतर येणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय व्हावा अशी विनंती आहे. मंत्री महोदयांनी लवकरच हा प्रश्न मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठेवण्यात येईल असे सांगितले. लवकर म्हणजे केव्हा हा प्रश्न आहे. नाहीतर अच्छे दिन सारखे व्हायचे, अच्छे दिन कधी येणार हे माहीत नाही. तेव्हा याबाबत येणाऱ्या मंत्रिमंडळात हा प्रस्ताव ठेवण्यात येईल काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितलेले आहे की, या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात बैठक झालेली आहे. जीवन प्राधिकरणाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची ही मागणी अनेक वर्षापासूनची आहे आणि त्यासाठी त्यांनी आंदोलने देखील केलेली आहेत. या प्रश्नाच्या बाबतीत विभागाचा मंत्री म्हणून मी सकारात्मक आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील तत्त्वत: मान्य केलेले आहे. तेव्हा मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर हा प्रस्ताव लवकर सादर केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वयेचे निवेदन नंतर घेण्याबाबत

श्री.अमरसिंह पंडित : मी उपस्थित केलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन मला आताच मिळालेले आहे. या निवेदनात काय म्हटलेले आहे हे मी वाचलेले सुद्धा नाही. तेव्हा माझी आपण्ास विनंती आहे की, हे निवेदन उद्या घेण्यात यावे.

सभापती : ठीक आहे.

सभागृहाच्या कामकाजाबाबत

सभापती : आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवरील कामकाज पाहता माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की,त्यांनी लक्षवेधी सूचनेवर नेमके आणि स्पेसिफीक प्रश्न विचारावेत. आपण प्रश्न डेव्हलप करण्यामध्ये जास्त वेळ घेऊ नये.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कल्याण शहर पूर्व व पश्चिम, मोहने-टिटवाळा व डोंबिवली शहरासह इतर भागात निर्माण झालेली पाणी टंचाई

मु.शी. : कल्याण शहर पूर्व व पश्चिम, मोहने-टिटवाळा व डोंबिवली शहरासह इतर भागात निर्माण झालेली पाणी टंचाई यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, मुझफ्फर हुसेन, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कल्याण शहर पूर्व व पश्चिम, मोहने-टिटवाळा व डोंबिवली शहरासह इतर भागात नागरीकरण मोठया प्रमाणात होत असून मागणीही त्याचप्रमाणे वाढून मोठया प्रमाणात पाणी टंचाई निर्माण होत असल्यामुळे मा. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पाण्याची समस्या सोडविण्यासाठी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित केला असता मा. मुख्यमंत्री व मा. उद्योग मंत्री यांनी सदरहू विभागातील पाणी टंचाईची समस्या दोन महिन्यात सोडविण्याचे दि. 23 जुलै, 2015 रोजी आश्वासन देण्यात येऊन आज त्याला चार महिन्याचा कालावधी होऊनही अद्यापी पाणी टंचाईची समस्या सुटलेली नसणे, यापूर्वीही माहे डिसेंबर, 2014 रोजी नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात तसेच सन 2015 मध्ये झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मा. जलसंपदा मंत्री व राज्य मंत्री यांनी बारवी धरणाची उंची वाढवू असे नमूद करुनही उंची वाढवलेली नसणे, त्याचप्रमाणे दिनांक 5 जानेवारी, 2015 रोजी मा. जलसंपदा मंत्री यांनी घेतलेल्या बैठकीत पाणी टंचाईची समस्या दूर करण्याचा निर्णय घेऊनही त्याची अंमलबजावणी करण्यात न येणे, तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाकडून नवी मुंबईस होणारा 140 द.ल.लि. पाणी पुरवठा बंद करण्यात येऊन तो कोटा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला वर्ग करण्याबाबत उच्चाधिकार समितीत निर्णय घेण्यात येऊनही महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने अद्यापपर्यंत सदरहू पाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त.....

कोटा जलसंपदा विभागास हस्तांतरीत न करणे, यामुळे याभागातील पाणी टंचाई समस्या सुटलेली नसणे, नागरीकांना पाण्यासाठी दाहीदिशा भटकंती करावी लागत असणे, पाणी टंचाई प्रश्न चिघळत असूनही याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्यामुळे कल्याण-डोंबिवली शहरात लोकांमध्ये संतापाची लाट उसळून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याचा धोका वाढणे, यामुळे पाणी टंचाईची समस्या सोडविण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार तातडीने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया."

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आपण कल्याण-डोंबिवली शहरातील पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासंदर्भातील ज्वलंत विषया संदर्भातील माझी लक्षवेधी सूचना स्वीकृत केली, त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनात हा विषय मी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित करण्याचा माझा प्रयत्न असतो. मागील अधिवेशनात दिनांक 23 जुलै, 2015 रोजी मी या विषयावरील लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्या लक्षवेधी सूचनेला माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उद्योग मंत्र्यांनी उत्तर दिले होते. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले होते ते मी वाचून दाखवितो - "पावसाळा संपल्याबरोबर आम्ही या कामाची सुरुवात करु. या कामासाठी साधारणपणे दोन महिन्यांचा कालावधी लागेल. तेवढ्या कालावधीमध्ये हे काम पूर्ण केले जाईल. स्वत: मी व माननीय उद्योग मंत्री या कामावर देखरेख ठेवू. कल्याण-डोंबिवली शहराला पाणी मिळाले पाहिजे याबद्दल दुसरी कोणतीही भावना असण्याचे काही कारण नाही" मी त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती की, आपण आणि माननीय उद्योग मंत्र्यांनी या कामाचे मॉनेटरींग केले तरच हे काम टार्गेटमध्ये पूर्ण होईल. नोव्हेंबर महिन्यापर्यंत पाणी मिळेल अशी आम्हाला हमी देण्यात आली होती. आता उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, माननीय उद्योग मंत्र्यांनी दिनांक 25.11.2015 रोजी बैठक घेतली. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्यांनी पुढाकार घेतल्यामुळे हा प्रश्न मार्गी तरी लागला. हे काम दिनांक 31 मे, 2016 पर्यंत पूर्ण होण्याची लेखी हमी देण्यात आलेली आहे. माझा प्रश्न आहे की, पूर्वीचा अनुभव पाहता प्रत्येक वेळी जी हमी देण्यात येते तिचे पालन होत नाही. तेव्हा 31 मे रोजीची हमी निश्चितपणे पाळली जाईल काय याची हमी माननीय मंत्री देतील काय ? आज कल्याण-डोंबिवली भागात पाण्याची परिस्थिती काय आहे याची माहिती मी आजच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडून घेतली. त्यांनी मला सांगितले की, बारवी धरणातून 235 एमएलडी पाणी उचलण्याची परवानगी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला आहे. पण त्यापैकी 30 टक्के पाण्याची कपात करण्यात आलेली आहे. त्याठिकाणी सध्या 165 एमएलडी पाणी उचलण्यात येत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त....

सभापती महोदय, काही महिन्यापूर्वी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये 27 गावांचा समावेश करण्यात आला. त्या गावांसाठी 50 एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. परंतु या 27 गावांसाठी फक्त 35 एमएलडी पाणी मिळत आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला 350 आणि 100 एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. कल्याण-डोंबिवली महानगर क्षेत्राची लोकसंख्या 15 लाख असून त्या ठिकाणी 250 एमएलडी पाण्याचा तुटवडा आहे. काही वर्षापूर्वी हायपॉवर कमिटीने निर्णय घेतला होता की, नवीन मुंबईमध्ये मोरबे धरण झाल्यानंतर नवी मुंबईला बारवी धरणातून पाणी देऊन त्यातील काही हिस्सा कल्याण-डोंबिवलीकरांना दिला पाहिजे. हा प्रश्न बारवी धरणातून पाणी दिल्यामुळे सुटत असेल तर ते चांगले आहे. आम्ही त्याचे स्वागत करतो. हायपॉवर कमिटीच्या निर्णयानुसार 31 मे पर्यंत तात्पुरत्या स्वरूपात बारवी धरणातून अतिरिक्त पाणी कल्याण-डोंबिवलीकरासाठी दिल्यास त्यांना रिलिफ मिळू शकेल. तेव्हा त्याबाबत निर्णय घेण्यात येईल काय ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, मागील पावसाळी अधिवेशनात या विषयावरील लक्षवेधीच्या सूचनेवर उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, माननीय उद्योग मंत्री स्वत: भेट देऊन कार्यवाहीचा निर्णय घेतील. त्यानुसार मी दिनांक 25.11.2015 रोजी बारवी धरण येथे संबंधितांची बैठक घेतली.

....N-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष देसाई ...

त्या ठिकाणी जे प्रकल्पग्रस्त आहेत त्यांनी काम थांबविले होते. त्यामुळे त्या ठिकाणी जाऊन त्यांच्या मागण्या काय आहेत हे विचारुन घेतले. त्यांच्या प्रश्नांवर, मागण्यांवर आम्ही त्याच ठिकाणी उत्तरे दिली, तोडगा काढला. ज्यांना जमिनीचा मोबदला मिळाला नव्हता त्यांना एक महिन्यात मोबदला अदा करण्याचे ठरले. त्याच बरोबर दिनांक 7 डिसेंबर रोजी सांडव्याचे काम पूर्ण झाले आहे. या बरोबरच दि.31 मार्च, 2016 पर्यंत डाऊन स्ट्रीमचे उर्वरित कॉंक्रीटीकरणाचे काम पूर्ण करणार आहोत. तसेच पुनर्वसित गावठाणातील विकास कामे मार्च-2016 पर्यंत पूर्ण करणार आहोत. अशा प्रकारे ही कामे कोणत्या कालावधीत पूर्ण करावी या बाबत निर्णय घेतलेले आहेत. या अनुषंगाने सर्व बाबी पूर्ण करण्यास आम्ही संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. सरकारचे या कामावर बारकाईने लक्ष असल्यामुळे या कामाबाबतचा वेळोवेळी आढावा घेतला जातो. या पावसाळ्यापूर्वी ही सर्व कामे पूर्ण करुन प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडविण्यात येतील. पुढील पाऊस चांगला झाला तर या धरणात भरपूर पाणी साठेल. या धरणातून 7 महानगरपालिका, नगरपालिका आणि अनेक ग्रामपंचायतींना पाणी दिले जाते. तसेच या धरणातून वेगवेगळ्या 7 औद्योगिक क्षेत्रांना पाणी पुरविले जाते. त्यामुळे या सर्वांचा प्रश्न पुढील कालावधीत निश्चितपणे सुटेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी हा विषय सतत लावून धरल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. पुढील वर्षी पाऊस पडल्यानंतर या धरणातील पाणीसाठा वाढणार आहे. सध्या त्या ठिकाणी पाणीसाठा जेमतेम 7 टक्के आहे. त्यामुळे आता लगेच काही करता येण्यासारखे नाही. सन्माननीय सदस्यांनी बोलताना हाय पॉवर कमिटीचा उल्लेख केला. त्यामुळे पुन्हा एकदा बैठक घेऊन या बाबतीत सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतींचा पुनर्विकास करणे

मु.शी. :वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतींचा पुनर्विकास करणे, या संबंधी ॲड.अनिल परब, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र गृहनिर्माण धोरण अंतर्गत एप्रिल, 2015 व सप्टेंबर, 2015 मध्ये कृती आराखडा (मसुदा) तयार करण्यात येणे, सदरहू कृती आराखड्यात परिच्छेद क्र. 3.14 मध्ये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या वसाहतींच्या पुनर्विकासाच्या कामास प्रस्तुत धोरण जाहीरर केल्याच्या दिनांकापासून 12 महिन्यांच्या कालावधीत सुरुवात करण्यात येणार असल्याचे नमुद करण्यात येणे, त्याचप्रमाणे वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतींच्या पुनर्विकासातून राज्य शासनास भरीव अतिरिक्त निधी उपलब्ध करून या निधीचा विनियोग, राज्यातील इतर शासकीय वसाहतींच्या पुनर्विकासाकरिता करण्यात येण्याबाबतही नमुद करणे, सदरहू महाराष्ट्र गृहनिर्माण धोरणाचा अंतिम कृती आराखडा तयार करण्यात येऊन त्यामध्ये प्राधान्याने मौजे, वांद्रे सर्व्हे क्र. 341 भुमापन क्र. 629 पैकी या जमिनीवरील शासकिय वसाहतींचा पुनर्विकास करुन कर्मचाऱ्यांना माफक दरात मालकी तत्वावर घरे किंवा घरासाठी माफक दरात भूखंड देणेबाबत होत असलेला विलंब, यासंदर्भात नियोजित शासकीय वसाहत रहिवाशी सहकारी गृहनिर्माण संस्था/संघीय संस्था यांच्याकडून सातत्याने मागणी, आंदोलने, मोर्चे तसेच संबंधित मा.मंत्री महोदयांना पत्रव्यवहार करूनही अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नसणे, दिनांक 16 डिसेंबर, 2014 रोजी मा.मुख्यमंत्री यांनी सहकारी गृहनिर्माण संस्थेने माफक घरे अथवा भूखंड मिळण्याबाबत पत्रव्यवहार करणे, तसेच यापूर्वीही दिनांक 27 ऑगस्ट, 2007 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री, यांना गव्हर्नमेंट क्वार्टर्स रेसिडेंटस असोसिएशनच्या माध्यमातून शासकिय वसाहतीच्या पुनर्विकासाचा नवीन प्रस्ताव सादर केलेला असणे, सदर प्रस्ताव मंजूर करुन माफक दरात घरे मिळावी या मागणीसाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

शासनाकडे पाठपुरावा करुनही केवळ आश्वासनापलीकडे कोणतीही अंमलबजावणी झालेली नसणे, सदर कर्मचाऱ्यांनी गृहनिर्माण सोसायट्या स्थापन केल्या तर आम्ही त्याचा सकारात्मक विचार करु असे आश्वासन शासनाकडून मिळाल्यानंतर सहकारी गृहनिर्माण संघीय संस्थेमार्फत तत्कालीन महसूल मंत्री तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना सविस्तर प्रस्ताव सादर करुन भूखंडाची मागणी केली असता शासनाने बी.ओ.टी. तत्वावर वसाहतींचा पुनर्विकास करण्याचा घेतलेला निर्णय, सदर निर्णयाच्या निषेधार्थ सन 2010 मध्ये जाहीर निषेध सभा, जिल्हाधिकारी कार्यालयावर प्रचंड इशारा मोर्चा तसेच सार्वत्रिक मुंडण आदिद्वारे शासनाचे लक्ष वेधण्यात येऊनही शासन स्तरावर दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे सन 2010 मध्ये विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सर्व पक्षाच्या आमदारांनी यासंदर्भात सभागृहात आग्रह धरल्यावर तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री यांनी आश्वासन देणे, परंतु आजतागायत शासनाकडून आश्वासनापलीकडे काहीच निर्णय घेण्यात आलेला नसणे, शासनाच्या अखत्यारितील जागांवर अनधिकृतपणे झोपड्या उभारल्या जावून त्याठिकाणी एसआरएच्या माध्यमातून शासन मोफत घरे देते, उच्च पदस्थ अधिकाऱ्यांना गृहनिर्माण संस्थाकरीता मोक्याच्या जागी माफक दरात भूखंड दिले जातात परंतु शासनाच्या सेवेतील कर्मचाऱ्यांच्या वसाहतींना मात्र माफक दरात भूखंड देण्यास दुजाभाव होणे, परिणामी शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये शासनप्रती निर्माण झालेली संभ्रमावस्था, त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष,याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत तातडीने शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.प्रवीण पोटे-पाटील (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेचे निवेदन हे माननीय मंत्र्यांनी स्वतः तयार केल्याचे दिसत नाही. सदरहू निवेदन हे अधिकाऱ्यांनी तयार केलेले आहे. वांद्रे येथील प्लॉट 132 एकरचा आहे. 1995 पूर्वी ज्यांनी झोपड्या बांधल्या त्यांना त्या ठिकाणी जागा दिली. परंतु 35-35 वर्षे सरकारची सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्या भागात मुबलक दरात घर वा भूखंड मिळत नाही. त्यामुळे त्यांना डोंबिवली, कर्जत, कसारा, विरार या भागात जावे लागते. त्या कर्मचाऱ्यांची साधी मागणी आहे की, वांद्रे वसाहतीचा पुनर्विकास होत असताना आम्ही ज्या गृहनिर्माण सहकारी संस्था बनवू त्यांना माफक दरात भूखंड द्यावा. जेणेकरुन, त्यांचे पुनर्वसन त्याच ठिकाणी होऊ शकेल. हा विषय पायाभूत समितीकडे होता. आम्ही विरोधी पक्षात असताना याच विषयावर तीन वेळा सभागृहाचे कामकाज बंद पाडले होते. त्या सरकारने आमच्या मागणीला मंजुरी दिली होती. मध्यंतरी वांद्रे येथील पोटनिवडणुकीच्या निमित्ताने माननीय मुख्यमंत्री वांद्र्याला आले होते. त्यावेळी त्यांनी मान्य केले की, सरकारी कर्मचाऱ्यांना घरे देण्यासाठी सरकार बांधिल आहे. परंतु आजच्या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात भविष्यात कोर्ट-कचेऱ्या होतील म्हणून सरकारी कर्मचाऱ्यांची मागणी मान्य करु शकत नाही, असे नमूद केले आहे. महोदय, अशा प्रकारचे उत्तर देणारे झारीतील शुक्राचार्य कोण आहेत हे शोधले पाहिजे. महोदय, सरकारी कर्मचारी सरकारकडे घरे किंवा भूखंड मागणार नाहीत तर कोणाकडे मागणार ? त्या ठिकाणी वास्तव्य करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना घरे उपलब्ध करुन देणे शक्य आहे. माझ्या माहितीनुसार त्या भागात व्यापारी संकुल आणले जाणार आहे. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथील ॲम्बेसीजसाठी ही जागा देणार असल्याचे सांगितले जाते. पूर्वीच्या सरकारने या विषयाच्या संदर्भात तीन भाग केले होते. तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांच्याकडे आम्ही एक प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावामध्ये 33 टक्के जागा सरकारी कर्मचाऱ्यांना, 33 टक्के जागा व्यापाऱ्यांना आणि 33 टक्के जागा कॉलनीला देण्याबाबत सुचविले होते. जेणेकरुन, सर्वांना घरे मिळतील आणि सरकारला सुध्दा पैसा मिळेल. हा प्रस्ताव त्यावेळी मंजूर झाला होता. या प्रस्तावावर बरीच चर्चा सुध्दा झाली होती. परंतु सरकारने आता थोडेसे सकारात्मक धोरण घेतले तर चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना घरे मिळू शकतील. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, राज्य सरकार या विषयी सकारात्मक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब....

भूमिका घेऊन स्वतःच्या कर्मचाऱ्यांना घरे किंवा त्यांच्या गृहनिर्माण संस्थांना भूखंड देण्याचा निर्णय घेईल काय ? सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेचे जे निवेदन वितरित केलेले आहे त्या निवेदनाचा मी निषेध करतो. कारण हे निवेदन सरकारचे आहे असे मला वाटत नाही. हे निवेदन पूर्णतः अधिकाऱ्यांनी तयार केलेले आहे. सभापती महोदय, मंत्रिमंडळातील माननीय मंत्री हे माझ्यासोबत सरकारी कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक आंदोलनात अग्रेसर होते. त्यामुळे त्यांनी अशा प्रकारचे निवेदन तयार केले असेल असे मला वाटत नाही. त्यामुळे सर्वप्रथम या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात सुधारणा केली पाहिजे. मी पुन्हा विचारतो की, राज्य सरकार या विषयी सकारात्मक भूमिका घेऊन कर्मचाऱ्यांना घरे किंवा त्यांच्या गृहनिर्माण संस्थांना भूखंड देणार काय ? तसेच मी असे विचारु इच्छितो की, या विषयाची व्याप्ती मोठी असल्यामुळे या विषयावर तोडगा काढण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या समवेत संबंधित मंत्री महोदय व अधिकाऱ्यांची आपल्या दालनात बैठक घेण्यात येईल काय ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न महत्त्वाचा आहे. जे कर्मचारी इतकी वर्षे शासनाची नोकरी करतात त्यांना घरे देणे, हा महत्त्वाचा विषय आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्या भागात झोपडीधारकांना झोपडपट्टी विकास योजनेमार्फत जागा देण्यात आली आहे. परंतु आमच्याकडे प्रत्यक्षात तशा प्रकारची माहिती उपलब्ध नाही. जर त्या वसाहतीत राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना घरे दिली तर, ज्या कर्मचाऱ्यांनी अगोदर त्या ठिकाणी राहून नंतर इतरत्र घरे घेतली त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. त्यामुळे या गोष्टीचा सुध्दा विचार करण्याची गरज आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, ज्यांनी घरे घेतलेली आहेत त्यांच्या बाबतीत आम्ही बोलत नाही. त्या वसाहतीत राहिलेल्या लोकांनी नंतर बाहेर घरे घेतली असतील त्यांनी किंवा बाहेरच्या सरकारी कर्मचाऱ्यांनी जर गृहनिर्माण सोसायटी स्थापन करुन सरकारकडे अर्ज केला तर त्यांना घरे द्यावीत. सध्या आमची मागणी या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आहे.

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, पोटनिवडणुकीच्या दरम्यान माननीय मुख्यमंत्री त्या भागात गेले होते आणि त्यांनी अमुक प्रकारची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रवीण पोटे-पाटील....

घोषणा केली होती. मी सांगू इच्छितो की, सरकार या बाबतीत सकारात्मक आहे. शासनाचे धोरण आहे की, सर्व गरीब आणि कर्मचाऱ्यांची घरे झाली पाहिजेत. त्यामुळे या दृष्टीने सरकार सकारात्मक आहे.

सभापती : मला वाटते सन्माननीय सदस्यांची मागणी माझ्या दालनात बैठक आयोजित करण्याबाबतची आहे. त्यामुळे या विषयी माझ्या दालनात बैठक आयोजित करण्यात येईल. या विषयाशी ज्याचा संबंध आहे त्यांना बैठकीला बोलविण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते, डॉ.नीलम गोऱ्हे यांना सुध्दा बोलविण्यात येईल.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, हा खूप मोठा आर्थिक विषय आहे. जे सरकारी कर्मचारी शासकीय वसाहतीमध्ये राहतात त्यांना घरे, नव्याने शासकीय निवासस्थान, काही भाग व्यापारी संकुलासाठी देणे या माध्यमातून मुंबईतीलच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक वसाहती विकसित करण्यासाठी पैसा मिळणार आहे. त्यामुळे कालच या विषयी ग्लोबल एजन्सी स्थापन करण्याचा निर्णय घेतला. जेणकरून यातून प्रथम व्हायबिलिटी काढता येईल. आपले म्हणणे बरोबर आहे की, हा विषय सभागृहात निर्णय करण्यासारखा सोपा नाही. त्यामुळे अगोदर सुचविल्यानुसार माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थित सर्व संबंधितांची आपल्या दालनात बैठक आयोजित करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मराठा समाजास शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या दिलेल्या आरक्षणाची अंमलबजावणी न होणे

मु.शी. : मराठा समाजास शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या दिलेल्या आरक्षणाची अंमलबजावणी न होणे यासंबंधी सर्वश्री विनायक मेटे, महादेव जानकर, धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मराठा समाजास दिनांक ९ जुलै, २०१४ रोजी शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गाकरीता राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखाली लोकसेवांमधील नियुक्त्या व पदांकरीता 16 टक्के आरक्षण देणे, आरक्षणाचे आदेश निघाल्यानंतर ते 14 नोव्हेंबर, 2014 च्या स्थगिती दरम्यान काळातील विद्यार्थी व सरळसेवा भरतीमध्ये आरक्षण धारकाला प्रवेश व नोकरी या आदेशाची अंमलबजावणी शिक्षण संस्था व विविध शासनाच्या विभागांनी न करणे, दिनांक 21 फेब्रुवारी, 2015 च्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गाकरीता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता मा.उच्च न्यायालयाच्या अंतरीम आदेशानुसार कार्यवाही करण्याचे या शासन निर्णयात आदेश असणे, परंतु सामान्य प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे याची अंमलबजावणी न होणे, दिनांक 2 डिसेंबर, 2015 च्या शासन निर्णयाव्दारे मा.उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत दिनांक 9 जुलै, 2014 ते दिनांक 14 नोव्हेंबर, 2014 या स्थगिती दरम्यानच्या काळातील 16 टक्के जागा मराठा आरक्षणासाठी राखून न ठेवता खुल्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांना नियुक्त करावे व या नियुक्त्या जास्तीत जास्त 11 महिन्यांसाठी किंवा सदर न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निर्णय यापैकी जे अगोदर घडेल, त्या कालावधीकरीता तदर्थ स्वरुपात नेमणूका करण्याचे या शासन निर्णयाव्दारे आदेश असणे, यामुळे महाराष्ट्रात सर्वात मोठा असणाऱ्या मराठा समाजाची प्रचंड नाराजी होणे, यासंदर्भात शासनाबाबत पसरलेला तीव्र असंतोष व शासनाची प्रतिक्रिया."

..8..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..9..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय माझी या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाला हरकत आहे. या विषयावर पहिल्यांदाच लक्षवेधी सूचना मांडली जात आहे असे नाही. हा विषय या ठिकाणी अनेकदा मांडण्यात आलेला आहे. महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मराठा समाजाला आरक्षण द्यावयाचे असेल तर या लक्षवेधी सूचनेला माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावयास पाहिजे, अशी मी नम्रपणे विनंती करतो. त्यामुळे तोपर्यंत ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी, असे माझे मत आहे.

सभापती : माननीय मुख्यमंत्री उपलब्ध आहेत काय ?

..ओ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी जी भूमिका मांडली, त्याबद्दल काहीच अडचण नाही. हा माननीय मुख्यमंत्र्यांच्याच अखत्यारितील विषय आहे. पण या लक्षवेधी सूचनेमध्ये व मराठा आरक्षणामध्ये थोडासा फरक आहे. मराठा आरक्षणावर आधारित ही लक्षवेधी सूचना जरूर आहे. मराठा आरक्षण दिनांक 9 जुलैला मिळाले, शासनाने निर्णय घेतला ....

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे समाधान होत आहे का ?

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मला बोलू द्यावे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे एवढीच आमची हरकत आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेमध्ये माझे देखील नाव आहे.

सभापती : होय. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडितजी, आपण माझ्याकडे बघून बोलावे. सन्माननीय सदस्यांकडे बघून बोलू नये. मला आपल्या भावना लक्षात आल्या आहेत. मी निर्णय देत आहे. (अडथळा) सदर लक्षवेधी सूचनेवर चर्चा होऊ द्यावी. माझ्या समजुतीने मराठा आरक्षण हा वेगळा विषय आहे. मराठा आरक्षण व न्यायालयाने घेतलेले निर्णय यामध्ये संबंधित विद्यार्थी व अन्य लोक अडचणीत आले आहेत, त्या संबंधाने ही लक्षवेधी सूचना केंद्रीत झाली आहे. त्यामुळे सदर लक्षवेधी सूचनेवर चर्चा होऊ द्यावी. आपल्याला केवळ मराठा आरक्षणावर लक्षवेधी सूचना लावायची असेल तर माननीय मुख्यमंत्र्यांकडून त्याचे उत्तर घेऊ.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आरक्षणाच्या आड दुसरे काही विषय असतील तर हरकत नाही. पण जर आरक्षणाचाच विषय असेल तर माननीय मुख्यमंत्र्यांकडून उत्तर घ्यावे असे आम्हाला वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

सभापती : तसे नाही. मी निर्णय घेतला आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, आरक्षणाच्या आड दुसरा काही विषय असेल असे म्हणजे .... सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना मंत्रिमंडळात आरक्षण ....

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांच्याकडे बघून बोलू नये. मी निर्णय घेणारा आहे. माझ्याकडे बोलून बघावे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांचे एवढेच म्हणणे आहे की, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी यासंबंधीची लक्षवेधी सूचना लावली आहे. राज्यातील मराठा आरक्षणाविषयीचा गंभीर विषय आहे. पण सन्माननीय सदस्यांच्या मनात असा प्रश्न उपस्थित झाला आहे की, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हे या आरक्षणाच्या बाबत आज बोलत आहेत, त्या आरक्षणाच्या आड मंत्रिमंडळाच्या आरक्षणाच्या बाबतीतील विषय काही आहे का ? सन्माननीय सदस्यांना असे विचारायचे होते. मी मूळ विषयावर येतो. (अडथळा) सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेत माझे देखील नाव आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी सुरूवात केली आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, या आरक्षणासंबंधी मी सुध्दा लक्षवेधी सूचना दिलेली आहे.

सभापती : आपल्याला संधी मिळेल.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी लक्षवेधी सूचना दिलेली असताना सुध्दा सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे म्हणाले की, त्यांच्या नावाने लक्षवेधी सूचना दिली आहे. त्यामध्ये माझे सुध्दा नाव ॲड केले आहे, त्यामुळे मला सुध्दा त्यावर बोलण्यास संधी मिळावी.

सभापती : आपल्याला सुध्दा निश्चितपणे संधी मिळेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी आपल्याला यासंबंधी सांगू इच्छितो की, ही लक्षवेधी सूचना, दिनांक 9 जुलै, 2014 ला जेव्हा मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय झाला तेथपासून दिनांक 14 नोव्हेंबर, 2014 ला स्थगिती देण्यात आली या दरम्यानच्या काळात ज्या खात्यांनी नोकरीकरिता जाहिराती दिल्या, मुलाखती घेतल्या, निवड केली आणि निवडपत्र सुध्दा दिले, पण रूजू करून घेतले नाही अशा मुलामुलींच्या संदर्भातील आहे. या आरक्षणाच्या अंतर्गत ज्यांनी शिक्षणासाठी प्रवेश घेतले त्या मुलामुलींना, आरक्षणाप्रमाणे प्रवेश, फी, शिष्यवृत्ती यासाठी अनेक महिने झाले त्रास होत आहे, याकरिता ही लक्षवेधी सूचना आहे. ही लक्षवेधी सूचना आजच नाही तर गेल्या अधिवेशनात सुध्दा मांडली होती. पूर्ण आरक्षणाकरिता ही लक्षवेधी सूचना नाही फक्त तेवढ्या कालावधीकरिता आहे. दिलेल्या उत्तरात सरकारचा काही दोष नाही. त्याचे कारण असे आहे की, ...

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझे ऐकावे.

सभापती : आपण बोलावे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी दोष नाही, यासाठी म्हणत आहे की, या संदर्भात गेल्या अधिवेशनात निर्णय झाला. ....

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

सभापती : सन्माननीय सदस्यांनी खाली बसून बोलू नये.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनात जुलैमध्ये ही लक्षवेधी सूचना झाली होती तेव्हा माननीय मंत्र्यांनी असे संगितले होते की, मधल्या काळातील त्या लोकांना 15 दिवसांत निर्णय घेऊन शासन निर्णय काढून न्याय दिला जाईल. जुलैमध्ये 15 दिवसांत असे सांगितले होते. सामान्य प्रशासन विभागाचे अधिकारी त्याबद्दल काही करत नाहीत म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांकडे बैठक घेतली. माननीय मंत्री श्री. विनोद तावडे साहेबही होते. ते मराठा आरक्षणाच्या संदर्भात अध्यक्ष झाले, त्यामुळे त्यांच्याकडे बैठक झाली. मुख्य सचिवांकडे माननीय मंत्री श्री. विनोद तावडे साहेब आणि आम्ही बैठक घेतली. सर्व ठिकाणी बैठका घेतल्या. खात्याला आदेश दिला. सामान्य प्रशासन विभागाचे सचिव श्री. नलावडे यांना आदेश दिले. पण त्यांनी माननीय उच्च

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ....

न्यायालयाच्या निर्णयाचा चुकीचा आधार घेऊन या सर्व प्रक्रियेमधील जवळपास 1600 ते 2000 मुलामुलींवर अन्याय केला आणि त्याकरिता मी पहिली मागणी केली की, संबंधित श्री. नलावडे यांना निलंबित करण्याची शिफारस केंद्र सरकारकडे केली पाहिजे. त्याचे कारण असे आहे की, गेल्या काही महिन्यांत जेव्हा नोव्हेंबरला स्थगिती आदेश दिला तेव्हापासून ते 7 एप्रिलच्या दरम्यान माननीय उच्च न्यायालयाने कायद्याला स्थगिती दिली तेथपर्यंत पदे भरण्याचे अधिकार शासनाला असताना सुध्दा शासन निर्णय काढला नाही, आदेश काढला नाही, ही पहिली चूक आहे. दुसरा निषेध करावा असा विषय असा आहे की, आज जे उत्तर दिले आहे त्यामध्ये 2 डिसेंबरचा आदेश आहे तोच फक्त छापला आहे, या पलीकडे फक्त सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे, एवढ्यासाठीच त्यांनी बुध्दी वापरली आहे. बाकी नवीन काही नाही. प्रश्न असा आहे की, शासनाने निवेदनामध्ये म्हटले आहे की, या सर्व मुलामुलींना 11 महिन्यांकरिता नवीन खुल्या वर्गातून परत प्रक्रिया करून संधी द्यावी. कोणाला द्यावी ? आमचा मूळ मुद्दा असा आहे की, या कालावधीमधील ईएसबीसीच्या ज्या मुलामुलींची निवड झाली आहे, मुलाखती झाल्या आहेत, त्यांना संधी द्यावी. सभापती महोदय, ते न करता पूर्णपणे वेगळी प्रक्रिया आहे. ती पूर्ण करायची का ? ज्यांची निवड झालेली आहे, त्यांच्यावर अन्याय कशासाठी करत आहात हा प्रश्न आहे. परंतु त्याला बगल दिली आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

सभापती : मी सन्माननीय सदस्य सर्वश्री. सतीश चव्हाण व अमरसिंह पंडित यांना सांगू इच्छितो की, जरा गांभीर्याने घ्यावे, खाली बसून बोलणे कृपा करून थांबवावे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, आपल्याला उत्तर पाहिजे, मुलामुलीच्या नोकरीसाठी सुरक्षितता पाहिजे की राजकारण करायचे आहे ? मला व्यक्तिश: या मुलामुलींना न्याय मिळाला पाहिजे असे वाटते म्हणून उत्तर पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझी हरकत आहे. निवेदनात स्पष्ट सांगितले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन दिले आह. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. सदर विषयासंबंधी माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार असतील तर एवढे विषय बोलून उपयोग काय आहे ? शासनाचा काही दोष नाही असे लक्षवेधी सूचनेवर बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल तर नेमका यामध्ये दोष कोणाचा आहे ? (अडथळा) आमचे नाव आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

सभापती : सन्मानीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी त्यांचे मत व्यक्त केले. आपले नाव लक्षवेधी सूचनेत आहे. आपल्याला संधी मिळेल तेव्हा बोलावे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझा पॉईंटेड प्रश्न आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझी हरकत अशी आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात निवेदन दिले आहे.

(विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, हा बालिशपणा काही दिवस सहन करा. माननीय मंत्री बसून बालिशपणा असे म्हणत आहेत. आपण आम्हाला संरक्षण द्यावे. आपण आम्हाला संरक्षण द्यावे की नाही ? (अडथळा) हा बालिशपणा आहे का, मराठा आरक्षणाविषयी आम्ही बोललो हा बालिशपणा आहे का ?

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

सभापती : माननीय मंत्र्यांनी अशा प्रकारच्या कॉमेंट करू नये. हे बरोबर नाही. आपण शब्द मागे घ्यावेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य बसून बोलतात, त्यांना आपण बोलू देता, त्यावेळी आम्ही गप्प बसलो. आम्ही ऐकतो याचा अर्थ असा नाही.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीतच असतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती : अशा परिस्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे अशक्य असल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.00 ते दुपारी 3.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

...Q-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभापती : सभागृहात अचानक घडलेल्या प्रसंगामुळे काही काळापुरती कटुता आणि तणाव निर्माण झाला होता. आता माझ्या समोर दोन प्रश्न आहेत. मी मंत्री या नात्याने मागील 15-20 वर्षापासून या ज्येष्ठ सभागृहाच्या प्रथा आणि परंपरा बघितलेल्या आहेत, तणावाचे प्रसंग देखील बघितलेले आहेत. परंतु, वाढते प्रकार असे दिसतात की, आपल्या जागेवर बसूनच सभागृह चालविण्याचा जो प्रयत्न होतो तो यापुढे होऊ नये. मग तो मंत्री महोदयांचा असेल किंवा सन्माननीय सदस्यांचा असेल. (...अडथळा....) सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील साहेब, पुढे काय करावयाचे ते आपण करू आपण खाली बसून बोलू नका. मंत्री महोदय आपण या संदर्भात थोडक्यात बोलून सभागृहाचे कामकाज व्यवस्थित करावे, अशी माझी विनंती आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मराठा समाजातील तरुणांच्या आरक्षणाच्या अत्यंत महत्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा सुरु आहे. या अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु असताना तळमळीपोटी असेल, परंतु बसून बोललेले रेकॉर्डवर येत नाही असे समजून मी जे बोललो असेल ते शब्द मी मागे घेतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे साहेबांनी मघाशी लक्षवेधी सुचनेवर दोन प्रश्न विचारले होते.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माझे स्पेसिफिक प्रश्न असे आहेत की, दिनांक 2 डिसेंबर, 2015 रोजी ईएसबीसीचा शासन निर्णय काढलेला आहे. या निर्णयात सुधारणा करुन आरक्षणाच्या कालावधीत जी मुले-मुली नोकरीसाठी पात्र असतील त्या सर्व मुला-मुलींना कोर्टाच्या आदेशाच्या अधिन राहून नोकरी देण्याचे, ऑर्डर देण्याचे, नियुक्ती देण्याचे सुधारीत आदेश शासन काढणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, ज्या मुलांना या आरक्षणानुसार शैक्षणिक प्रवेश मिळालेला आहे त्यांना शैक्षणिक फी, शैक्षणिक शिष्यवृत्ती आणि त्यांचे प्रवेश अबाधित ठेवण्याचे काम शासन सुधारीत शासन निर्णयानुसार करणार आहे काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, या सर्व गोष्टींना ज्यांनी विलंब लावलेला आहे ते सामान्य प्रशासन विभागाचे सचिव श्री.नलावडे यांची चौकशी करुन त्यांच्या निलंबनाची शिफारस शासन करणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. मघाशी सभागृहात जे वातावरण निर्माण झाले त्याबाबत मी बोललो आहे. हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. रोज अनेक तरुण येऊन भेटतात आणि त्यांची स्थिती बघितल्यानंतर आपल्यालाच वाईट वाटते. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे तळमळीपोटी जे बोललो ते वक्तव्य मी मागे घेतो आणि दिलगिरी व्यक्त करतो. मराठा समाजातील तरुणांना न्याय देण्याचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी सांगितल्याप्रमाणे या संदर्भात सातत्याने काही बैठका झालेल्या आहेत. न्यायालय, नोकरशाही आणि शासनाचे निर्णय यामध्ये बेसिक स्पष्टता असली पाहिजे. आपण आरक्षण घोषित केले. त्या दरम्यान जाहिराती आल्या, उमेदवारांच्या मुलाखती झाल्या आणि उमेदवार सिलेक्ट झाले. उमेदवारांना आपण सिलेक्ट झाल्याचेही कळले. परंतु, त्यांना ऑर्डर मिळाली नाही. त्यांना ऑर्डर मिळाली नाही, याचा अर्थ त्यांची नेमणूक झाली नाही असे समजायचे की झाली असे समजायचे ? या निवडीला स्थगिती द्यायची की या प्रोसेसला कन्टिन्यू करायचे, या विषयाबाबत स्वाभाविकपणे संबंधित विभागाची काही मते होती आणि या संदर्भात विधी व न्याय विभागाचे मत जाणून घेणे, ॲडव्होकेट जनरल यांचे मत जाणून घेणे, ही सर्व प्रक्रिया त्यामध्ये झाली. या विषयाच्या संदर्भात अगोदरही बैठका झालेल्या आहेत. या संदर्भात आम्ही मुख्य सचिवांबरोबर देखील बैठका घेतलेल्या आहेत. आता फायनली शासनाने असे ठरविले की, न्यायालयाच्या अधिन राहून आणि निदर्शनास आणून ज्यांची निवड झाली होती, ज्यांना निवड झाल्याचे कळले होते, परंतु नेमणुकीचे पत्र त्यांच्या पर्यंत पोहोचले नव्हते, अशा तरुणांची आपण निवड केली पाहिजे. दुसरा मुद्दा असा आहे की, विद्यार्थ्यांना जे आरक्षण दिले होते ते तर आपण अबाधित ठेवलेच आहे. परंतु, त्यांच्या शैक्षणिक शुल्काचा जो विषय आहे त्यासाठी वेगळा आदेश काढावयाचा होता. तो आदेश न काढल्यामुळे त्यांच्या शुल्काचे काय करावयाचे याबाबत आरक्षण पुढे 4 वर्षे सुरु ठेवण्याबाबतचा निर्णय त्यावेळी मंत्रिमंडळाने घेतला.

..R-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

शुल्काच्या बाबतीत मंत्रिमंडाळासमोर जाऊन निर्णय घ्यावा लागेल. त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे ॲडव्होकेट जनरल व विधी खाते यांचे मत त्या त्या विषयात घेण्यात येत आहे. यासंदर्भात एप्रिल व ऑगस्ट महिन्यात पाठपुरावा करण्यात आला आहे. त्या त्या वेळी विधी खाते व ॲडव्होकेट जनरल आणि माननीय न्यायालय यांच्याकडून माहिती येत असल्यामुळे उशीर होत आहे. त्यामुळे या प्रक्रियेत एकाच व्यक्तीचा दोष आहे असे न मानता ही प्रोसेस किचकट होती, कायद्याच्या बारीक गोष्टी होत्या, या सर्व बाबी लक्षात घेऊन कार्यवाही करण्यात आली आहे, या सर्व गोंष्टी अधिक गतीने करता आल्या असत्या परंतु याबाबत त्या त्या खात्यांची परस्पर विरोधी मते आल्यामुळे दिरंगाई झाली होती. मला असे वाटते की, पहिल्या दोन प्रश्नांची उत्तरे मिळाली तर सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना न्याय दिल्याचे समाधान मिळेल व पुढील विषय न केलेले बरे राहील.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, जुलै महिन्यात देण्यात आलेल्या आश्वासनाला आता आठ ते नऊ महिने झाले आहेत. मंत्री महोदयांनी आश्वासन दिले त्याबाबत मी सर्व मराठा समाजाच्या वतीने आपले आभार मानतो. सुधारित आदेश निश्चितपणे किती दिवसात निघेल व या मराठा समाजाला न्याय मिळेल याचे आपण उत्तर द्यावे.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना मी सांगू इच्छितो की, मघाशी सांगितल्याप्रमाणे सर्व वेगवेगळी मते आम्ही कोर्टाच्या निदर्शनास आणून ही बाब लगेच करण्यात येईल. मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांची नेमणूक न झाल्यामुळे बेंच बनत नाही. हा विषय त्या बेंचसमोरच आणावा लागणार आहे. हा बेंच बनेल त्यावेळी त्यांच्यासमोर मराठा आरक्षणाचा विषय मांडण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, 7 एप्रिल रोजी हायकोर्टाने जो निर्णय दिलेला आहे, त्यानुसार त्यांनी ओपनमधून नियुक्ती करावी, परंतु ईएसबीसीमधून पूर्ण प्रक्रिया सुरु करावी याबाबत काही नमूद करण्यात आले नाही. अर्धा ग्लास पाणी असताना तो कोणाला अर्धा ग्लास भरलेला दिसतो तर कोणाला अर्धा ग्लास रिकामा दिसतो अशा पध्दतीचा निकाल आहे. या विभागाने त्याचा उलटा अर्थ घेतला आहे. व मराठा समाजाचे नुकसान केले आहे. म्हणून यासंदर्भात तातडीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

अभ्यास करुन 15 दिवसात किंवा अधिवेशन संपल्यानंतर एक महिन्याच्या आत जी.आर. काढण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यासंदर्भातील पूर्ण अभ्यास करण्यात आलेला आहे, या बाबी उच्च न्यायालयाच्या निर्णयात आणून देण्यात येतील याबाबत आपण काळजी करु नका.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी अशी मागणी केली की, संबंधित अधिकाऱ्याला सस्पेंड करा. याबाबत शासनाला धोरण ठरवायचे आहे, त्यामध्ये अधिकारी काय करणार, यामध्ये अधिकाऱ्यांचा काय दोष आहे, मराठा आरक्षणाचा विषय अतिशय संवेदनशील झालेला आहे. त्यामुळे अधिकारी यात निर्णय घेऊ शकत नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या महत्वाच्या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत मला दोन स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचे आहेत, मराठा आरक्षणासंदर्भात राखीव ठेवण्यात आलेल्या पदांच्या बाबतीत माननीय उच्च न्यायालयाचे नेमके काय आदेश आहेत, हे सभागृहाला कळले पाहिजे. ज्या शासन निर्णयाबाबत येथे चर्चा केली जाते, सदर शासन निर्णयातील अनुक्रमांक (e) मध्ये शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित पदे गुणवत्तेनुसार खुल्या संवर्गात धरुन नियुक्ती देण्याबाबत निर्देश केले आहेत, म्हणजेच या संवर्गातील आरक्षित पदावर सदर पदोन्नत्या दिल्याने थर्डपार्टी इंटरेस्ट निर्माण होणार आहे, अशा परिस्थितीत भविष्यकाळात न्यायप्रक्रिया किंवा कायदेशीर प्रक्रियेतून आरक्षण पुनर्स्थापित झाल्यास या प्रवर्गातील उमेदवार या जागांपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. म्हणून शासन शुध्दीपत्रक 2 डिसेंबर, 2015 वगळण्यात येणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी कोर्टाने काय आदेश दिले ते सांगावे असे म्हटले आहे, तो निर्णय डिटेल असल्यामुळे मी तो पटलावर ठेवतो. त्यामुळे ती पूर्ण ऑर्डर आपणाला वाचावयास मिळेल. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे इतर विषयात संभ्रम नाही. ज्यांची निवड झाली त्यांना पत्र पोहचले नव्हते, या उमेदवारांना काय मानावयाचे यासंदर्भातील निर्णय आता आम्ही घोषित करीत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मंत्री महोदय, माझी स्वत:ची एक शंका आहे, आपण कायदा करतो, त्या कायद्यात आपण बदल करतो, या विषयाबाबत हायकोर्टाने जे आक्षेप घेतले आहेत किंवा स्टे दिला असेल, त्यानुसार आपण सुधारित अध्यादेश काढला. पहिला कायदा किंवा अध्यादेश आणि हायकोर्टाच्या निर्णयानुसार काढण्यात आलेला सुधारित अध्यादेश याच्या मधील जो कालावधी आहे, माझ्या माहितीनुसार व मला जे काही थोडेफार कळते त्याप्रमाणे आपण कायद्यात बदल करतो त्यावेळी शेवटचा क्लॉज सेव्हींगचा असतो. पहिल्या कायद्यानुसार ज्या काही घटना घडतात किंवा कोणी त्याबाबत ॲक्शन घेतली असेल, त्यानुसार काही फायदे व तोटे झाले असतील. त्या सर्व ॲक्शन व कृती आपण सेव्ह करीत असतो. जे करणार आहात त्याबाबत याचा देखील विचार आपण करावा. मला स्वत:ला वाटते की, सेव्हींग क्लॉज जर टाकला तर हे सर्व प्रश्न आटोमॅटिक सुटतील. कोर्टाच्या अधीन राहून सरकारला जे करायचे आहे ते आपण करावे इतकेच मला म्हणायचे आहे.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले आहे की, कोर्टाचा आदेश मी पटलावर ठेवतो. स्टे ऑर्डर आरक्षणाच्या मुद्यांवर मिळाली आहे की, भविष्यात शिक्षण व नोकरी करीत असलेल्या मुलांसाठी स्टे ऑर्डर मिळाली आहे, याचे उत्तर देण्यात यावे. कोर्टाची ऑर्डर पटलावर ठेवण्यापेक्षा दोन मिनिटात उत्तर दिले तर पुढील दिशा क्लिअर होईल. ऑर्डर काढण्यात ज्या पध्दतीने दिरंगाई झाली त्याचा अर्थ स्पष्ट होतो की, स्टे ऑर्डर ही सर्व प्रोसेला मिळाली असेल. शिक्षण व नोकरी या दोन विषयावर आरक्षणाची मागणी करण्यात आली होती. राजकीय आरक्षण मागील सरकारने नाकारले होते. राजकीय आरक्षणाची मागणी कोणी केली नव्हती. शिक्षण व नोकरी या दोन विषयावर स्टे ऑर्डर मिळाली असेल तर मंत्री महोदय सभागृहाला आश्वासन कसे देतात की, आम्ही पुढील काही दिवसात त्वरित व्यवस्थित नवीन ऑर्डर काढू, जेणेकरून ज्या मुलांनी परीक्षा दिली असेल किंवा ज्यांची नियुक्ती झाली असेल त्यांना पुन्हा त्या ठिकाणी रूजू करण्यात येईल. याबाबत मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी मांडलेला मुद्दा अतिशय महत्वाचा आहे. जो कायदा पारित केला त्याला स्टे देण्यात आलेला आहे. कायदा पारित करुन स्टे मिळेपर्यंत जो कालावधी गेला त्या कालावधीत ज्यांना आरक्षणातून नेमणुका देण्यात आल्या. त्या कालावधीत जाहीरात आली, परीक्षा झाली, मुलाखत झाली व सिलेक्ट झाले. जे सिलेक्ट झाले त्यातील काही लोकांना नियुक्त्या देण्यात आल्या त्यांना संरक्षण आहे, फक्त संभ्रम इतका आहे की, मुले सिलेक्ट झाले परंतु त्यांना ऑर्डर दिली नाही या मुलांना सिलेक्टेड मानायचे की नाही. त्याबाबत माननीय सभापती महोदयांनी सांगितल्याप्रमाणे उच्च न्यायालयाच्या अधिन राहून त्यांना सिलेक्टेड मानून आदेश देण्यात येतील.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, एखादा विषय न्यायप्रविष्ट होतो त्यावेळी संबंधित व्यक्तीला न्याय मिळेपर्यंत न्यायालयीन कालावधी किती जाईल हे तुम्ही आम्ही कोणीही सांगू शकत नाही. हा महत्वाचा विषय आहे, त्यामुळे माननीय कोर्टात हे विषय वारंवार मेन्शन केले पाहिजेत. मराठा समाजाच्या आरक्षणाचा कालावधी वाढू नये म्हणून संबंधित विषयाबात माननीय कोर्टात तातडीने विषय मेन्शन करुन यासंदर्भातील कार्यवाही मंत्री महोदय करणार काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या विषयाबाबत मी असे सांगू इच्छितो की, उच्च न्यायालयाने हा विषय फेटाळला होता, त्यानंर शासन सुप्रीम कोर्टात गेले, सुप्रीम कोर्टाने असे सांगितले की, पुन्हा त्याच न्यायालयात जाऊन सुनावणी घ्यावी. याबाबत आपणाला साधारणपणे कळते की, ज्या न्यायालयात ही बाब फेटाळली तेथे पुन्हा सुनावणी घेतली तर त्यासंदर्भात काय शक्यता आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे अशी आपली सर्वांची इच्छा आहे, त्यासंदर्भातील पुरावे व माहिती गोळा करण्यात थोडा कालावधीत जात आहे. आधीच्या माहितीच्या आधारे कोर्टात गेलो तर सकारात्मक निकाल येणार नाही म्हणून अधिकची माहिती गोळा करण्यात येत आहे. मराठा समाज सामाजिकदृष्ट्या कसा मागास आहे याबाबत माहिती गोळा केली आहे, ती कोर्टात सादर करण्यात येईल. जुनी कागदपत्रे घेऊन घाईघाईने कोर्टात गेलो असतो तर पुन्हा हरलो असतो म्हणून ही केस आता भक्कम करण्यात आली आहे, मी सभागृहाला आश्वस्त करतो की, आपण मराठा समाजाला आरक्षण मिळवून देऊ.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नवी मुंबई महानगरपालिकेमधील सह शहर अभियंता (विद्युत) श्री.जी.व्ही.राव यांचा मनमानी कारभार

मु.शी. : नवी मुंबई महानगरपालिकेमधील सह शहर अभियंता (विद्युत) श्री.जी.व्ही.राव यांचा मनमानी कारभार यासंबंधी श्री.नरेंद्र पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नवी मुंबई महानगरपालिकेमधील कार्यरत सह शहर अभियंता (विदयुत) श्री.जी.व्ही.राव यांचा वर्षानुवर्षे चालत आलेला मनमानी कारभार माहे नोव्हेंबर 2015 मध्ये उघडकीस येणे, श्री. राव यांच्या विरुध्द विद्युत विभागातील जवळपास सर्वच अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्या जाचाला कंटाळून आयुक्तांकडे तक्रार केलेली असणे, श्री.राव यांनी कनिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांना पदाचा गैरवापर करुन नेहमीच शिवीगाळ करणे, अपशब्द वापरणे, गलिच्छ भाषेत संभाषण करणे व जातिवाचक उदगार काढून त्यांचा सतत अपमान करणे, आजी-माजी नगरसेवकांना सौजन्याची वागणूक न देता त्यांच्यामध्ये व कर्मचाऱ्यांमध्ये गैरसमज निर्माण करुन वादाची परिस्थिती तयार करणे, त्यांच्या जाचाला कंटाळून तक्रार करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्यालयीन कामकाजाच्या नस्तीवर देखील अपशब्द लिहीणे किंवा त्या नस्त्या गहाळ करणे, महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या समितीच्या बैठकांना जास्तीत जास्त वेळ अनुपस्थित राहून जबाबदारी संबंधित नसलेल्या अधिकाऱ्यांवर ढकलणे, श्री.राव यांनी नवी मुंबई महानगरपालिकेतील कनिष्ट अधिकाऱ्यांमध्ये निर्माण केलेले दहशतीचे वातावरण, सदर हुकूमशाही वर्षानुवर्षे सर्रासपणे चालू असून त्याविरुध्द तक्रारी प्राप्त झाल्यानंतरही प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, आयुक्तांनी पूर्वीच चौकशीचे आदेश देऊन देखील अद्यापपर्यंत चौकशी पूर्ण न होणे, त्यामुळे महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेली संतापाची भावना, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

....S-1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, नवी मुंबई महापालिकेचे शहर अभियंता श्री.जी.बी.राव यांच्याबद्दलची ही लक्षवेधी सूचना आहे. या अधिकाऱ्याने आपल्या कारकिर्दीत सातत्याने हाताखालील विविध संवर्गात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जातीवाचक शब्द वापरून त्रास दिलेला आहे. सर्वांसमोर कर्मचाऱ्यांचा अपमान करणे, स्त्री पुरुष कर्मचाऱ्यांची पदोन्नतीबाबत अडवणूक करण्याचा प्रयत्न केला आहे. श्री.मिलिंद पवार या कनिष्ठ अभियंत्याची 3 वर्षात 3 ते 4 वेळा बदली करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या वडिलांनी तक्रारी केलेल्या आहेत. नवी मुंबई महापालिकेच्या सर्व पक्षीय नगरसेवकांनी आयुक्तांकडे या अधिकाऱ्याबाबत तक्रारी केलेल्या आहेत. तरी देखील त्यांच्यावर कारवाई होत नाही. मंत्री महोदयांनी सांगितले की, दिनांक 17.8.2015 रोजी समिती नेमली आहे. या समितीने कोणते निष्कर्ष काढले आहेत? या अधिकाऱ्याला त्याच पदावर कार्यरत ठेवून त्यांची चौकशी करणे योग्य होणार नाही. या अधिकाऱ्याची आयुक्तांनी चौकशी करण्याऐवजी दुसऱ्या विभागातील अधिकाऱ्यामार्फत चौकशी केली जाईल काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या प्रकरणाच्या चौकशीचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्यामध्ये हे सिध्द झाले आहे की, काही अंशी त्यांचा या प्रकरणामध्ये दोष आहे. प्रिलिमनरी चौकशी अहवालानंतर नैसर्गिक न्याय तत्वाप्रमाणे त्यांचे काय म्हणणे आहे हे विचारले जाईल आणि तथ्य आढळलेच आहे. परंतु जोपर्यंत फायनल रिपोर्ट येत नाही तोपर्यंत त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यातील वाहतुकीच्या सोयीसाठी उभारण्यात येणाऱ्या विविध मेट्रो रेल्वे प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या समस्या

मु.शी. : राज्यातील वाहतुकीच्या सोयीसाठी उभारण्यात येणाऱ्या विविध मेट्रो रेल्वे प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या समस्या यासंबंधी सर्वश्री शरद रणपिसे, संजय दत्त, मुझफ्फर हुसैन, अशोक ऊर्फ भाई जगताप ,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील विविध शहरांमध्ये वाहतुकीच्या सोयीसाठी मेट्रो प्रकल्प उभारण्याचे घेण्यात आलेले निर्णय, त्यासाठी उभारावा लागणारा कोट्यवधी रुपयांचा निधी, सदर प्रकल्प राबविण्यासाठी जागतिक बँक, जपान आंतरराष्ट्रीय सहकारी संस्था, तसेच इतर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून निधी उभारण्याचा घेण्यात आलेला निर्णय, असे असले तरी राज्यातील जनतेवर विविध प्रकारे मोठ्या प्रमाणात शुल्क आकारण्याचेही प्रस्तावित असणे, त्यामुळे जनतेत पसरलेली नाराजीची भावना, या बाबी विचारात घेता राज्यात उभारावयाचे सर्व प्रकल्प, त्यांचा कालावधी, तसेच जनतेवर शुल्क आकारुन करावयाची निधीची उपलब्धता, या सर्व बाबी जनतेसाठी स्पष्ट करण्याची गरज, या प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या निवासी व व्यावसायिक व्यक्ती यांना पर्यायी जागा देण्याची आवश्यकता, मुंबईतील प्रकल्पामुळे मंत्रालयासमोरील फ्री प्रेस जर्नल मार्गावरील व परिसरातील बाधित होणारी मोठ्या प्रमाणातील विविध राजकीय पक्षांची कार्यालये, त्यांना बेलार्ड इस्टेटमधील पोर्ट हाऊसमध्ये तात्पुरती जागा देण्याचे प्रस्तावित असणे, सदर जागा मंत्रालय, विधानभवन, यापासून दूर असल्यामुळे फारच गैरसोयीचे असणे, तसेच त्यामुळे लोकप्रतिनिधींना विधीमंडळ व मंत्रालयीन कामकाजाच्यादृष्टीने होणारा त्रास, या बाबींमुळे राजकीय पक्ष कार्यालये, मंत्रालय/विधानभवन, परिसरातच असावीत अशी राजकीय पक्षांची असलेली मागणी या सर्व मुद्यांबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, नवी मुंबई, मुंबई, पुणे व नागपूर महापालिका क्षेत्रात वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने मेट्रो रेल्वे प्रकल्प येत आहेत. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी निधी कसा गोळा करण्यासाठी शहरात विकास शुल्कात 100 टक्के वाढ, स्थावर मालमत्तेची विक्री, देणगी त्याचबरोबर मेट्रो मार्गिकेच्या दोन्ही बाजूला 500 मीटर अंतरापर्यंत अतिरिक्त वाढीव चटई क्षेत्र मंजूर केले जाणार आहे. म्हणजे पुणे मेट्रो रेल्वे मार्गिकेच्या दोन्ही बाजूला 500 मीटरपर्यंत एफएसआय वाढवून दिला जाणार आहे. शासनाने 4 एफएसआय प्रस्तावित केला आहे. पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी 4 एफएसआय वाढवून दिल्यामुळे त्या परिसरात येणारी वाढीव लोकसंख्या, होणारे कमर्शियलायझेशन, त्यासाठी आवश्यक असणारी ड्रेनेज व्यवस्था, मूलभूत सुविधा, पाणी याचे गणित केले आहे काय? मुंबईसारख्या मोठया इमारती पुण्यामध्ये उभ्या राहतील, परंतु जमिनीवर कोणत्याच मूलभूत सुविधा नाही अशी परिस्थिती निर्माण होईल. शासनाकडून अशा प्रकल्पासाठी पीपीपी पध्दतीचा करार केला जातो. मुंबईतील मेट्रो प्रकल्पासाठी रिलायन्स कंपनीबरोबर करार करण्यात आला होता. कालांतराने कंपनीकडून करारातील एखाद्या मुद्दा पुढे करून भाडेवाढ करण्याची मागणी केली जाते. पुण्यातील प्रकल्पाबाबत असा करार होणार आहे का, होणार नसेल तर पुणेकरांवर मेट्रो रेल्वेच्या तिकिटाचा वाढीव भार पडणार नाही याचा सरकारने विचार केला आहे का? कुलाबा ते सीप्झ मेट्रो प्रकल्पाच्या अनुषंगाने मुंबईतील नरिमन पॉईंट येथील राजकीय पक्षांची कार्यालये स्थलांतरित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या राजकीय पक्षाच्या कार्यालयांचे पुनर्वसन इतर ठिकाणी करण्यापेक्षा त्याच परिसरात करण्याचा विचार व्हावा. राजकीय पक्षांच्या कार्यालयामध्ये सतत कार्यकर्त्यांची गर्दी असते. मंत्रालयाशेजारी पर्यटन विकास महामंडळाचे कार्यालय आहे, त्या कार्यालयात फारशी गर्दी नसते. अशी कार्यालये स्थलांतरित करून त्या जागेवर राजकीय पक्षाच्या कार्यालयांचे स्थानांतरण करण्यात येईल काय?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी 4 एफएसआय संदर्भात प्रश्न विचारला आहे. हा प्रकल्प आजच्या काळाची गरज असला तरी खूप खर्चिक आहे. 1 कि.मी.भूमिगत मार्गिकेसाठी 2500 ते 3000 कोटी रुपये खर्च येतो. उन्नत मार्गासाठी कमी खर्च येतो. मत्ता उभी करावी लागते. प्रायव्हेट पार्टनरच्या माध्यमातून किंवा शासनाला ती जनरेट करावी लागते. मत्ता उभी करण्यासाठी म्हणून 4 एफएसआय देत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) S.5

SGB/ AKN/ ST/ 15:30

डॉ.रणजित पाटील....

सभापती महोदय, या बरोबरच विकासाबद्दल जे म्हटले आहे ते सुध्दा आहे. जेवढे ॲव्हेन्यू आहेत, त्यातील कमर्शियल एक्स्प्लॉयटेशन असेल, रेल्वे स्थानक किंवा तेथील परिसर असेल त्यातून मत्ता उभी करण्याचा प्रयत्न करीत आहोत. रिलायन्स कंपनीचा अनुभव माननीय सदस्यांनी सांगितला. मुंबईतील मेट्रो रेल्वे प्रकल्प बूट पध्दतीवर हाती घेण्यात आला, त्याचा आज अनुभव आपण भोगत आहोत. फेअर फिक्सेशन कमिटीमध्ये एमआरए म्हणून रिलायन्स कंपनी बसली आहे. फिक्सेशन ती कंपनी करीत आहे. कारण आपण प्रायव्हेट पार्टनरला घेतले आहे. यासाठी आपल्याला आपली मत्ता उभी करण्याची गरज आहे. पुणे मेट्रो प्रकल्पासाठी राज्य सरकारचा हिस्सा 20 टक्के, केंद्र सरकारचा हिस्सा 20 टक्के, महापालिकेचा हिस्सा 10 टक्के व 50 हिस्सा कर्जाच्या स्वरूपात असणार आहे. त्यातून तो प्रकल्प उभा राहणार आहे. तिसरा प्रश्न राजकीय पक्षाच्या कार्यालयांच्या पुनर्वसनाबाबत विचारला आहे. कुलाबा-सीप्झ प्रकल्प पूर्णपणे अंडरग्राऊंड असणार आहे. तात्पुरत्या अवस्थेत मलबा बाहेर टाकण्यासाठी जागा उपलब्ध व्हावी म्हणून तात्पुरत्या स्वरूपात ही राजकीय पक्षांची कार्यालये हलविण्यात येणार आहेत. यासाठी दलामल टॉवरपासून आजूबाजूच्या परिसराबाबत विचार करण्यात आला होता. हे पुनर्वसन निश्चितपणे याच परिसरात होईल याची काळजी घेऊ.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, 4 एफएसआयमुळे मोठमोठे टॉवर पुण्यामध्ये उभे राहतील. आज पुण्यामध्ये 1 एफएसआय मंजूर असून हॉस्पिटल, शाळा यासाठी विशेष बाब म्हणून 0.5 एफएसआय वाढवून दिला जातो. 4 एफएसआय मंजूर केल्यानंतर पुण्यातील मूलभूत सुविधांवर प्रचंड ताण येणार आहे.

सभापती : मंत्री महोदय, बरेच पुणेकर नागरिक माझी मित्रमंडळी आहेत. ज्या कर्वे रोडवरून मेट्रो रेल्वे जाणार आहे त्या परिसरात अशी शंका आहे की, मेट्रो मार्गिकेच्या दोन्ही बाजूला 500 मीटरपर्यंत 4 एफएसआय मंजूर केला जाणार आहे, त्यामुळे तेथील भारतीय जनता पक्षाच्या नगरसेविका माझ्याकडे चर्चेसाठी आल्या होत्या. माझ्या मनात शंका आहे की, जर 4 एफएसआय वाढवून होणारी पुढील पॉप्युलेशन आणि मेट्रोमध्ये हीच माणसे बसावीत अशी अपेक्षा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. थोडक्यात तुम्हाला मेट्रो प्रकल्प फिजिबल करण्यासाठी एफएसआय वाढवायचा आहे काय? म्हणजे 4 एफएसआय दिला नाही तर हा प्रकल्प फिजिबल होणार नसेल तर करण्यात अर्थ काय

...6..

17-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) S.6

SGB/ AKN/ ST/ 15:30

सभापती.....

आहे? म्हणजे पुढील इन्फ्रास्ट्रक्चर, पुण्यातील 5 धरणे, अजून सहावे धरण घेतले, या वाढीव इन्फ्रास्ट्रक्चरचा या वाढीव लोकसंख्येमुळे येणारा ताण या पुढील गोष्टी आहेत. मला जर विचारले तर या प्रश्नाचा आपण थोडा विचार करावा असे मला वाटते.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, वाढीव एफएसआयबद्दल पूर्ण अभ्यास केला जाईल. त्याच्या फूट प्रिंट किती पडतील याचे ॲनालिसीस केले जाईल. लोकसंख्येची गर्दी, सोशल इम्पॅक्ट याचे पूर्ण असेसमेंट केले जाईल.

....टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मेट्रो पाहिजे म्हणून कन्जस्टेड एरिया निवडला आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सिंगापूरमध्ये देखील 8 एफएसआय देऊन प्रकल्प उभे राहिलेले आहेत. तेथे बिल्डींगच्या मधून मेट्रो रेल्वे गेल्याचे आपण पाहतो. आपल्याला आज दळणवळणाची साधने उभी करावयाची असतील तर आपल्याला पुढचे चॅलेंज स्वीकारावे लागले. आज आपण पुढचा विचार केला नाही तर मग मार्गच निघणार नाही. मग यात आपल्याला प्रायव्हेट पार्टनर घ्यावा लागेल. या सर्व सोशल इम्पॅक्टचे पूर्णपणे असेसमेंट केले जाईल. तेथे किती फूटप्रिंट पडतात या सर्व गोष्टीचा साकल्याने विचार केल्यानंतर निर्णय घेतला जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण पुणेकरांच्या मनातील प्रश्न येथे व्यक्त केल्याबद्दल मी आपली आभारी आहे. सभागृहात दिलेल्या उत्तराला कालमर्यादा असली पाहिजे. तसे पाहिले तर अमरावती हे पुण्यापासून खूप लांब आहे. पुण्यातील मेट्रो प्रकल्पासंबंधी आमच्या पालकमंत्र्यांना सगळी कल्पना आहे. पुणे शहरातील कर्वे रोड, प्रभात रोड येथे ज्यांनी घरे घेतली आहेत त्यांना मेट्रो ही शाप ठरत आहे. आधीच पुण्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर झालेला आहे. मी त्या सर्व वर्णनात जात नाही. या भागातील लोकप्रतिनिधींसह सर्वांचीच नाराजी आहे. येथे पेशाने वकिल असलेले लोक रहात आहेत. सरकारला वेळोवेळी मदत करणारे अनेक लोक तेथे रहात आहेत. केवळ ते मोठे ज्येष्ठ नागरिक आहेत म्हणून प्रश्न नाही. आपण एफएसआय वाढवून दिल्यानंतर त्या शहरातील नागरिकांच्या अडचणीमध्ये बाधा येणार असेल तर त्याचा आपण पुनर्विचार करणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आधीच सांगितले आहे की, या सर्व गोष्टींचा पायाभूत सुविधेवर ताण पडू नये म्हणून अभ्यास केला जाईल.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, काल मी या विषयावर एक प्रश्न विचारला होता. परंतु, त्यावर या सभागृहात चर्चा झाली नाही. पुणे मेट्रो प्रकल्प दिल्ली मेट्रो प्रकल्पाच्या माध्यमातून करण्याचे ठरले आहे. दिल्ली मेट्रोचे वरिष्ठ अधिकारी श्री.श्रीधरन यांनी एक अहवाल दिला होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले.

त्या अहवालात 4 एफएसआय द्यावा असे नमूद केले होते. कालच्या उत्तरात असे नमूद केले होते की, माननीय पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील मेट्रोचा नवीन सुधारित अहवाल माननीय मुख्यमंत्र्यांनी दिल्लीला सादर केला आहे. या अहवालात आपण काय काय सुधारणा केली आहे, त्यात कोणकोणते बदल केले आहेत हे आम्हाला समजले पाहिजे. मेट्रो चालवायची असेलतर आर्थिक गणित देखील बसले पाहिजे. एक महिना मेट्रो लेट झाली तर पाच कोटी रूपयांचा फटका बसणार आहे. हा फटका पुणेकर नागरिकांना सहन न होणारा आहे. मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी दिल्ली मेट्रो रेल्वे प्रकल्पाने 4 एफएसआय देण्याचे सुचविले आहे. हा एफएसआय महानगरपालिका किंवा शासनाने सुचविलेला नाही. आपण पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. त्या समितीने काय अहवाल दिला आहे, तो अहवाल पटलावर ठेवण्यात येणार आहे काय, तो दिल्यानंतरच यासंबंधी चर्चा करता येईल.

सभापती : आता सभागृहात पालकमंत्री उपस्थित असल्याने त्यांनी उत्तर द्यावे.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, पुण्यातील मेट्रो रेल्वे प्रकल्प हा ओव्हरहेड पाहिजे की, अंडर ग्राऊंड पाहिजे यावर 8 वर्षे चर्चा चालली आहे. यासंबंधी अनेक तज्ज्ञांशी बोलून इकॉनॉमिकल व्हायबल काय आहे हे बघून गावातून मेट्रो जात असेल तर तेथे ती अंडरग्राऊंड व बाकीच्या ठिकाणी ओव्हरहेड करण्याचा निर्णय घेतलेला आहे. पालकमंत्री म्हणून मी आयुक्तांबरोबर वारंवार बैठका घेतल्या आहेत. यासंबंधी मी महानरपालिकेच्या सर्व पक्षाच्या नेत्यांना, गट नेत्यांना भेटलो होतो. आता जो दिल्लीला अहवाल गेला आहे त्यात असे नमूद केले आहे की, पुण्याच्या मध्यभागी रस्त्यातून प्रकल्प नेण्या ऐवजी तो थोडासा नदीकाठी शिफ्ट करण्यात यावा. नदीच्या बाजूला कोथरूड, डेक्कन जिमखाना, शिवाजी नगर असा भाग आहे. पलीकडच्या बाजूला दत्त वाडी, नारायण पेठ, नवी पेठ, कसबा पेठ, शनिवार पेठ असा भाग आहे. शेवटी रायडरशिप वाढावी म्हणून तो प्रकल्प थोडासा शिफ्ट करण्यात आला आहे. यासंबंधी दिल्ली मेट्रोशी बोललो आहे. त्याचा प्लॅन तयार झाला आहे. शिफ्टींग केलेला थोडासा प्लॅन, डीपीआर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीश बापट...

बदल्यामुळे तो बदलून देण्यात आलेला आहे व तो दिल्लीला पाठविण्यात आलेला आहे. पुढील काही दिवसांमध्ये त्यासंबंधी कार्यवाही होईल असे मला वाटते. आता प्लॅन झाला की, एस्टीमेट तयार करण्यात येणार आहे. त्यानंतर मग ग्लोबल टेंडर काढण्यात येईल. यासंबंधातील जसजशी माहिती उपलब्ध होईल ती तस तशी पुण्यातील लोकांना कळविण्यात येईल.

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, एक प्लॅनर म्हणून पुण्याच्या मेट्रोला माझा पूर्णतः विरोध आहे. पण लोकांना तो प्रकल्प हवा आहे म्हणून मी तो स्वीकाराला आहे. त्यासंबंधी माझा एकच प्रश्न आहे. आपण जी सल्लागार समिती नेमली आहे त्यामध्ये अर्थतज्ज्ञ, उद्योगपती वगैर लोक आहेत. त्या लोकांबद्दल माझे काहीही ऑब्जेक्शन नाही. पण आयुष्यात जे रिक्षात पण बसले नाही ते आमच्या पुण्याची मेट्रो ठरविणार आहे काय ? त्यात प्लॅनर नाही, अर्बन डिझायनर नाही. त्यांचा या समितीमध्ये शासन अंतर्भाव करणार आहे काय ? मुंबईसाठी 2.53 एफएसआय नियम नियम 33 (7) अंतर्गत केला तेव्हा मुंबई उच्च न्यायालयाने सांगितले की, आपले मुंबईतील इन्फ्रास्टक्चर मजूबत आहे किंवा नाही ते पहावे. त्यानंतरच 33 (7) ची अमंलबजावणी करावी. पुण्यामध्ये केवळ पैसे उभारण्याकरिता मेट्रोच्या दोन्ही बाजूला 4 एफएसआय देत आहात. हा रूट देखील चुकलेला आहे. मुंबईच्या मनोरेलचे काही रूटस् चुकलेले आहेत. तसे पुण्याचे होणार आहे. तेव्हा अल्टरनेटीव्ह इकॉनॉमिकल व्हायबल मॉडेल आपण विचारात घेतले आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गाडगीळ यांचा या समितीमध्ये अन्य लोकांचा समावेश करणार आहात काय असा पहिला प्रश्न होता. ते काम त्याही पेक्षा पुढे गेलेले आहे. या प्रकल्पासाठी आपण दिल्ली मेट्रो रेल्वेकडून टेक्निकल सपोर्ट घेतला आहे. मुंबईमध्ये नियम 33 (7) अंतर्गत 4 एफएसआय वाढवून दिलेला आहे. येथे देखील आपण 4 एफएसआय देत आहोत. मी आधीच सांगितले आहे की, एफएसआय देताना अभ्यास केला जाईल. जास्त फूटप्रिंट कुठे आहे, कुठे जास्त रोड आहे या सर्वांचा अभ्यास करून झाल्यानंतरच 4 एफएसआय देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी सन्माननीय पालक मंत्री श्री.बापट साहेबांना विचारू इच्छितो की, आपल्या सभागृहात एवढा मोठा एक्सपर्ट असताना त्यांना आपल्या समितीवर निमंत्रित म्हणून का नियुक्त करीत नाही ?

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, समितीमध्ये कोण नेमावे यासंबंधातील चर्चा पुणे महानगरपालिकेत गेल्या 8 वर्षापासून सुरू आहे. ही 8 वर्षे चाललेली चर्चा पुणेकरांना आता बस झालेली आहे. मी पालकमंत्र्याचा चार्ज घेतल्यानंतर गतीने काम करण्यास सुरूवात केली असून दिल्लीमध्ये 2, मुंबईमध्ये 3 आणि पुण्यामध्ये 6 बैठका सर्व पक्षीयांना बोलावून घेतलेल्या आहेत.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय पालकमंत्र्यांनी फक्त बीजेपीच्या पदाधिकाऱ्यांनाच बोलाविले आहे. आम्हा कोणालाही बोलाविलेले नाही.

श्री.गिरीश बापट : आपल्याला बोलाविले नाही हे अगदी बरोबर आहे. त्याचे कारण दिल्लीमध्ये फक्त खासदारांना बोलाविले होते. आपल्या पक्षाचा पुण्यातून खासदारच निवडून न आल्यामुळे प्रॉब्लेम झाला. नाही तर त्यांना देखील बोलाविले असते.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, विधान सभा सदस्यांना बोलाविले जाते. विधान परिषदेच्या सदस्यांना बोलाविले जात नाही.

सभापती : ठीक आहे. मंत्री महोदय अन्याय दूर करून टाकावा. मला सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी विनंती केली आहे. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये अनुक्रमांक 9 वर त्यांची लक्षवेधी सूचना दर्शविण्यात आली असून माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर बैठकीला जायचे असल्यामुळे ती आधी घ्यावी अशी त्यांनी विनंती केली. त्यामुळे मी आता लक्षवेधी सूचना क्रमांक 9 घेत आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सामाजिक न्याय विभागाच्या विशेष शाळा व कर्मशाळा यांची अनुदानाअभावी होणारी उपेक्षा व दुरवस्था

मु.शी. : सामाजिक न्याय विभागाच्या विशेष शाळा व कर्मशाळा यांची अनुदानाअभावी होणारी उपेक्षा व दुरवस्था यासंबंधी श्री. कपिल पाटील वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत चालणाऱ्या विशेष शाळा व कर्मशाळा यांची अनुदानाअभावी होणारी उपेक्षा आणि दुरावस्था, अनुदानासाठी प्रतिक्षेत असलेल्या शाळांवरील आर्थिक संकट आणि त्यामुळे विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांची होणारी शैक्षणिक आबाळ, विशेष शाळा व कर्मशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना नियमित वेतन न मिळणे, अशा सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सेवार्थ ऐवजी शालार्थ प्रणालीद्वारे सहाय्यक अनुदान या लेखाशिर्षा ऐवजी अनुदान या लेखाशिर्षाखाली दरमहा एक तारखेला थेट वेतन देण्याची आवश्यकता असणे, विशेष शाळांच्या शिक्षकांचा विशेष दर्जा लक्षात घेऊन त्यांना माध्यमिक वेतनश्रेणी देण्याची गरज असणे, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची संधी नसलेल्या म्हणजेच एकाकी पदांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेल्या समुचित ग्रेड वेतनामध्ये सुधारणा केलेली नसणे, वेतनेतर अनुदान नियमित देण्याची आवश्यकता असणे, वयाची १८ वर्ष पूर्ण केलेल्या विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी प्रत्येक जिल्हयात कर्मशाळा उभी करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना, केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ज्या शासकीय स्पेशल व स्वयंसेवी संस्थाच्या शाळा आहेत यांच्यामधील अनुदानामध्ये रूपये 900 आणि रूपये 3000 इतकी तफावत आहे. ही तफावत आपण कशी दूर करणार आहात, या शाळांमधील कर्मचाऱ्यांना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत आपण वेतन देणार आहाता काय, या शिक्षकांसाठी लागणारे क्वालिफिकेशन, त्यांना लागणारी मेहनत लक्षात घेऊन त्यांना माध्यमिक शाळांची वेतनश्रेणी देण्याचे मान्य केले होते त्यासंबंधी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, वेतनेतर अनुदान कमी असल्याचे शासनाने स्वतःच मान्य केले आहे त्यामुळे यासंबंधी आपण माननीय वित्त मंत्र्यांसोबत बैठक घेणार आहात काय ?

U-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेबांनी एकत्र पाच प्रश्न विचारले आहेत. या विषयाची व्याप्ती पाहता विशेष शाळेच्या शिक्षकांच्या संदर्भातील हा विषय असल्यामुळे माननीय वित्त मंत्र्यांबरोबर आणि संबंधित वरिष्ठ अधिकारी किंवा या विषयाशी जे जे संबंधित आहेत त्यांच्याबरोबर आणि दोन्ही बाजुच्या पदवीधर आणि शिक्षक आमदारांबरोबर जानेवारीच्या मध्यावधीमध्ये घेण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्री महोदय नेहमीच आश्रमशाळा शिक्षकांच्या बाबातीत अभ्यास पूर्ण उत्तर देत असतात. निवेदनात विनाअनुदानित आश्रमशाळांची संख्या दिलेली आहे. ज्या शाळा विनाअनुदानित आहेत त्यांनाही आम्ही अनुदान देऊ असे उत्तर आम्हाला आपल्याकडून अपेक्षित होते. परंतु मला वाटते तसा उल्लेख आपल्याकडून चुकून राहून गेलेला दिसतो. अपंगाच्या विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याचा निर्णय आपल्याच मंत्री मंडळाने काही दिवसापूर्वी घेतला होता. परंतु विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याचा ज्या शाळा राहिलेल्या आहेत त्यांना सुध्दा अनुदानावर आणण्याच्या बाबतीत मंत्री मंडळापुढे जाऊन किती दिवसात निर्णय घेणार आहात ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, "ए" श्रेणीतील 123 शाळांना विशेष शाळा म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांच्या म्हणण्यानुसार शासन सकारात्मक असून त्यावर निश्चितपणे विचार केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. हरिसिंग राठोड : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या 148 शाळांना अनुदान सुरु होते, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनाही पगार सुरु होता. परंतु गेल्या दोन अडीच वर्षापासून शिक्षकांना पगार मिळत नाही. परवा हे शिक्षक शेगाव वरुन नागपूरला पायी आले होते. आता ते येथे उपोषणाला बसले आहेत.

सभापती :सन्माननीय सदस्य म्हणत आहेत की, त्या शिक्षकांचा येथे मोर्चा आलेला आहे. त्यामुळे आपण वैयक्तिक लक्ष घालावे व जमले तर त्या ठिकाणी जाऊन त्यांना भेटावे व हा प्रश्न सोडविण्यास मदत करावी.

श्री.दिलीप कांबळे : ठीक आहे.सभापती महोदय, संबंधित मोर्चकरांची मी आजच भेट घेतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : पुणे व पिंपरीतील पीएमपी सेवेचा व्यावसायिक आराखडा पूर्ण करण्यात होणारी टाळाटाळ

मु.शी. : पुणे व पिंपरीतील पीएमपी सेवेचा व्यावसायिक आराखडा पूर्ण करण्यात होणारी टाळाटाळ यासंबंधी श्री.अनिल भोसले, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे व पिंपरीतील दहा लाख नागरीक पीएमपी बसेसचा रोज वापर करीत असणे, पुणे आणि पिंपरी या दोन शहरांसाठी स्थापन करण्यात आलेल्या पीएमपी या कंपनीची प्रवासीसेवा कशी असावी याचा व्यावसायिक आराखडा (बिझिनेस प्लॅन) पुणे महापालिकेकडून दोन वर्षांपूर्वी करण्यात येणे, यासाठी पीएमपीला दोन कोटी रूपये पुणे महापालिकेकडून आराखडा तयार करण्यासाठी देण्यात येणे, परंतु या कामात पीएमपी प्रशासनाकडून व्यवसायिक पध्दतीने नियोजन केल्यास निर्णयप्रक्रिया काटेकोर होईल म्हणून पीएमपीचे संचालक मंडळ टाळाटाळ तसेच दिरंगाई करीत असणे, पुणे व पिंपरीतील पीएमपी बसने प्रवास करणाऱ्या दहा लाख प्रवाशांच्या प्रवासाच्या दृष्टीने हा व्यावसायिक आराखडा पूर्ण होणे अत्यंत आवश्यक असणे, हा व्यावसायिक आराखडा पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल भोसले: सभापती महोदय, सन 2014 मध्ये पुणे महानगरपालिकेने वाहतुकीच्या दृष्टीने आराखडा बनविण्यासाठी पीएमटीला पैसे दिले होते. त्यानंतर दोनदा निविदा काढली होती. परंतु ही निविदा तांत्रिक कारणामुळे मंजूर झाली नाही त्यामुळे सदरचे तांत्रिक कारण काय होते ?

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, निवेदनामध्ये उल्लेख करण्यात आला आहे की, संचालक मंडळाच्या सभेपुढे हा विषय ठेवलेला आहे. हा विषय मागच्या महिन्यातही पुढे गेलेला आहे. उद्या या संचालक मंडळाने हा आराखडा मंजूर न केल्यास राज्य सरकार हस्तक्षेप करणार काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या बिझनेस प्लॅनची मी स्वत: माहिती घेतली आहे. या ना त्या कारणाने दोन तीनदा या मंडळाकडून पुढे ढकलण्यात आला. पहिल्यांदा परिपत्रक सर्क्युटलेट पध्दतीने सर्क्युलेटचे कारण देण्यात आले. दुसऱ्यामध्ये निर्णय घेतला नाही आणि पुढे तो ठेवण्यास सांगितला. हा प्रश्न पुढच्या सभेत घेऊन निकाली काढण्याच्या संदर्भात निदेश देण्यात येतील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 7 बाबत

(मंत्री महोदय अनुपस्थित)

सभापती : मंत्री महोदय, श्री. बापट साहेब मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, लक्षवेधी सूचनेंचा बॅकलॉग असल्यामुळे आपण या आठवडयात रोज जास्त प्रमाणात लक्षवेधी सूचना लावत आहोत. आठवी लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकरांची होती व ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याची विनंती मंत्री महोदयांनी केली आहे. मला लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यास हरकत नाही परंतु ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याच्या संदर्भात जे कारण दिलेले आहे ते पटण्यासारखे नाही. मंत्री म्हणून मी सुध्दा सभागृहात उत्तरे दिलेली आहेत. आमच्या काळात ईमेल आणि इतर माध्यमे उपलब्ध नव्हती. आता मंत्री असे उत्तर देत आहेत की, आम्हाला रात्री बारा वाजता, दोन वाजता, तीन वाजता लक्षवेधी सूचना मिळाली. आमच्या काळातही अशाच वेळी लक्षवेधी सूचना मिळत होती परंतु आम्ही सकाळी ब्रिफिंग घेऊन उत्तरे देत होतो. माझे म्हणणे असे आहे की, ही प्रोसिजर आपण एकदा नीट बघू. एखादी लक्षवेधी सूचना जर स्वीकृत झाली असेल तर क्षेत्रीय माहिती अगोदरच गोळा करुन ठेवली पाहिजे. लक्षवेधी सूचना लागल्यानंतर क्षेत्रीय माहिती गोळा करण्याचे कारण काय ? आपण क्षेत्रीय माहिती अगोदरच गोळा केली तर हे प्रश्न ताबडतोब सुटतील. ठीक आहे. आता मंत्री महोदय सभागृहात उपस्थित झाल्यामुळे लक्षवेधी सूचना क्रमांक 7 घेण्यात येईल.

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वनविकास महामंडळाच्या बारमाही रोजंदारी वनमजुरांचा कायमस्वरूपी सेवेत समावेश करणे

मु.शी. : वनविकास महामंडळाच्या बारमाही रोजंदारी वनमजुरांचा कायमस्वरूपी सेवेत समावेश करणे यासंबंधी सर्वश्री. माणिकराव ठाकरे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, मुझफ्फर हुसैन सय्यद वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील वनविकास महामंडळाच्या बारमाही रोजंदारी वनमजूरांचा कायमस्वरूपी सेवेत समावेश करावा यासाठी गेल्या दहा वर्षांपासून लढा सुरू असून शासनाच्या दुर्लक्षामुळे या वनमजुरांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे डिसेंबर, 2015 दरम्यान निदर्शनास येणे, शासनाने या वनमजुरांच्या सेवेचा कालावधी लक्षात घेऊन काही अटी व शर्तीच्या अधिन राहून दिनांक 30 जानेवारी, 1996 च्या शासन निर्णयानुसार 10264 वनमजुरांची पदे निर्माण केलेली असणे, शासनाने किमान पाच वर्षे शासन सेवेत असलेल्या वनमजुरांना शासन सेवेत कायम करावे यासाठी अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली असणे, या समितीने या वनमजुरांना म्हणजे दिनांक 1 नोव्हेंबर, 1994 ते जून, 2004 पर्यंत कायम करण्यात यावे असा अहवाल दिलेला असणे, तसेच शासनानेही दिनांकक 1 जून, 2012 पासून शासनसेवेत कायम करण्याचा निर्णय घेतलेला असणे, परंतु या निर्णयाची न झालेली अंमलबजावणी, परिणामी या वनमजुरांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे त्यांनी हिवाळी अधिवेशनात मोर्चा काढण्याचा केलेला निर्धार, या वनमजुरांना शासन सेवेत कायम करण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. सुधीर मुनगंटीवार (वनमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...६..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधरी मुनगंटीवार : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सविस्तर माहिती मी निवेदनाच्या वेळी दिलेली आहे. परंतु सन्माननीय सदस्यांना अजून काही सूक्ष्म उत्तर हवे असेल तर ती देण्यास माझी तयारी आहे.

श्री.हरिसिंग राठोड : या विषयाच्या संदर्भात मंत्री महोदयांनी सकाळी उत्तर दिलेले आहे. परंतु माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी रोजंदारी कामगारांच्या संदर्भात निर्णय घेतला जाणार आहे काय ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, 675 वनमजूरांना कायम केले पाहिजे अशी शासनाची भूमिका असून यासंदर्भात विभागीय आयुक्तांनीही अहवाल दिलेला आहे. 675 मजुरांना स्थायी केले तर शासनाच्या तिजोरीवर 30 कोटी 12 लाख 81 हजार 525 रुपयांचा बोजा पडणार आहे. परंतु तरीही हे अधिवेशन संपेपर्यंत यासंदर्भातील एकत्रित केलेली माहिती न तपासता या मजुरांना स्थायी करणे योग्य होणार नाही, उचित होणार नाही. सन्माननीय सदस्यांनी या सभागृहात ज्या भावनेने प्रश्न विचारला आहे त्यासंदर्भात माननीय सभापती महोदयांनीही सहा महिन्यापूर्वी एक पत्र दिले होते. आपल्या सर्वांच्या भावना लक्षात घेऊन या मजुरांना स्थायी करण्याची प्रक्रिया आपण वेगाने करु परंतु बुधवार पर्यंत या मजुरांना स्थायी करता येईल का यासंदर्भातील उत्तर.....

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. हरिसिंग राठोड या विषयाच्या संदर्भात मंत्री महोदयांना थोडा अवधी दिला तर ते योग्य होईल. मंत्री महोदय, पॉझिटीव्ह आहेत.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय वन मंत्री श्री. मुनगंटीवार साहेब चंद्रपूर जिल्हयाच्या सोबत वर्धा जिल्हयाचेही पालक मंत्री आहेत. वर्धा जिल्हयातील वन विकास महामंडळाचे कामकाज बंद झालेले आहे. त्या ठिकाणी जवळ जवळ 150-200 वनमजूर काम करीत होते. या वनमजूरांचे समायोजन करु असे म्हटले गेले होते. परंतु अनेक वर्षापासून या वनमजूरांचे समायोजन झालेले नाही. या मजुरांना वन विभागाच्या दुसऱ्या कोणत्याही कामावर घेतले नसल्यामुळे त्यांना रोजंदारी मिळत नसल्यामुळे त्यांच्यावर आज उपासमारीची वेळ आलेली आहे. सेलू तालुक्यात या विषयाच्या संदर्भात अनेकदा उपोषणे, आंदोलने झाली आहेत. परंतु आतापर्यंत यासंदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे .....

मंत्री महोदयांनी जातीने लक्ष घालून सेलू विभागातील वन मंडळ बंद झाल्यामुळे तेथील वनमजुरांचे समायोजन करुन त्यांना कामावर घेतले जाणार आहे काय ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, वन विकास महामंडळाचे काम बंद झाले की, नाही याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु नियमानुसार ज्या मजुरांने वर्षामध्ये किमान 240 दिवस काम केले अशा 16810 मजुरांना, यामध्ये वनविभागाचे काही लोक आहेत व काही सामाजिक वनीकरण विभागाचे व काही लोक एफडीसीएमचे आहेत. आपण आतापर्यंत 16810 लोकांना स्थायी केले आहेत. आता जो अहवाल आलेला आहे त्यामध्ये 675 लोकांचा समावेश आहे. अगोदर हा आकडा 738 चा होता परंतु यातील 9 लोकांचा मृत्यू झाला असून जवळपास 54 लोकांचे वय 60 च्या वर गेलेले आहे. आपल्याला 675 मजूर स्थायी करावयाचे आहेत.

V-1/.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार...

या 675 कर्मचाऱ्यांमध्ये आपण ज्यांच्या संबंधी प्रश्न विचारलेला आहे त्याची नावे असतील तर ते निश्चितपणे स्थायी होतील. त्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता नाही. परंतु आपण नावांची यादी दिल्यास ते 675 कर्मचाऱ्यांमध्ये आहेत किंवा कसे हे तपासून सांगू शकेन.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी माननीय मंत्र्यांना धन्यवाद देतो. ते स्थायी होईपर्यंत त्यांना काम तरी दिले पाहिजे. त्यांना कामावर घेतले जात नाहीत, हे खरे आहे काय ?

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, त्या ठिकाणी एफडीसीएमच्या संदर्भात रोपवन सुरु असेल तर काम देण्याची पद्धत आहे. जर काम नसेल तर त्यांना नरेगामधून काम उपलब्ध होऊ शकते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहात संबंधित विभागाचे मंत्री उपस्थित नसणे

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, विधानसभेमध्ये भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीचे औचित्य साधून डॉ.बाबासाहेब आंबेडकर व व संविधान या विषयावर चर्चा सुरु आहे. खालच्या सभागृहात माननीय मंत्री श्री.राजकुमार बडोले थांबलेले आहेत. माननीय राज्यमंत्री श्री.दिलीप कांबळे यांना देखील त्या विषयावर बोलायचे होते, परंतु मी त्यांना या सभागृहात बोलाविलेले आहे. तेव्हा सभागृहात मंत्री नाहीत असे नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : ज्येष्ठ नागरिक धोरणाच्या अंमलबजावणीतील दिरंगाई

मु.शी. : ज्येष्ठ नागरीक धोरणाच्या अंमलबजावणीतील दिरंगाई यासंबंधी सर्वश्री. जगन्नाथ शिंदे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, मुझफ्फर हुसैन, माणिकराव ठाकरे, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्यायस व विशेष सहाय्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मातृ पितृ देवो भव" असे म्हणवणाऱ्या आपल्या राज्यात जेष्ठ नागरिकांची घोर उपेक्षा होत असल्याचा आरोप जेष्ठ नागरिकांच्या कृती समितीने केलेला असणे, राज्याच्या जेष्ठ नागरिक धोरणात सुधारणा करून ते अंमलात आणण्यासाठी मागील वर्षभर सातत्याने पत्र व्यवहार करणे, राज्यभर गंभीर समस्येतून जात असलेल्या जेष्ठ नागरिकांना 1 वर्षात 7 पत्रे केवळ भेटीसाठी लागत असल्याने जेष्ठ नागरिकांबाबत शासनाकडून दिसून येणारी उदासिनतेची भावना, राज्यांच्या जेष्ठ नागरिक धोरणातील तरतुदीची आजमितीस अंमलबजावणीही न होणे, परिणामतः राज्यातील 60 टक्के जेष्ठ नागरिकांना 2 वेळेचे अन्नही मिळत नसल्याची परिस्थिती, राज्यातील मोठया प्रमाणावरील जेष्ठ नागरिकांची संख्या व त्यांची होत असलेली उपेक्षा विचारात घेवून शासनाने लवकरात लवकर योग्य तो ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जगन्नाथ शिंदे : सभापती महोदय, मी लक्षवेधी सूचनेमध्ये जे प्रश्न विचारले होते त्या प्रश्नांची उत्तर देण्याऐवजी वेगळीच उत्तरे दिलेली आहेत. सभागृहाची दिशाभूल करणारी ही उत्तरे आहेत. तेव्हा यामध्ये बदल करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या साडेसहा लाख आहे. ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य, त्यांना होणारा स्मृतीभ्रंश यावरील उपचारांसाठी सरकारच्या विविध योजना आहेत. परंतु या योजनेचा लाभ ज्येष्ठ नागरिकांना मिळत नाही. या संदर्भातील त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांपर्यंत तक्रारी केलेल्या आहेत. परंतु माननीय मुख्यमंत्री, माननीय मंत्री आणि अधिकारी यांनी त्यांच्या तक्रारींचे निराकरण केलेले नाही. माझा प्रश्न आहे की, ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण कोण करणार आहे ? ज्या ज्या जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या तक्रारी मांडल्या असतील आणि त्या तक्रारींचे निराकरण झाले असेल तर ती माहिती पटलावर ठेवावी. शासनाने सन 2013 मध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी जे धोरण आखले होते त्याची अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे 60 टक्के ज्येष्ठ नागरिकांना जेवण, औषध, निवास मिळत नाही. या प्रश्नांचे निराकरण किती कालावधीत करणार आहात ? ज्या अधिकाऱ्यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण केले नसेल त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, या सदनातीत ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.जगन्नाथ शिंदे यांनी राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. त्यांनी सांगितले की, जिल्ह्या जिल्ह्यात गावा-गावांतून ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण होत नाही. ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एका अधिकाऱ्याची नियुक्ती शासन करणार आहे. अपंग विभागाचे सहाय्यक आयुक्त हे दर महिन्याच्या पाच तारखेला जिल्ह्याच्या ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी बसणार आहेत. ज्येष्ठ नागरिकांच्या ज्या इतर तक्रारी आहेत त्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात येईल. ज्येष्ठ नागरिकांना 600 रुपये निवृत्ती वेतन मिळते त्यामध्ये देखील शासन वाढ करणार आहे. राज्यातील ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींच्या संदर्भात किंवा सोयीसुविधांच्या संदर्भात शासन नक्कीच काळजी घेईल एवढे या निमित्ताने सांगतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेखाच्या सूचना

पृ.शी./मु. शी. : राज्यात विशेषत: मुंबईमध्ये बोगस पॅथॉलॉजी लॅब चालविणाऱ्याविरुद्ध तातडीने कारवाई करणे याबाबत श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, मुंबईसह राज्यात बोगस डॉक्टरांची संख्या वाढत असतानाच त्याच बरोबरीने बोगस पॅथॉलॉजी लॅबची संख्याही वाढत आहे. मुंबईसह राज्यात सुमारे 5 हजार बोगस पॅथॉलॉजी लॅब सुरु असल्याची धक्कादायक माहिती पुढे आलेली आहे. यामुळे राज्यात पेशंटच्या जीवाशी खेळ सुरु असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. अद्यापपर्यंत शासनाने बोगस लॅबवर कोणतीही कारवाई केलेली नाही."

सभापती महोदय, मी संदर्भात स्वत: अनुभव घेतलेला आहे. माझ्या मुलीला व्हायरल झाला होता. मी कल्याण येथील रॅनबॅक्सी एसआरके लॅबमध्ये रक्ताचे नमुने तपासण्यासाठी पाठविले. लॅबने लेप्टो झाल्याचा रिपोर्ट दिला. त्यामुळे मी मुलीला बॉम्बे हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले. त्या ठिकाणी रक्ताचे नमुने तपासल्यावर मुलीला साधा व्हायरल असल्याचे दिसून आले. चुकीचा रिपोर्ट मिळाल्यामुळे किती मनस्ताप होऊ शकतो याचा मी अनुभव घेतलेला आहे. चुकीच्या रिपोर्टमुळे हजारो नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागलेला आहे. शासनाने या विषयाकडे गांभीर्याने पहावे आणि त्यासंबंधी उचित पाऊल उचलावीत अशी माझी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, बोगस लॅबच्या संदर्भात शासन एक विधेयक आणत आहे. मी त्या संदर्भात सातत्याने पाठपुरावा करीत आहे. एडस झालेला नसताना एडस झाल्याचा चुकीचा रिपोर्ट दिल्यामुळे त्या व्यक्तीवर आत्महत्या करण्याची पाळी आली होती, पण तो वेळीच वाचला. या विषया संदर्भातील फाईल महसूल आणि गृह विभाग विभागांकडे अडकून पडली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ही फाईल लवकरात लवकर क्लिअर करण्याच्या संदर्भात आपण निर्देश द्यावेत जेणेकरुन या संदर्भात लवकर कायदा होऊन जे लोक फसले जात आहेत त्यांची यातून सुटका होईल आणि राज्यात बोगस डॉक्टर्स आणि बोगस पॅथॉलॉजीचा जो सुळसुळाट झालेला आहे त्यास आळा बसेल.

सभापती : शासनाने नोंद घ्यावी.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु. शी. : बिंदू वायु (ऊर्जा) प्रा.लि.कंपनी, सिन्नर (जि.नाशिक) यांनी गहाणखत करताना नियमाप्रमाणे मुद्रांक शुल्क अदा न करता शासनाची केलेली फसवणूक याबाबत श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"बिंदू वायु प्रा.लि.या कंपनीने दुय्यम निबंधक कार्यालय, सिन्नर, जिल्हा नाशिक येथे 774 कोटी रुपये किंमतीचे गहाणखत करणे, गहाणखत करताना केवळ 10 लक्ष रुपये मुद्रांक शुल्क अदा करणे, मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार 40 कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक असणे, नियमाप्रमाणे मुद्रांक शुल्क अदा न केल्यामुळे शासनाचे 40 कोटी रुपयांचे आर्थिक नुकसान होणे, हे शासकीय अधिकाऱ्यांच्या संगनमताने झालेले आहे, याबाबत तक्रार देऊनही अद्याप कारवाई न होणे, शासनाचा मुद्रांक शुल्क बुडवून शासनाची फसवणूक करणाऱ्या कंपनी विरुद्ध तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारा शासनास करीत आहे."

सभापती महोदय, मी मैत्रा वायुच्या संदर्भात सभागृहात वेगवेगळ्या आयुधांद्वारे चार वेळा प्रश्न उपस्थित केला होता. या कंपनीने नगर जिल्ह्यात देखील हेच केलेले आहे. शासनाकडे प्रकरणे आल्यानंतर ती कोर्टात न्यायची व कोर्टाकडून स्थगिती मिळवावयाची आणि आपले काम सुरु ठेवायचे. कोर्टात शासनाच्या बाजून व्यवस्थित प्रेझेन्टेशन न झाल्यामुळे शासनाच्या विरोधात निकाल जात आहे आणि काही प्रकरणे प्रलंबित राहत आहेत. या ठिकाणी माननीय वित्तमंत्री उपस्थित आहेत. हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. सिन्नरचे प्रकरण अजून कोर्टात गेलेले नाही. तेव्हा या संदर्भात नोंद घेऊन कारवाई करणे अत्यंत गरजेचे आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, नोंद घेतलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु. शी. : डहाणू तालुक्यातील (जि.पालघर) विविध परिसरात वीज ग्राहकांना महावितरण कंपनीकडून नवीन डिजीटल मीटर दिल्यानंतर अवाजवी बिले आकारण्यात येणे, या बाबत श्री.आनंद ठाकूर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.आनंद ठाकूर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या व निकडीच्या बाबीवर विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

"पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील डहाणू, वाणगांव, बोर्डी, कासा, चारोटी, सायवन, आशागड, जामशेत, आंबोली, गंजाड, चिंचणी आदि परिसरात महावितरण कंपनीने ग्राहकांना नवीन डिजीटल मीटर दिल्यानंतर त्यांना दुप्पट-तिप्पट बिले देण्यात येणे, कैनाड या ठिकाणी मीटर बसवून जोडणी न देता हजारोंची बिल आकारणी केली जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, नवीन डिजीटल मीटर लावल्यानंतर महावितरण व कंत्राटदाराने रिडींग न घेता रिडींग उपलब्ध नाही अशा प्रकारचा उल्लेख असलेली बिले देण्यात आल्याने ती तिप्पट-चौपट तर कुठे 50 पट देण्यात येणे, तर काही ठिकाणी घरापर्यंत न पोहचता अंदाजे देयक दिले जाणे, ग्राहकांना अशी अव्वाच्या सव्वा बिले देऊन कनेक्शन तोडण्याची महावितरण कंपनीकडून देण्यात येत असलेली धमकी, ग्राहकांना बिलासाठी सतावणारे महावितरणचे कनिष्ठ अभियंता, सहायक अभियंता व कार्यकारी अभियंता नवीन विद्युत जनित्र, विद्युत खांब व विद्युत तारांच्या मंजुरी करार कंत्राटात कंत्राटदाराशी संगनमत करुन आर्थिक देवाण-घेवाण करुन चुकीच्या मोजमापाद्वारे पुस्तकी रेकॉर्ड करुन चुकीची बिले अदा करीत असल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये महावितरण कंपनीबाबत निर्माण झालेला संताप, तीव्र चिडेची भवना, महावितरणच्या मनमानी कारभारावर अधिकाऱ्यांचे नसलेले नियंत्रण, विद्युत वापरापेक्षा किती तरी तांत्रिक सदोष व चुकिचे येणारे रिडींग यामुळे ग्राहकांना गंडवण्याचा एककलमी कार्यक्रम महावितरणने चालविलेला असल्यामुळे याची सखोल चौकशी करुन शासनाने या बाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, सदर विषय सार्वजनिक महत्त्वाचा असल्याने मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास शिफारस करीत आहे."

श्री.सुधीर मुनगंटीवार : नोंद घेण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु. शी. : पुणे, महानगरपालिका अंतर्गत सुरक्षा रक्षक नेमणूक प्रक्रियेत झालेली अनियमितता, त्यामुळे महानगरपालिकेला आर्थिक नुकसान सोसावे लागणे, या बाबत श्री.अनिल भोसले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या व निकडीच्या बाबीवर विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"पुण्यातील संगमवाडी ते विश्रांतवाडी, आळंदी रोड, नगर रोड, येथील बीआरटी मार्ग तयार झाल्यानंतर मार्च, 2014 पासून तेथे सुरक्षा रक्षक नेमून त्यांना वेतन अदा करण्यात येणे, पुणे महापालिकेच्या मुख्य सभेने 1100 सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्याची मंजुरी दिलेली असताना प्रत्यक्षात 1600 सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यात येणे, त्या सुरक्षा रक्षकांच्या वेतनापोटी करोडो रुपये खर्चूनही या बीआरटी मार्गावरील बसथांबा व ऑटोमेटिक ॲल्युमिनियम स्लायडींग डोअर यांची मोडतोड तसेच काही वस्तू चोरीला गेलेल्या असणे, सुरक्षा रक्षक असूनही या बीआरटी मार्गावरील झालेल्या नुकसानीच्या दुरुस्तीपोटी सुमारे दोन कोटी रुपये खर्च येणे, सुरक्षा रक्षकांची नेमणूक न करताच त्यांचे बिल काढण्यात आल्याचे सुरक्षा रक्षकांच्या हजेरी पत्रकावरुन स्पष्ट होणे, परिणामी यातून पुणे महानगरपालिकेला आर्थिक नुकसान सोसावे लागणे, महापालिकेचे आर्थिक नुकसान थांबविण्यासाठी सुरक्षा रक्षकांवर होणाऱ्या चुकीच्या खर्चाबाबत चौकशी करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

सभापती : शासनाने नोंद घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु. शी. : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या निधीचा विनियोग प्रभावीपणे होत नसणे, या बाबत श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

"कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाकडून दलित वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत घनकचरा विभागातर्फे स्वच्छतागृहांचा करण्यात आलेल्या सर्व्हेक्षणानुसार 3164 कुटुंबे स्वच्छता गृहांच्या प्रतीक्षेत असल्याचे सप्टेंबर, 2015 मध्ये उघडकीस येणे, केंद्र व राज्य सरकारने गावागावांत हागणदारीमुक्त योजना राबविल्यानंतरही, 'स्मार्ट सिटी' च्या यादीत समाविष्ट असलेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात 3000 पेक्षा अधिक परिवारांना शौचालय नसणे, प्रतिवर्षी दलित वस्ती सुधार योजनेचा कोट्यवधी रुपयांचा शासकीय निधी येत असतानाही एवढ्या मोठ्या प्रमाणात कुटुंबे शौचालयांपासून वंचित असल्याने, राज्य शासनाकडून मागील पाच ते दहा वर्षात देण्यात आलेल्या दलित वस्ती सुधार योजनेच्या निधीच्या विनियोगाची सखोल चौकशी होण्याची आवश्यकता असल्याची शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

सभापती : शासनाने नोंद घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु. शी. : राज्यात विकास कामांकरिता काढण्यात येणाऱ्या ई-टेंडरींग धोरणात बदल करुन 15 लाखांवरील कामे ई-टेंडरींगद्वारे देणे, या बाबत ॲड.रामहरी रुपनवर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

"महाराष्ट्रामध्ये विकास कामे करताना तीन लाख रुपयांच्या वरील रकमेची कामे ई-टेंडरिंग पध्दतीने दिली जातात व तीन लाख रुपयाच्या आतील कामे ग्रामपंचायत किंवा विभागामार्फत केली जातात. यापूर्वी ही मर्यादा 10 लाख रुपयांपर्यंतची होती. सध्या महागाईमध्ये फार मोठी वाढ झाली असल्याने पूर्वीची 5 लाखाच्या कामाची किंमत आता 15 लाख रुपये झाली आहे.

सध्या स्पर्धेमध्ये ई-टेंडरिंग भरली जात आहेत. त्यामुळे 80 टक्के टेंडर हे 25 ते 30 टक्के कमी दराने भरली जात आहेत. त्यामुळे कामाची गुणवत्ता घसरली आहे. कामे मुदतीमध्ये व गुणवत्तेची होत नाहीत. तसेच वर्ष अखेरीस निधी खर्च न होणे व तो परत जाणे याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे जनतेत तीव्र नाराजी आहे. ग्रामपंचायतीला काहीही अधिकार न राहणे, ई-टेंडरिंग पुन्हा पुन्हा काढावी लागणे, त्यामुळे नाहक वेळ जाणे व निधी परत जाणे यांचे प्रमाण वाढले आहे. यासाठी या धोरणामध्ये बदल होणे आवश्यक आहे. यासाठी 15 लाखांच्या वरील रकमेची कामे ई-टेंडरिंग पध्दतीने देण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही."

सभापती : सकाळी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हा विषय उपस्थित झाला होता. त्यावेळी मी काही सूचना केल्या आहेत. सुशिक्षित बेकार तरुण आणि मजूर सोसायट्यांशी संबंधित हा विषय आहे. हे दोन्ही घटक मला या अधिवेशनात भेटायला आले होते. मी सकाळी ज्या भावना व्यक्त केल्या होत्या त्याच आता सुध्दा करतो. ई-निविदा पध्दत अत्यावश्यक आहे, पोस्ट क्वॉलिफिकेशन सुध्दा अत्यावश्यक आहे. परंतु त्याचे जे नकारात्मक परिणाम आहेत त्यातून मार्ग काढून विशेषत: मजूर सोसायट्या आणि सुशिक्षित बेकार तरुणांसाठी थोडीशी मोनोपॉली तयार करुन दिली होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

मी संसदीय कार्य मंत्र्यांना सांगू इच्छितो की, ही बाब लक्षात घेऊन 3 लाखाच्या वरील ई-निविदेला अपवाद करण्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्री यांच्या बरोबर संबंधित विभागाची बैठक घेण्यात येईल एवढे आपण माननीय मुख्यमंत्र्यांना कळवावे.

श्री.गिरीष बापट : होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु. शी. : मुंबई शहरात धर्मादाय न्यासाकडे नोंदणी असलेल्या रुग्णालयांमध्ये गरीब व दुर्बल घटकांसाठी राखीव असलेल्या 10 टक्के खाटा रुग्णांना मिळत नसल्यामुळे त्यांची होत असलेली गैरसोय, या बाबत श्री.किरण पावसकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या व निकडीच्या बाबीवर विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

"मुंबई शहरात मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अंतर्गत सार्वजनिक धर्मादाय न्यासाकडे खाजगी रुग्णालयांची नोंद करण्यात येत असणे, या धर्मादाय रुग्णालयात एकूण खाटांच्या दहा टक्के खाटा गरीब आणि दहा टक्के खाटा दुर्बल घटकांमधील रुग्णांसाठी खास राखून ठेवून अनुक्रमे मोफत तसेच निम्म्या दरात वैद्यकीय सेवा देण्याचे न्यासाचे स्पष्ट निर्देश असताना या रुग्णालयांमधून या रुग्णांना वैद्यकीय उपचार दिले जात नसणे, तसेच दादरच्या शुश्रूषा रुग्णालयात खाट रिकामी नसल्यामुळे एका रुग्णाचा बळी गेल्याचे ऑगस्ट, 2015 मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास येणे, या बाबत शासनाने सदरहू रुग्णालयांच्या बाबतीत कठोर कारवाई करावी व त्यांना या बाबतीत स्पष्ट निर्देश द्यावेत. तसेच दरवर्षी 10 टक्के गरीब व दुर्बल घटकांना किती खाटा उपलब्ध करुन दिल्या जातात याचे वार्षिक ऑडिट करावे, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास शिफारस करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु. शी. : बृहन्मुंबई पालिकेतील 28 हजार सफाई कामगारांना त्यांच्या वसाहतीत मालकी हक्काची घरे तातडीने देणे, या बाबत ॲड.जयदेव गायकवाड, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या व निकडीच्या बाबीवर विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

"गत वर्षी दिनांक 4 जून, 2014 रोजी सफाई कामगारांना हक्काचे घर मिळावे यासाठी सफाई कामगारांनी उत्स्फूर्त लढा सुरु करणे आणि लढताना सदर लढ्यात नवाकाळचे संपादक यांनी सफाई कामगारांना मार्गदर्शन केले, तसेच दिनांक 3 मार्च, 2014 रोजी आंदोलन करण्यात आले असता माननीय मुख्यमंत्री यांनी बृहन्मुंबई पालिकेतील 28 हजार सफाई कामगारांना त्यांच्या वसाहतीमध्ये मालकी हक्कात घर देण्याची घोषणा करुन सुमारे 11 महिन्याचा कालावधी ओलांडून सुध्दा मुंबई शहरात सफाई कामगारांसाठी घरे बांधण्याची कार्यवाही होईल किंवा नाही या बाबत साशंकता निर्माण झालेली आहे. सबब, सदर सफाई कामगारांना घरे मिळण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

सभापती : शासनाने नोंद घ्यावी.

..एक्स....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक या शाळांचा 'कायम' शब्द काढून त्यांना अनुदान देण्याचा निर्णय आघाडी शासनाने म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या सरकारच्या काळात घेतला गेला. परंतु त्यानंतर राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत जी एमसीव्हीसी कनिष्ठ महाविद्यालये चालविली जातात, ज्यांना खाजगी तत्वावर परवानगी दिलेली आहे, तसेच जी वरिष्ठ महाविद्यालयेसुध्दा कायमस्वरूपी विनाअनुदान तत्वावर दिली गेलेली आहेत, त्यांना सुध्दा अनुदान द्यावे यासाठी अनेक वेळा सभागृहात प्रश्न उपस्थित केला आहे. परंतु या सरकारला संवेदना नसल्यामुळे ऐकण्याच्या पलीकडे हे सरकार काही करत नाही. त्यामुळे या एमसीव्हीसीच्या कनिष्ठ महाविद्यालयांना आणि वरिष्ठ महाविद्यालयांना अनुदान द्यावे अशा प्रकारची मागणी मी करत आहेत. तसेच यांचा 'कायम' हा शब्द काढावा आणि या शिक्षक कर्मचाऱ्यांना वेतन सुरू करावे. यासाठी मी विशेष उल्लेखाद्वारे या ठिकाणी मागणी करत आहे. माननीय मंत्री श्री. गिरीष बापट साहेबांच्या कानावर ही मागणी गेली आहे असे मला वाटते. तेव्हा त्याबाबतीत सभापती महोदय, आपण त्यांना निर्देश द्यावेत.

सभापती : खास नोंद घेण्यात यावी.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडते.

सभापती महोदय, मी तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या विषयी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. आपण उद्योजकता वाढविण्यासाठी खूप प्रयत्न करत आहात. परंतु विश्व बँकेच्या अहवालात म्हटले आहे की, जगातील 18 देशांत महिलांना काम करण्याच्या संदर्भात सोयीसुविधा देणारे कायदे आहेत. भारतात स्त्रियांना खाण किंवा तत्सम क्षेत्रात मर्यादेपेक्षा जास्त वजन उचलावे लागते तर काच उत्पादन करणाऱ्या क्षेत्रात महिलांना काम करू दिले जात नाही. विविध धोरणांमधील ही विसंगती आहे. त्यामुळे हा असणारा दुजाभाव दूर करण्यासाठी आणि त्याचवेळी त्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी इक्वल पे ॲण्ड इक्वल राईट्स कमिशन कायदा जसा युरोपमधील देशांमध्ये आणि अमेरिकेसारख्या विकसित देशांमध्ये आहे त्याप्रमाणे करणे ही महाराष्ट्राच्या उद्योजकतेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. राज्य प्रागतिक राज्य म्हणून पुढे जाण्यासाठी याचा फार उपयोग होऊ शकेल. विविध कंपन्यांमध्ये डायरेक्टर म्हणून स्त्रियांना नेमण्याबाबत तरतूद करणारे जगात देश आहेत. भारतात तशी तरतूद आहे. मात्र असे फक्त 9 देश आहेत. परंतु याची अंमलबजावणी होत नाही हा फार मोठा प्रश्न आहे. इक्वल पे ॲण्ड इक्वल राईट्स कमिशन कायदा करण्याच्या संदर्भात राज्याने येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये पावले उचलावीत याकडे मी विशेष उल्लेखाद्वारे लक्ष वेधत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये मुंबई, पुणे, नांदेड, जळगाव, रायगड, लातूर, कल्याण, भंडारा इत्यादी शहरांमध्ये ट्रॅफिक वॉर्डन हे मासिक मानधनावर वाहतूक पोलिसांना मदतीचे काम करत आहेत, नाशिक शहरात सुध्दा दि. 05 सप्टेंबर, 2004 रोजी पोलीस महासंचालकांच्या हस्ते ओळखपत्र वितरित करून ट्रॅफिक वॉर्डन योजनेचा शुभारंभ करण्यात आलेली असून त्यांना ट्रॅफिकचे नियम आणि कायदेविषयक माहितीचे 90 दिवसांचे प्रशिक्षण सुध्दा देण्यात आलेले आहे. मात्र सन 2009 नंतर ही योजना शहरात बंद करण्यात आलेली आहे. राज्यातील सर्व मोठया शहरांमधील वाढता विस्तार, वाढती लोकसंख्या व वेगाने वाढणारी वाहनांची संख्या याचा विचार करून वाहतुकीच्या नियमनासाठी वाहतूक पोलिसांसोबत ट्रॅफिक वार्डनची नियुक्ती करून या वाहतूक मदतनीसांना होमगार्डच्या धर्तीवर मानधन देण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे करत आहे.

सभापती : शासनाने नोंद घ्यावी.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, योगायोगाने या ठिकाणी माननीय गृह राज्यमंत्री देखील उपस्थित आहेत. हे महत्त्वाचे संसदीय आयुध आहे. अनेक वेळा या आयुधाच्या मार्फत अनेक विषयांना न्याय मिळाला आहे. परंतु विशेष उल्लेखाच्या व इतर आयुधांच्या माध्यमातून हा विषय मांडण्याची तिसरी-चौथी वेळ आहे. मी माननीय गृह राज्यमंत्र्यांना विनंती करतो की, त्यांच्याकडे जरी ग्रामीणचा भाग असला तरी येथे आपल्या सूचना मिळाव्यात आणि याबाबत एक विशेष बैठक तातडीने त्यांच्या दालनात किवा आपल्या दालनात घ्यावी आणि हा विषय मार्गी लावावा.

सभापती : मंत्री महोदय, आपल्या दालनात बैठक घ्यावी किंवा माझ्या दालनात बैठक घ्यावी. आपल्याला योग्य वाटेल तसे करावे.

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, आपण सांगाल त्याप्रमाणे करण्यात येईल. सदर बाबतीत काही अडचण नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी आज दिलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना स्वीकारलेल्या नाहीत. तो आपला निर्णय मला मान्य आहे. परंतु काल व आजही मी एक औचित्याचा मुद्दा मांडण्याची मला संधी मिळावी अशी विनंती केली आहे. आपण मला परवानगी द्यावी अशी विनंती आहे. खूप महत्त्वाचा विषय आहे. मी कालही हा विषय दिला होता. आजही पत्र दिले आहे. मात्र संधी मिळाली नाही. आपली परवानगी मिळावी.

भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षणाच्या कोल्हापूर येथे होणाऱ्या परीक्षेची तारीख बदलण्याबाबत

सभापती महोदय, केंद्रीय लोकसेवा आयोगाची सहायक भविष्य निधी आयुक्त पदासाठीची परीक्षा दिनांक 10 जानेवारी, 2016 ला आहे. 3 वर्षांतून एकदा ही परीक्षा आता होत आहे. अनेक उमेदवारांनी परीक्षेसाठी फॉर्म भरले आहेत. मात्र त्याच दिवशी भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षणाची कोल्हापूर केंद्रामध्ये परीक्षा होत आहे. त्यामुळे उमेदवारांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे की, आपण केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला जायचे की कोल्हापूर येथे होणाऱ्या सेवापूर्व प्रशिक्षण परीक्षेला जायचे. एक परीक्षा मुंबईला आहे तर दुसरी परीक्षा कोल्हापूरला आहे, एक परीक्षा सकाळी 10 ते दुपारी 12 आहे आणि दुसरी 12 ते 2 आहे. मुंबईचा उमेदवार कोल्हापूरला पोहचणे शक्य नाही. त्यामुळे माझी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून विनंती आहे की, सेवापूर्व प्रशिक्षण परीक्षेची तारीख आता निश्चित जरी झाली असली तरी, लोकसेवा आयोगाची तारीख बदलता येणार नाही, परंतु कोल्हापूर सेवापूर्व प्रशिक्षण परीक्षेची तारीख निश्चितपणे आपल्या स्तरावर बदलता येणे शक्य आहे. माझी शासनाला विनंती आहे की, भारतीय प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षणाच्या कोल्हापूर येथे होणाऱ्या परीक्षेची जरूर थोडी वेळ बदलावी म्हणजे त्या परीक्षेमध्ये सहभागी होण्याची संधी मिळू शकेल.

सभापती : उचित कार्यवाही करावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) X.5

MSK/ ST/ 16:20

पृ.शी./मु.शी. : विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करणे.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री. पुरुषोत्तम खेडेकर लिखित "शिवरायांच्या बदनामीची केंद्रे" या पुस्तकातील आक्षेपार्ह विधानांमुळे तसेच 'लोकप्रभा' अंकामधील प्रा. हरी नरके यांच्या "फॅसिस्ट शक्तींमुळे बहुजनांचे विभाजन" या लेखातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण या विषयावरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सभागृहास सादर करते.

सभापती : विशेषाधिकार समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहात मांडलेल्या विविध विषयांच्या संदर्भातील कार्यवाहीबाबत

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, श्री. पुंडलिक ठाकरे, वर्धा, वय 50 या शेतकऱ्याचा मेयो हॉस्पिटल, नागपूर येथे आज मृत्यू झाला आहे. मी सदनात सदर विषय आज यासाठी उपस्थित करत आहे. कारण शेतकऱ्यांच्या प्रश्नावर एक मोर्चा निघाला होता, त्यामध्ये या शेतकऱ्याने सहभागी होऊन त्याच मार्चामध्ये त्याने विष प्यायले होते. गेली 4 दिवस तो अत्यवस्थेत होता आणि आज त्याला देवाज्ञा झाली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र संपत नाही म्हणुनच आम्ही सर्वांनी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी कर्जमाफीच्या, कर्जमुक्तीच्या संदर्भात विषय मांडला होता. 4 दिवसांपूर्वी विधिमंडळाच्या बाजूला महाराज बाग चौकामध्ये एका शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. सरकारने हाही विषय लक्षात घ्यावा. अधिवेशन संपण्यास वेळ आहे. शासनाने 10 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे. परंतु तरीही शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या बाबतीत आणखीही विचार करावा.

सभापती महोदय, मी काल 2 महत्त्वाचे विषय उपस्थित केले होते. संग्रामच्या बाबतीत लाठीचार्ज झाला, त्या संदर्भात चौकशी करून त्याचा अहवाल सदनात देण्याच्या बाबतीत निर्देश दिले होते. पण अजुनही सरकारकडून याबाबतीतील कसलेही निवेदन आलेले नाही. नियम 289 अन्वये उपस्थित केलेल्या मुद्यावर विभागाच्या माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले, त्याचे मी स्वागत केले. पण अमानुषपणे संग्रामच्या तरुण-तरुणींवर लाठीचार्ज केला गेला, त्याबाबतीत आमची विनंती होती की, सरकारकडून तत्काळ ज्यांनी लाठीचार्ज केला त्यांची चौकशी करून निलंबिनाची कारवाई झाली पाहिजे. मात्र याबाबत सुध्दा सरकारचा कोणताही खुलासा आलेला नाही.

सभापती महोदय, पुरवणी मागण्यांच्या चर्चेच्या दरम्यान राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या जन्मतारखेच्या बाबतीतील शासन निर्णयाचे अनुषंगाने सुध्दा विषय उपस्थित केला होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.....

त्या निमित्ताने देखील शासनाकडून निवेदन झालेले नाही. सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी शासनाकडून सभागृहात निवेदन व्हावे, अशी माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांकडून तीन बाबी या ठिकाणी उपस्थित करण्यात आल्या आहेत. त्यांनी उपस्थित केलेल्या तिसऱ्या प्रश्नाबाबत कालच सन्माननीय विरोधी पक्ष नेते, मी आणि सचिव एकत्रितपणे बसलो होतो, काही चर्चा झाली, त्यांनी ते मान्यही केले आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचे म्हणणे असे आहे की, वाढदिवसाच्या तारखात बदल झाला आहे. एकाच दिवशी दुपारी 3.30 वाजता एक तारीख अपलोड झाली आणि दुपारी 5.00 वाजता त्यामध्ये दुरुस्ती करण्यात येऊन ती तारीख अपलोड झाली. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पिनपॉईंट केले की, शुध्दीपत्रक किंवा कॉरिजॉंडम काढल्याशिवाय असा बदल करता येत नाही आणि ती वस्तुस्थिती आहे. माननीय संसदीय कार्य मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी ही बाब मुख्यमंत्री महोदय किंवा अन्य संबंधितांच्या कानावर घालावी आणि अशा प्रकारची पुनरावृत्ती भविष्यात होणार नाही, याची काळजी घ्यावी. हा केवळ शाहु महाराजांच्या तारखेबाबतचा प्रश्न नाही तर बसवराजांच्या बाबतीतही प्रश्न होता आणि राजा प्रतापसिंह यांच्या बाबतीतही होता. या गोष्टी जेव्हा खालच्या स्तरापर्यंत फिल्टर होतात त्यावेळी गोंधळ आणि संवेदनशील प्रश्न निर्माण होतो. तसेच, इतर अनेक गोष्टीही निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे शासनाने या संदर्भात उचित कार्यवाही करावी.

सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी संग्राम योजनेच्या संदर्भात दुसरा प्रश्न उपस्थित केला आहे. काल या विषयी सभागृहात चर्चा झाली. अनेक सन्माननीय सदस्य त्या घटनेबाबत नाराज व दु:खी होते. त्यामुळे या संदर्भातील अहवाल आज सभागृहासमोर आला तर बरे होईल.

सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा तिसरा प्रश्न उपस्थित केला आहे. त्याची शासनाने गांभीर्याने नोंद घ्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचा मुद्दा

स**भापती** : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्याची परवानगी मागितली आहे. विशेष बाब म्हणून मी त्यांना परवानगी देत आहे.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मुंबई शहर आणि उपनगराची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून मुंबईची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या मुंबई लोकलचा प्रवास मुंबईसाठी जीवघेणा ठरत आहे. ज्या प्रमाणात लोकलच्या प्रवाशांची संख्या वाढली त्या प्रमाणात लोकलच्या सोयीसुविधांमध्ये वाढ झालेली नसल्याने दिवसेंदिवस लोकलच्या प्रवासात मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांची संख्या वाढत आहे. सन 2015 मध्ये रूळ ओलांडतांना 1512 जणांचा मृत्यू झाला आणि 400 लोक जखमी झाल्याची नोंद आहे. रेल्वेच्या हद्दीत होणाऱ्या या दुर्घटनांना रेल्वे प्रशासनाचे ढिसाळ नियोजन, वारंवार होणारे तांत्रिक बिघाड, कोलमडणारे वेळापत्रक जबाबदार असून यामुळे प्रवाशांचा उद्रेक होतो. "जीवनवाहिनी नव्हे, हा तर मृत्युचा सापळा", "रोज मरे, त्याला कोण रडे", अशी लोकल सेवेची अवस्था झाली आहे.

सभापती महोदय, मी हे औचित्य स्वत:च्या अनुभवनातून मांडीत आहे. कारण, कल्याण ते मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनस असा लोकलचा प्रवास मी रोज करीत असतो. सामान्य नागरिकांचे रोज होणारे हाल मी रोज बघत असतो. हा विषय केंद्र सरकारशी संबंधित असला तरी शेवटी लोकलने प्रवास करणारे आपल्या राज्याचे नागरीक आहेत. आज अनेक लोकल प्रवासी अपघातात मरत आहेत, दुर्घटनेमध्ये अनेक लोक जखमी होत आहेत. हा विषय अतिशय गंभीर आहे. आपण मला आयत्या वेळी हा विषय मांडण्याची परवानगी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि आपल्या माध्यमातून माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना अशी विनंती करतो की, हा विषय सरकारने गांभीर्याने घ्यावा, केंद्रीय रेल्वे मंत्री महोदयांबरोबर बैठक आयोजित करून स्थानिकांच्या भावना त्यांच्या पर्यंत पोहोचवाव्यात आणि राज्य सरकारच्या वतीने जे काही करता येण्यासारखे आहे, त्याबाबत पावले उचलावीत.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी एक महत्वाचा विषय सभागृहात उपस्थित केला आहे. हा विषय केंद्र सरकारशी संबंधित असला तरी राज्यातील लोकांशी संबंधित आहे. केंद्रीय बजेट, लोकल वाढविणे, डबे वाढविणे, अशा प्रकारे अनेक उपाययोजना करणे राज्याच्या हिताचे आहे, लोकांच्या हिताचे आहे. मी आज तारीख सांगू शकणार नाही. परंतु, ही बाब मी मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देईन आणि आपण केंद्रीय रेल्वे मंत्री महोदयांबरोबर बैठक आयोजित करु.

...4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान या विषयावरील चर्चेबाबत

सभापती : भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंती वर्षाचे औचित्य साधुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान या विषयावर आज सभागृहात चर्चा ठेवण्यात आली आहे. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत निश्चित केल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्री, माननीय सभागृह नेते, माननीय विरोधी पक्षनेते, सभागृहातील सर्वपक्षीय गट नेते, प्रतोद या चर्चेत भाग घेणार आहेत. या चर्चेसाठी अडीच तासांचा वेळ निश्चित केला आहे. आज सकाळी सर्व माननीय गटनेत्यांबरोबर झालेल्या चर्चेत या चर्चेला अडीच तासांचा वेळ देण्याचे ठरविण्यात आले होते. पक्षीय बलाबलाचा विचार करुन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 56 मिनिटे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला 42 मिनिटे, भारतीय जनता पक्षाला व पाठींबा देणाऱ्या सदस्यांना 29 मिनिटे, शिवसेनेला 13 मिनिटे आणि पुरोगामी आघाडीला 10 मिनिटे, अशा प्रकारे 150 मिनिटांचे वाटप झाले आहे. सर्व सन्माननीय गटनेत्यांनी, त्यांच्या पक्षातील सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सन्माननीय सदस्यांची नावे माझ्याकडे पाठवावीत. आता आपण माझ्या भाषणापासून या चर्चेला सुरुवात करीत आहोत.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, आपण या चर्चेसाठी अडीच तासांचा वेळ निश्चित केला आहे, त्याबाबत आमचे काही म्हणणे नाही. परंतु, थोडा अधिक वेळ लागला तर आपण चर्चेची वेळ वाढवून द्यावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती : एक तरी गोष्ट आपण वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संविधान

मु.शी.: 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संविधान' या संबंधी माननीय सभापतींनी उपस्थित केलेली चर्चा.

सभापती : आपल्या देशाच्या राज्यघटना मसुदा समितीचे अध्यक्ष भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वे जयंतीवर्ष आणि 26 नोव्हेंबर, 1949 रोजी घटना मंजूर करण्यात आल्याची घोषणा आणि घटना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांची या राज्यघटनेवर स्वाक्षरी या महत्वपूर्ण ऐतिहासिक घटनेला 66 वर्षे होणे हे औचित्य साधून आपण आज सभागृहामध्ये या विशेष चर्चेचे आयोजन केले आहे. गेल्या महिन्यात 26 नोव्हेंबर हा दिवस आपण "संविधान दिन" म्हणून संपूर्ण देशात अत्यंत उत्साहात विविध कार्यक्रमांनी, जागृतीपर उपक्रमांनी साजरा केला. डॉ.आंबेडकरांच्या जीवन कार्यात नागपूरचे असलेले विशेष स्थान आणि 26 नोव्हेंबर नंतर आपले नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरु असणे ही गोष्ट लक्षात घेता, आपण संविधानावरील या विशेष चर्चेचे आयोजन केले आहे. संसदेत देखील अशाप्रकारे 26 नोव्हेंबर रोजीच चर्चा होऊन संविधान आणि संविधान निर्मात्यांचा गौरव करण्यात आला. लोकसभा अध्यक्षा माननीय सुमित्राताई महाजन आणि पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी यांनी संविधानासंदर्भात त्यावेळी व्यक्त केलेले विचार आपल्याला एक लोकप्रतिनिधी म्हणून निश्चितच मार्गदर्शक ठरणारे आहेत.

घटना समितीची 9 डिसेंबर, 1946 ते 26 नोव्हेंबर, 1949 या काळात 11 अधिवेशने झाली. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी म्हणजे 14 ते 30 ऑगस्ट, 1947 दरम्यान घटना समितीचे पाचवे अधिवेशन सुरु होते. स्वतंत्र भारताचे प्रथम विधी मंत्री ही जबाबदारी सांभाळणारे डॉ.आंबेडकर, भारतीय संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष होते आणि या समितीमध्ये सर्वश्री के.एम.मुन्शी, अलादि कृष्णास्वामी अय्यर, एन.गोपालस्वामी अय्यंगार, माधवराव, मोहम्मद सदुल्लाह, बी.एल.मित्तर, डी.पी.खेतान आणि टी.डी.कृष्णमाचारी आदि विद्वान महानुभाव सदस्यपदी होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

सखोल विचारमंथन, जगातील विविध राज्यघटनांचा तुलनात्मक अभ्यास, भारतातील वैविध्य टिकवत एकसंघत्वाला प्राधान्य, वंचित घटकांना न्याय आणि नागरिकांच्या मुलभूत अधिकारांना संरक्षण या मुद्यांना अग्रक्रम देत राज्यघटनेची अत्यंत परिश्रमपूर्वक निर्मिती करण्यात आली. आपली राज्यघटना म्हणजे राज्यव्यवस्थेसंदर्भातील केवळ नियमावली नाही. तर स्वतंत्र भारतातील नागरिकांच्या सर्वांगिण उन्नतीचा तो प्रेरक अविष्कार आहे.

राज्यघटनेतील उद्देशिका (PREAMBLE) हे भारतीय जनतेने परस्परांना दिलेले घटनात्मक अभिवचन असून त्याव्दारे संविधान अंगिकृत आणि अधिनियमित करुन स्वत:प्रत अर्पण केले आहे. ही उद्देशिका प्रत्येकाने मुखोद्गत करावी. अवघ्या दहा ओळींमध्ये कर्तव्य आणि जबाबदारीचा आभाळाएवढा आशय आणि समुद्राइतकी विचारांची खोली या दहा ओळींमध्ये सामावलेली आहे. भारतीय राज्यघटना 26 जानेवारी, 1950 रोजी अंमलात आल्यानंतर भारतात खऱ्या अर्थाने संसदीय कामकाज पध्दतीला सुरुवात झाली. संसदीय कार्यपध्दतीचा मूळ गाभा म्हणजे जनतेचे सार्वभौमत्व हा आहे. जनतेचे सार्वभौमत्व हे भारतीय संविधानाच्या उद्देशिका, प्रस्ताविकेमध्ये (PREAMBLE) दृग्गोचर झालेले आहे. संसदीय कामकाज पध्दतीच्या अभ्यासकाला राज्यघटनेची प्रस्तावना एका दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहे. राज्यघटनेच्या उद्देशिकेत संपूर्ण घटनेचे सार अंतर्भूत आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व दर्जाची समानता ही चतु:सुत्री हा संसदीय लोकशाहीचा गाभ आहे. संविधानातील प्रत्येक तरतुदींचा बारकाईने अभ्यास केल्यास या मूल्यांवर आधुनिक भारतीय समाजरचनेची जडणघडण झाल्याचे दिसते.

अत्यंत परिश्रमाने तयार केलेला आणि मसुदा समितीने संमत केलेला घटनेचा मसुदा हा घटना समितीला 4 नोव्हेंबर, 1948 रोजी डॉ.आंबेडकरांनी सादर केला त्यावेळी त्यांनी केलेले भाषण, विविध मुद्यांचा घेतलेला परामर्ष केवळ अभ्यासकांच्याच नव्हे तर सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने देखील एक अनमोल वैचारिक ठेवा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

आजच्या या चर्चेच्या अनुषंगाने माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, हे भाषण आपण सर्वांनी काळजीपूर्वक वाचावे, त्याचे अध्ययन करावे. राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेच्या वतीने आपण हे मूळ इंग्रजीतील भाषण मराठीत अनुवादित करुन पुस्तिका स्वरुपात प्रकाशित केले आहे. या पुस्तिकेत अन्य आवश्यक तपशिलांचा, संदर्भांचा देखील समावेश करण्यात आला आहे.

भारतातील संसदीय कार्यप्रणालीची नेहमीच अमेरीकेतील अध्यक्षीय लोकशाही बरोबर तुलना केली जाते. राज्य घटनेचा मसुदा आकार घेत असताना देखील या विषयावर चर्चा झाली. डॉ.आंबेडकरांनी आपल्या दिनांक 4 नोव्हेंबर, 1948 च्या या भाषणात या विषयी अतिशय सुंदर विवेचन केले आहे. "दोन्ही कार्यप्रमाणाली लोकशाहीवर आधारीत असून त्यापैकी कोणती एक निवडायची हा निर्णय अत्यंत कठीण होता. लोकशाहीतील कार्यपालिकेला दोन अटी पूर्ण कराव्या लगतात. एक म्हणजे, ही कार्यपालिका स्थिर असली पाहिजे आणि दुसरे म्हणजे ही कार्यपालिका उत्तरदायी असली पाहिजे. तथापि, या दोन्ही अटींची सारख्याच प्रमाणात पूर्तता करु शकणारी प्रणाली दुर्दैवाने आजवर विकसित झालेली नाही. आपल्याला एकतर अधिक स्थैर्य, परंतु कमी उत्तरदायित्व असलेली प्रमाणाली लाभेल किंवा अधिक उत्तरदायित्व, परंतु कमी स्थैर्य असणारी प्रणाली मिळेल. अमेरिकी आणि स्विस प्रणालीमध्ये अधिक स्थैर्य, परंतु कमी उत्तरदायित्व आहे. या उलट ब्रिटीश प्रणालीत अधिक उत्तरदायित्व, परंतु कमी स्थैर्य आहे. प्रस्तावित घटनेत कार्यपालिकेसाठी संसदीय प्रणालीची शिफारस करताना अधिक स्थैर्यापेक्षा अधिक उत्तरदायित्वाला पसंती देण्यात आली आहे." Stable form of Government पेक्षा Responsible form ला त्यांनी प्राधान्य दिले. त्यांचा द्रष्टेपणा यातून दिसून येतो. लोकप्रतिनिधी आणि त्यातून बनणारे सरकार हे जनतेला अधिकाधिक उत्तरदायी/जबाबदार ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. याचे कारण नागरीकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण अबाधित रहावे याला त्यांनी प्राधान्य दिले. हा त्यांचा विचार किती महत्वाचा आहे याची आपणा सर्वांना आजच्या परिस्थितीत निश्चितच जाणीव झालेली आहे.

आपली राज्य घटना काळाच्या कसोटीवर उतरणारी ठरली असून राज्य घटनेमुळेच उत्कृष्ट संसदीय शासन प्रणाली विकसित झाली आणि त्या आधारे भारताने सर्वांगीण प्रगतीचा मोठा टप्पा गाठला आहे. मात्र अजूनही आपल्याला प्रगतीचे आणखी पुढील शिखर सर करावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

समाजातील अंतिम घटक, वंचित घटक सुखी झाल्याशिवाय आपण स्वस्थ बसता कामा नये. डॉ.आंबेडकरांनी मसुद्याचा ठराव सादर करताना या भाषणाच्या शेवटी दिलेला इशारा वजा आवाहन महत्वाचे आहे. घटना कितीही चांगली असली तरी ती राबविणारे सक्षम आणि जबाबदार नसतील तर जनता जनार्दनांचा अपेक्षाभंग होऊ शकतो. आपणा सर्वांना जनसामान्यांच्या इच्छा आकांक्षांची अपेक्षापूर्ती करावयाची आहे. ती प्रेरणा आपली राज्य घटना आपल्याला सदैव देत राहील. आजच्या या चर्चेद्वारे त्या दृष्टीने आपण सर्वजण नव्या ऊर्जेने कार्यरत होऊ या, अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्याच शब्दात सांगावयाचे झाले तर "ही घटना लवचिक आहे आणि शांततेच्या तसेच, युद्धाच्या काळात देश एकसंघ ठेवण्याएवढी ती नक्कीच समर्थ आहे. मला असे खरोखरच म्हणावेसे वाटते की, नव्या घटनेच्या अमलामुळे परिस्थिती बिघडली तर आपली घटना वाईट आहे हे कारण त्यासाठी नसेल. आपल्याला असे म्हणावे लागेल की मानवच भ्रष्ट होता. या मानवाला, या दिवशी, या आपल्या प्रस्तावाच्या माध्यमातून मी सदनात मनापासून आदरांजली वाहतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेते) : सभापती महोदय, परमपूज्यनीय भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे 125 वे जयंती वर्ष संपूर्ण देशात वेगवेगळ्या पद्धतीने साजरे कले जात आहे. त्याच निमित्ताने आज सभागृहात राज्य घटनेच्या बाबतीत चर्चा करण्यासाठी आणि परमपूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राज्य घटना निर्मितीमध्ये मोठे योगदान आहे. ते पुन्हा एकदा न्यायमंडळाच्या माध्यमातून जनतेसमोर यावे आणि आपली राज्य घटना आणखी बळकट व्हावी यासाठी नक्कीच फार मोठे काम या निमित्ताने होत आहे. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न परमपूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वाला व पवित्र विचारांना सर्वप्रथम मी भावपूर्ण अभिवादन करतो.

सभापती महोदय, आपण संपूर्ण देशभरात यावर्षी परमपूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे 125 वे जयंती वर्ष सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून, लोकसहभागातून साजरे करण्याचे ठरविले. संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु झाल्यानंतर संसदेमध्ये याबाबत चर्चा झाली. संसदेच्या माननीय अध्यक्षा, देशाचे माननीय पंतप्रधान आणि विरोधी पक्षाच्या सर्व सनमानीय सदस्यांनी संविधान आणि संविधानाचे निर्माते परमपूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर पुन्हा एकदा प्रकाश टाकला. डॉ.बाबासाहेबांच्या स्मरणार्थ त्यांचे 125 वे जयंती वर्ष आणि भारतीय राज्य घटना, या विषयावर आज चर्चा सत्र आयोजित करण्यात आले आहे. या चर्चा सत्राच्या माध्यमातून परमपूजनीय डॉ.बाबासाहेबांचे विचार, भारतीय राज्य घटनेची थोरवी पुन्हा एकदा लोकांपर्यंत पोहोचेल व त्यातूनच देशातील लोकशाही अधिक बळकट होईल, असे माझे व्यक्तिगत मत आहे. ज्या तारखेला या विषयावर सभागृहात चर्चा होत आहे त्या तारखेचे फार मोठे महत्व आहे. आज योगायोगाने 17 डिसेंबर तारीख आहे. दिनांक 17 डिसेंबर, 1946 रोजी संविधान समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी घटनेसंदर्भात बोलण्यासाठी डॉ.बाबासाहेबांचे नाव पुकारले होते. आज योगायोगाने 17 डिसेंबर तारीख आहे. आपण आज योगायोगाने 17 डिसेंबर रोजीच सभागृहात राज्य घटनेच्या संदर्भात चर्चा करीत आहोत.

सभापती महोदय, या विषयावर बोलावयाचे म्हटले तर त्यासाठी वेळ कमी पडेल. देशात काही दिवसापूर्वी देशाचा राष्ट्रग्रंथ कोणता असावा याबाबत बरची चर्चा झाली आणि असे सांगण्यात आले की, राष्ट्रग्रंथ भगवदगिता असली पाहिजे. कोणत्या धर्माचा कोणता ग्रंथ हे ठरलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.नरेंद्र पाटील)

श्री.धनंजय मुंडे.....

परंतु, लोकशाहीत वेगवेगळ्या जाती धर्माच्या 125 कोटी जनतेला बांधून ठेवणारा कोणता ग्रंथ असेल तर राज्य घटना ही खऱ्या अर्थाने धर्मग्रंथ आहे, असे माझे व्यक्तिगत मत आहे. संविधानाने तयार केलेली जी न्यायमंडळे आहेत, ज्या न्यायमंडळात आपण आज या विषयावर चर्चा करतो, प्रकाश टाकतो ती न्यायमंडळे म्हणजे प्रार्थना स्थळे आहेत आणि त्या प्रार्थना स्थळांमध्ये आपण त्या धर्मग्रंथाचा आधार घेऊन लोकशाही टिकवितो, बळकट करतो, मजबूत करतो. एवढेच नाही तर राज्य घटना म्हणजे ज्याला आपण धर्मग्रंथ म्हणतो त्याचा आधार घेऊन याच कायदेमंडळात लोकहिताचे कायदे सुद्धा करतो. परमपूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ती राज्य घटना र आपल्याला दिलेली आहे. खरे तर परमपूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांकडे आपण राज्य घटनेचे शिल्पकार म्हणून पाहतो. राज्य घटनेच्या माध्यमातून आधुनिक, पुरोगामी, प्रगतशील भारताचा पाया भक्कम केला गेला. समाजातील गरीब, वंचित, उपेक्षित, विद्यार्थी, युवक, महिला, दलित, आदिवासी, अल्पसंख्याक अशा सर्वच घटकांचा विचार डॉ.बाबासाहेबांनी राज्य घटनेत केला आहे. परमपूजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दूरदृष्टीचे अनेक पैलू आपल्याला सांगता येतील.

..2A-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

समाजातील वंचित उपेक्षित घटकांच्या सक्षमीकरणासाठी लढणारे ते आघाडीचे वकील होते, बाबासाहेब प्रख्यात अर्थतज्ज्ञ होते, रिझर्व्ह बँक व वित्त आयोगासारख्या संस्थांच्या जडणघडणीत त्यांचे महत्वाचे योगदान होते. विजनिर्मिती जलसिंचनासारख्या सुविधांच्या निर्मितीसाठी त्यांनी देशातील पहिला नदीखारे प्रकल्प तयार केला होता. महिलांना समान हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी हिंदू संहिता विधेयक तयार केले. जेव्हा संसदेत या विधेयकाला मंजुरी मिळाली नाही, तेव्हा त्याच्या निषेधार्थ केंद्रीय मंत्री पदाचा राजीनामा देण्याचे धाडस या देशात पहिल्यांदा परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले होते.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते देशाची संकल्पना म्हणजे फक्त नकाशा आणि झेंड्यांसह राजकीय भौगोलिक अस्तित्व नव्हे. केंब्रीज शब्दावलीत नमूद केलेल्या राष्ट्राची प्रसिध्द व्याख्या त्यांना मान्य नव्हती. डॉ.बाबासाहेब यांची त्यासंदर्भात तात्विक व अध्यात्मीक बैठक होती. लोकांचे कल्याण, लोकांमध्ये समानता व परस्पराबद्दल प्रेम आपुलकी व मैत्री ही मुख्य संकल्पना ज्या ठिकाणी आहे ते म्हणजे राष्ट्र अशी त्यांची व्याख्या होती. बाबासाहेबांनी आयुष्यभर राष्ट्रवादाचे ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्न केला. त्यांचा राष्ट्रवाद मात्र आजच्या प्रचलित व कथित राष्ट्रवादापेक्षा वेगळा होता. बळकट राष्ट्रनिर्मितीसाठी जातपात विरहित समाजाची आवश्यकता आहे असे त्यांचे मत होते. हीच संकल्पना समोर ठेऊन त्यांनी पिण्याच्या पाण्याच्या समान हक्कांसाठी महाडचा सत्याग्रह केला. मंदिर प्रवेश हक्काचा लढा दिला. मनुस्मृतीची होळी केली, यासारख्या अनेक सामाजिक चळवळी केल्या. दुर्दैवाने सामाजिक लढ्याची ती चळवळ आज छिन्न होत चालली आहे, ही मात्र नक्कीच चिंतेची बाब आहे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली घटना समितीने तयार केलेला मसूदा 26 नोव्हेंबर, 1949 रोजी स्वीकारण्यात आला. त्यामुळे 26 नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. 1949 मध्ये या दिवसापासून नागरिकत्व, निवडणुका व अंतरिम संसदीय विषय व इतर काही तात्पुरत्या बाबी तत्काळ लागू झाल्या. आपला देश हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून ओळखला जातो. त्याचप्रमाणे आपली राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी राज्यघटना म्हणून प्रसिध्द आहे. आपली राज्यघटना सर्व समावेशक आहे, जगातील सर्व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

चांगल्या व योग्य घटनांचा समावेश आपल्या घटनेमध्ये झाला पाहिजे ही सर्वात पहिल्यापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची इच्छा होती. ती इच्छा घटना निर्मिती करुन बाबासाहेबांनी पूर्ण केली. जगातील अन्य देशांना आपल्याबरोबर स्वातंत्र्य मिळाले. शेजारच्या देशातील लोकशाहीची काय परिस्थिती आहे, ते आपण पाहत आहोत. अनेक जाती पंथ भाषा सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक व्यवस्था असलेल्या आपल्या देशात लोकशाही व्यवस्था केवळ टिकली नाही तर ती दिवसेंदिवस अधिक मजबूत होत आहे. हे आपल्या राज्यघटनेचे आणि ती बनविणाऱ्या परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मोठेपण आहे. आपली राज्यघटना दिवसेंदिवस अधिक मजबूत होत आहे. त्याचे कारण मला असे दिसते की, आपल्या राज्यघटनेमध्ये प्रत्येक व्यक्तीच्या मताला समान मान्यता आली आहे. सामाजिक आर्थिक न्यायाच्या तत्वाला अग्रक्रम देण्यात आलेला आहे. समाजातील दुर्बल वंचित, उपेक्षित घटकांसाठी अनुसूचित जाती जमातीसाठी राखीव जागा सारख्या तरतूदी, अल्पसंख्यांक बांधवांचे सांस्कृतिक हक्क या सर्वांची काळजी आपल्या घटनेत घेण्यात आली आहे. भारतातील सामाजिक विविधता लक्षात घेऊन सर्वांना सोबत घेऊन जात असताना जे काही करावे लागेल त्याचा समावेश आपल्या घटनेत केलेला आहे.

सभापती महोदय, केंद्र आणि राज्य याचे नाते काय असावे, याची उत्तम व्यवस्था या राज्यघटनेत परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेली आहे. डॉ.बाबासाहेबांना व घटनाकरांना लोकसत्ताक शासन यंत्रणा आणि धर्मनिरपेक्ष राज्य भारतात निर्माण करायचे होते, त्यासाठी सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय प्रस्तापित होईल, अशी शासन यंत्रणा कार्यान्वित व्हावी असा त्यांचा हेतू होता. आज सर्व धर्मसमभाव की, धर्मनिरपेक्षता या दोन संकल्पनांवर राजकीय पक्षात वाद होत असले तरी जनतेच्या मनात असा कोणताही वाद नाही हे मात्र नक्की आहे.

सभापती महोदय, परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे 125 वे जयंती वर्षे साजरे करीत असताना त्यांचे छायाचित्र व राज्यघटनेची प्रस्तावित असलेली करंन्सी नोट बाजारात आणण्याचा निर्णय केंद्र शासनाने व रिझर्व्ह बँकेने घ्यावा व त्याची अंमलबजावणी या वर्षी व्हावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

अशी शिफारस मी या चर्चेच्या निमित्ताने सभागृहाला करीत आहे. या चर्चेचा ठराव आपण केंद्र शासनाकडे पाठवावा, जेणेकरून अनेक जाती धर्मातील लोक परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर प्रेम करणारे, त्यांच्या दृष्टीने आज देखील डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे प्रेरणास्त्रोत आहेत. अशा प्रेरणास्त्रोतासाठी नोटेवर त्यांचा फोटो आला तर केंद्र सरकार खऱ्या अर्थाने डॉ.बाबसाहेब आंबेडकरांचे 125 वे जयंती वर्षे साजरे करीत आहे, त्याचे सार्थक होईल असे मला म्हणायचे आहे. पुन्हा एकदा परमजूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती वर्षानिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस मी अभिवादन करतो, त्यांनी तयार केलेल्या पवित्र धर्मग्रंथाला अभिवादन करतो व माझे भाषण संपवितो.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय सभापती यांनी प्रस्ताव मांडला व या विषयाच्या संदर्भात पुढाकार घेतला व आज दोन्ही सभागृहात संविधानाच्या संदर्भात चर्चा करीत आहोत, त्याबाबत सर्वात प्रथम मी माननीय सभापती यांचे अभिनंदन करतो. त्याचप्रमाणे माननीय श्री.राजकुमार बडोले, समाजिक न्याय मंत्री व माननीय मंत्री श्री.दिलीप कांबळे यांनी हा विषय दोन्ही सभागृहासमोर यावा असा आग्रह धरला, त्याबाबत मी त्यांचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, या विषयावर बोलत असताना बोधीसत्व परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि घटना समितीचे सर्व सन्माननीय सदस्य यांना सुरुवातीला मी अभिवादन व मानाचा मुजरा करतो. या देशाला राज्यघटना मिळाल्यानंतर 65 वर्षे झाली आहेत, खंडप्राय देश व 65 वर्षाची लोकशाही आहे, या घटनेची दोन तीन वैशिष्टे मी नमूद करणार आहे, दोन अडीच हजार वर्षाचा इतिहास पाहिला तर त्यावेळी काय परिस्थिती होती, जाती व पोट जाती होत्या, श्रध्दा व अंधश्रध्दा होती, विविध भाषा, चालीरिती व राज्य होती. राज्यांचे सम्राट होते, त्यावेळी एक वेगळी परंपरा होती. या सगळ्या परंपरा हे सर्व भेदाभेद दूर करुन गेली 65 वर्षे 125 कोटी लोकसंख्या असलेल्या देशाला एकसंध बांधून ठेवण्याचे काम भारतीय संविधानाने केले आहे. याचा अभिमान तुम्हाला व आम्हाला असला पाहिजे. हे संविधानाचे सर्वात मोठे काम आहे हे मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो. राज्य घटनेने आम्हाला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय दिला. ज्यांना प्रतिष्ठा नव्हती त्यांना प्रतिष्ठा दिली. सन्माननीय सदस्य श्री.दिलीप कांबळे, श्री.जयदेव गायकवाड, प्रा.जोगेंद्र कवाडे, ॲड.जनार्दन चांदूरकर, श्री.भाई गिरकर आहेत, आम्ही हे सर्व भोगले आहे, भेदाभेद काय होता, आजही जगामध्ये काळा व गोरा असा भेद आहे, गरीब-श्रीमंत आहे, राजा रंक किंवा गुलाम असा भेदभाव आहे, या देशात अडीच तीन हजार वर्षात चार मजल्याची एक इमारत उभी राहिली, मला त्या खोलात जावयाचे नाही. या चार मजल्याच्या इमारतीमध्ये जी अस्पृश्यता होती. म्हणजे एखाद्या व्यक्तीची सावली जर दुसऱ्या व्यक्तीवर पडली तर... जगामध्ये असा भेदभाव फक्त भारतात होता. त्या माणसाला या राज्यघटनेने प्रतिष्ठा दिली आहे. आपणा सर्वांना प्रतिष्ठा दिली, या गोष्टींचा अभिमान बाळगला पाहिजे. म्हणून राज्यघटनेचे आपण अभिनंदन केले पाहिजे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

सभापती महोदय, या राज्य घटनेचे वैशिष्ट्य म्हणजे आपल्याला लोकशाहीची देणगी दिली असे सर्वजण म्हणतात. ती लोकशाही टिकविली. पण ही लोकशाही देताना आजूबाजूच्या जगाकडे पहा. 1947 साली आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले. ब्रिटिश राजवटीखाली आपण होतो. 1947 पूर्वी असे म्हटले जायचे की, जगामध्ये जेथे जेथे ब्रिटिशांचे साम्राज्य आहे, त्या साम्राज्याला कोणी शह देऊ शकत नाही. परंतु मोहनदास करमचंद गांधी या नावाचे व्यक्तिमत्व उदयास आले. ज्यांना आपण महात्मा गांधी या नावाने ओळखतो. त्यांनी या ब्रिटिश साम्राज्याला पहिला आणि शेवटचा धक्का दिला. भारत स्वतंत्र झाला. भारताबरोबर आफ्रिका खंडातील अनेक राज्ये स्वतंत्र झाली. पाकिस्तान, बांगलादेश, अफगाणिस्तान हे देश स्वतंत्र झाले. परंतु त्या देशांमध्ये लोकशाही टिकली नाही. आज सुध्दा पाकिस्तानचे पंतप्रधान रात्री झोपताना विचार करतात की, आपल्या देशाचे मिलिटरी जनरल माझी सत्ता उलटविणार नाही ना! पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान झुल्फिकार अली भुत्तो यांना त्या देशातील हुकूमशहाने फाशी दिली हे आम्ही विसरु शकत नाही. आज 65 वर्षे उलटूनही आमच्या देशातील लोकशाही वृध्दिंगत झाली, याचे एकमेव कारण म्हणजे परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेची भरभक्कम चौकट तयार केली. हे या घटनेचे वैशिष्ट्य आहे.

सभापती महोदय, घटनेने आम्हाला धर्मनिरपेक्षता दिली, सत्ता संपत्ती कमावण्याचा सर्वांना अधिकार दिला, अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले. आज या देशामध्ये सामान्य माणूस सार्वजनिक ठिकाणी येऊन देशाच्या पंतप्रधानांविरुध्द बोलू शकतो. लोकशाहीची मिमांसा करु शकतो. सत्ताधाऱ्यांच्या विरोधात बोलू शकतो. हे खूप मोठे स्वातंत्र्य आपल्याला घटनेने दिले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या एका गोष्टीचा मी आवर्जून उल्लेख करतो. राज्य घटनेमध्ये 'एक व्यक्ती एक मत' हा सर्वात मोठा अधिकार त्यांनी दिला. या देशातील टाटा, बिर्ला या उद्योगपतीचे सुध्दा एक मत आणि झोपडपट्टीत किंवा ग्रामीण भागात राहणाऱ्या सामान्य माणसाला सुध्दा एक मत दिले. त्या माध्यमातून आपण लोकशाही टिकविली आहे. संविधानाबद्दल, लोकशाहीबद्दल चर्चा करताना आपण एका गोष्टीचा विचार केला पाहिजे की, आपल्या या संविधानासमोर आज काय आव्हाने आहेत, या संविधानाला आधीन राहून येणाऱ्या आव्हानांना कशाप्रकारे सामोरे जाणार आहोत? आज देशामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

भ्रष्टाचार हा सर्वांत मोठा विषय आहे. व्यभिचार, हिंसाचार, बेरोजगारी हे विषय आहेत. दारिद्र रेषेखाली कोट्यवधी लोक जगत आहेत. त्यांचा विकास कसा करायचा हा विषय आहे. देशाचा आणि राज्याचा विकास कसा करायचा हा विषय आहे. धर्म, जात, वंश यामधील भिंती विस्तारत आहेत, त्या कमी झाल्या पाहिजेत. यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्य घटनेमध्ये सांगितलेल्या दोन गोष्टी आपल्याला कराव्या लागतील. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यात हेच सांगितले की, बहुजन हिताय-बहुजन सुखाय. या मार्गाने आपल्याला जावे लागेल. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न होते, Casteless society of India. जातीविरहित समाजरचना. या दोन गोष्टी केल्यानतर घटनेचे पावित्र्य राखल्याचे काम होईल आणि तीच अपेक्षा या विधिमंडळाकडून आहे. मी या निमित्ताने अण्णाभाऊंना विसरलो तर अन्याय केल्यासारखे होईल. मी अण्णाभाऊ साठे यांची बाबासाहेबांच्या जीवन पटावरील एक कविता मुद्दाम वाचून दाखवितो.

जग बदल घालुनी घाव
सांगुनी गेले मला भिमराव
गुलामगिरीच्या या चिखलात
रुतून बसला का ऐरावत
अंग झाडुनी निघ बाहेरी
घे भिनेवरती घाव.

सभापती महोदय, मी बोलत असताना आव्हानांचा उल्लेख केला. मी राजकीय बोलणार नाही. परंतु राज्य घटनेच्या संदर्भात काही वक्तव्ये सुरु झालेली आहेत. राज्य घटना बदलली पाहिजे हा पहिल्यांदा विचार सुरु झाला. राज्य घटनेमध्ये आपण दुरुस्त्या केलेल्या आहेत. महिलांना आरक्षण दिले, इतर महत्वाच्या दुरुस्त्या केल्या. पण मेहेरबानी करुन राज्य घटनेने जी मूलभूत चौकट तयार केली आहे त्या चौकटीला तुम्ही हात लावण्याचा प्रयत्न केला तर निधर्मीय पक्ष एकत्र येऊन हा प्रयत्न हाणून पाडल्याशिवाय राहणार नाहीत. आरक्षणाचा फेरविचार करावा असे म्हटले जाते. कालांतराने हा विचार मागे घेतला जातो. कोणती संघटना काय करते हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) BB.3

SGB/ ST/ ST/ 17:00

श्री.शरद रणपिसे....

सांगताना मी कोणाचे नाव घेणार नाही. परंतु आरक्षण का दिले, अस्पृश्यता का होती? चार मजल्यांची इमारत होती. त्यामधील शेवटच्या वर्गाने फार मोठे काम केले, दलितांनी सेवा केली. वैश्यांनी व्यापार उदिम केला, क्षत्रियांनी राज्य कारभार केला. राज्याचे, देशाचे रक्षण केले. सगळ्यात वरच्या वर्गाने आम्हाला शिक्षण दिले नाही. सुशिक्षित केले नाही. आता मराठा समाजाला आरक्षण द्या, धनगर समाजाला आरक्षण द्या, मुस्लीम समाजाला आरक्षण द्या अशी मागणी होत आहे. दलितांप्रमाणे, आदिवासींप्रमाणे आरक्षण देण्यास आमचा विरोध नाही. त्यांच्या आरक्षणाला हात न लावता आरक्षण दिले जावे. या गोष्टीचा गांभीर्याने विचार झाला पाहिजे.

सभापती महोदय, राज्य घटनेच्या निमित्ताने देशामध्ये सहिष्णुतेचा मुद्दा निर्माण झाला. अनेक साहित्यिक, विचारवंत राजीनामा देत आहेत. सहिष्णुतेचा मुद्दा राजकीय पक्षांनी काढला नाही. साहित्यिक, विचारवंत, कलाकार, खेळाडू यांनी काढला. आजही आपण ज्या सभागृहात बसलो आहोत त्या सभागृहात दोन वर्षापूर्वी खैरलांजीच्या घटनेवर चर्चा केली. दादरी येथे अल्पसंख्याक समाजाच्या वृध्द व्यक्तीला गोमांस आणले म्हणून घराबाहेर काढून मारण्यात आले, ही शोकांतिका आहे. राज्य घटनेचा विचार आपण करतो, विचारमंथन करतो त्यावेळी या सहिष्णुतेचा विचार केला पाहिजे. आपण या विधिमंडळाचे सदस्य आहोत. लोकसभा, राज्यसभा सदस्य, राज्यपाल, मंत्रिमंडळ यांचे उत्तरदायित्व आहे. राज्य घटनेला अनुसरून काम करण्याची आपली जबाबदारी आहे. पूर्वेतील एका राज्याच्या राज्यपालांनी असे म्हटले की, अल्पसंख्याकानी पाकिस्तानात निघून जावे. असे घटनात्मक पदावर कार्यरत असणाऱ्यांनी वक्तव्य करणे योग्य नाही. मी कोणाचा अवमान करु इच्छित नाही. या राज्य घटनेने सर्वांना समान अधिकार दिला आहे. राजकीय विचार मांडायचा नाही, त्याबद्दल बोलायचे नाही. राजकीय पक्ष या विचारवंताच्या, साहित्यिकांच्या सहिष्णुतेच्या भूमिकेमध्ये सामील झालेले नाहीत. असहिष्णुतेचे वातावरण निवळले पाहिजे. ही केंद्र आणि राज्य सरकारची जबाबदारी आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरु यांनी लोकशाहीसाठी खूप काही केले. सभापती महोदय, आपण ज्या आसनावर बसलेले आहात, त्याच्या वरच्या बाजूला भारत सरकारची राजमुद्रा आहे, समोर राजदंड आहे आणि वरच्या बाजूला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

'धम्मचक्र प्रवर्तनाय' हे बोधवाक्य लिहिलेले आहे. या शिवाय संसद, राज्यसभा, राष्ट्रपती भवन होऊ शकत नाही.

..2सी.1....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे....

परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांचे यावर एकमत होते. महाकारो आणि गौतम बुद्धाच्या काळात जे गणराज्य होते त्या गणराज्याला अनुसरून ही घटना निर्माण करण्यात आलेली आहे. धम्म चक्र प्रवर्तनाय हे वाक्य आपल्याला काय सांगते ? मानव जातीच्या कल्याणासाठी अडीच हजार वर्षापूर्वी महाकारो आणि तथागत गौतम बुद्धाने मानव कल्याणाच्या जातीचा जो मार्ग दाखविला त्या मार्गाला अनुसरून या सभागृहाचे कामकाज चालत आहे. माझ्या भाषणात कुठलाही राजकीय अभिनिवेश नाही. कोणाबद्दल माझी तक्रार नाही. मी कोणाबद्दल काही बोललो असेल तर मेहरबानी करून ते लावून घेऊ नका. मी त्याबद्दल क्षमासुद्धा मागेन. परंतु, आपल्या या राज्य घटनेचे पावित्र्य राहिले. ती जबाबदारी आपल्या विधिमंडळाची आहे, संसदेची आहे. पुन्हा एकदा या राज्य घटनेचे शिल्पकार परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि घटना समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांना मानाचा मुजरा करतो. मी काँग्रेस पक्षाच्या वतीने अभिवचन देतो की, आम्ही सर्वजण राज्य घटनेचे पावित्र्य राखू. एवढेच बोलतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीचे औचित्य साधून लोकसभेमध्ये, राज्यसभेमध्ये आणि विधान सभेमध्ये व विधान परिषदेमध्ये ही जी चर्चा, विचारमंथन घडवून आणले आहे, त्याबद्दल मी सर्वात प्रथम त्यांचे केंद्र व राज्य शासनाचे अभिनंदन करते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर तत्त्वचिंतक होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटना समितीसमोर मंगळवार, दिनांक 17 डिसेंबर 1946, गुरूवार, दिनांक 4 नोव्हेंबर, 1948 आणि शुक्रवार, दिनांक 25 नोव्हेंबर 1949 रोजी केलेल्या भाषणांचे संकलन विधिमंडळाचे प्रधान सचिव डॉ.अनंत कळसे यांनी केले असून ते विधिमंडळाच्या सदस्यांसाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी विधिमंडळ सचिवालयाचे खास आभार मानते.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे तत्त्वचिंतक होते. चातुर्वर्णियांवरील आधारित श्रम विभागणीला त्यांचा पूर्णतः विरोध होता. त्यांनी अनेक प्रकारे भारतीय पद्धतीचे विवेचन व विश्लेषण केले आहे. भारताच्या व्यासपीठावर त्यांनी समता संघर्ष उभा केला होता. त्याच बरोबर साता समुद्राच्या पलीकडे जाऊन त्यांनी इंग्लंडमध्ये किंवा अन्य देशांमध्ये जाऊन स्वतःचे म्हणणे मांडले. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार होण्याआधीचा त्यांचा संपूर्ण संघर्ष पाहिला तर दिसून येते की, प्रचंड अडथळ्यांची शर्यत पूर्ण करत डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्या स्थानापर्यंत पोहोचले. ते एक व्यक्ती नव्हते, नेते नव्हते तर प्रचंड अशा जनसागराचे प्रतिनिधी होते. आज सुद्धा ज्यांना ज्यांना अधिकारापासून वंचित रहावे लागते त्यांना संघर्ष करण्याशिवाय मार्ग नाही याबद्दलचा प्रेरणा देणारा मूलभूत विचार त्यांनी मांडला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची अनेक पुस्तके आहेत.

जातीचे उच्चाटन करण्यासंबंधातील त्यांचे विश्लेषण मला येथे मुद्दाम मांडावेसे वाटते. आरक्षण हे विधि लिखित म्हणून आपण स्वीकारले आहे. जाती मूळापासून नष्ट होण्यासाठी श्रम विभागणी आपण कळत नकळत स्वीकारली. त्याला विरोध करीत असताना त्यांनी हाच प्रश्न विचारला होता की, तो ज्या जातीत जन्मलेला आहे तो जर कर्माने वेगळ्या प्रकारचे काम करीत असेल तर त्याला त्या जातीतील काम करण्यासाठी कशी काय सक्ती करू शकतो. आजही मला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असे वाटते की, ग्रामीण भाग असो, शहरी भाग असो एक वाक्य सातत्याने बोलले जाते की, ज्याने त्याने त्याच्या पायरीने रहावे. त्यामुळे मला प्रश्न उपस्थित करावा लागतो की, ही जी पायरी आहे ती कोणी ठरविली आहे ? मग ती विठ्ठल मंदिरातील पायरी असेल. काळाराम मंदिरामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मोठा संघर्ष करावा लागला. त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारण्याच्या अगोदर हिंदू धर्मामध्ये परिवर्तन होण्यासाठी सातत्याने खूप प्रयत्न केले. हे प्रयत्न करीत असताना काळाराम मंदिराचा सत्याग्रह झाला. यासाठी लोकांना खूप संघर्ष करावा लागला. तेथे संपूर्ण आंबेडकरी जनता गेली होती. त्यावेळी त्यांनी हेच सांगितले होते की, आम्हाला काळाराम मंदिरातील राम नको, त्यामध्ये जो माणूस असतो तो आम्हाला पाहिजे आहे. मी संपूर्ण इतिहासामध्ये जाणार नाही. भारतीय इतिहासामध्ये हा संघर्षाचा काळ होता. त्यामुळे त्याबद्दल पुनर्विचार झाला, आत्मचिंतन झाले. सुधारणा झाल्यावर, बदल झाल्यावर तो आपण स्वीकारण्याचा प्रयत्न करतो ही भारतीय समाज व्यवस्थेची मोठी शक्ती आहे. त्यांनी राज्य घटनेचे शिल्पकार म्हणून कार्य केले त्यात त्यांनी उल्लेख केलेला आहे. प्रत्येक देशामध्ये घटना तयार मोठा कालावधी गेलेला आहे. काही देशांमध्ये घटना तयार करण्यासाठी 9-9 वर्षांचा काळ गेलेला आहे. या उलट डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्य घटना तयार करत असताना काही मूलभूत सूत्र स्वीकारली. आता सभागृहात मला आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये, सन्माननीय सदस्य ॲड.जयदेवजी गायकवाड, सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई गिरकर, दिलीप कांबळे, नागो गाणार दिसत आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रखर अशी तात्विक भूमिका होती. त्यांनी राज्य घटना करताना स्वतःच्या विचारांची सक्ती कधीच केली नाही. पहिले मानसिक परिवर्तन असते. हे मानसिक परिवर्तन करण्यासाठी त्यांनी एक रचना स्वीकारली. अन्यथा ते त्याच वेळी भारतीय राज्य घटनेमध्ये सर्वांनीच धर्म बदला असा निर्णय देऊ शकले असते. मला बौद्ध धर्मा बद्दल आदर आहे. मी अनेक वेळा स्वतः बुद्ध वंदना केली आहे. परिवर्तनासाठी चळवळ करणे आणि अधिकारासाठी सर्वधर्माच्या, जातीच्या लाखो लोकांना पुढे नेण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी त्यातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सीमा रेषा कुठे आहे हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बरोबर ओळखले होते. राज्य घटनेमध्ये त्यांनी एक वाक्य नमूद केलेले आहे. आम्ही तीन साधने स्वीकारली आहेत. त्यातील पहिले साधन म्हणजे एकच न्याय यंत्रणा सगळीकडे असली पाहिजे. दुसरे साधन दिवाणी आणि गुन्हेगारी विषयक मूलभूत कायद्यामध्ये समानता स्वीकारली आहे. कौटुंबिक कायदे वेगळे असले तरी चोरी, खून, बलात्कार या सारखे गुन्हे झाले तर सर्व जातीच्या लोकांना क्रीमिनल प्रोसिजर कोड लावण्यात येतो. मग त्यात श्रीमंत असो की गरीब असो. तिसरे महत्वाचे साधन म्हणजे महत्वाची जबाबदारी सांभाळण्यासाठी सामायिक स्वरूपाची अखिल भारतीय नागरी सेवा देखील स्वीकारली आहे. नागरी जीवन आणि उद्योग समुदाय यातील पायाभूत कायद्यातील भिन्नता नाहीशी करण्यासाठी बरेच कोडीफिकेशन करावे लागले आहे. त्याच बरोबर स्वातंत्र्याचा गैरफायदा कोणी घेत असेल तर तो रोखण्यासाठी सुद्धा राष्ट्राला स्वतःच्या कायदेकानू मार्फत मूलभूत अधिकार असतात हे देखील त्यांनी स्वीकारले. तो आपल्या राज्य घटनेतील विचारांचा एक मोठा पाया होता आणि आजही आहे. त्याच बरोबर राज्यांना फुटण्याचा अधिकार नाही हे अमेरिकेच्या एका उदाहरणावरून घेऊन संपूर्ण देश एकसंघ ठेवण्यासाठी काय करावे लागेल याचा विचार आपल्या कमिटीमध्ये मांडला आहे. या कमिटीमध्ये वेगवेगळी मते देखील काहींनी मांडली आहेत. काही लोकांनी त्यांच्या बद्दल रिझर्व्हेशन्स व्यक्त केली आहेत. श्री.नझिरूद्दीन अहमद यांना मसुदा समितीने केलेले काम हे पूर्णतः नाकारणे हे आपले कर्तव्य आहे असे वाटते. त्यासंबंधी डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, मसुदा समितीने केलेल्या कार्याबद्दल श्री.नझिरूद्दीन यांना तो अधिकार आहे. पण मसुदा समितीच्या कोणत्याही सदस्यांपेक्षा आपण अधिक बुद्धिमान आहोत असे श्री.नाझिरूद्दीन अहमद यांना वाटते. मसुदा समिती त्यांना या दाव्याला आव्हान करू इच्छित नाही. या उलट संविधान सभेला ते समितीवर नियुक्त करण्याच्या योग्यतेचे आहे असे वाटले असते तर आपल्यात त्यांचे स्वागत करण्यात मसुदा समितीला आनंदच वाटला असता. मला असे वाटते की, त्यांनी मतभेद देखील नम्रतेने स्वीकारले आहेत. येथे मला हिंदू कोडचा देखील उल्लेख करायला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

पाहिजे. हिंदू कोडमध्ये परिवर्तन झाले आहे. सक्सेशन ॲक्टमध्ये आता बदल झालेला आपण पाहिला आहे. जो पर्यंत हिंदू कोड बिल लागू झाले नव्हते तो पर्यंत हिंदू समाजात बहुपत्नीकत्वाला मान्यता होती. हिंदू कोड बिलावर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पुस्तक आहे. त्यात त्यांनी उदाहरण दिलेले आहे. त्यांनी देशभरातील माहिती घेतली तेव्हा त्यांना पश्चिम बंगालमध्ये एक माणूस सापडला की, ज्याने 500 पत्नी केल्या होत्या.

2D-1 .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

या 500 पत्नींची चुकामूक होऊ नये यासाठी तो एक रजिस्टर मेन्टेन करीत होता. बहुपत्नीत्वाच्या संदर्भात हिंदू बिल कोडमध्ये सगळीकडे एक पत्नीत्वाचा कायदा लागू होणे यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे फार मोठे योगदान होते असे मला वाटते. हिंदू कोड बिल स्वीकारताना विरोध होऊ लागला त्यावेळी त्यांनी राजीनामा दिला. परंतु त्यांच्या राजीनाम्याचा एक परिणाम असा झाला की, टप्प्या टप्प्याने 20 वर्षामध्ये हिंदू कोड बिलातील अनेक बदल, म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जे बदल एकदम करावयाचे होते ते हिंदू समाजाला स्वीकारण्यास काही वर्षे लागली. परंतु त्यामधून एक दिशा निश्चितपणाने मिळाली. परंतु आजही यामध्ये अनेक बदल होणे अपेक्षित आहेत.

सभापती महोदय, हिंदू कोड बिलाच्या संदर्भात मला येथे सांगावयाचे आहे की, दलित, अनुसचित जाती जमातीच्या स्त्रियांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जसा विचार केला तसेच त्यांनी ज्या हिंदू स्त्रिया दलित जातीमध्ये जन्मलेल्या नाहीत, अनुसूचित जमातीत जन्मलेल्या नाहीत अशा स्त्रियांच्या अधिकारांचाही त्यांनी विचार केलेला आहे. त्याच बरोबर मतदानाच्या अधिकारासाठी जवळ जवळ 50 वर्षापेक्षा जास्त वर्षे अमेरिकेमध्ये, इंग्लडमध्ये, युरोपमध्ये स्त्रियांना मतदानासाठी चळवळ करावी लागली होती. सौदी अरेबियात चार दिवसापूर्वी महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला. भारतामधील स्त्रिया मतदानाच्या अधिकारासाठी सातत्याने प्रयत्न करीत होत्या. परंतु इंग्लडमधील स्त्रियांना सफरेज मुव्हमेंट करावी लागली होती. या ठिकाणच्या स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून त्या खांबाला बांधून घेत होत्या. बरीच आंदालने झाली होती. काही वेळेस तत्कालीन ब्रिटिश सरकारने या महिलांच्या अंगावर घोडेस्वार सुध्दा सोडले होते. त्यावेळेस पोलिसांनी आपल्याला सोडवू नये यासाठी या स्त्रिया साखळदंडाने स्वतःला बांधून, साखळदंडाला एक कुलूप लावून चावी नदीमध्ये फेकून देत असत. इतके उग्र आंदोलन युरोप मधील महिलांना करावे लागले होते. या उलट भारतामध्ये महिलांना मतदानाचा अधिकार लवकरच मिळाला. मी तर असे मानते की, भारतीय महिलांचे योगदान हे समाजामध्ये, शेतीमध्ये, शिक्षणामध्ये तसेच धर्मकारणामध्ये होते त्या सर्वांचा एका अर्थाने सन्मान भारतीय राज्य घटनेने, भारतीय स्त्रियांना मतदानाचा अधिकार देऊन केला. यासंदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका अत्यंत व्यापक स्वरुपाची होती. यासंदर्भात मी आणि माझ्या सारख्या अनेक महिला अशा मानतात की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांबद्दल आदर व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, ज्यावेळेस मी समाज कार्य सुरु केले आणि आमच्या महिला संस्थेमार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी केली त्यावेळेस बरेचसे लोक मला हळूच माझी जात विचारीत होते. तुम्ही दलितेतर असूनही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती कशी साजरी करता असा प्रश्न नेहमी विचारीत होती.

सभापती महोदय, सन्माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितले होते की, वेगवेगळ्या ग्रंथाच्या ऐवजी घटनाच पुरेशी का नाही ? डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जी राज्य घटना आहे ती प्रमाण माना अशी त्यांनी भूमिका घेतली होती. त्यांनी भिम शकती व शिव शक्तीची भूमिका घेतली होती.

सभापती महोदय, मला येथे मुद्दाम सांगावयास पाहिजे की, मी 1998 पासून शिवसेनेचे काम करण्यास सुरुवात केली. घाटला भागात माझे भाषण झाले तेव्हा स्व.प्रमोद महाजन साहेब हे देखील व्यासपीठावर होते. माझे भाषण पूर्ण झाल्यानंतर मी जय भिम आणि जय महाराष्ट्र म्हटले. नंतर मी साहेबांना सांगितले की, इकडे पहिल्यांदाच मी बोलले. परंतु मी त्यात जय भिम सुध्दा बोलले त्यासंदर्भात तुम्हाला काय वाटते ? तेव्हा मला शिवसेना प्रमुखांनी सांगितले होते की, "तुला जय भिम म्हणायला कोण अडवते ते मी पाहतो." म्हणून मला येथे मुद्दाम नमूद करावयास पाहिजे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका सर्व पक्षाने, सर्व जातीने, सर्व धर्मांनी, सर्व माणसांनी स्वीकारलेली आहे पण त्याच बरोबर मला येथे मुद्दाम सांगावेसे वाटते की, या सगळया विचाराबरोबर हा कार्यक्रम आपण या सभागृहात का करीत आहोत ? संविधान दिन आपण का साजरा करीत आहोत ? मला एक उल्लेख मुद्दाम करावासा वाटतो की, बाबासाहेब आपल्या भाषणात असे म्हणाले होते की, "साम्यवादी पक्ष व समाजवादी पक्ष या दोन घटकांकडून संविधानावर मोठया प्रमाणात नापसंती व्यक्त करण्यात येत आहे. खाजगी संपतीचे राष्ट्रीयकरण किंवा सामाजिकीकरण करण्याचे संविधानाने त्यांना स्वातंत्र दिलेच पाहिजे. परंतु मोबदला न देता सर्व खाजगी संपत्तीचे राष्ट्रीयकरण करावे अशी साम्यवादी भूमिका आहे आणि समाजवाद्याना हवी असलेली दुसरी गोष्ट अशी की, संविधानातील सर्व अधिकार कोणत्याही निर्बंधाशिवाय असावेत. जेणे करुन त्यांच्या पक्षाला सत्ता प्राप्त करण्यात अपयश आले तर राज्य उलथून पाडण्याचेही स्वातंत्र त्यांना हवे आहे." डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी यामध्ये जेफरसन यांचे मत कोट केलेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

असून त्यांनी असे म्हटले आहे की, देश हितासाठी स्थापन करण्यात आलेल्या संस्थांना स्पर्श करता येणार नाही किंवा फेरबदल करता येणार नाही. पण त्याच बरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी खेडयांच्या संदर्भात तीव्र भूमिका मांडली होती. खेडयांमध्ये बऱ्याचशा प्रमाणात सरंजामी विचार, जाती संस्था, उच्चतम, नीच्चतम अशा पध्दतीच्या भावना मर्यादित आहेत. त्यामुळे खेडयाकडून शहराकडे चला असे त्यांनी त्यांच्या तत्वविचारातून मांडलेले आहे. परंतु राज्य घटना मांडत असताना त्यांनी या सर्व विचारांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला तसेच त्यासाठी त्यांनी प्रचंड असे परिश्रम केले होते. मला असे वाटते की, त्यांच्या योगदानाच्या निमित्ताने आपण दोन्ही सभागृहात चर्चा करतो आहोत त्यावेळी आपले मतभेद असण्याचे एकमत असू शकते.

सभापती महोदय, आमचे सन्माननीय विरोधी पक्षाचे सदस्य म्हणतात की, राज्य घटनेच्या गाभ्याला हात लावला तर आम्ही त्याला विरोध करु. मला असे वाटते की, राज्य घटना ही जसे पावसाचे पाण्याला आपण मातीपासून वेगळे करु शकत नाही राज्य घटनेतील मूलभूत तत्वे आहेत. त्यामुळे मूलभूत तत्वापासून बदलणे म्हणजे स्वत:च स्वत:ला भूकंपासाठी बोलावणे करण्यासारखे आहे. त्यामुळे कोणी कितीही ठरवले तरी सुध्दा अनेक पिढयांचा इतिहास बदलवून लोकशाही चौकटीत नेण्याचे ऐतिहसीक स्वरुपाचे काम ज्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले आहे. खरे म्हणजे ती चौकट नाही तर ती एक जीवनशैली आहे, तो एक मार्ग असून त्यामधून चालत असताना मला असे वाटते की, ज्यावेळेस केंद्र सरकार आणि राज्य सरकार या विषयाच्या संदर्भात चर्चा घडवून आणतात तर ती केवळ दिशाभूल करण्यासाठी आहे असा कृपया गैरसमज करुन घेऊ नका. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार प्रत्यक्षात अंमलात आणणे व दुसऱ्यावरती चांगल्या विचारांची आपण मांडणी करु शकतो परंतु कोठे तरी त्यासंदर्भात सर्वांना सामावून घेण्याचा प्रयत्न करणे हे अत्यंत गरजेचे आहे. शेवटी एवढे सांगते की, आजही महिलांवर अत्याचार होत आहेत. महिला कोणत्या धर्माची आहे, कोणत्या जातीची आहे म्हणूनच प्रत्येकवेळी अत्याचार होतात असे नाही. परंतु तरीही दलित, आदिवासी महिलांवर जे अत्याचार होतात त्याचा पनिशमेंट रेट 2.5 टक्के आहे व सर्वसामान्य महिलांवरील पनिशमेंट रेट 4 टक्के आहे. मला वाटते या ठिकाणी सुध्दा 1.5 टक्क्याचा फरक आहे. पण आज ज्या प्रकारचे अत्याचार होतात किंवा ज्या कारणामुळे अनेक गोष्टी घडतांना दिसतात, आपण जेव्हा सुप्रशासन म्हणतो त्यावेळेला चांगल्या प्रकारे या कायद्यात योग्य ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

बदल घडवून व त्यातून अंमलबजावणीच्या यंत्रणा मजबूत करणे ही एका अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना व्यक्त केलेली सर्वात मोठी आदरांजली असेल एवढे सांगून मी माझे दोन शब्द संपवते.धन्यवाद.

जय भिम, जय महाराष्ट्र.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप कांबळे (सामाजिक न्याय राज्य मंत्री) : सभापती महोदय, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला राज्य घटना दिली आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने संसदेच्या दोन्ही सभागृहामध्ये संविधान दिनावर चर्चा घडवून आणलेली आहे. आज आपल्या सदनात चर्चा होत असताना सर्व प्रथम मी भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करतो. माननीय सभापती महोदय, घटनेचे शिल्पकार म्हणून बाबासाहेबांच्या संदर्भात बोलत असताना त्या काळात वेगळी परिस्थिती होती.

EE-1/.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप कांबळे...

सभापती महोदय, आज दिनांक 17 डिसेंबर, 2015 रोजी संविधानावर चर्चा होत आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना समितीसमोर भाषण केले होते ती तारीख 17 डिसेंबर, 1946 होती. घटना समितीसमोर अनेक सदस्य बोलण्याचे बाकी असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अचानकपणे घटना समितीसमोर मत मांडण्यासाठी निमंत्रित करण्यात आले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, मला आज बोलण्याची संधी मिळेल असे वाटले नव्हते. मला बोलण्याची संधी मिळणार आहे हे मला अगोदर समजले असते तर मी तयारीनिशी आलो असतो, तरी देखील मी माझे मत मांडणार आहे. त्यानंतर त्यांनी घटना समितीसमोर आपले मत मांडण्यासाठी सुरुवात केली तेव्हा संपूर्ण् सभागृह त्यांचे भाषण अवाक होऊन ऐकत होते. डॉ.बाबासाहेबांनी आपल्या बुद्धी चातुर्याने संविधानाच्या संदर्भात अतिशय प्रखर मते मांडली. डॉ.बाबासाहेबांचे भाषण संपले तेव्हा संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या गजराने दणाणून गेले होते.

सभापती महोदय, या घटनेच्या माध्यमातून प्रत्येक प्रत्येक स्त्री-पुरुषाला बोलण्याबरोबर व्यवसाय करण्याचा अधिकार मिळाला. एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात शिक्षण घेण्याचा, व्यवसाय करण्याचा, राहण्याचा अधिकार मिळाला. या देशाला संविधान मिळाले नसते तर कदाचित मला या सभागृहात माझे विचार मांडण्याची संधी मिळाली नसती असे मला वाटते्. डॉ.बाबासाहेबांनी संविधानाच्या माध्यमातून देशातील करोडो गोरगरीब, दीनदुबळे, दलित, आदिवासी बांधवांना आपले विचार मांडण्याची संधी दिलेली आहे. संविधानाद्वारा केवळ राजकीय अधिकारास संरक्षण मिळाले असे नाही तर शैक्षणिक अधिकार, विचार स्वातंत्र्याचा अधिकार, व्यवसाय करण्याच्या अधिकारास संरक्षण मिळालेले आहे. आपल्या देशात ही समानता दिसत आहे ती राज्य घटनेमुळे दिसत आहे.

सभापती महोदय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारकासाठी इंदू मिलची जागा मिळण्यासाठी तत्कालीन सरकारचा संघर्ष दहा-पंधरा वर्षे सुरु होता. केंद्रामध्ये आणि राज्यामध्ये सत्ता परिवर्तन झाल्यानंतर आम्ही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी इंदू मिलची जागा मिळविली. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे भूमीपूजन केले. एवढेच नव्हे तर 1921-22 या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थीदशेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप कांबळे...

लंडन स्कूल ऑफ ईकोनॉमिक्स येथे शिकत असताना ते लंडनमध्ये ज्या भाडयाच्या घरात राहत होते ते भाड्याचे घर देखील राज्य सरकारने खरेदी केले असून त्या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक करणार आहोत. त्याचा लोकार्पण सोहळा देखील माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी विद्यार्थीदशेत अतिशय हलाखीचे जीवन काढले. परंतु त्यांनी स्वतःच्या जिद्दीवर उच्च शिक्षण घेतले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या हयातीमध्ये आणि विद्यार्थीदशमध्ये अनेक गोष्टींसाठी संघर्ष करावा लागला. घटना समितीमध्ये येण्यासाठी देखील संघर्ष करावा लागला. तरी देखील त्यांनी जिद्द सोडली नाही. त्यांना ज्या प्रकारचा अन्याय आणि अत्याचार सहन करावा लागला त्याचा सूड त्यांनी कधी घेतला नाही. डॉ.बाबासाहेब आंबडेकरांनी "मी हिंदू धर्मामध्ये जन्माला आलो असलो तरी हिंदू धर्मामध्ये मरणार नाही " असे उद्गार काढले. त्यांनी हे उद्गार काढल्यानंतर त्यांनी 15-20 वर्षे या देशातील वर्ण व्यवस्था सुधारण्याची वाट पाहिली. 20 वर्षानंतर दुसऱ्या धर्मात जात असताना त्यांनी कोणावरही सूड उगवला नाही. त्यांनी धर्मांतर करताना जो बौद्ध धर्म स्वीकारला त्या धर्माचा जन्म या मातीत झालेला आहे.

सभापती महोदय, आज इतर देशांमध्ये काय परिस्थिती आहे याचा विचार करावा. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 1956 मध्ये अन्य कोणत्याही धर्माचा स्वीकार केला असता तर दुर्दैवाने आपल्या देशाची काय परिस्थिती झाली असती ? डॉ.बाबासाहेब आंबेडकर केवळ घटनेचे शिल्पकार नाहीत तर डॉ.बाबासाहेब खूप मोठे अर्थतज्ज्ञ होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील प्रत्येक नागरिकावर खूप मोठे उपकार केलेले आहेत.

सभापती महोदय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 125 वी जयंती साजरी करीत असताना राज्य शासनाने काही चांगले निर्णय घेतलेले आहेत. ज्या ज्या ठिकाणी डॉ.बाबासाहेबांचा ऐतिहासिक संबंध आला मग त्यामध्ये चवदार तळे असेल, काळाराम मंदिर असेल किंवा ज्या ठिकाणी धर्मांतराची घोषणा केली किंवा तळेगाव असेल किंवा ज्या ठिकाणी ऐतिहासिक भाषणे झाली त्या सर्व स्थळांचा विकास राज्य शासन करणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप कांबळे.....

सभापती महोदय, ग्रामीण भागातील मुलींना शहराच्या ठिकाणी निवासाची व्यवस्था व्हावी म्हणून शासन 50 वसतीगृह उभी करीत आहेत. ज्या महिला भगिनी नोकरीच्या निमित्तानेशहराकडे येतात त्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यासाठी मुंबई,पुणे, ठाणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती आणि नागपूर या ठिकाणी वर्कींग वुमेन्स हॉस्टेल निर्माण करीत आहोत. राज्यातील दलित वस्त्यांतील काही निवडक दलित वस्त्या निवडून त्या वस्त्यांचा शासन विकास करणार आहे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) ही संस्था पुण्यामध्ये आहे. ही संस्था शहराच्या मध्यभागी असल्यामुळे त्या संस्थेस जागा कमी पडत आहे. या संस्थेसाठी पुणे शहराच्या जवळ 12-15 एकर जागा घेऊन यशदाच्या धर्तीवर तिचा विकास करणार आहोत.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली घटना बदलण्याच्या संदर्भात किंवा आरक्षणाच्या संदर्भात या ठिकाणी वारंवार चर्चा होते. मी सांगू इच्छितो की,डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला जी राज्य घटना दिलेली आहे ती घटना बदलण्याचे काही कारण नाही आणि तसा कोणी प्रयत्न देखील करणार नाही. आरक्षणाच्या संदर्भात जो उल्लेख झाला त्याबाबत मला असे वाटते की, या देशामध्ये एक बाबासाहेब निर्माण झाले आणि त्यांनी देशातील करोडो दीनदुबळे, दलित, आदिवासी, शोषित पीडित समाजाला न्याय दिला. त्याच बाबासाहेबांच्या शिक्षणामुळे आज घराघरामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर निर्माण झालेले आहेत. त्यामुळे घटना बदलणे किंवा आरक्षण बदलण्याचा शासन कोणाताही विचार करीत नाही एवढेच या ठिकाणी सांगतो आणि पुन्हा एकदा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद,जय महाराष्ट्र, जय भीम.

..... 2F-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, नुकतेच माननीय राज्यमंत्र्यांचे भाषण संपले आहे. सत्ताधारी पक्षाकडून केवळ एक-दोन मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. एवढ्या महत्त्वाच्य विषयावर चर्चा सुरु असताना सरकारकडून या चर्चेच्या बाबतीत उदासीनता दिसून येते. सरकारला ही चर्चा करण्यात इंट्रेस नाही काय ? माझी विनंती आहे की, सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सभागृहात उपस्थित राहावे म्हणून आपण बेल वाजविण्यास सांगावे.

तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) : आता सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड आपले विचार व्यक्त करणार होते. परंतु सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी मला विनंती केल्यामुळे मी त्यांना अगोदर संधी देतो. त्यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांनी आपले विचार व्यक्त करावेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपण कालही माझ्यावर अनुग्रह केला आणि आज सुध्दा अनुग्रह केला, त्याबद्दल मी आपला फार फार आभारी आहे. परंतु आपण माझ्यावर अनुग्रह केल्यामुळे सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांच्यावर अन्याय झाला असे मला वाटत नाही. कारण मला जे बोलावयाचे आहे तेच त्यांना बोलायचे आहे आणि त्यांना जे बोलायचे आहे तेच मला बोलायचे आहे.

सभापती महोदय, विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात परमपूज्य, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीचे औचित्य साधून संविधान आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची महानता यावर चर्चा ठेवल्याबद्दल सर्वप्रथम मी माननीय सभापतींना धन्यवाद देतो, किंबहुना त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, संविधनावर बोलायचे असेल तर ते दोन-चार मिनिटांत, अर्ध्या-एका तासात, दोन तासात बोलता येणार नाही. हे वर्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे 125 वे वर्ष म्हणून संपूर्ण देश साजरे करीत आहे. यासाठी केंद्र सरकारने राष्ट्रीय पातळीवर एक समिती गठीत केली आहे. राज्य सरकारने तशा प्रकारची समिती गठीत केली आहे की नाही, हे मला माहीत नाही.

सभापती महोदय, संसदेचे अधिवेशन सुरु झाल्यापासून 26/11 या संविधान दिनाच्या अनुषंगाने राज्यघटनेवर तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यकर्तृत्वावर चर्चा झाल्याचे संपूर्ण देशाने नव्हे जगाने बघितले आहे. ही ऐतिहासिक व अभूतपूर्व अशी घटना आहे. परंतु त्यासाठी 125 वर्षे वाट पहावी लागली याबद्दल मला थोडासा खेद वाटतो. वास्तविक पाहता अशा प्रकारची चर्चा यापूर्वीच व्हायला हवी होती. असो. उशिरा का होईना पण ही चर्चा होत आहे. काहीच न होण्यापेक्षा निदान सुरुवात तरी झाली आहे. सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते साहेब, सभागृहात ही चर्चा उपस्थित केल्याबद्दल मी आपल्या सरकारला धन्यवाद देतो. या ठिकाणी कोण मोठे झाले किंवा कोण छोटे झाले हा प्रश्न नाही. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांनाच मोठे केले आहे. या देशाला ज्यांनी मोठे केले त्यांना पदोपदी कसे छळले जाते, त्यांचे पुतळे कसे तोडले जातात, त्यांचा अवमान कसा केला जातो, हे सुध्दा तितकेच खरे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

सभापती महोदय, घटना समितीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा समावेश करण्यात आला. घटना समितीची 11 अधिवेशने झाली. घटना समितीच्या दिनांक 24 नोव्हेंबर, 1950 रोजीच्या बैठकीत घटना समितीच्या सर्व सदस्यांनी ऐतिहासिक अशा दस्तऐवजावर सह्या केल्या. महोदय, आजचा दिवस आपल्या सर्वांच्या दृष्टीने विशेष आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी आजचा दिवस महत्त्वाचा का आहे हे सांगितले. संविधानावर चर्चा करण्यासाठी आपण आजचा दिवस शोधून काढलेला आहे. राज्याचे माननीय सामाजिक न्याय मंत्री इंजिनियर श्री.राजकुमार बडोले व त्यांचे सहकारी माननीय सामाजिक न्याय राज्यमंत्री श्री.दिलीप कांबळे यांच्या पुढाकाराने, माननीय सभापती व माननीय अध्यक्षांनी ही चर्चा या ठिकाणी घडवून आणली आहे. त्यामुळे मी आपणा सर्वांचा मोठा ऋणी आहे.

सभापती महोदय, संविधानाच्या बाबतीत काय बोलावे आणि काय नाही हेच मला सुचत नाही. सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हे माझे कट्टर मित्र आहेत. अनेकजण 'कट्टर' हा शब्दप्रयोग शत्रूसाठी वापरतात. परंतु मी हा शब्द माझ्या मित्रासाठी वापरत आहे. माननीय श्री.दिवाकर रावते हे सत्ताधारी बाजूत असो की विरोधी बाजूत असो, ते नेहमीच न्यायाच्या बाजूने उभे असतात, हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

सभापती महोदय, संसदेमध्ये संविधनावर दोन दिवस चर्चा झाली. राष्ट्रीय पातळीवर केंद्र व राज्य सरकारच्या वतीने 'संविधान दिन' हा मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. आपल्या देशाला दिनांक 15 ऑगस्ट, 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिनांक 26 नोव्हेंबर, 1946 रोजी या देशाच्या महान नेत्यांकडे राज्यघटनेचा प्रारूप मसुदा सादर केला. दिनांक 26 नोव्हेंबर, 1950 रोजी संपूर्ण देशात ती राज्यघटना लागू करण्यात आली. संपूर्ण देशात 15 ऑगस्ट हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून आणि 26 जानेवारी हा दिवस 'गणराज्य दिन' म्हणून मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. किंबहुना, देशात आणि जगात भारतीय लोकांकडून हा दिवस उत्सवासारखा साजरा केला जातो. या निमित्ताने माझी विनंती आहे की, दरवर्षी 26 नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय सणाच्या रूपाने 'संविधान दिन' म्हणून साजरा केला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) FF-4

SJB/ ST/ 17:40

प्रा.जोगेंद्र कवाडे....

सभापती महोदय, संविधान सभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संघ राज्यात्मक संसदीय लोकशाहीची निर्मिती केली. सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ साहेब, आपण सर्वजण त्यांचे वारसदार आहोत. त्यावेळी एक महत्त्वाची गोष्ट घडली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे बंगालमधून संविधान सभेवर निवडून आले होते. त्या दरम्यान देशाची फाळणी झाली. त्यामुळे बंगाल प्रांत हा पूर्व पाकिस्तानमध्ये गेला आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे सदस्यत्व रद्द झाले. त्यामुळे लोकांना फार चिंता वाटू लागली. लोकांना वाटायचे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या विद्वान माणसाची संविधान सभेत आवश्यकता आहे. त्यामुळे संविधान सभेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसादजीने, डॉ.बाबासाहब आंबेडकर को संविधान सभा में शीघ्र चुनकर भेजने की जिम्मेदारी मुंबई पर डाल दी. डॉ.राजेंद्र प्रसाद यांना संविधान सभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर का हवे होते हे त्यांच्याच शब्दात मी सांगतो. "Apart from any other considerations, we found Dr. Ambedkar's work, both in the Constituent Assembly and in various Committees to which he was appointed, to be of such cadre as to require that we should not be deprived of his services. As you know, he was elected from Bengal and after the division of the Province; he has ceased to be the Member of the Constituent Assembly. I am anxious that he should attend the next Session of the Constituent Assembly commencing from 14th July and it is, therefore, necessary that he should be elected immediately."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

असे मुंबईच्या मुख्यमंत्र्यांना सांगितले. यावरून देशाची राज्यघटना तयार करण्यासठी त्यांची किती गरज होती हे समजते. त्यासाठी त्यांनी अशा प्रकारे मुंबईच्या मुख्यमंत्र्यांना कळविले. बाबासाहेब येथून निवडून गेले. खरे पाहिले तर यावर जास्त बोलण्याऐवजी मी फक्त एक गोष्ट वाचली असती तरी संपले असते. Preamble of the Constitution of India is enough. भारताच्या राज्यघटनेचा सरनामा आहे, प्रिॲम्बल आहे, उद्देशिका आहे. It is a universal document of liberation. बाबासाहेब प्रिॲम्बलमध्ये काय म्हणतात ते पहा.

"WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly
resolved to constitute India into a SOVEREIGN
SOCIALIST SECULAR DEMOCRATIC REPUBLIC and
to secure to all its citizens:
JUSTICE, social, economic and political;
LIBERTY of thought, expression, belief, faith and
worship;
EQUALITY of status and of opportunity;
and to promote among them all
FRATERNITY assuring the dignity of the individual
and the unity and integrity of the Nation;
IN OUR CONSTITUENT ASSEMBLY this twentysixth
day of November, 1949, do HEREBY ADOPT,
ENACT AND GIVE TO OURSELVES THIS
CONSTITUTION."

सभापती महोदय, मला वाटते की, विधानसभा, विधानपरिषद, कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्था यांमध्ये जे सन्माननीय सदस्य निवडून जातात, जे सरकारी अधिकारी वेगवेगळ्या पदांवर असतात, सरकारी कर्मचारी असतात त्यांना जसे गणेश स्तोत्र पाठ असते, देवीच्या प्रार्थना पाठ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

असतात त्याच पध्दतीने भारताच्या संविधानातील प्रिॲम्बल, उद्देशिका प्रत्येकाला पाठ असली पाहिजे. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना समजले पाहिजे. शाळांमध्ये विद्यार्थी जातात, जनगणमन म्हणतात, काही शाळांमध्ये सरस्वतीचे गुणगान केले जाते, प्रार्थना होते, ठीक आहे. करू द्या. आपल्या धर्मनिरपेक्ष राज्यामध्ये शाळांतील विद्यार्थ्यांकडून देखील अशा प्रकारे प्रार्थना वगैरे केल्या जातात, राष्ट्रगीत होते. राष्ट्रगीत झाल्यानंतर विद्यार्थ्यांना सामुदायिक प्रिॲम्बलचे वाचन केले पाहिजे अशा प्रकारचे कम्पल्शन केले पाहिजे अशी माझी मागणी आहे. आता सुरू झाले आहे. नागपूरमध्ये 26 नोव्हेंबरला एक मोठा ऐतिहासिक, ना भूतो, ना भविष्यती असा प्रकार घडला. ते चित्र पाहून नागपूरकर जनतेच्याच नव्हे तर महाराष्ट्रातील, देशातील जनतेच्या हृदयामध्ये एक मोठे वादळ निर्माण झाले, आनंद निर्माण झाला, आनंदाच्या ऊर्मी निर्माण झाल्या, आनंदाच्या लाटा निर्माण झाल्या. नागपूर नगरातील जवळजवळ दीड लाख विद्यार्थ्यांनी नागपूरच्या स्टेडियममध्ये 26 नोव्हेंबरला संविधान दिनाच्या दिवशी मोठी रॅली केली, अत्यंत भव्य-दिव्य अशा प्रकारचे चित्र होते. हा आमचा विद्यार्थी बाबासाहेबांच्या राज्यघटनेने तयार झाला तर आमच्या देशाकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत कोणी मायचा लाल करणार नाही किंवा पैदा होणार नाही, असे चित्र त्या दिवशी आमच्या देशाने पाहिले हे या ठिकाणी मला आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, बाबासाहेब प्रिॲम्बलमध्ये काय म्हणतात की, "प्रिॲम्बल" आम्ही स्वत:लाच अर्पण करत आहोत. जगाच्या इतिहासात आजपर्यंत अशा प्रकारची राज्यघटना कोणी तयार केली नाही. आजच्या या दिवसाचे महत्त्व मी सांगतो. आमच्या मित्रांनीही हे सांगितले आहे. आज 17 डिसेंबर आहे आणि या 17 डिसेंबरच्या दिवशी बाबासाहेब आंबेडकरांना पहिल्यांदा घटना समितीमध्ये बोलण्याची अनुमती डॉ. राजेंद्रप्रसाद, घटना समितीचे अध्यक्ष यांनी दिली. मघाशी आमचे माननीय मंत्री श्री. दिलीप कांबळे यांनीही याचा उल्लेख केला, मला फार बरे वाटले. आजचा हा दिवसही छान निवडला. संविधान सभेचे कामकाज 9 डिसेंबरला सुरू झाले, दिनांक 17 डिसेंबर, 1946 ला म्हणजे संविधान सभेचे कामकाज सुरू झाल्याच्या नवव्या दिवशी बाबासाहेबांना बोलण्यासाठी उभे करण्यात आले. अचानक बोलण्यासाठी उभे करण्यात आले. बाबासाहेब देखील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

भांबावले की, आता मी काय बोलू आणि काय नको. शेवटी विद्वान माणसे. येणाऱ्या संकटाला तोंड देणे हेच त्यांचे खरे महत्त्व असते. त्यामध्ये बाबासाहेब काय म्हणाले हे सांगणे मी माझे कर्तव्य समजतो. थोडा वेळ गेला तरी चालेल. दिनांक 17 डिसेंबरला बाबासाहेब बोलण्यास उभे झाले. अचानकपणे डॉ. राजेंद्रप्रसादजींच्या वतीने नाव पुकारले गेले. या प्रसंगाचे वर्णन करताना संविधान सभेचे एक सदस्य न.वि.गाडगीळ हे बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणाबद्दल म्हणतात की, त्यांचे भाषण इतके मुत्सद्याला शोभणारे होते, इतके कटुतेशिवाय, इतके प्रामाणिकपणे आव्हान देणारे होते की संपूर्ण सभागृह मतीगुंग झाल्यासारखे ऐकत होते. प्रचंड उत्साहाने सर्व सदस्यांनी टाळ्यांचा कडकडाट करून त्यांच्या भाषणाचे कौतुक केले, स्वागत केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल सांगायचे झाले तर बाबासाहेब आंबेडकर काँग्रेसचे कट्टर विरोधक होते. पण काँग्रेसने जेव्हा देशाची सत्ता हातामध्ये घेतली तेव्हा माझा देश घडला पाहिजे म्हणून आपला विरोध बाजूला ठेवून नेहरूजींच्या मंत्रिमंडळाचे निमंत्रण त्यांनी स्वीकारले. त्यांनी काँग्रेसच्या मतप्रणालीची आणि नेत्यांची जाहीर, खाजगीत अनेकदा टीका केली, टर्र उडवली. साहजिकच घटना समितीमधील काँग्रेसच्या नजरा त्यांच्याकडे वळल्या होत्या की केव्हा आंबेडकर कचाट्यात सापडतात आणि केव्हा तुटून पडतो. प्रत्येक सभासदाला वाटले की, जयकरांच्या ठरावाला पाठिंबा देऊन जयकरांच्या बरोबर आंबेडकर देखील आपली प्रतिष्ठा घालवून बसणार. जयकरांचे म्हणणे होते की, मुसलमानांचा आणि संस्थानिकांचा समावेश झाल्याशिवाय घटना समिती परिपूर्ण होणार नाही. बाबासाहेबांनी त्यास फेटाळून लावले. काँग्रेसचे नेते हे राष्ट्रातील कर्तृत्व शक्तीचे प्रतिक होते, त्यांच्याविरुद्ध बोलणे म्हणजे लौकिकजीवन इतिश्री करण्यासारखे होते. काँग्रेसचे सभासद हे आपला कट्टर शत्रू, आंबेडकरांना पाणी पाजण्यास आतूर झाले होते.

तालिका सभापती : मी सभागृहाची वेळ ही चर्चा संपेपर्यंत वाढवत आहे. परंतु माझी आपल्या सर्वांना विनंती आहे की, आपण सर्वांनी कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त मुद्दे उरकण्याचा प्रयत्न करावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.नरेंद्र पाटील) : आजच्या चर्चेत बेल वाजविणे मला पटणार नाही. कारण घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल आपण विचार मांडीत आहोत. सन्माननीय सदस्यांना माझी एवढीच विनंती आहे की, आपणही वेळेची मर्यादा ओळखून भाषण केले तर सर्व सन्माननीय सदस्यांना चर्चेत सहभागी होता येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आपल्या घटनेने नागरिकांना कोणते मूलभूत अधिकार राहतील, हे देखील डॉ.बाबासाहेबांनी आपल्या भाषणात सांगितले आहे. त्यांनी असे सांगितले की, "माझी अपेक्षा होती की, देशात आर्थिक, सामाजिक न्यायाच्या अंमलबजावणीसाठी शेतीच्या आणि उद्योगाच्या राष्ट्रीयीकरणाची तरतूद ठरावात करणे आवश्यक होते. समाजवादी अर्थव्यवस्था असल्याशिवाय भविष्यातील कोणतेही सरकार देशामध्ये सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय देऊ शकेल, असे मला वाटत नाही." हे डॉ.बाबासाहेबांनी त्या काळात सांगितले. ते आजही लागू पडते की नाही ?

सभापती महोदय, 'प्रजासत्ताक' या शब्दाबद्दल वाद निर्माण करण्यात आला. पण डॉ.बाबासाहेबांनी सहज आणि सोप्या भाषेत असे सांगितले की, 'प्रजासत्ताक' हा शब्द वादाचा केंद्रबिंदू असता कामा नये. सार्वभौमत्व लोकांमधून निर्माण होते, त्याला प्रजासत्ताक म्हणतात. एवढ्या साध्या, सोप्या भाषेत त्यांनी प्रजासत्ताकाची व्याख्या समजावून सांगितली.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी असे सांगितले की, "बाबासाहेबांचे चित्र असलेली नोट शासनाने छापावी." माझे या मागणीला समर्थन आहे. लोकांच्या खिशात ती असलीच पाहिजे. कारण, लोकांना बाबासाहेब कळलेच नाहीत ना. डॉ.बाबासाहेबांचा पदोपदी अपमान करण्यात आला. या देशात पदोपदी त्यांची बेईज्जती करण्यात आली. त्यांना पदोपदी अवमानित करण्यात आले. पण त्यांनी या देशाला, या समाजाला सांगितले की, "माझा जरी या देशामध्ये अपमान झाला तरी माझ्या देशाचा अपमान मी खपवून घेणार नाही." असे सांगणारे बाबासाहेब देशात पहिले होते. माझी बेईज्जती झाली तरी चालेल, पण माझ्या भारतमातेची बेईज्जती करण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्याला मी माफ करणार नाही, हे त्यांनी या देशाला सांगितले. माझा पदोपदी अवमान झाला तरी चालेल पण माझ्या देशाचा अवमान मी सुईच्या टोकाएवढाही खपवून घेणार नाही, हे सांगणारे बाबासाहेब होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाची राज्यघटना लिहिली ती काही फक्त महारा, मांगा, ढोरा, चांभारांसाठी नाही तर या देशातील 125 कोटी लोकांच्या कल्याणासाठी लिहिली. देशाची राज्यघटना म्हणजे केवळ गरिबांचे कवच नाही तर देशाची राज्यघटना, बाबासाहेबांचे विचार म्हणजे देशाच्या जगण्याचा आधार आहे. बाबासाहेबांचे विचार हा देशाच्या जगण्याचा आधार आहे. बाबासाहेबांचे संविधान म्हणजे देशाच्या जगण्याचा आधार आहे. हा आधार नष्ट झाला तर या देशाचे काय होईल, याचा विचार करुन माणूस वेडा होऊ लागतो. काय होईल या देशाचे ?

सभापती महोदय, या देशातील एकात्मता, अखंडता कायम राहिली पाहिजे, हे बाबासाहेबांचे स्वप्न होते. बाबासाहेबांनी देशाची राज्यघटना 26 नोव्हेंबर या दिवशी देशाचे पहिले राष्ट्रपती बाबु राजेंद्र प्रसाद यांच्याकडे सोपविली. त्यावेळी देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु उपस्थित होते, राजगोपालाचारी उपस्थित होते, मौलाना अब्दुल कलाम आझाद, गोविंद वल्लभ पंत, सरदार वल्लभभाई पटेल उपस्थित होते आणि त्यांच्या उपस्थितीमध्ये देशाची राज्यघटना बाबासाहेबांनी देशाचे पहिले राष्ट्रपती बाबु राजेंद्र प्रसाद यांच्याकडे सोपविली. तेव्हा देशाच्या पहिल्या राष्ट्रपती महोदयांनी ती राज्यघटना आपल्या मस्तकी लावली आणि ते म्हणाले की, "डॉ.आंबेडकर, इस देश का संविधान लिखकर आप ने ऐसा काम किया है की ये देश आपके उपकारों को कभी भुल नही सकता." अशा शब्दात राष्ट्रपती महोदयांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा गौरव केला. तेच बाबासाहेब असे म्हणतात की, "जोपर्यंत आकाशात चंद्र, सूर्य आहे आणि समुद्राच्या पाण्याचा शेवटचा थेंब बाकी आहे तोपर्यंत माझ्या देशाची लोकशाही, स्वातंत्र्य, एकात्मता, अखंडता कायम राहिली पाहिजे." हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्यघटनेचे स्वप्न होते. हे स्वप्न कृपा करुन कोणी दुषित, प्रदूषित करण्याचे काम करु नका, अशा प्रकारची विनंती मला या प्रसंगी करावीशी वाटते.

सभापती महोदय, शेकडो वर्षानंतर राज्यघटनेच्या स्थाने पहिल्यांदा कायद्याचे राज्य या देशात निर्माण झाले. एक थोर विचारवंत अनुजकुमार गुप्ता हे काय म्हणाले. ते असे म्हणाले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

की, "हजारों साल के बाद देश में पहिला चमत्कार ऐसा हुआ की इस देश में कानुन का राज पैदा हुआ, संविधान के व्दारा कानुन का राज पैदा हुआ." तोपर्यंत काय होते. तुम्ही चार मजल्याच्या बिल्डिंगी सांगितल्या. एका मजल्यावरुन दुसऱ्या, दुस-यावरुन तिस-या, तिसऱ्यावरुन चौथ्या मजल्यावर जाण्याची शिडीच नाही. हे सांगायला तुम्ही विचारलात. शिडी नसलेली बिल्डिंग तयार केली. ज्यांनी, ज्या माळ्यात पैदा व्हायचे त्यांनी त्याच माळ्यात मरायचे. वर जायची काही सोय नाही, खाली यायची काही सोय नाही. जर वरच्या मजल्यावर बदमाश गेले त्यांना खाली ढकलण्याची सोय नाही आणि खाली चांगले असले तरी त्यांना वर जाण्याची सोय नाही, अशा प्रकारची बिल्डिंग दुर्दैवाने या देशात तयार झाली. ही बिल्डिंग बाबासाहेबांनी उद्ध्वस्त करुन टाकली. चार मजली बिल्डिंग उभी नव्हती तर आडवी होती. ती उद्ध्वस्त करुन या देशामध्ये समता, बंधुत्व, न्याय, माणुसकी आणि समतेचे राज्य निर्माण करण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्यघटनेने केले. या देशातील शेवटचा माणूस जीवंत असेपर्यंत बाबासाहेबांच्या उपकाराला तो कधी विसरु शकणार नाही.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांना आणखी किती वेळ लागणार आहे ?

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, एक दोन मिनिटात मी माझे भाषण संपविणार आहे.

सभापती महोदय, आपल्या देशामध्ये संविधानाच्या माध्यमातून राजकीय समानता आली. पण आर्थिक आणि सामाजिक समानता कोठे आली, हे आपण मला सांगावे. "One Man, One Vote, One Value', 'एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य', असे आपण सांगितले. टाटा, बिर्ला, अंबानी यांनाही एकच मत आणि माझ्यासारख्या फकीर माणसाला देखील एकच मत, ही राजकीय समानता आली. पण सामाजिक समानतेचे काय, आर्थिक समानतेचे काय ? हा धोका राज्यघटना प्रदान करताना बाबासाहेबांनी देशाला सांगितला होता. "आता आम्ही नवीन युगात प्रवेश करीत आहोत, कॉंट्रॅडिक्शनमध्ये प्रवेश करीत आहोत, राजकीय समानता राज्यघटनेमुळे आली, लोकशाही निर्माण झाली, पण जर या देशामध्ये सामाजिक आणि आर्थिक समानता निर्माण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

झाली नाही तर या देशाची जनता तुमची लोकशाही उद्ध्वस्त केल्याशिवाय राहणार नाही." हाही इशारा दिला होता ना बाबासाहेबांनी. हा इशारा सत्ताधारी मंडळींनी लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा", हा नारा डॉ.बाबासाहेबांनी फक्त महारा, मांगांनाच दिला नव्हता तर या देशातील सर्व लोकांना त्यांनी शिकायला सांगितले, संघटित व्हायला सांगितले आणि आपल्या अधिकारासाठी संघर्ष करायला सांगितला. शिक्षणाचा हा नारा त्यांनी दिला.

सभापती महोदय, गांधीजींना आपण राष्ट्रपिता मानतो. आमच्या देशाचे ते बापू आहेत. गांधीजी आमचे राष्ट्रपिता आहेत. पण या देशाच्या लोकशाहीचे पितामह, पिताश्री कोण असतील तर ते परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. गांधीजी राष्ट्रपिता आहेत आणि या देशाच्या लोकशाहीचे पिताश्री कोणी असतील तर ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत, हे मला या ठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, मध्यंतरी मी लोकसभेत होतो. त्यावेळी 'संविधानाची समिक्षा', असा एक नॅशनल अजेंडा आला होता. मला मोठे आश्चर्य वाटले. संविधानाची समिक्षा म्हणजे लेकाने बापाची समिक्षा करायची आणि तुच माझा बाप आहेस की नाही, हे ठरवायचे. अशा प्रकारची भावना आमच्या देशात निर्माण झाली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

तेव्हा मी लोकसभेचा सदस्य होतो. संविधानाच्या समीक्षेचे निमित्त करुन या देशाचे संविधान हटवून दुसरे कोणते तरी आणावयाचे, पुन्हा तीच 4 मजली व्यवस्था देशात निर्माण करण्याचे कारस्थान देशात सुरु झाले. त्यावेळी मी लोकसभेत म्हटले होते की, मायबाप सरकार, तुम्ही देशातील सर्व धरतीला हात लावा, सर्व दौलतीला हात लावा, पाहिजे त्या वस्तूला हात लावा. परंतु, राज्य घटना हटविण्यासाठी जे हात पुढे येतील ते हात देशातील जनता छाटून टाकल्याशिवाय राहणार नाही. लोकसभेत मी हेच सांगितले होते हे देखील मला या ठिकाणी आवर्जून सांगावेसे वाटते. राज्य घटनेत गरजेप्रमाणे लवचिकता आहे. परंतु, उद्देशिका हा प्राण आहे. त्याला हात न लावता तुम्हाला जो काही बदल करावयाचा आहे तो करावा. माणसाचे शरीर जसे आहे ते तसेच ठेवावे. तुम्हाला त्याचे कपडे बदलायचे तर ते बदलावेत, तुम्ही कपडे बदलू शकता. परंतु, तुम्ही शरीर कसे बदलणार, प्राण कसा बदलणार, ज्याला आपण आत्मा म्हणतो तो तुम्ही कसा बदलणार आहात ?

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण सर्वांनी कृपया वेळेची मर्यादा पाळावी.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. मी माझ्या भाषणाचा शेवट करतो.

सभापती महोदय, दादर टर्मिनसला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे, राजगृहाचे राष्ट्रीय स्मारक करावे, पटवर्धन मैदानावर शताब्दी भवन उभारण्यात यावे, श्याम हॉटेल जेथे डॉ.बाबासाहेबांनी धम्मक्रांती केली होती तेथे धम्मक्रांती स्मारक केंद्र उभारण्यात यावे, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, देशातील अनेक लोक डॉ.बाबासाहेबांना वेगवेगळ्या नावांनी ओळखतात. त्यांना कोणी सूर्य म्हणतो, कोणी महासूर्य म्हणतो, कोणी प्रज्ञा सूर्य म्हणतो तर कोणी क्रांती सूर्य म्हणतो. एक कवी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना काय म्हणतो ? डॉ.बाबासाहेब आंबेडकर नावाच्या सूर्याने एकदा आकाशातील सूर्याला सांगितले की, "हे सूर्या तू तेथील सूर्य आहेस, मी येथील सूर्य आहे. आपण ठरवू या, परिवर्तनासाठी करार करु या. तू ताऱ्यांना प्रकाशमान कर, मी साऱ्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

प्रकाशित करीन. मी या देशातील 125 कोटी लोकांच्या घरात, मनात, दारात, समतेचा, ममतेचा, बंधुत्वाचा, न्यायाचा, राष्ट्रवादाचा, राष्ट्रीयतेचा, एकात्मतेचा, एकसंघतेचा प्रकाश पोहोचविण्याचे काम करीन," असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कर्तृत्व होते.

सभापती महोदय, मी माझ्या वतीने त्यांना अभिवादन करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द संपवितो.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 125 व्या जयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या विधान परिषदेत त्यांना आदरांजली वाहण्यासाठी, अभिवादन करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. मी सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना अभिवादन करतो. 26 नोव्हेंबर रोजी पार्लमेंटचे दोन दिवसाचे विशेष अधिवेशन बोलावून देशातील नामवंत नेत्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले. देशाची राज्य घटना आपल्याला प्रमाणभूत आहे. राज्य घटनाकारांना राज्याच्या संसदीय सभागृहांनी अभिवादन केले पाहिजे या हेतूने ज्यांनी हा प्रस्ताव मांडला त्यांचे मी मनापासून आभार मानतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला राज्य घटना दिली. त्यांचे योगदान अनन्यसाधारण असे आहे. त्यांनी दिलेल्या राज्य घटनेमुळे देशात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तन झालेले आहे. त्या परिवर्तनाचा विचार केल्यानंतर आपल्या असे लक्षात येते की, या देशात ज्याला आपण नेहमी एक फ्रेज मानतो की, Maker of Modern India. या देशाला घडविणारे कोण आहेत ? जे कोणी आहेत, त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर निश्चितच अग्रभागी आहेत, हे आपण प्रथम कबूल केले पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्य घटना लिहिली आहे. आपण त्याचे संपूर्ण श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना देतो. परंतु, आपल्याला कल्पना आहे की, या देशाची एक कॉन्स्टिटयुअंट असेंबली होती. ब्रिटीश काळातील प्रोवेंशियल गर्व्हमेंटमधून निवडून गेलेले, आमदारांनी निवडून दिलेले प्रतिनिधी राज्य घटनेचे सदस्य होते. अशा या संसदीय संविधान सभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा प्रवेश कसा झाला हा देखील अतिशय रोमांचित करणारा इतिहास आहे. त्या इतिहासामध्ये मी जाणार नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा विद्यार्थी दशेपासून जो अभ्यास आहे त्याकडे पाहिल्यानंतर आपण जर त्याबद्दल विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला तर मला असे वाटते की, त्यांच्या अभ्यासाची आपणा सर्वांना कल्पना आहे की, कोणताही विद्यार्थी एम.ए. व्हायचे असेल, पी.एचडी. करावयाची असेल तर त्या विषयाचा जास्तीत जास्त ॲकॅडमिक अभ्यास करतो. तो त्या विषयाचा अभ्यास करून परीक्षा देतो आणि उत्तीर्ण होतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एम.ए., पी.एचडी., बी.एस्सी., बार-ॲट-लॉ वगैरे डिग्री घेतली. परंतु, अलीकडच्या काळात विद्यार्थ्यांनी शेवटच्या दोन-तीन महिन्यात अभ्यास केला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड.....

की त्यांना डिग्री मिळते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंग्लंड येथील लायब्ररीमध्ये, कोलंबीयाच्या लायब्ररीमध्ये 18-18 तास किंवा लायब्ररी सुरु झाल्यानंतर ती बंद होईपर्यंत अभ्यास करीत असत. मी असा विचार केला की, ते एवढा काय अभ्यास करीत होते ? त्यांना त्या परीक्षा अवघड वाटत होत्या काय ? मला असे वाटते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर ॲकॅडेमिकली अभ्यास करताना त्या विषयाशी निगडित असलेल्या ज्ञानशाखेचा प्रचंड अभ्यास करीत होते. ते एकाच वेळी दोन-तीन डिग्री घेऊ शकतील एवढा ते अभ्यास करीत होते. त्यांच्याकडे एम.ए., पी.एचडी., बी.एस्सी., बार-ॲट-लॉ पासून अर्थशास्त्रापर्यंत डिग्री होती. त्यावेळी ब्रिटनमध्ये राहून ब्रिटनच्याच विद्यापीठात अभ्यास करताना भारतातील अर्थव्यवस्थेचे विश्लेषण त्यांच्या थेसिसमध्ये आहे. प्रॉब्लेम ऑफ रुपीज असो किंवा त्यांनी डिव्हिडंटचे एक वेगळे ॲनॅलेसिस केलेले आहे. त्यामध्ये ते ब्रिटीश सरकारवर प्रचंड टिका करीत असत. तुम्ही आमच्या देशावर एवढी वर्षे राज्य केले, परंतु तुम्ही आमच्या देशाची अर्थव्यवस्था मातीत घालविली आहे, अशी टिका ते करीत असत. मला त्यावेळी प्रश्न पडतो की, हा विद्यार्थी कसा आहे ? ते ब्रिटनमध्ये अभ्यास करतात आणि भारतावर ज्या ब्रिटीशांचे राज्य आहे त्या ब्रिटीशांवर आपल्या थेसिसमध्ये घणाघाती टिका करतात. आपण ब्रिटीशांवर टिका केली तरी आपण ती डिग्री घेऊ शकतो याचा त्यांना कॉन्फीडन्स होता, हे यावरुन आपल्या लक्षात येते. आपण त्या तपशीलात जावे. त्यांनी ब्रिटीश व्यवस्थेवर टिका केलेली आहे. एवढेच नाही तर सन 1930 मधील राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर गोरगरीबांचे, दलितांचे पुढारी म्हणून तेथे गेले होते. ब्रिटीश पंतप्रधानांनी भारतीयांना तेथे पाचारण केले होते. आगामी काळात आम्ही तुमच्या देशाला स्वातंत्र्य देणार आहोत, स्वतंत्र देशाची राज्य घटना कशी असेल, असे त्यांनी विचारले. त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी काय केले ? डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्यावेळी बोलायला लागले त्यावेळी त्यांनी ब्रिटीश पंतप्रधांनाना विचारले की, तुम्ही 150 वर्षे आमच्या देशावर राज्य करीत आहात. परंतु, आमच्या भारत देशात अजून एवढी भयानक अस्पृश्ता आहे की त्या अस्पृश लोकांना सार्वजनिक ठिकाणी पाणी देखील भरता येत नाही.

..2J-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड...

1930 मध्ये काळाराम मंदिराचा सत्याग्रह सुरु होता. त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना शेकडो लोकांना तारेने संदेश व वर्तमानपत्रे पाठविली होती. राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये ती त्यांनी मांडली होती, त्यांनी ब्रिटीश पंतप्रधान यांना सांगितले की, पाहा अजूनही आम्हाला मंदिर प्रवेश मिळू शकत नाही. तेव्हा बाबासाहेब यांनी अशी मागणी केली होती की, तुम्ही 150 वर्षे राज्य करुन आमच्या भारतातील अस्पृश्यांना पाणी भरण्याचा हक्क व मानवी हक्क देत नसाल तर तुम्ही भारतावर राज्य करण्याची गरज नाही. तुम्ही तेथून चालते व्हा, पहिल्यांदा स्वातंत्र्याची मागणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये केली होती.

माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते हा प्रश्न कोणी लक्षात घेत नाही. राऊंड टेबल कॉन्फरन्सचे डिटेल आपण वाचण्याचा प्रयत्न करावा. 1930 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये स्वातंत्र्याची मागणी केल्याबरोबर देशातील लोकांना प्रचंड आनंद झाला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर या वीर माणसाने ब्रिटीश पंतप्रधानांच्या तोंडावर जाऊन सांगितले की, तुम्ही चालते व्हा, आम्हाला स्वातंत्र्य द्या, आम्ही आमचे बघून घेऊ. परंतु काही लोकांना थोडासा राग आला होता, त्याचे कारण असे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्याच राऊंड टेबल कॉन्फरन्समध्ये दलित व अस्पृश्य लोकांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याची मागणी केली होती व ब्रिटीश पंतप्रधानांनी ती मान्य केली होती. त्यानंतर असा इतिहास घडत गेला. एकीकडे स्वातंत्र्याची मागणी केली म्हणून त्यांचे कौतुक केले व दुसरीकडे काँग्रेसच्या लोकांना राग आला होता. डॉ.बाबासाहेबांनी अशी मागणी केल्याच्या विरोधात गांधीची उपोषणाला बसले होते व त्यापुढील इतिहास आपणाला माहीत आहे, त्यामधून पुणे करार पुढे आला. डॉ.बाबासाहेबांनी त्या ठिकाणी देखील देशाचा विचार केला, पुणे कराराच्या निमित्ताने गांधीजी उपोषणाला बसले व आपला जीव धोक्यात घालून ते मागणी करीत होते की, बाबासाहेब तुम्ही आमच्यापासून वेगळे होऊ नका. कारण समाजाचे विभाजन होईल. त्यानंतर बाबासाहेबांनी मेनस्ट्रीममध्ये राहण्यास मान्यता दिली. अनेक लोक त्याबाबत देखील टीका करतात, विशेषकरुन आमच्या आंबेडकरी चळवळीमध्ये बोलत असताना अमक्यानी व तमक्यानी फसविले, गांधीजींनी फसविले मला स्वत:ला असे वाटते, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पुणे कराराच्या निमित्ताने निर्णय घेतला व राखीव जागांचा प्रश्न त्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड...

लावून धरला होता. तो मिळाला म्हणून देशाच्या मेनस्ट्रीममध्ये राहण्याचा निर्णय घेतला तो देखील ऐतिहासिक होता. नंतरच्या कालखंडात आपण पाहिले आहे, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी सांगितले की, ते घटना समितीमध्ये गेले, परंतु काँग्रेसवाल्यांना राग होता, इतर विद्वानांना त्यांनी निवडून दिले होते, बाबासाहेबांना मुंबई इलाख्यातून निवडून जाता येत नव्हते म्हणून ते पश्चिम बंगालमध्ये गेले. तेथे जोगेंद्रनाथ मंडल नावाचे सद्गृहस्थ शेड्युलकास्टचे आमदार होते. त्यांनी काही आमदारांना कन्व्हीन्स केले, विशेषत: काँग्रेसमधील मुस्लिम आमदार व शेड्युलकास्टचे आमदारांनी बाबासाहेबांना निवडून पाठविले. डॉ.बाबासाहेब निवडून गेल्यावर पहिली सभा ऑब्जेकटिव्ह रेझ्युलेशनवर झाली होती. हे सांगण्याचे कारण असे की, ऑब्जेकटिव्ह रेझ्युलेशन पंडित जवाहरलाल नेहरु यांनी 9 डिसेंबर रोजी मांडले होते. अशा प्रकारची घटना करायची आहे, त्यावर अचानकपणे बाबासाहेब आंबेडकर यांना बोलावयास सांगितले होते. तेव्हा बाबासाहेब आंबेडकर यांनी पहिले भाषण कॉन्स्टिट्युअंट असेंब्लीमध्ये केले.. ते भाषण अतिशय महत्वाचे आहे, त्याची प्रत आपणाकडे आलेली आहे, ते भाषण आपण निश्चितपणे वाचावे. पंडित जवाहरलाल नेहरु हे अतिशय प्रभावी वक्ते होते, प्रचंड मुत्सद्दी होते, काँग्रेसमधील मोठे नेते होते, परंतु नेहरु यांच्यावर टीका न करता अतिशय सुक्ष्मपणे त्यांनी नेहरुंना विचारले की, तुम्ही हे ऑब्जेक्टिव्ह रेझ्युलेशन मांडले आहे. यामध्ये फ्रेन्च राज्यक्रांतीचा विषय असायला पाहिजे. फ्रेन्च राज्यक्रांतीने जागातील लोकशाही देशांना एक संदेश दिला. एवढेच नाही तर फंडामेटल राईटच्या संदर्भात चार्टर मिळाले त्या फ्रेन्च राज्यक्रांतीचा आपल्या ऑब्जेक्टिव्ह रेझ्युलेशनमध्ये समावेश होण्याची गरज होती. या पलिकडे जाऊन ते म्हणाले की, आपणाला या निमित्ताने राज्य घटना निर्माण करताना एक संधी प्राप्त झाली आहे, आपण या देशाची सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पुनर्रचना करु शकतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा राज्यघटना निर्मिती करण्यामागील हेतू अतिशय क्रांतीकारक स्वरुपाचा होता. त्यांना या समाजाची पुनर्रचना करायची होती. या देशातील संपूर्ण अर्थव्यवस्थेची व राजकीय पुनर्रचना करावयाची होती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड...

अशा प्रकारचे विचार त्यांनी मांडले होते. त्यावेळच्या प्रश्नांबाबत बोलत असताना ते म्हणाले की, मला कल्पना आहे, राज्यघटना निर्माण करीत असताना माझ्यापुढे असा प्रश्न आहे की, आपल्या देशात प्रचंड विषमता आहे, प्रचंड जातींचा समाज आहे, वेगवेगळे धर्म व वेगवेगळ्या विचारांचे लोक आहेत, या सर्व लोकांचे एकमत कसे करायचे. अतिशय गंभीरपणे त्यांनी याबाबींचा विचार केला. डॉ.बाबासाहेब यांच्यापुढे त्यावेळी जी आव्हाने होती, त्यापैकी हे एक आव्हान होते. प्रतिनिधी वेगवेगळ्या विचारसरणीचे आहेत, वेगवेगळ्या आयडॉलॉजीस्ट, वेगवेगळ्या पक्षाचे, वेगवेगळे धर्म, जाती व त्यामध्ये प्रचंड तणाव असलेले, अशा सर्व लोकांमध्ये आपल्याला हवे ते कसे करायचे. तरी देखील ते सांगतात की, आपणाकडे वेगवेगळे धर्म, जाती व पक्ष असले तरी तुम्हाला मी आवाहन करु इच्छितो की, आपण एकसंध भारत निर्माण केला पाहिजे. त्यावर बाबासाहेबांना प्रचंड अपलॉज मिळाला. बाबासाहेब तेव्हा घटनाकार नव्हते ते त्यांचे पहिले भाषण होते. त्यावेळी ते म्हणाले की, आपणाला एकसंध भारत निर्माण करण्यासाठी धर्म, जाती, पंथ व आपले विचार बाजूला ठेवले पाहिजेत. अशा प्रकारचा अतिशय जाज्ज्वल विचार त्यांचा होता. ते असे म्हणाले की, आपले विचार भिन्न असताना देखील आपणामध्ये एकसंमती कशी घडवायची व सर्वांना एकत्र कसे करावयाचे हा मोठा प्रश्न आहे. पहिल्या भाषणात ते असे म्हणतात की, आपण मतभेद बाजूला केले पाहिजे, इगो, विचार जास्त ताणून धरु नका ते पुढे असे म्हणतात की, "When deciding the destinies of nations, dignities of people, dignities of leaders and dignities of parties ought to count for nothing. The destiny of the country ought to count for everything." फक्त देश हा महत्वाचा आहे, हे मी या ठिकाणी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे, ते घटनाकार तर होतेच पण त्याही पलिकडे अतिशय उच्च प्रतीचे देशभक्त होते, मी जाता जाता असे सांगू इच्छितो की, त्यांनी दिलेल्या या राज्यघटनेमुळेच देशात सामाजिक, आर्थिक परिवर्तन झाले. एकेकाळी अस्पृश्यता काय होती हे आपणा सर्वांना माहिती आहे. 40 ते 45 वर्षापूर्वी माणसे स्पर्श करीत नव्हती, पाणवठे खुले नव्हते, एकत्र पंक्ती नव्हत्या, मंदिर प्रवेश नव्हता, आता सर्व बदलत आहे, या बदलाचे कारण म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची राज्यघटना आहे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड...

आपल्या देशात शांततामय क्रांती चालू आहे, कोणी चळवळी करो, भाषण करो, त्यांने काही फरक पडत नाही, त्याची गरज देखील नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळे या देशात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तन आणण्याचा प्रयत्न होत आहे..

सभापती महोदय, 1952 मधील लोकसभा किंवा त्या दरम्यानच्या विधानसभा पहा. त्यानंतर झालेल्या सर्व लोकसभा व विधानसभेच्या निवडणुका पहा. आपल्या देशात हळूहळू सत्तांतर व बदल होत आहेत, सत्तेपासून वंचित असलेला समाज हळूहळू सत्तेत येत आहे, आज धनगर समाज देखील आरक्षण मागत आहे, त्या समाजाला देखील जाग आली आहे. 1989 मध्ये ओबीसी समाजाला आरक्षण दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटना तयार करताना सांगितले होते की, ओबीसींना देखील आरक्षण दिले पाहिजे. परंतु त्यावेळी सरदार वल्लभभाई पटेल यांनी मान्य केले नाही. Everybody is equal before the Law. आता काय आपण सर्व समान आहोत त्यांना देण्याची गरज नाही. मी नाव घेतो कृपया... हा इतिहास आहे. तो प्रत्यक्ष लेखी त्यांच्या भाषणात आहे. म्हणून मी हे बोललो. या देशात बदल होत आहेत, एकेकाळी अस्पृश्य असलेले लोक मान सन्मानाने व ताठ मानेने जातात, त्याचे कारण राज्यघटना आहे, राज्यघटना निर्मिती करताना जे डिबेट झाले ते देखील अतिशय क्रांतीकारक होते. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांना मी काही डिबेट दाखविणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेची कलमे फायनल करीत असताना संविधान सभेत त्यांचे अस्तित्व कसे होते, अतिशय ऑथॉरिटी, प्रचंड अभ्यास करणारी ही व्यक्ती होती. कोणतेही कलम झाल्यावर त्यावर प्रचंड दुरुस्त्या येत होत्या, टीका होत होती. ते एकूण घेऊन शेवटचे उत्तर देत होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड.....

आलेली दुरुस्ती नाकारायचे. त्यांना म्हणाले की, आम्ही दुरुस्ती मांडण्याचा प्रयत्न करतो, परंतु ते ऐकून न घेता ती दुरुस्ती नाकारतात. असे झाले तर कसे होईल? तेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, तुमच्या दुरुस्तीमध्ये लॉ पॉईंट असेल, निश्चितपणे गाभ्याचा विषय असेल तर विचार करण्यात येईल. तो नसेल तर त्या दुरुस्त्या स्वीकारता येणार नाहीत. अशा वेगवेगळ्या प्रकारच्या चर्चा आहेत. अनेक विषयावरील चर्चा आहेत. त्या पाहता हेच सांगू इच्छितो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ही राज्य घटना लिहिताना प्रचंड कष्ट केले. त्या काळातील संविधान सभेत ते मांडले गेले. टी.टी.के.कृष्णम्माचारी यांनी मसुदा दिला. मसुद्यावर भाषणे झाली त्यावेळेला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर स्तुतिसुमनांचा वर्षाव झाला. काय काय भाषणे होती? डॉ.बाबासाहेब आंबेडकर तुम्ही बुध्दीचा कोणता रोलर वापरला, ज्यामुळे आम्हाला चिडीचूप केले आणि सर्व कलमे पास करुन अतिशय सुंदर घटना तयार केली. You have done a Herculean job. तुमची ही राज्य घटना म्हणजे एक प्रकारचे मोन्यूमेंट आहे, एक शिल्प आहे. निश्चित ज्याकडे पहात रहावे अशी ऐतिहासिक वास्तू आहे. हा ऐतिहासिक दस्तऐवज आहे अशा प्रकारची वर्णने केली आहेत. पण टी.टी.के.कृष्णम्माचारी म्हणाले की, घटना समितीच्या ड्राफ्टिंग समितीमध्ये 7 सदस्य होते. घटना समितीतील 7 पैकी एक सदस्य मृत्यू पावले, ती जागा भरली नाही. एका सदस्यांने राजीनामा दिला, ती जागा भरली नाही. दोन सदस्य अमेरिकेत होते, ते आले नाहीत, त्यांच्या जागा भरल्या नाहीत. दोन राज्याच्या निवडणुकीच्या कार्यक्रमात राजकारणात व्यस्त होते, ते देखील आले नाहीत. एकट्या बाबासाहेब आंबेडकरांनी हे काम केले. म्हणून आपण सतत त्यांचे नाव घेतो. बाबासाहेब आंबेडकरांनी शेवटचे भाषण करताना संपूर्ण घटना समितीची वारेमाप स्तुती करुन सांगितले की, तुमच्यामुळेच घटना निर्माण झाली. काँग्रेसचे देखील त्यांनी त्यावेळेला आभार मानले. तुम्ही जर सपोर्ट दिला नसता तर मी ही राज्य घटना करु शकलो नसतो. शेवटच्या कलमाबाबत मी सांगू इच्छितो. या देशाचे नाव कोणी ठेवले, या देशाला भारत हे नाव कोणी दिले? कलम 1 वर चर्चा चालू होती. देशाचे नाव अमेरिका आणि इंग्लंडच्या बेसवर युनियन ऑफ इंडिया असे ठेवायचा प्रस्ताव काही दिवस ठेवला होता. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, घटना पूर्ण होईल त्यावेळी आपण हे कलम पूर्ण करु एका कलमावर शेवटी बाबासाहेब उठले आणि त्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड.....

दुरुस्ती दिली. या देशाचे नाव त्यावेळेला एच.व्ही.कामत यांनी युनायटेड स्टेटस ऑफ इंडिया असे सुचविले होते. त्यामध्ये पुन्हा बदल करुन बाबासाहेब आंबेडकरांनी सूचना दिली की, "India, i.e. Bharat, shall be the Union of India." म्हणजे या देशाचे नाव भारत असेल, तोपर्यंत कोणाच्याही डोक्यात भारत हे नाव नव्हते. हिंदुस्थान वगैरे नावे होती. या देशाचे नाव भारत हे ठेवण्यामागे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दुरुस्ती सुचविली आणि त्यांनीच हे नाव ठेवले. आमच्याकडे आंबेडकर चळवळीतील लोक म्हणतात की, गल्लीबोळाला, रस्त्याला, इमारतीला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्या अशी सूचना करतात तेव्हा मी त्यांना हेच सांगतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देऊन छोटे काम करीत आहात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला भारत नाव दिले, तो किती मोठा माणूस होता.

सभापती महोदय, मधल्या काळात खूप चर्चा झाली. त्यामध्ये आपल्या देशाच्या प्रिॲम्बलवर चर्चा होत असताना सेक्युलरिझम शब्द काढून टाका अशी भूमिका घेण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराच्या पहिल्या कलमावर चर्चा होत असताना के.टी.शहा यांनी मागणी केली होती की, सेक्युलरिझम आणि सोशॅलिझम हे दोन शब्द टाकावेत. त्याला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नकार दिला. कारण त्यावेळी काम चालू होते. बाबासाहेब म्हणाले की, या राज्य घटनेमध्ये अशा काही तरतुदी आहेत, ज्यात सेक्युलरिझमचा अंतर्भाव आहे, सोशॅलिझमचा देखील अंतर्भाव आहे. म्हणून वेगळे लिहिण्याची गरज नाही. तरी देखील मधल्या काळात सेक्युलरिझमच्या संदर्भात काही लोकांनी ऑब्जेक्शन घेतले. खरे म्हणजे आपला भारत सेक्युलर स्टेट आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मरण करायचे असेल तर आपण या देशामध्ये सेक्युलरिझम टिकेल यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, आपल्या देशात अनेक जाती, अनेक पंथ, अनेक धर्म असलेले लोक आहेत. एका धर्माचा आपण विचार करावयास लागलो तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची राज्य घटना आपल्याला मान्य नाही असा अर्थ होतो. म्हणून या देशात सेक्युलरिझम जोपर्यंत टिकेल तोपर्यंत या देशातील लोकशाही टिकणार आहे. सेक्युलरीझम आपल्या राज्य घटनेत आहे. तिचा जास्तीत जास्त परिपोष केला पाहिजे. निश्चितच धर्माचे अवडंबर केले जाते. अंतर्मुख होऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना राज्य घटनेमध्ये जे अभिप्रेत होते ते कुठपर्यंत आले याचा विचार केला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) KK.3

SGB/ ST/ 18:30

ॲड.जयदेव गायकवाड.....

पाहिजे. प्रिॲम्बलचा विचार करताना प्रास्ताविकामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की,

> "WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a SOVEREIGN SOCIALIST SECULAR DEMOCRATIC REPUBLIC and to secure to all its citizens:..."

असे जेव्हा म्हणतात त्यावेळेला आपले सेक्युलरलीझम योग्य दिशेने चालू आहे की नाही, त्याचा परिपोष होतो की नाही याचा विचार केला पाहिजे. देशामध्ये समतेवर आधारित समाज, आर्थिक समतेवर आधारित समाज असला पाहिजे.

सभापती महोदय, पहिल्या भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की, या देशामध्ये आर्थिक समानता झाली पाहिजे असे सांगितले. ती क्रांती देखील झाली पाहिजे. ती निर्माण होते की नाही? या देशामध्ये एकीकडे दारिद्र्य आहे आणि जगता येत नाही म्हणून माणसे आत्महत्या करतात ही या देशातील लोकशाहीला शोभणारी गोष्ट नाही. देशाच्या लोकशाहीमध्ये सरकारची जबाबदारी आहे, लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे. आमच्या अवतीभोवती माणसे जगता येत नाही म्हणून आत्महत्या करत असतील तर ते भयानक आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घ्यायला आपण लायक नाही. त्यांनी आम्हाला सांगितले आहे, ही लोकांची लोकशाही आहे, लोकांनी ठरविलेली आहे. लोकांच्या साठी आहे. या देशातील माणसे लोकशाहीच्या केंद्रस्थानी आहेत. तो शेतकरी असेल, दलित असेल, त्याच्यावर अत्याचार होतील, अन्याय होत असतील ते लोकशाहीला भूषणावह नाही. आपण या लोकशाहीचा विकास करावयाचा असेल तर राज्य घटनेमध्ये जे संकल्पित केले आहे, जी स्वप्न पाहिली आहेत ती साकार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तरच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना ख-या अर्थाने अभिवादन केल्यासारखे होईल. मी माझ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांच्या विचारांना अभिवादन करतो आणि थांबतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, पंडितजी नेहरु या देशाच्या पहिल्या मंत्रिमंडळाची यादी घेऊन महात्मा गांधीजींकडे गेले होते त्या यादीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव नव्हते. गांधीजीं नेहरुंना एवढेच म्हणाले की, यादीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव कसे नाही. पुढे मंत्रिमंडळामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा समावेश झाला. पुढे संविधान सभेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर आले आणि मसुदा समितीचे अध्यक्षही बनले. गांधीजींचे वर्णन या देशाचे राष्ट्रपिता म्हणून केले जाते. पण या देशाचे भाग्यविधाते म्हणून पुढील अनेक पिढयांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घ्यावे लागेल. त्यांनी सगळ्यात मोठी देणगी या देशाला दिली असेल तर ती संविधान आहे. हा देश आजही टिकून आहे तो केवळ या संविधानामुळे टिकून आहे. हे संविधान या देशातील लोकांनी स्वतःला अर्पण केले आहे. हे सगळयात मोठे यश डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आहे.

सभापती महोदय, जगात अनेक संविधान आहेत, अनेक प्रार्थना आहेत त्या ईश्वरास उद्देशून आहेत किंवा ईश्वराला अर्पण केलेल्या आहेत. परंतु भारताचे संविधान लोकांनी लोकांना अर्पण केलेले आहे. या देशात 2500 वर्षापूर्वी चंद्रगुप्त आणि अशोकाचे राज्य त्यावेळच्या संविधानावर चालत होते, अर्थशास्त्रावर चालत होते. ते अर्थशास्त्र सुध्दा ईश्वरास अर्पण केलेले नव्हते. चाणक्यानी त्याची सुरुवात चार्वाक आणि शुक्राचार्य अर्पण करुन केली होती. पण डॉ.बाबासाहेब आंबेडकर दोन हजार वर्ष पलीकडे जातात आणि या देशाला इतकी ताकद देऊन जातात की, 70 वर्षानंतरही अनेक आक्रमणे होऊन देखील, देशात अनेक यादव्या होऊन देखील हा देश एकसंघ राहिला, तो केवळ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामध्ये या देशातून वेगळे होण्याची कोणतीही तरतूद नाही. हा राज्यसंघ आहे. त्यामुळे या राज्यसंघात सामील झालेल्या राज्यांनी त्यांना वेगळे होण्याचा अधिकार असला पाहिजे असा विचार मांडला, तो डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्टपणे नाकारला आणि संसदेला सुध्दा मूळ गाभ्याला हात घालता येत नाही इतके मजबूत संविधान बनविले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी वेगळे होण्याच्या कल्पनेला मूळात यासाठी विरोध केला की, हा देश एकसंघ राहिला पाहिजे, या देशापेक्षा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इतर कोणतीही मोठी गोष्ट नाही असे बाबासाहेब वारंवार पहिल्या, दुसऱ्या आणि शेवटच्या भाषणात सांगत राहिले आहेत.

...2एल.1...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

म्हणून संविधानामध्ये रेफरन्डमला जागा नाही. काही दिवसांपूर्वी या राज्याचे महाअधिवक्ता रेफरन्डमची भाषा करीत होते. पण या संविधानामध्ये रेफरन्डमला जागा नाही. ती जागा का नाही हे आपण काश्मीरच्या प्रश्नापासून अनुभवले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची दृष्टी किती मोठी होती हे यावरून पुन्हा एकदा दिसून येते.

सभापती महोदय, आपले संविधान हे 26 नोव्हेंबर रोजी स्वीकारले गेले. त्यावेळच्या आपल्या भाषणात ते म्हणाले होते की, आज आम्ही राजकीय लोकशाहीमध्ये प्रवेश करीत असलो तरी या देशामध्ये सामाजिक आणि आर्थिक लोकशाही प्रस्थापित झालेली नाही. जो वर आर्थिक आणि सामाजिक लोकशाही प्रस्थापित होत नाही तो वर राजकीय लोकशाहीचा डोलारा टिकू शकणार नाही असा इशारा त्यांनी त्यावेळीच दिला होता. संविधानामध्ये धर्मनिरपेक्षता, लोकशाही, समाजवाद हे शब्द का आले, याबद्दल अलीकडच्या काळामध्ये केंद्रामध्ये चर्चा उपस्थित झाली होती. पण बाबासाहेबांनी संविधानाच्या सभेमध्ये जे पहिले भाषण केले त्या भाषणामध्येच समाजवादाचा उल्लेख जोरदारपणे केला होता. ते म्हणाले होते की, समाजवादी अर्थव्यवस्था असल्याशिवाय भविष्यातील कोणतेही सरकार देशात सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय प्रस्थापित करू शकणार नाही. ते शब्द त्यावेळच्या प्रीएम्बलमध्ये नसतील, परंतु, बाबासाहेबांच्या विचारात आणि त्यांच्या संविधानातील प्रत्येक तरतुदीत लोकशाही ठासून भरली होती, समाजवाद ठासून भरला होता. तितकची धर्मनिरपक्षेता देखील ठासून भरली होती. धर्मनिरपेक्षतेच्या संदर्भात धर्म निरपेक्षता की, पंथ निरपेक्षता असा वाद जाणीवपूर्वक पसरविला जातो. तसाच समता की, समरसता असा वाद जाणीवपूर्वक पसरविला जातो. बाबासाहेबांनी समरसता नाकारली आहे. त्यांनी समतेचा आग्रह धरलेला आहे. समरसतेमध्ये आपण आपले अस्तित्व मिटवून टाका आणि आमच्यात समरस व्हावे अशी दर्पोक्ती आहे. दुसऱ्याची ओळख मिटविण्याचा त्यामध्ये डाव असतो. परंतु, समतेमध्ये आपण अल्पसंख्याक असलो तरी समान अधिकार असतात. आपले मत वेगळे असले तरी ते मांडण्याचा अधिकार आहे. या देशाचा नागरीक म्हणून जितका अधिकार मला आहे तेवढाच अधिकार आपल्याला आहे. जेवढा अधिकार टाटा, बिर्ला यांना आहे तेवढाच अधिकार तेल्या-तांबोळ्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

आहे. शेवटच्या माणसाला देखील तेवढाच अधिकार आहे. त्यामुळेच बाबासाहेबांनी मतांचा अधिकार शेतसारा, कर भरणाऱ्यांना अधिक दिलेला नाही. जे कर भरू शकत नाही त्यांना कमी दिला असे केलेले नाही. त्यांनी सर्वांना एकाच पातळीवर आणलेले आहे. भारताचे संविधान ज्या दिवशी लागू झाले त्या दिवशी या देशातील हजारो वर्षापासून सुरू असलेली समाज व्यवस्था मोडित काढली. ही समाज व्यवस्था वर्ण व्यवस्थेवर आधारित होती. बाबासाहेबांनी एका संविधानाद्वारे किती चमत्कार केला ? या प्रचंड महाकाय देशाला प्रचंड अशी लोकशाही दिली. त्यावेळी सांगितले जात होते की, एवढ्या महाकाय देशात लोकशाही टिकूच शकत नाही. कारण येथे निरक्षरता आहे, जातीयवाद आहे. येथे धर्मवाद ठासून भरला आहे. असंख्य पंथ आहेत, प्रांत आहेत. त्या काळामध्ये 600संस्थाने होती. तेथे लोकशाही टिकू शकणार नाही असे सांगितले गेले होते. परंतु, भारताचे संविधान एवढे मजबूत आहे की, लोकशाहीवर अनेक आघात होऊन देखील ती मजबूतीने उभी आहे. तिला जरा सुद्धा धक्का पोहोचवता आलेला नाही. आणीबाणीच्या मधल्या काळात अधिकार काढून घेतले गेले. पण ज्यानी हे अधिकार काढून घेतले त्यांना त्यांची चूक उमगली आणि जनतेने याच संविधानाच्या आधारे त्यांना बदलवून पुन्हा एकदा लोकशाही प्रस्थापित केली. एवढे मोठे हे संविधान आहे.

सभापती महोदय, आज आम्ही संविधानावर चर्चा करीत आहोत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 125 व्या जयंती निमित्त आम्ही ही चर्चा करीत आहोत. तेव्हा संविधानाच्या सरनाम्यामध्ये, संविधानाच्या मूलभूत अधिकारामध्ये, संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये त्यांनी जे जे आग्रह धरले त्या आग्रहांच्या प्रती आपले राज्य त्या कसाला किती पर्यंत उतरले आहे हे पाहिले पाहिजे. त्या काळी देखील डॉ.बाबासाहेबांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा केली होती. आर्थिक दुरवस्थेमध्ये आपण प्रवेश केलेला असताना त्यावेळी त्यांनी रूपयासंबंधी चर्चा केली होती. एरिगेशनच्या प्रश्नासंबंधी या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा होते त्या काळात त्यांनी एरिगेशनचे मंत्री म्हणून मूलभूत मांडणी केली होती. बाबासाहेबांनी असा कोणताही प्रांत सोडला नाही. त्यामुळे बाबासाहेबांचा आरसा लावून, परिस लावून आज आपण कुठे आहोत हे तपासून पाहिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

पहिजे. मग आपल्याला कळू शकेल की, आजही महाराष्ट्र दारिद्र्यामध्ये का आहे, आजही महाराष्ट्र 17 टक्क्याच्यावर एरिगेशन का करू शकलेला नाही ? आजही महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर दुष्काळ का पडला आहे ? आजही महाराष्ट्रातील जनता आक्रंदन का करीत आहे ? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे आपल्याला द्यावी लागणार आहेत. या प्रश्नांची उत्तरे आपण देणार नसाल आणि केवळ बाबासाहेबांना अभिवादन करणार असाल तर ते योग्य नाही. केवळ 125 व्या जयंती निमित्त एखादी नोट काढणार असाल, तिकीट काढणार असाल, स्मारक उभे करणार असाल आणि दुसऱ्या बाजूला डॉ.बाबासाहेबांच्या उद्देशिकांना, तत्त्वांना तिलांजली देणार असाल तर ती बाबासाहेबांच्या विचारांशी प्रतारणा ठरेल. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक आपण उभारले नाही तरी चालेल. परंतु, बाबासाहेबांनी सांगितलेला विचार आपण पदोपदी जीवंत ठेवला पाहिजे, तरच या देशाच्या लोकशाहीला भवितव्य राहील. तुम्हा-आम्हाला भवितव्य राहील.

सभापती महोदय, बाबासाहेबांच्या विचारांना नख लावण्याचा अनेकदा प्रयत्न केला गेला. एका सरकारने मधल्या काळात आढावा समिती नेमली होती. त्या समितीमध्ये संविधानाचा आढावा घेतला पाहिजे अशी चर्चा केली गेली. अखेर लोकमताच्या रेट्या खाली आणि संविधान मजबूत असल्यामुळे ती आढावा समिती गुंडाळावी लागली. पुन्हा एकदा आता ती चर्चा सुरू होत आहे. अगदी अलीकडच्या काळात माननीय मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप केल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. या राज्याचे शिक्षण धोरण ठरवित असताना संविधानातील मूलभूत कल्पनांवर वार करण्याचा प्रयत्न त्या अहवालात करण्यात आला होता. ती बाब आम्ही मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. तेव्हा मुख्यमंत्र्यांनी एका क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी ते धोरण स्क्रॅप केले. मी मुख्यमंत्र्यांचे यासाठी आभार मानतो की, मुख्यमंत्री ज्यावेळी संविधानाची शपथ घेतात त्यावेळी त्यांच्यावर राज्याची नव्हे तर लोकशाहीची रक्षण करण्याची जबाबदारी असते. संविधानातील सर्व तरतुदींचे रक्षण करण्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांची असते. आज बाबासाहेबांची आठवण काढत असताना मी मुख्यमंत्र्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. या राज्याचे शिक्षण धोरण दुर्बलांना वंचित करणारे होते. ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

त्यांनी स्क्रॅप केले. या राज्यातील शिक्षण धोरण राज्यातील गोरगरीबांना न्याय देऊ शकत नाही म्हणून ते त्यांनी स्क्रॅप केले. आता त्यांना नवी ताकद देण्याचे धोरण आखावे लागेल. मुख्यमंत्र्यांनी एक चांगली गोष्ट केली. पण त्याच्या पलीकडे त्यांना जावे लागेल. त्यांनी एक चांगली चर्चा उपस्थित करून आम्हाला संधी दिल्याबद्दल त्यांचे आभारी आहोत, माननीय सभापतींचे, माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे आभारी आहोत. पण यापुढे बाबासाहेबांच्या विचारांशी प्रामाणिक राहण्याचा निर्णय आम्ही कसा करणार आहोत याचा देखील विचार केला पाहिजे. ज्या राज्यात खैरलांजी प्रकरण होऊन गेले त्या राज्यात पुन्हा खैरलांजी होणार नाही हे आपण सांगणार आहात काय ? या राज्यात एका बाजूला खाजगीकरणाचा, व्यापारीकरणाचा, कंत्राटीकरणाचा प्रयत्न सुरू असताना तो आपण थांबविणार आहोत काय ? बाबासाहेबांनी खाजगीकरणाला, व्यापारीकरणाला, कंत्राटीकरणाला विरोध केला होता. बाबासाहेब कायदा मंत्री होते, कामगार मंत्री होते, न्याय मंत्री होते. या देशातील सर्व कामगारांना त्यांनी मूलभूत अधिकार दिले. पेन्शनचा अधिकार दिला. किती दिवस व किती तास काम करायचे हे त्यांनी सांगितले. त्यांनीच आपल्याला कामाचे आठ तास ठरवून दिले. त्यापूर्वी कामगारांना 13 ते 14 तास काम करावे लागत होते. एवढे सारे या देशाला बाबासाहेबांनी दिलेले आहे. बाबासाहेबांनी काय दिले नाही ? त्यांना केवळ दलितांचे उद्धारक या दृष्टीनेच आपण पाहतो. संविधान सभेमध्ये बाबासाहेब म्हणाले की, किमान दलित समाजाला न्याय देण्याची माझी इच्छा पूर्ण होईल. परंतु, ज्यावेळी त्यांना मसुदा समितीचे अध्यक्ष केले त्यावेळी त्यांनी या देशाचे स्वरूप पालटून टाकले. परंपरेने चालत आलेल्या आपल्या देशाचे चित्र त्यांनी आरपार पालटून टाकले. त्यामुळे आज आपण 70 वर्षात हा देश कुठे गेला आहे हे पाहात आहोत. गांधीजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वातंत्र्य जरूर मिळविले असेल. परंतु, या देशाला सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीचे स्वातंत्र्य देण्याकरिता आवश्यक असणारे संविधान बाबासाहेबांनी दिले. त्यामुळे या संविधानाच्या प्रती आपण पुढे कसे जाणार आहोत याचा विचार केला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

सभापती महोदय, बाबासाहेब हे याच सदनाचे सदस्य होते. ही चर्चा करीत असताना आपण अभिमान बाळगला पाहिजे. या सभागृहात बाबासाहेबांनी भाषण केले आहे. ते म्हणाले होते की, "मी सर्वप्रथम भारतीय आहे आणि शेवटी ही भारतीय आहे". हे वाक्य देखील याच सभागृहातील आहे. त्या सभागृहात बाबासाहेबांच्या संविधानावर चर्चा करीत असताना माझ्या समोर बसणारे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील जे म्हणाले त्याची मी जाता जाता आठवण करून देतो. श्री.जयंत पाटील म्हणाले की, श्री.नारायण नागोजी पाटील हे माझे आजोबा होते. त्यांची बाबासाहेबांशी फार मैत्री होती. बाबासाहेब त्यांच्याकडे अनेकदा आले होते. संविधानासंबंधातील अनेक पाने त्यांनी त्या काळी तेथे लिहिली होती. मी श्री.जयंतभाई पाटील यांना म्हणालो की, तेथे स्मारक व्हायला पाहिजे. त्यांनी जाता जाता सांगितले की, ज्या घरात बाबासाहेब राहिले ते घर आम्ही राज्याला सुपूर्द करू आणि त्याचे संग्रहालय करण्याचा प्रयत्न करू. मी त्याचा आवर्जून उल्लेख करतो. त्यांना तातडीने एका बैठकीला जायचे होते म्हणून ते गेले आहेत. मी त्यांचा हा उल्लेख आता येथे केला नसता तर तो माझा अप्रामाणिकपा ठरला असता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक हे झालेच पाहिजे. ते भव्यदिव्य झाले पाहिजे यात शंका नाही. परंतु, महाराष्ट्र राज्य हे संविधानबरहुकूम चालेल पाहिजे. संविधानाच्या मुल्यांना जरा सुद्धा नख न लावता राज्यातील सर्व गोरगरीब जनतेला लोकशाही सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्याचा उपभोग घेतला येईल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.....

आणि यासाठी या राज्याला लागलेली कंत्राटीकरणाची कीड, या राज्याला लागलेली शिक्षणाच्या व्यापारीकरणाची कीड, या राज्याला लागलेल्या सर्व क्षेत्रात खाजगीकरणाची कीड, सर्व क्षेत्रात लागलेली उदारीकरणाची कीड, जी आज विषमता निर्माण करीत आहे. ती कीड संपवण्याचा आपण पण करणार की, नाही ? नाही तर आम्ही बाबासाहेबांचे स्मरण आम्ही जरुर करु, पण दुसऱ्या बाजूला राज्यात आर्थिक आणि सामाजिक विषमता वाढवणाऱ्या सगळया तरतुदी करीत राहू आणि त्यांना आपण बोलवत राहू तर मग मात्र आपण बाबासाहेबांना न्याय दिल्यासारखे होणार नाही. मला असे वाटते की, आपल्या सभागृहाने, माननीय मुख्यमंत्री किंवा आपण जो ठराव मांडू, जो निर्धार करु जसा निर्धार त्या काळात संविधानाची उद्देशिका डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिली त्यांची आठवण करतांना पुन्हा आपण ते करु त्यावेळेला किमान याचा विचार त्यात होईल अशी अपेक्षा मी व्यक्त करतो आणि येथेच थांबतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र, जय भिम.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 जयंतीचे औचित्य साधून डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संविधान या विषयावरील चर्चेत मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपला आभारी आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे महामानव होते, अतिविशाल मनाचे होते. त्यांच्या हृदयाची तुलना आज आपण अतिविशालतेशी करतो. त्यांना त्यांच्या आयुष्यात अन्याय सहन करावा लागला, अन्याय, अत्याचार, अपमान व छळ सहन करावा लागला होता. परंतु नैसर्गिक दृष्टया जो राग माणूस म्हणून समाजाच्या प्रती यावयास पाहिजे होता तो त्यांच्या वागण्यात, व्यवहारात, कृतीतून त्यांनी येऊ दिला नाही हे त्यांचे मोठेपण आहे. भारतीय राज्य घटनेत त्यांनी द्वेषाला, अन्यायाला, अत्याचाराला स्थान मिळू दिले नाही हे त्यांचे मोठेपण आहे. हे मोठेपण आणि विशाल मानसिकता स्वीकारताना आपण मात्र 1952 च्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मनाचा कोतेपणा दाखवला आणि अशा महामानवाला सर्वानुमते, एकमताने बिनविरोध लोकसभेत पाठविण्याचे पावन कृत्य करु शकलो नाही याचे दु:ख, वेदना व्यक्त केल्या शिवाय राहणे शक्य नाही. भारतीय राज्य घटनेच्या उद्देशिकामध्ये दिलेला प्रत्येक शब्द जर वाचला, शब्दामागील गर्भितार्थ विचारार्थ घेतला आणि त्याला दृष्टी समजून घटनेतील तरतुदीचा विचार केला तर कसा समाज, कसा माणूस बाबासाहेबांना अभिप्रेत होता हे सुस्पष्ट होते. त्यांना अभिप्रेत असलेला माणूस, अभिप्रेत असलेला समाज, देश, राज्य आज निर्माण होऊ शकले नाही ही शोकांतिका आहे. हे का होऊ शकले नाही याचे कारण शोधले पाहिजे. स्मारक बनवणे, नाव देणे हे आवश्यकच आहे ते घटनेतील तरतुदींचा खरा अर्थ समजून त्यानुसार धोरण राबवणे आणि अभिप्रेत असलेला माणूस, समाज घडवणे हे आहे. परंतु ते आपण करु शकलो नाही हे बाबासाहेबांनी आपल्या भाषणातच नमूद केले होते. बाबासाहेब असे म्हणतात की, या घटनेची अंमलबजावणी करणारे नेतृत्त्व आणि नोकरशहा कशा भावनेने ही घटना अंमलात आणतात आणि समोरील महाकाय समस्यांबाबत काय भूमिका स्वीकारतात यावर या घटनेतील संकल्पनांना मूर्तस्वरुप देणे अखेर अवलंबून राहणार आहे. म्हणून माझी या निमित्ताने विनंती आहे की, देशाचे नेतृत्व करणाऱ्यांनी खऱ्या अर्थाने घटनेला समजून घेतले पाहिजे व त्यानुसारच धोरण राबवले पाहिजेत. आमची नोकरशहा, प्रशासनिक यंत्रणा ही खऱ्या अर्थाने या बाबतीत आडकाठी करणारी आहे. त्यांची यंत्रणा, त्यांची मानसिकता आजही गुलामीच्या काळातील, इंग्रज सरकारच्या काळात तयार झालेली आहे. त्यात मूलभूत बदल करण्याची नितांत आवश्यकता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो गाणार.....

आहे व त्याशिवाय अंमलबजावणी योग्य दिशेने, योग्य उद्देशाने होऊ शकत नाही याची जाण आम्ही सगळयांनी ठेवली पाहिजे. शेवटी मी आपल्याला एकच विनंती करतो की, बाबासाहेबांनी सगळयात जास्त महत्व शिक्षणाला दिले होते. शिक्षण सगळयांना मोफत, सक्तीचे आणि गुणवत्तापूर्ण समान शिक्षण दिले पाहिजे. यावेळेस केंद्र सरकार आणि राज्य सरकार शैक्षणिक धोरण बदलण्याचा प्रयत्न करीत आहे . या उद्देशाला पूर्ण करण्याच्या दृष्टीने बाबासाहेबांना अभिप्रेत असलेला माणूस, समाज घडविण्याच्या दृष्टीने शिक्षणाची योजना आणि धोरण राबवले पाहिजे अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

उप सभापती : या चर्चेमध्ये भाग घेण्याऱ्या सन्माननीय सदस्यांची नावे क्रमाने पुढील प्रमाणे आहेत.

सन्माननीय सदस्य श्री. गजभिये, ॲड.श्री.चांदूरकर, सर्वश्री भाई गिरकर, हरिसिंग राठोड, अनंतराव गाडगीळ,ॲड.रामहरी रुपनवर व डॉ.सुधीर तांबे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. महोदवराव जानकर यांना दोन शब्द बोलू द्यावे अशी विनंती आहे.

उप सभापती : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश गजभिये यांनी विचार मांडण्यास सुरुवात करावी.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये(नामनियुक्त) : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 125 व्या जयंतीच्या निमित्ताने सर्व भारतभर जयंतीपर्व सुरु आहे. त्याचाच एक भाग म्हणून विधानपरिषदेच्या वतीने व विधानसभेच्या वतीने खऱ्या अर्थाने आदरांजली आपण देत आहोत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटना समिती समोर केलेली 3 भाषणे किती प्रभावी होती आणि त्यामुळे निश्चितच या समाज व्यवस्थेवर काय परिणाम झाला याचा ऊहापोह या पुस्तिकेत करण्यात आले असून या पुस्तिकेचे संकलन विधानमंडळाचे प्रधान सचिव डॉ. अनंत कळसे यांनी केल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. हे पुस्तक संकलन करताना प्रबोधन देण्यासाठी आपले सभापती श्री.रामराजे निंबाळकर साहेब, विधानसभेचे अध्यक्ष श्री.हरिभाऊ बागडे साहेब तसेच उप सभापती श्री. डावखरे साहेब यांनी मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल त्या सर्वांचे आभार मानतो.

सभापती महोदय, भारतीय लोकशाहीच्या पवित्र मंदिरामध्ये आम्हाला सुध्दा बोलण्याचा अधिकार भारतीय संविधानाने, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेने दिला हे मी सांगण्यास मागे पुढे पाहणार नाही. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवरील विचार मी ऐकले आहे. बाबासाहेब किती थोर होते याची प्रचीती तुम्हा-आम्हाला आलेली आहे. त्यामुळे मी म्हणू इच्छितो की,

घायाळ पाखरांना पंख दिले तू, मुक्या वेदनांना शब्द दिले तू
तुझ्या चेतनेने आंधळ्यांना जगणे दिले तू,
युगा युगाच्या शोषितांना जीवंत स्वप्न दिले तू, जीवंत स्वप्न दिले तू

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांसाठी काय केले आणि काय करावयाचे शिल्लक राहिले ते तुम्ही आम्ही जाणतो. दि. 26 नोव्हेंबर हा दिन संपूर्ण देशात संविधान दिन म्हणून साजरा करण्यात आला. आम्ही सुध्दा माननीय शरदचंद्र पवार साहेबांच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने भारतीय संविधान दिवस नागपूर येथे साजरा केला. आम्ही स्वतःला फार भाग्यवान समजतो,त्याचे कारण असे आहे की, ज्या दिक्षा भूमीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या दलित,शोषीत पिडीताना धम्म दिक्षा दिली. खऱ्या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची कार्यकक्षा त्यावेळेला कळाली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मंत्रिमंडळाची बैठक सुरु झालेली आहे. सर्व मंत्री तेथे उपस्थित आहेत. मला सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकायची आहेत. परंतु मंत्रिमंडळाची बैठक सुरु झाल्यामुळे आपण मला 15-20 मिनिटांकरिता मंत्रिमंडळाच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी परवानगी द्यावी.

उप सभापती : ठीक आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी उपस्थित राहण्यासाठी मंत्री महोदयांनी परवानगी मागितलेली आहे. आता सभागृहात "डॉ.बाबासाहेब आंबेडकर व संविधान" या विषयावर चर्चा सुरु आहे. सभागृहात मंत्रिमहोदय उपस्थित नसले तरी ही चर्चा मध्येच न थांबविता, ती चर्चा पुढे सुरु ठेवत आहे.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, ती धम्मदीक्षा इतकी महत्वाची ठरली की, सत्य, अहिंसा आणि करुणा याची देशाला गरज होती आणि ती गरज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या माध्यमातून देशातील जनतेला मिळाली आणि लोकांना खऱ्या अर्थाने बौद्धधर्म कळला. ज्या धम्मदीक्षा देणाऱ्या पवित्र स्थळाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा चरण स्पर्श झाला त्याठिकाणी आमचा जन्म झाला त्याचा आम्हाला अभिमान आहे. आम्ही त्यावेळी उपस्थित नसलो तरी आमचे पूर्वज तेथे उपस्थित होते म्हणून आम्ही स्वत:ला भाग्यशाली समजतो.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

सभापती महोदय, भारतीय संविधान तयार होत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना काय काय हालअपेष्टा सोसाव्या लागल्या. माऊंट बेटींगने दिलेल्या शेवटच्या सूचनेवरुन भारतीय संविधान सभेच्या निवडणुका सुरु झाल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना संविधान सभेवर जायचे होते. परंतु त्यांना थांबविण्यामध्ये अनेक लोक होते. परिणमी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा भंडारा येथे् पराभव झाला. पण बंगालचे जोगेंद्रनाथ् मंडल यांनी त्यांना तेथून निवडून आणले. जोगेंद्रनाथ् मंडल बाबासाहेबांना म्हणाले की, बाबासाहेब तुम्ही फक्त अर्ज भरायला या, बाकीचे आम्ही सर्व पाहून घेऊ इतकी श्रद्धा पश्चिम बंगालवासियांची बाबासाहेबांवर होती. पण महाराष्ट्राने बाबासाहेबांना काय दिले याचा ऊहापोह या ठिकाणी मला करायचा नाही. जोगेंद्रनाथ मंडल यांनी बाबासाहेबांना संविधान सभेत पाठविले. तो भाग बांगला देशात असल्यामुळे बाबासाहेबांचे सदस्यत्व पुन्हा रद्द

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

झाले. कदाचित डॉ.बाबासाहेबांना संविधान सभेत निवडून पाठविण्याची शिक्षा त्यांना बांगलादेशात पाठवून मिळाली. काँग्रेसला पण बाबासाहेबांना संविधानाच्या कामकाजापासून अलिप्त ठेवता येत नव्हते. कारण त्यांच्या इतकी प्रचंड विद्ववत्ता आणि कल्याणाचा जाहीरनामा संपूर्ण काँग्रेसमध्ये कोणाकडेही नव्हता. भारताचे संविधान बाबासाहेबांशिवाय बनणे अशक्यप्राय होते आणि ही गोष्ट काँग्रेस चांगलीच ओळखून होती. शेवटी बाळ गंगाधर खेरांना पत्र लिहून जयकरांचे मुंबई प्रांतातील संविधान सभेतील सदस्यत्व रद्द करण्यात आले आणि त्या ठिकाणी डॉ.बाबासाहेबांना संविधानसभेवर निवडून आणण्यात आले. कारण काँग्रेस, संविधानसभा आणि भारतदेश या सर्वांची ती गरज होती. बाबासाहेब संविधानसभेवर निवडून जाणे सर्वांच्याच हिताचे होते. त्यानंतर डॉ.बाबासाहेबांनी संविधान मसुदा समितीच्या अध्यक्ष पदावरुन केलेली कामगिरी आणि संविधान सभे्तील सर्व कलमावर केलेली भाषणे म्हणजे या देशाचे भवितव्यच होते. दिनांक 9 डिसेंबर, 1946 ला संविधान सभेची पहिली बैठक बोलाविण्यात आली आणि त्या बैठक्ीत भारतीय संविधानाचे प्रारुप कसे असावे, यावर दीर्घ चर्चा झाली. या चर्चेत प्रत्येक सदस्याला आपली मते मांडण्याची संधी देण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आपले मत मांडण्यासाठी वाट पहावी लागत होती. अखेर आजच्या दिवशी म्हणजे दिनांक 17 डिसेंबर, 1946 रोजी डॉ.बाबासाहेबांना संविधान सभेसमोर संविधानाच्या प्रारुपावर मत मांडण्यासाठी अचानक आमंत्रित करण्यात आले. कारण अनेक सदस्य बोलावयाचे होते आणि बाबासाहेबांना आजच्या दिवशी बोलाविण्यात येईल याची त्यांना कल्पनाच नव्हती. डॉ.बाबासाहेबांनी भाषणाच्या सुरुवातीलाच त्याचा उल्लेख केला की, आज भाषण करण्यासाठी माझा नंबर लागेल याची मला कल्पना नव्हती. मला पूर्व सूचना मिळाली असती तर मी तयारीनिशी माझे मत मांडले असते. तरी देखील मी माझे मत मांडणार आहे. डॉ.बाबासाहेबांचे संविधान सभेतील भाषण सुरु झाले आणि सर्व सभागृह अवाक होऊन त्यांचे भाषण ऐकत होते. डॉ.बाबासाहेब आपल्या बुद्धीचातुर्याने संविधान सभेसमोर आपले मुद्दे मांडत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण् सुरु असताना संविधान सभेतील एकही सदस्य उठला नाही की

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

जागचा हललासुद्धा नाही. बाबासाहेबांच्या मुखातून जणुकाही भविष्याचे संविधानच बाहेर पडत होते. संपूर्ण् मानवजातीच्या कल्याणासाठी एक आचारसंहिता लिहिली जात होती. डॉ.बाबासाहेबांचे भाषण झाल्यावर सभागृहामध्ये त्यांचे स्वागत करण्यात आले. सभागृह टाळ्यांच्या कडकडाने निनादून गेले. सभागृहातील सर्व सदस्यांनी डॉ.बाबासाहेबांच्या विद्वतेसमोर माना झुकविल्या. डॉ.बाबासाहेबांच्या भाषणाने त्यांचे विरोधकही इतके प्रभावी झाले की, त्यांच्या तोंडून कौतुकाचे शब्दही फुटत नव्हते. ही गोष्ट आपल्यासाठी निश्चितपणे अभिमानाची आहे. त्या बाबासाहेबांना स्मरण करीत असताना आज आपण इतर देशांमध्ये काय परिस्थिती आहे हे पाहतो आहोत. त्या देशांमध्ये लाथाडी सुरु आहे मग तो देश पाकिस्तान असो वा अन्य देश असो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला बुद्ध माहीत करुन दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे सर्वात प्रथम भारत देशाला बुद्ध माहीत झाला. त्यांनतर बुद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार चीन, थायलंड, मलेशिया, बँकॉक या देशांमध्ये झाला. भारत देशाला पहिल्यांदा बुद्ध कळून सुद्धा येथील जातीय व्यवस्थेने तो बुद्ध लोकांपर्यत पसरु दिला नाही, ही शोकांतिका आहे. या ठिकाणी बोललेला प्रत्येक शब्द-न-शब्द लिहिला जात आहे. प्रत्येक ठिकाणी त्याची नोंद होते. आपण केलेले भाषण आपणास लगेच वाचावयाच मिळते ही बाबासाहेबांचीच कृपा आहे.

सभापती महोदय, नांदेड येथे अनुसूचित जातीच्या लोकांवर बहिष्कार टाकण्यात आला होता म्हणून मी काल त्या ठिकाणी भेट देण्यासाठी गेलो होतो. उस्मानाबाद येथील अनसुरडा गावामध्ये अनुसूचित जातीच्या लोकांना पाणी भरण्यासाठी बंदी घातलेली होती त्याठिकाणी सुद्धा भेट देण्यासाठी गेलो होतो. भारतीय संविधान असूनही असे होत असेल तर ते योग्य नाही.

सभापती महोदय, मी आपणास चार पंक्तिया वाचून दाखवितो.

एक नल पर पानी पीने के लिए बंदी थी,
जातिवादियों की आंखें इतनी अंधी थी,
जुबान काट दी जाती थी न्याय मांगने वालों की,
इतनी वर्ण व्यवस्था गंदी थी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

हे असे का होते याचे उत्तर मिळत नव्हते. प्रश्नही त्यांचे आणि उत्तरही त्यांचेच होते आम्हाला बोलण्याचा काहीही अधिकार नव्हता. आम्हाला चालण्याचासुद्धा अधिकार नव्हता. यादिकाणी आम्हाला बोलण्याचा अधिकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला आहे हे मी येथे अभिमानाने सांगतो. डॉ.बाबासाहेब नसते, भारतीय संविधान झाले नसते तर आम्हाला ही परिस्थिती पहावयास मिळाली नसती. आजही अनुसूचित जातीच्या लोकांना पिण्यासाठी पाणी मिळत नसेल, दुकानातून सामान मिळत नसेल तर ते भारतीय संविधान कोणत्या कामाचे आहे ? पहिल्या वक्त्याने म्हटले की, भारतीय संविधान कितीही चांगले असले तरी त्यांना वापरणारे लोक बरोबर नसतील तर हे भारतीय संविधान मातीमोल आहे.

सभापती महोदय, चार दिवसांपूर्वी आम्ही वर्तमानपत्रात बातमी वाचली की, आपण जपानकडुन बुलेट ट्रेनकरिता एक लाख कराडे रुपयांचे कर्ज घेत आहोत, आपणास कमी दराने हे कर्ज मिळत आहे, आम्ही त्याचे स्वागत करतो.

.....2O-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

स्वागत आहे. हे कर्ज अत्यल्प दराने घेण्यात येत आहे. अशा प्रकारे कर्ज घेऊन जर भारत देशाचा विकास होत असेल तर निश्चितपणे कर्ज घ्यावे. परंतु 100 टक्के बुध्दीस्ट देश असलेल्या जपान देशाचा विकास नागासाकी आणि हिरोशिमा शहरे उद्ध्वस्त झाल्यानंतर सुध्दा किती झपाट्याने सुरु आहे हे आपण बघितले. तो देश भारतासारख्या मोठ्या देशाला कोट्यवधी रुपयांचे कर्ज देत असेल तर जपान हा देश एवढा प्रगल्भ आणि श्रीमंत कशाच्या भरवशावर झाला ? महोदय, तो देश बुध्दाच्या तत्त्वज्ञानामुळे मोठा झाला हे मला सांगावेसे वाटते. ज्यांनी भारतीय संविधान दिले, ज्यांनी बुध्द धम्म दिला ते बुध्द या देशात आले आणि माझा देश 100 टक्के बुध्दमय झाला तर जपान देशाला भारताकडून कर्ज घ्यावे लागेल, असे माझे व्यक्तिगत मत आहे. असे झाले तर मला सांगताना अभिमान वाटेल की,

"ये बाबासाहेब,
सच्चाई की, इंसाफ की किताब है तू,
हमारे जिंदगानी का इन्कलाब है तू,
सच तो ये बात है कि वतन के इतिहास में,
एक महकता हुआ गुलाब है तू,
एक महकता हुआ गुलाब है तू "

महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आमच्या हातातून झाडू आणि टोपली काढून आमच्या हातात पेन आणि कागद हे शस्त्र दिले. एवढेच नव्हे तर त्यांनी आम्हाला 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा' हा नारा दिला.

सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या माध्यमातून भारताच्या संसदेचा कारभार चालतो. तसेच सर्व राज्यातील विधिमंडळ सभागृहाचे कामकाज चालते. आपला संपूर्ण राज्यकारभार कसा चालतो किंवा या कारभाराला कोणी स्वरुप दिले, त्याचे महत्त्व काय आहे हे मी सांगतो. मी नागपूर महापालिकेमध्ये नगरसेवक असताना तसेच सन्माननीय सदस्य प्रा.अनिल सोले हे महापौर असताना आम्ही दिल्ली येथे प्रशिक्षणासाठी गेलो होतो. आम्ही दिल्लीच्या म्युझियम मध्ये गेलो. आम्हाला त्या ठिकाणी एक फिल्म दाखविण्यात आली. त्या फिल्ममधून सम्राट अशोक यांचे संपूर्ण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जीवन चरित्र दाखविण्यात आले. त्या फिल्ममध्ये सम्राट अशोक यांचा संपूर्ण राज्य कारभार कसा

श्री.प्रकाश गजभिये....

चालत होता हे आम्ही बघितले. त्यावेळी आमच्या डोळ्यातून अश्रू आले. कारण सम्राट अशोक यांचा राज्य कारभार जसा चालत होता तशाच प्रकारचा राज्य कारभार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तयार करुन ठेवलेला आहे. ग्रामपंचायत, विधानसभा, विधानपरिषद, लोकसभा किंवा राज्यसभा असो, या संपूर्ण ठिकाणी सम्राट अशोकांचा राज्य कारभार जसा चालत होता त्याच प्रमाणे चालत आहे. हा राज्य कारभार आम्हाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिला याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण राज्यघटनेत बुध्दीझम अंतर्भूत केला आहे. सभापती महोदय, सभागृहात निळ्या रंगाचे जे चक्र हे ते अशोकाचे चक्र आहे, राजमुद्रावर जे तीन सिंह दाखविण्यात आलेले आहेत ते सुध्दा सम्राट अशोकाचे आहे. त्यामुळे निश्चितपणे आपल्याला याचा सार्थ अभिमान असला पाहिजे. आपल्या देशात किंबहुना आपल्या राज्यात सम्राट अशोकाच्या राज्य कारभाराप्रमाणेच राज्य कारभार सुरु आहे.

सभापती महोदय, गरीब घरातील व्यक्ती सुध्दा आपल्या देशाचा पंतप्रधान होऊ शकतो. माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नसते तर मी पंतप्रधान होऊ शकलो नसतो. यावरुन आपल्या लक्षात येईल की, ही किमया भारतीय लोकशाहीची आहे, भारतीय संविधानाची आहे. सभापती महोदय, भारतीय संविधानाच्या शेवटच्या पानावर प्रास्ताविक नमूद केलेले आहे. या निमित्ताने माझी विनंती आहे की, कृपया त्या ढाच्यामध्ये कोणीही बदल करता कामा नये. कारण संविधानाचा ढाचा बदलला तर देशाची संपूर्ण व्यवस्था कोलमडून पडेल. त्यामुळे खऱ्या अर्थाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना कुठे तरी वेदना होतील. सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची 125 वी जयंती साजरी करीत असताना आपण संविधानाचा ढाचा अबाधित ठेवावा, एवढीच या निमित्ताने विनंती करतो व येथेच थांबतो.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

धन्यवाद. जयभिम, जय बुध्द, जय राष्ट्रवादी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदूरकर (नामनियुक्त) : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंती निमित्त केंद्र सरकारने संपूर्ण देशात भारतीय संविधानाच्या निमित्ताने कार्यक्रम घेण्याचे आदेश दिले आहेत. भारतीय संविधानाची महती देशातील जनतेला पटावी म्हणून देशाच्या संसदेत तसेच देशातील सर्व विधिमंडळात अशा प्रकारची चर्चा घेण्यास सांगणे हा अतिशय स्तुत्य असा उपक्रम आहे. त्यानुसार आज महाराष्ट्राच्या विधानपरिषद सभागृहात ही चर्चा सुरु आहे. याबद्दल माननीय सभापतींनी जो ठराव मांडला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो आणि त्या ठरावाला पाठिंबा देतो.

सभापती महोदय, भारत स्वतंत्र होऊन 60 वर्षांपेक्षा जास्त काळ झालेला आहे. या संपूर्ण काळात भारताचे संविधान देशाला मार्गदर्शन करीत आहे. संपूर्ण देशात भारतीय संविधानाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार कारभार सुरु आहे. एवढ्या मोठ्या गंभीर विषयावर बोलण्यासाठी खूप वेळ लागू शकतो. परंतु वेळेची मर्यादा लक्षात घेता ते शक्य नाही. त्यामुळे मी या प्रस्तावावर थोडक्यात माझे विचार मांडू इच्छितो.

सभापती महोदय, आपले भाग्य हे आहे की, ज्यांनी या देशाची घटना लिहिली, संविधान लिहिले त्यांचे नाव डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहे. श्री.धनंजय कीर नावाच्या बायोग्राफीकाराने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची बायोग्राफी लिहिली आहे. ती बायोग्राफी अतिशय स्टॅण्डर्ड आहे. त्या बायोग्राफीच्या पहिल्या पानावर त्यांनी अतिशय महत्त्वाचे वाक्य लिहिलेले आहे. ते वाक्य असे आहे की, "...from dust to doyen, from the life of a social leper to the position of a constitution-maker....." अशा प्रकारे त्यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वर्णन केले आहे."...from dust to doyen,.." म्हणजे मातीत जन्माला आलेला माणूस हा अत्यंत महत्त्वाचा माणूस होतो. त्यांनी 'leper' हा शब्द यासाठी वापरला की लेपरला माणूस स्पर्श करीत नाही. तशाप्रकारे अनटचेबलला माणूस स्पर्श करीत नव्हता. त्यामुळे धनंजय कीर यांनी "....from the life of a social leper to the position of a constitution-maker....." असे वाक्य वापरले आहे. हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे एका शब्दातून केलेले वर्णन आहे. त्यांच्या आयुष्यावरील चित्रपट पाहिला तर या गोष्टी सर्वांना समजतील. त्यातील एक छोटासा प्रसंग मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील सातारा जिल्ह्यातील सातारा रोड स्टेशन येथे

17-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) OO-4

SJB/ ST/ 19:10

प्रा.जनार्दन चांदूरकर....

नोकरीला होते. त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुंबईत शिकत होते. त्यावेळी त्यांच्या वडिलांनी सांगितले की, तू बहिणींना घेऊन दोन-चार दिवसांसाठी साताऱ्याला ये. त्यानुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपल्या बहिणींना घेऊन सायंकाळी सातारा स्टेशनला उतरले. सातारा स्टेशनपासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे घर 15-20 कि.मी. अंतरावर होते. सायंकाळची वेळ होती. त्यावेळी एक बैलगाडी तेथून जात होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बैलगाडी चालविणाऱ्या व्यक्तीला त्यांच्या घरापर्यंत सोडण्यास सांगितले. त्यावेळी त्या व्यक्तीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना सांगितले की, मी तुला तुझ्या घरापर्यंत पोहचून देतो, परंतु त्यासाठी तुला मला अमुक इतके पैसे द्यावे लागतील.

.....2पी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जनार्दन चांदूरकर ....

बाबासाहेबांनी ते मान्य केले. गाडी थोड्या अंतरावर गेली. त्या गाडीवानाने त्यांना प्रश्न विचारला की, तू कुठल्या जातीचा आहेस ? तेव्हा बाबासाहेबांनी सांगितले की, अशा-अशा जातीचा आहे. त्याने बाबासाहेबांना शिव्या देण्यास सुरूवात केली, गाडीतून उतरविले, तुला अगोदर समजत नव्हते का, असे तसे बोलला. नंतर तो असे म्हणाला की, आता तू गाडीत बसलेला आहेस. पण मी अस्पृश्य असलेल्या गाडीत बसणार नाही, मी चालणार आणि तू गाडी चालवणार. आता हे मुंबईचे, यांना गाडी चालविणे शक्य होते का ? पण बाबासाहेब ती बैलगाडी चालवत, चालवत गेले, तो माणूस पायी चालत गेला. रात्र झाली, पुढे जाणे अवघड पडेल म्हणून त्याने सांगितले. एका ठिकाणी एक खोपटे होते, तेथे लाईट दिसला. त्यावेळी तो गाडीवान म्हणाला की, दोन मिनिटे थांब. येथे रात्र काढू. आता पुढे जाणे अवघड आहे. येथेच रात्री रहायला लागेल. बाबासाहेबांनी घरातून भाकरी बांधून नेलेल्या होत्या, त्या खोपट्यातील माणसाने त्यांना जेवल्यानंतर प्यायला पाणी दिले नाही, as he was untouchable. दुसऱ्या दिवशी उठून ते गेले आणि आपल्या वडिलांना जाऊन भेटले. प्रश्न असा आहे की, एवढ्या विपरित, महाकठीण परिस्थितीमध्ये बाबासाहेब आंबेडकर हे कॉन्स्टिट्यूशन मेकर झालेच कसे ? पण ते झाले ही वस्तुस्थिती आहे. त्यांच्या आयुष्यातील लढा सुरू झाला, अवेकनिंग झाले. त्यावेळी ते हिंदू होते आणि हिंदू धर्मामध्ये त्यांचा विश्वास होता. मी जाणीवपूर्वक बोलत आहे. हिंदू धर्मामध्ये त्यांचा विश्वास होता 'Annihilation of Caste' हे पुस्तक त्यांनी नंतर लिहिले. परंतु सर्व लोकांना संघटित करण्याच्या दृष्टीने, त्यांची दु:खे वेशीवर टाकून एक संघटना बनविण्याच्या दृष्टीने त्यांनी काळाराम मंदिराचा सत्याग्रह केला. महाडचा सत्याग्रह केला. असे सत्याग्रह सुरू झाले. परंतु त्यावेळच्या सनातनी लोकांनी बाबासाहेबांना विरोध केला. एक गोष्ट मी या ठिकाणी अजून नमूद करू इच्छितो. पण या परिस्थितीत बाबासाहेब आंबेडकरांना मदत करणारे बाबासाहेबांचे सर्व सहकारी अधिकत: ब्राह्मण होते. त्या सर्व ब्राह्मणांना वाटायचे की, बाबासाहेबांचा लढा बरोबर आहे आणि हे झालेच पाहिजे. बाबासाहेबांचा लढा वाढत गेला. ब्राह्मण मंडळी जास्त मोठ्या प्रमाणात बाबासाहेबांच्या बरोबर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जनार्दन चांदूरकर ....

होती. बाबासाहेबांचा संघर्ष सुरू झाला. संघर्ष सुरू झाल्यानंतर Babasaheb emerged as a Leader of untouchables, अस्पृश्यांचे लिडर किंवा दलितांचे लिडर म्हणून निर्माण झाले. दलितांचे प्रश्न ते ब्रिटिश सरकारकडे मांडू लागले. सायमन कमिशनवर महात्मा गांधींनी बहिष्कार टाकलेला होता. परंतु दलितांचे प्रश्न मांडण्यासाठी बाबासाहेब आंबेडकर सायमन कमिशनसमोर हजर राहिले. मघाशी कोणीतरी काँग्रेस संदर्भात बोलले. सभापती महोदय, त्यामुळे काँग्रेसवाले बाबासाहेबांच्या विरूद्ध झाले. Babasaheb claimed to be the Leader of untouchables and dalits in India. गोलमेज परिषदेसाठी गांधीजींना जसे निमंत्रण आले तसे ब्रिटनच्या पंतप्रधानांनी बाबासाहेब आंबेडकरांना देखील निमंत्रण पाठविले. गोलमेज परिषदेत बोलताना महात्मा गांधीजींनी सांगितले ते अतिशय महत्त्वाचे असे आहे की, "Mr. Prime Minister, I am the Leader of untouchables." बाबासाहेब उठले आणि त्यांनी सांगितले की "No. He is giving wrong information. I am the Leader of dalits and untouchables." हे पहिल्या कॉन्फरन्समध्ये झाले. दुसरी राऊंड टेबल कॉन्फरन्स झाली. भारत स्वतंत्र होत असताना ब्रिटिशांनी घातलेल्या कंडिशन्स होत्या की, भारतापासून पाकिस्तान अलग झाला पाहिजे. शीख आणि बाकीच्या लोकांना स्वतंत्र दिले पाहिजे, अशा पध्दतीने ब्रिटिशांनी तोडो आणि नंतर स्वतंत्रता दो ही त्यांची निती होती, त्याच्या संदर्भात दुसरी गोलमेज परिषद झाली. गांधीजींचा मुस्लिमांना पाकिस्तान देण्यास विरोध नव्हता. Barrister Jinnah was representing Muslims in India, पण बाबासाहेब आंबेडकरांचा विरोध होता. मात्र बाबासाहेब आंबेडकर त्या विषयावर बोलू शकत नव्हते. कारण he was the Leader of untouchables. त्यांना त्यांचेच मांडायचे होते. भारत स्वतंत्र झाला तर या स्वतंत्र भारतामध्ये ही जी वर्णशाही आहे, उतरंड आहे ती कायम राहील आणि जो दलित आहे तो दलितच राहील, जो मागासलेला आहे, तो मागासलेलाच राहील म्हणून त्यांच्यासाठी भारत स्वतंत्र होण्यापूर्वी काही प्रोव्हिजन्स केल्या पाहिजेत, त्यामध्ये त्यांनी एक प्रोव्हिजन मागितली की, दलितांचा नेता दलितांनीच निवडला पाहिजे असे मतदारसंघ बनवा. Separate electorates for dalits. पण गांधीजींनी त्याला विरोध केला. आता हा इतिहास

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जनार्दन चांदूरकर ....

झालेला आहे. Both Babasaheb Ambedkar and Mahatma Gandhi were great Indians. पण हा इतिहास आहे. इतिहासातील या फॅक्ट्स आहेत. गांधींनी जेव्हा त्यांना विरोध केला तेव्हा ब्रिटिश प्राईम मिनिस्टरने गोलमेज परिषदेमध्ये सांगितले की, मि. आंबेडकर तुमचे म्हणणे तुम्ही लिहून द्या आणि गांधींना सांगितले की, तुमचे म्हणणे तुम्ही लिहून द्या, we will take a decision later on and communicate to you. तुम्हाला नंतर निर्णय कळवू. नंतर निर्णय आला. बाबासाहेबांची डिमांड मान्य केली. मात्र त्यानंतर पुण्याच्या येरवडा जेलमध्ये महात्मा गांधींनी त्या निर्णयाच्या विरोधात 21 दिवस उपोषण केले. बाबासाहेबांना गांधींजींच्याकडून फिलर्स येत होते. सरदार वल्लभभाई पटेल आणि मोठ मोठे काँग्रेसचे नेते येऊन बाबासाहेबांना सांगत हाते की, तुम्ही गांधींजींचे म्हणणे मान्य करावे आणि गांधी सांगतात, त्याप्रमाणे तुम्ही वागावे. बाबासाहेब म्हणाले की, मी गांधींचे मान्य करणार नाही. कारण माझा समाज, दलित समाज वर्षांनुवर्षे पिछडा समाज आह, यांच्यासाठी हे चांगले केले आहे. मग गांधींजींना याचे वाईट कशाला वाटले पाहिजे, ही बाबासाहेबांची भूमिका होती. पण जेव्हा गांधी क्षीण झाले तेव्हा बाबासाहेबांनी गांधीजींशी चर्चा करण्याचे मान्य केले. जेव्हा बाबासाहेब गांधीजींकडे चर्चेला गेले तेव्हा गांधीजींनी त्यांना विचारले की, आंबेडकर, तुम्ही माझ्या मताशी का सहमत होत नाही ? मी यातून भारत स्वतंत्र झाल्यानंतर तेच वृत्त घेणार आणि जातीयता नष्ट करणार, सर्व नष्ट करणार. तेव्हा बाबासाहेबांनी त्यांना सांगितले की, महात्मा आले आणि महात्मा गेले पण ते झाले नाही. त्यासाठी कायदा करावा लागतो. पण शेवटी बाबासाहेब आंबेडकरांनी, देशासाठी, देशामध्ये अराजक माजेल, देशामध्ये लफडी होतील, भांडणे होतील म्हणून गांधींचे म्हणणे मान्य केले आणि तो संघर्ष मिटला.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे बसून 'लफडी' हा शब्द मागे घेण्याबाबत सांगत आहेत. ठीक आहे. मी 'लफडी' शब्द मागे घेतो. भारत स्वतंत्र झाल्यानंतर मसुदा समितीचे चेअरमन कोणी व्हायचे असा प्रश्न निर्माण झाला. मी हे सांगण्यापूर्वी एक रेफरन्स देऊ इच्छितो. बाबासाहेब आंबेडकरांनी 'Thoughts on Pakistan' नावाचे पुस्तक लिहिले. That book was a piece of advice to Barrister Jinnah की, तू पाकिस्तानमध्ये जाऊ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जनार्दन चांदूरकर ....

नको, इंडियामध्ये रहा. त्या पुस्तकाच्या पहिल्या पानावर बाबासाहेबांनी लिहिले आहे की, "A husband and a wife cannot cut a baby into two at the time of divorce, as you cannot cut your head to cure your headache." डोके दुखत असेल तर डोके कापून टाकले जात नाहीत, घटस्फोट होत असेल तर नवरा-बायको मुलाचे तुकडे करत नाहीत. त्यांनी जीनाला विचारले की, Have you read my book ? तेव्हा जीनांनी सांगितले की, "Mr. Ambedkar,, Pakistan has became a reality." इंडिया इन्टॅक्ट रहावा म्हणून परिश्रम करून बाबासाहेबांनी लिहिलेले ते पुस्तक आहे. मी पुढील मुद्यावर जात असताना आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, जातीयवाद मिटावा, सर्व समान व्हावेत, वर्णाश्रम मिटावा यासाठी बाबासाहेबांनी फार मोठे प्रयत्न केले.

....2Q

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदुरकर.....

मोठ्या प्रमाणावर ब्राम्हणांनी त्यांचे स्वागत केले होते. कलकत्त्यावरुन बाबासाहेबांना सर्व महंतांचे पत्र आले आणि तुमच्या मताशी आम्ही सहमत आहोत, आपण येथे भाषण देण्यासाठी यावे, असे त्यांनी बाबासाहेबांना कळविले. बाबासाहेबांनी त्यांना कळविले की, भाषण देण्यापूर्वी मी माझे लिखित भाषण आपणाकडे पाठवितो, ते तुम्हाला मान्य असेल तर मी भाषण देण्यासाठी तेथे येईन. बाबासाहेबांनी लिखित भाषण त्यांच्याकडे पाठविले, त्या लोकांना ते मान्य झाले नाही आणि नंतर त्याच भाषणाचा ड्राफ्ट 'Annihilation of Caste' या पुस्तकरुपाने प्रसिध्द झाला. मुद्दा असा आहे की, before he converted into Buddhism त्यांनी सगळे प्रयत्न करुन बघितले. on path Indian society येते का, हे त्यांनी पाहिले.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्यांनी एका बिल्डिंगचे उदाहरण दिले. एका माळ्यावरुन दुसऱ्या माळ्यावर, दुसऱ्या माळ्यावरुन तिसऱ्या माळ्यावर जाण्यास परवानगी नव्हती. ही पध्दत मोडून काढण्याचा देखील बाबासाहेबांनी सगळा प्रयत्न केला होता. जेव्हा त्यांना ते शक्य झाले नाही then he embraced Lord Buddha's religion.

सभापती महोदय, भारताच्या राज्यघटनेचे चार वैशिष्ट्ये आहेत. पहिले संसदीय कार्य पध्दती, दुसरे एक्झिक्युटिव्ह, तिसरे ज्युडिशिअरी आणि चवथे मिडिया. या सर्व गोष्टींवर या 60 वर्षांच्या काळामध्ये बाबासाहेबांच्या विचारांचा फार मोठा परिणाम झालेला आहे. जो कोणी सरकार चालवील तो भारतीय संविधानाला मानणारच. आपल्या देशाचे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी यांनी परवा हे सगळे वाद निकाली काढले आणि भारतीय राज्यघटना ही सुर्य, चंद्र असेपर्यंत अशीच राहील, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे आता तो मुद्दा राहिलेला नाही. परंतु, या राज्यघटनेची अंमलबजावणी, हा मुद्दा अद्याप शिल्लक आहे. खरे तर त्यावर येथे भाषणे झाली पाहिजेत. त्यावर भाषण करण्याची माझी इच्छा आहे. परंतु, वेळेअभावी आपण मला परवानगी देणार नाही. म्हणून वेळेच्या कमतरतेमुळे मी माझे भाषण आटोपते घेतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदुरकर.....

सभापती महोदय, जाता जाता या महान मानवाला मी कोटी कोटी प्रणाम करतो, त्याबरोबरच त्यांच्याबरोबर कान्स्टिटयुएंट असेंब्लिमध्ये जे 92 सदस्य होते, नंतर काही सदस्य वाढले, त्या सर्व सदस्यांचा हातभार ही घटना बनविण्यामध्ये लागलेला आहे, त्या सर्वांना प्रणाम करतो. आपण हा विषय चर्चेला घेतला, त्याबद्दल आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद. जय महाराष्ट्र. जय भीम.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान या विषयावर सभागृहात सुरु असलेल्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सुरुवातीलाच मी आपले आभार मानतो. आपण मला डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या कार्याला नमन करण्याची संधी दिली. परमपुज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर एवढे विद्वान होते, त्यांना एवढे अफाट ज्ञान होते की, संविधान सभेत ज्यावेळी संविधान ॲप्रुव्ह होत होते त्यावेळी जी क्लॉजवाईज चर्चा होत होती त्यावेळी एक एक मुद्दे उपस्थित होत होते आणि आता बाबासाहेब काय उत्तर देतील, याची उत्कंठा आपल्याला लागून राहते. अध्यक्षपदी माननीय बाबु राजेंद्र प्रसाद असले तरी उत्तरे मात्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर द्यायचे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान या विषयावर बोलताना मला एका गोष्टीची आठवण करुन द्यावयाची आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शेवटच्या दिवशी भाषण करताना असे सांगितले की, "हे संविधान कितीही चांगले असले तरी या संविधानाची अंमलबजावणी करणारे बरोबर नसतील तर ती कुचकामी ठरेल." आजही राज्यघटनेमधील काही क्लॉज असे आहेत, काही गोष्टी अशा आहेत की, या बाबी त्यांनी आपल्यावर सोडल्या होत्या. ज्या गोष्टी आपल्याला करावयाच्या आहेत.

सभापती महोदय, राज्यघटनेतील कलम 340 चा उल्लेख मी करु इच्छितो. या माध्यमातून या देशातील 52 टक्के लोकांना न्याय द्यावयाचा होता. या देशामध्ये ओबीसी 52 टक्के आहेत. याचा अर्थ या देशाची अर्ध्यापेक्षा जास्त लोकसंख्या ही इतर मागासवर्गीयांची आहे, ओबीसींची आहे. यामधील काही महत्वाच्या गोष्टी मी आता आपल्याला सांगणार आहे. आपण त्या लक्ष देऊन ऐकाव्यात. कलम 340 नुसार मंडल आयोग नेमण्यात आला. मंडल आयोगाने सरसकट 27 टक्के आरक्षण ओबीसीना दिले आणि त्यामध्ये 3000 ते 3500 जातींचा समावेश केला. मंडल आयोगाचे एक सदस्य श्री.एल.आर.नाईक यांनी मंडल आयोगाच्या अहवालावर सही केली नाही. ते म्हणाले की, "मंडलजी ये जो आप कर रहे है वो ठीक नही हो रहा है, आप को ऐसा करना चाहिए की

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड.....

इस में बॅकवर्ड और मोस्ट बॅकवर्ड जो अतिपिछडे है और जो कम पिछडे है उनको अलग कर दिजिए." त्यांनी सांगितले की, "डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ज्यावेळी आरक्षणाचे धोरण राबविले होते त्यावेळी शाहू महाराजांनी असे उदाहरण दिले की, दोन घोडे असतील, त्यामधील एक अशक्त आणि एक सशक्त घोडा असेल आणि त्या दोघांनाही एका टोपलीत चणे खाण्यास दिले तर सशक्त घोडा सर्व चणे खाऊन फस्त करील आणि अशक्त घोड्याला काही मिळणार नाही. 27 टक्के आरक्षणाचेही असेच झाले आहे.

सभापती महोदय, मी गेल्या 20 वर्षांपासून हा एकच मुद्दा देशामध्ये मांडतो आहे. 27 टक्के आरक्षणाचे विभाजन झाले पाहिजे. प्रामुख्याने भटक्या व विमुक्तांसाठी वेगळे आरक्षण दिले पाहिजे. मी जो मुददा मांडत आहे तो देशभर चर्चिला जातो पण या सभागृहामध्ये पहिल्यांदा आज संधी मिळाली आहे, मी आपले मनापासून आभार मानतो. मी 20 वर्षापूर्वी हा मुद्दा माननीय अटलबिहारी वाजपेयी, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, नितीन गडकरी या सर्वांसमोर मांडला आणि त्यांना तो मान्य झाला होता. याच मुद्याबाबात भटक्या व विमुक्तांसाठी एक आयोग गठीत झाला आणि प्रमोद महाजन आणि गोपीनाथ मुंडे यांनी त्या आयोगाचा मला सदस्य बनविले. सध्याचे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्रजी मोदी आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री श्री.शिवराजसिंह चौहान यांना रामभाऊ म्हाळगी प्रशिक्षण संस्थेमध्ये मी एक तास या मुद्याबाबत विवेचन केले आणि त्यांना सांगितले की, कॉंग्रेसने मागाससर्गीयांसाठी केले आता आपल्याला मागासवर्गीयांसाठी करण्याची सोन्याची संधी आहे, आपण विभागाजन करावे, महाराष्ट्रामध्ये केले आहे, त्याच धर्तीवर देशामध्ये करावे.

सभापती महोदय, या ठिकाणी मराठा आणि धनगरांच्या आरक्षणाचा विषय निघतो. त्यामध्ये पूर्ण राजकारण आहे. त्या बाजूने राजकारण आणि या बाजूने राजकारण आहे. खरी गोष्ट कोणी बोलावयास तयार नाही. मुख्यमंत्री महोदयांनी काय सांगितले होते, हे आपण विसरला आहात. मी चुकीचे काही बोलणार नाही. महत्वाचा मुद्दा हा आहे की, जसा धनगरांचा प्रश्न आहे तसा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड.....

वंजाऱ्यांचाही प्रश्न आहे. धनगरांना आरक्षण आणि भटक्या व विमुक्तांना आरक्षण नाही. या महाराष्ट्रामध्ये माननीय श्री.शरद पवार यांनी धनगरांना साडेतीन टक्के आरक्षण दिले आहे. तरी तुम्ही म्हणता धनगरांना आरक्षण नाही. त्यासाठी ओरडत आहात, घोंगड्या घालत आहात.

...RR-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड.....

माननीय मुख्यमंत्री महोदयांनी असे सांगितले होते की, आदिवासींच्या आरक्षणाला धक्का न लावता आम्ही धनगरांना आरक्षण देऊ. म्हणजे काय ? म्हणजे थर्ड सूची, मी देशभर ओरडून सांगतो की, ओबीसीचे विभाजन करावे, त्याशिवाय धनगरांना आरक्षण मिळणार नाही. मी आपल्याला एक उदाहरण देतो. मी सुरुवातीला सेकंड क्लासने प्रवास करीत होतो. मी धामणगांव येथून रेल्वेमध्ये बसत होतो. अकोला स्टेशन आल्यानंतर त्या रेल्वे डब्यात बसलेले प्रवाशी डब्याचे दरवाजे बंद करीत असत. ते अकोला स्टेशनपासून कोणालाही त्या डब्यात चढू देत नव्हते. आदिवासी लोक ट्रेनमध्ये बसलेले आहेत, ते आता आम्हाला आत घ्यायला तयार नाहीत, अशी परिस्थिती आज आहे. तीच परिस्थिती मराठा समाजाबद्दल आहे. आपण घाईगर्दीने मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेतला, तो चुकीच्या पद्धतीने घेतलेला आहे. माननीय न्यायालयाने काय सांगितले, आरक्षण देताना कोणते निकष आहेत ? (...अडथळा....) मी तुमच्या फायद्याचेच सांगतो. त्यामुळे तुमचे सर्व प्रश्न सुटतील. आपण कृपया दोन मिनिट शांत बसावे. आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे. मराठा समाजाला आरक्षण देताना एकतर ते सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले आहेत हे तुम्हाला सिद्ध करावे लागेल. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांच्यामध्ये असमानता आहे. त्यांचे सरकारमध्ये, नोकरीमध्ये योग्य प्रतिनिधीत्व नाही हे तुम्हाला संविधानाच्या अनुच्छेद 16 (4) नुसार सिद्ध करावे लागेल. काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी यासाठी देशावर खूप उपकार केलेले आहेत. केंद्रात युपीए सरकार सत्तेत असताना त्यांनी देशातील सर्व समाजातील लोकांची जनगणना केलेली आहे. प्रत्येक समाजाची लोकसंख्या किती आहे ही माहिती शासनाकडे उपलब्ध आहे. देशात मराठा, बंजारा, वडार, भोई समाजाची लोकसंख्या किती आहे ही माहिती संगणकामध्ये फिड केलेली आहे. हा विषय सोडविण्याच्या दृष्टीकोनातून मी आपल्याला हे सांगत आहे आणि तुमच्याकडे दुसरा कोणता उपाय देखील नाही.

सभापती महोदय, राष्ट्रीय मागसवर्ग आयोगाने नुकताच एक अहवाल दिलेला आहे. त्यांनी सांगितले की, ओबीसी 27 टक्के आहेत, त्याचे 3 भाग करावेत. एक म्हणजे भटके विमुक्त, दुसरे म्हणजे मोस्ट बॅकवर्ड क्लास, त्यामध्ये न्हावी, धोबी, लोहार, सुतार, सोनार, माळी, तेली आणि तिसरे म्हणजे उर्वरीत कुणबी, मराठा समाज असे 3 भाग करावेत. महाराष्ट्रात 70 टक्के कुणबी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड.....

समाजाच्या लोकांनी ऑलरेडी मराठा असल्याचे ओबीसी सर्टिफिकेट घेतले आहे. मी तर असे म्हणेन की, माननीय श्री.मोहन भागवत साहेबांनी जे सांगितले ते एका अर्थाने बरोबर आहे. आपण त्यावर राजकारण करु नका. तुम्ही नीट उत्तर दिले नाही. माननीय श्री.मोहन भागवत साहेबांनी असे म्हटले की, रिव्ह्यू दी करप्शन आणि हरिभाऊ राठोड देखील तेच सांगत आहे. आपण रिव्ह्यू घ्यावा. देशात युपीएससी मार्फत आयएएस, आयपीएस, आयआरएस अधिकाऱ्यांची 1300 पदे भरली जातात. म्हणजे यातील जवळपास 350 पदे ओबीसी समाजाला मिळाली पाहिजेत. 1300 पदांमध्ये वडार, भोई, कोळी, गोवारी, बंजारा, वंजारी, मसनजोगी, नंदी बैलवाले, तेली, तांबोडी, बेलदार समाजाचे लोक किती आहेत ? कोठे आहेत आमचे हे बंधू ? तुम्ही याबाबत का विचार करीत नाही ? डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी काय म्हटले होते ? त्यांनी म्हटले होते की, समानता असावी. कायद्यासमोर सर्व समान आहेत. देशातील सर्व नागरीक समान आहेत. त्यांनी असे म्हटले होते की, समान याचा अर्थ Equal should not be treated with unequal. समानांबरोबरच समानांची तुलना केली पाहिजे. तुम्ही समानांची असमानांबरोबर तुलना करु नका. डॉ.बाबासाहेबांनी हे स्पष्ट केलेले आहे. म्हणून राष्ट्रीय मागासवर्ग आयोग, नॅशनल बॅकवर्ड क्लास कमिशनच्या शिफारशी लागू केल्या तर धनगर, गोवारी, मराठा, भटक्या विमुक्त समाजाचा प्रश्न सुटेल. हे मी सांगत नाही. घटनेच्या अनुच्छेद 340 नुसार राष्ट्रीय मागासवर्ग आयोग स्थापन करण्यात आला आहे आणि जस्टीस इश्वर्य त्या आयोगाचे अध्यक्ष आहेत. त्यांनी हा रिपोर्ट दिलेला आहे. आपण तो रिपोर्ट बघावा. तो रिपोर्ट नेटवर उपलब्ध आहे. भारतीय जनता पार्टीची जी डोकेदुखी आहे ती दूर होईल. आम्हाला आरक्षण पाहिजे. तुम्ही सेड्युल ट्राईब "अ", "ब" आणि "क" असे 3 भाग करावेत. भटक्या विमुक्तांचा समावेश सेड्युल ट्राईब "अ" मध्ये करावा. धनगर, वडार, कोळी समाजाचा समावेश सेड्युल ट्राईब "ब" मध्ये करावा आणि उर्वरीत ओबीसी असे करावे. हा महत्वाचा प्रश्न आहे. आपण सर्वांनी याचा विचार केला पाहिजे. मुख्यमंत्री महोदयांनी हे माननीय पंतप्रधानांच्या निदर्शनास आणून द्यावे. योगायोगाने माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेब तेली समाजाचे आहेत. तेली समाज मोस्ट बॅकवर्ड क्लासमध्ये मोडतो. म्हणजे त्यांचेही काम मलाच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड.....

करावे लागत आहे. (...अडथळा...) तुम्ही म्हणता तसे नाही. आपले नेते आज प्रपोजल घेऊन दिल्लीला गेलेले आहेत. मी त्यांचे नाव घेणार नाही. त्यांनी माझ्याकडून माहिती घेतली. हा महत्वाचा प्रश्न आहे. www.haribhaurathod.org या संकेतस्थळावर मी माहिती अपलोड केलेली आहे. आपण त्याचा अभ्यास करावा आणि हे प्रश्न सोडवावेत. हे प्रश्न नक्कीच सुटतील. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटना लिहिताना आर्थिक, सामाजिक असा ठराव मांडला होता. मघाशी सरांनी सांगितले की, आम्हाला आर्थिक न्याय मिळालेला नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते की, शेती आणि उद्योग यांचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे. कोठे झाले राष्ट्रीयीकरण ? त्यावेळी काही लोकांनी ते ठरावात देखील येऊ दिले नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी त्याबद्दल नापसंती व्यक्त केलेली आहे आणि ते जर झाले असते तर आज गरीब, श्रीमंत ही जी दरी आहे ती निश्चितपणे दूर झाली असती. परंतु, ते होऊ शकले नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बॅकर्ले यांचे उदाहरण दिले होते. सत्ता देणे सोपे आहे. परंतु, शहाणपण देणे कठीण आहे. आम्ही तुम्हाला सत्ता दिली. पण तुम्हाला शहाणपण कोण देणार ? ते कठीण आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नीतिमत्तेबद्दल सांगितले होते. नीतिमत्ता महत्वाची आहे. म्हणून तुम्ही योजना आयोगाचे नाव बदलून नीती आयोग केले, कदाचित ते हेच असेल. आपण नीतिमत्ता जागेवर ठेवावी. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू समाजावर मोठे उपकार केलेले आहेत. ते म्हणाले होते की, मी हिंदू म्हणून जन्मलो, परंतु मी हिंदू म्हणून मरणार नाही. त्यांनी मुस्लिम धर्म स्वीकारला नाही. त्यांनी मुस्लिम धर्म स्वीकारला असता तर तुमचे काय झाले असते याचा विचार करावा ? डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे हिंदू समाजावर खूप उपकार आहेत. (...अडथळा...) आमचा धर्म कोणता आहे हेच आम्हाला माहीत नाही....

उप सभापती : आता सन्माननीय सदस्य श्री.धनंजय गाडगीळ यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते की, भटक्या विमुक्त समाजासाठी बजेट असले पाहिजे. परंतु, भटक्या विमुक्त समाजासाठी बजेट नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड.....

मी आपल्याला संविधानाचा भाग सांगत आहे. संविधानामध्ये तशी तरतूद आहे. घटनेतील अनुच्छद 338 नुसार....

उप सभापती : आपण कृपया आता थांबावे. मी सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, मी आपल्याला संविधानातील तरतूद वाचून दाखवितो.

उप सभापती : संविधानातील तरतुदी आमच्याही तोंडपाठ आहेत.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, अंमलबजावणी होत नाही, हा मूळ मुद्दा आहे. म्हणून तर आम्हाला भारतीय जनता पक्षाच्या हाती सत्ता द्यावी लागली.

..2S-1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हरिसिंग राठोड...

दलित समाजाला सामाजिक, आर्थिक न्याय देण्यासाठी सत्ताधारी पक्षातील लोक सुधारले तर विरोधी पक्षातील लोक देखील सुधारले पाहिजेत. जे वातावरण तुम्ही निर्माण केले त्यातून तुम्हाला आता परमेश्वरच वाचविणार आहे. फक्त तुम्ही 27 टक्क्याचे विभाजन करा. बाबासाहेब आंबेडकरांचे हे सामाजिक न्याय वर्ष आहे, या वर्षात मागासवर्गीय लोकांना न्याय द्यावा, अशी मागणी करतो व माझे भाषण संपवितो, धन्यवाद, जयभिम, जय सेवालाल.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की, प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी दहा मिनिटांचा वेळ ठरवून दिलेला आहे, त्यामध्ये देखील दोन किंवा पाच मिनिटे आपण वाढवून देतो. त्यानंतर सदस्यांना सूचना देऊन देखील सदस्य खाली बसत नसतील तर हे बरोबर नाही.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत गाडगीळ (नामनियुक्त) : सभापती महोदय, हा विषय आज सकाळी आमच्याकडे चर्चेला आला, तेव्हा सर्व समाजाच्या आमदारांनी या विषयावर विचार व्यक्त करावेत असा एक विचार आम्ही केला होता. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते नव्हते. मी म्हटले की, डॉ. बाबासाहेबांना फक्त दलितांपुरते मर्यादित ठेऊ नका. कारण ते सर्व समाजाचे नेते आहेत. मला एक पूर्व इतिहास या निमित्ताने सांगावासा वाटतो, काही सन्माननीय सदस्यांना माहिती नसेल, पुणे येथे ऐतिहासिक पर्वतीचे मंदिर आहे, ते दलितांना खुले नव्हते, ते मंदिर दलितांना खुले करण्याचा संघर्ष माझे आजोबा काकासाहेब गाडगीळ यांनी केला होता. त्यावेळी त्यांचे डोके फोडण्यात आले होते, आमच्या घरावर सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला होता. परंतु त्या विचारांपासून आम्ही मागे हटलो नाही, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी काकासाहेब गाडगीळ यांचा घटना समितीमध्ये समावेश केला होता. डॉ.बाबासाहेब यांनी लिहून ठेवले आहे की, काकासाहेब गाडगीळ यांनी घटना समितीमध्ये मला अतिशय मोलाचे सहकार्य केले आहे.

सभापती महोदय, स्व. राजीव गांधी यांनी 74 वी घटना दुरुस्ती केली, त्याचे शीर्षक त्यांनी 'Power to the People' घेतले होते. यामध्ये आजचे महामहीम राष्ट्रपती व त्यांच्या सोबत राजीव गांधी यांनी माझ्या वडीलांचा समावेश केला होता. त्यावेळी राजीव गांधी यांनी सांगितले होते की, बाबासाहेबांच्या घटनेच्या मूळ मसूद्याला हात न लावता सर्व सामान्य लोकांच्या हातामध्ये सत्ता कशी देता येईल असे आपण करायला पाहिजे. त्या अनुषंगाने 74 वी घटना दुरुस्ती करण्यात आली आहे. आंबेडकर घराण्याचा आणि आमच्या घराण्याचा तीन पिढ्यांचा संबंध आहे, माझे वडील राजकारणात येण्यापूर्वी मुंबईच्या हायकोर्टात होते, त्यावेळी माझे बालपण दादरमध्ये गेले. एक घर सोडून राजगृह हे बाबासाहेबांचे राहते घर आहे, मी लहानपणी त्या ठिकाणी खेळलो आहे. त्यामुळे माझ्यावर आंबेडकरी विचारांची पकड व आहे, मी या ठिकाणी आवर्जुन उल्लेख करतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना काँग्रेसने दलित म्हणून नव्हे तर न्यायशास्त्रातील व राज्यशास्त्राचा गाढा अभ्यास असलेली व्यक्ती म्हणून घटना समितीच्या प्रमुख पदी नेमले होते. त्यांची विद्ववत्ता व त्यांचा व्यासंग पंडित नेहरु यांनी ओळखला होता. वास्तविक घटना समितीमध्ये माझ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत गाडगीळ...

आजोबांसोबत अयंगार, मुंशी, गोपालस्वामी होते, या सर्वांचे नेतृत्व काँग्रेस पक्षाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दिले.

सभापती महोदय, काही माणसे संस्था व पदांमुळे मोठी होतात, परंतु अशी फार कमी संस्था व पदे असतात की, जे माणसांमुळे ओळखली जातात, भारताची घटना हे त्याचे उदाहरण आहे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे घटनेमुळे नव्हे तर भारताची घटना ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे जगात ओळखली जाऊ लागली याचा मला आवर्जुन उल्लेख करावासा वाटतो. भारताचे संविधान हे अनेक वर्षाच्या संघर्षाचे प्रतिक व फलित आहे. लोकसभेत ज्या वेळी हा विषय आला त्यावेळी काँगेसच्या अध्यक्षा माननीय श्रीमती सोनिया गांधी अशा म्हणाल्या की, यह संविधान लोकतंत्र और कानून के राज का सामाजिक न्याय और सशक्तिकरण हमारे देश की एकता को मजबूत करने के साथ साथ हमारी अनेकताओं का अभिनंदन करने वाला यह दस्ताऐवज है. संविधानाची ताकद काय आहे, स्वातंत्र्यानंतर 10 ते 15 बदल घटनेत करण्यात आले आहेत, घटनेच्या मुळ गाभ्याला व ढाच्याला प्रिअंब्लला कोणालाही हात लावता आलेला नाही. डॉ.बाबासाहेब यांनी तयार केलेल्या घटनेची ताकद काय आहे, ज्या प्रवृत्तीनी व विचारांनी घटना मानली नाही, त्यांनाच आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाची पायाभरणी करावी लागत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा हा विजय आहे, आज तुम्हाला त्यांना वंदन करावे लागत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची निर्मिती झाली ती प्राब्लेम ऑफ रूपी त्यांचा अथ: आहे, मार्क आणि बुध्द ही त्यांची इती आहे. आज दुर्दैवाची बाब अशी आहे की, डॉ.बाबासाहेबांनी दिलेल्या घटनेचा आदर्श आणि सिध्दांत यावर आता हल्ला होत चालला आहे, बाबासाहेबांच्या विचारावर अप्रत्यक्ष हल्ला होत चालला आहे, ज्याचा उल्लेख "The largest democracy in the World" केला जातो. या भारताची लोकशाही ही साचेबंद साच्यातून चालत आले असून देशाचा गाडा 50 ते 60 वर्षापासून चालू राहिला आहे. त्याचे श्रेय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना द्यावे लागणार आहे. राज्य व केंद्राच्या म्मंत्रिमंडळाला निर्णयाचे स्वातंत्र्य असले तरी मंत्रिमंडळ हे विधिमंडळास जबाबदार आहे, हे घटनेने स्वीकारले आहे. याचा उल्लेख मी या निमित्ताने करीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनंत गाडगीळ...

आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दादासाहेब गायकवाड यांना काही पत्र लिहिली होती. त्यांचे पुस्तक मी वाचले तेव्हा त्यातील एका गोष्टीमुळे मी अतिशय भारावून गेलो. त्यामध्ये असा उल्लेख आहे की, आपल्या देशातील राज्यकर्त्यांनी किंवा सत्ताधाऱ्यांनी काश्मिरच्या प्रश्नावर नीट लक्ष दिले नाही तर हा प्रश्न हाताबाहेर गेल्याशिवाय राहणार नाही. 30 ते 40 वर्षापूर्वीचे बाबासाहेबांचे विचार त्यांनी केलेला अंदाज आज खऱ्या अर्थाने सिध्द होत आहे.

सभापती महोदय, मला दिलेल्या वेळेत मी भाषण संपवित आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त मी अभिवादन करतो. मघाशी आमच्या मित्रांनी एक शेर सांगितला होता,त्या अनुषंगाने मी एक शेर सांगून मी थांबणार आहे. "पत्थर के जिगर वालों गम में वह रवानी है, खुद रहा बना देगा वह बहता हुआ पानी है." धन्यवाद, इतके बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.महादेव जानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125 व्या जयंतीचे औचित्य साधून आंबेडकर आणि संविधान या विषयावर चर्चा घेण्यात आली त्याबद्दल राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने मी बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना देतो. बाबासाहेबांनी या देशाला घटना दिली. आम्हाला हायस्कूलमध्ये शिकत असताना नागरिकशास्त्रातून संविधान माहित झाले. या देशाचे पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक शाळा कॉलेजमध्ये संविधान काय आहे हे शिकविण्याचा निर्णय घेतला त्याबद्दल मी राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना लिहिली. घटना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद होते व ड्राफ्ट समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर होते. बाबासाहेबांनी दलितांसाठी काम केले असे म्हणणे त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल. बाबासाहेबांनी या देशात इरिगेशन, इलेक्ट्रिसिटी या सर्व अंगासाठी काम करण्याची भूमिका स्वीकारली. बाबासाहेबांचे एक वाक्य मला आजही आठवते. बाबासाहेब म्हणाले होते की, मी कितीही चांगला ग्रंथ लिहिला असला तरी तो ग्रंथ जर कायदा राबविणाऱ्याची नियत सही नसेल तर त्याचा उपयोग होणार नाही. आंध्रप्रदेश राज्यातील बंजारा किंवा धनगर तेथे आदिवासी समजला जातो आणि शाहु, फुले, आंबेडकरांचा जप करणाऱ्यांच्या या महाराष्ट्रात 65 वर्षात हा समाज ओबीसीमध्ये आहे, ही विसंगती वाटते.

सभापती महोदय, मी माननीय श्री.मोहन भागवत यांचे स्वागत करतो. रिझर्व्हेशन पॉलिसीचा आढावा घेतला पाहिजे. याचे कारण असे की, आंबेडकरी चळवळ आम्ही काशिराम यांच्याकडून शिकलो. आजही या देशातील संविधा मसनजोगी यांना लागू आहे का? ज्यांनी शाहु, फुले, आंबेडकरांचे नाव घेऊन राज्य केले त्यांनी हा समाज वंचित का ठेवला याचे उत्तर दिले पाहिजे. ज्यांनी बाबासाहेबांचा जप केला, फुले, शाहुंचा जप केला आणि 65 वर्षे राज्य केले, त्यांच्या राज्यात आजही या समाजाला आरक्षण मागावे लागत आहे. आमची व्यथा आजही आहे. मी माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांना धन्यवाद देतो. त्यांनी प्रिअॅम्बल काय असते हे प्रत्येक मुलाला शिकविण्याचा निर्णय घेतला. मला मंत्री पद नको. I am hostory maker.

सभापती महोदय, बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत जी चर्चा केली त्यात कास्ट, क्रेडिट आणि सोशॅलिझमचा समावेश होता. त्या कास्टची आज काय अवस्था आहे. 65 वर्षानंतर सुध्दा कोणत्या जाती कुठे आहेत याचा पासवर्ड पास झाला नाही. हे आमचे फेल्युअर आहे असेल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17-12-2015 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) TT.2

SGB/ ST/ ST/ 20:00

श्री.महादेव जानकर....

तर त्याबाबत उपाययोजना सुचविली पाहिजे. संविधान चांगले आहे त्याचे मी स्वागत करतो. परंतु ज्या समाजावर अन्याय झाला, त्याच्याबाबत चर्चा करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बाबासाहेब आंबेडकरांना राष्ट्रीय समाज पक्षातर्फे जय मल्हार करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.हुस्नबानू खलिफे)

ॲड.रामहरी रूपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, संविधानावरील चर्चेमध्ये अनेकांनी अतिशय चांगली भाषणे केली केली, आपल्या सगळयांना चांगले ज्ञान मिळाले. या विषयावर मी माझे मत मांडणार आहे. आजची तारीख 17 डिसेंबर, 2015 आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बरोबर 69 वर्षापूर्वी दिनांक 17 डिसेंबर, 1946 रोजी संविधानावर भाषण केले. हा योगायोग आहे. अतिशय चांगल्या वातावरणात चर्चा सुरु आहे. हा चांगुलपणा समाजामध्ये वाढीस लागला पाहिजे ही बाबासाहेबांची इच्छा होती. मी संविधानाबद्दल आदर व्यक्त करतो. संविधानामुळे सर्व समाज एकत्रित येण्याचा आणि समानता आणण्याचा प्रयत्न झाला त्यामुळे देशात क्रांती झाली. याचे परिणाम आपण सर्वजण पहात आहोत. संविधानामुळे सर्वांना समान न्याय, समान हक्क आणि समानता मिळाली. पण संविधानामुळे समाजात दुसरी एक गोष्ट घडली ती आपण विसरता कामा नये. भारत स्वतंत्र झाला त्यावेळी 651 संस्थानिक उठून उभे राहिले आणि आमचे राज्य, आमचे राज्य सांगू लागले. त्यावेळी संपूर्ण देशात रेल्वे कशी न्यायची हा पेच निर्माण झाला.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सभागृहात संविधानावर चर्चा सुरु असताना एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत, त्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यात यावे.

श्री.रवींद्र वायकर : सभापती महोदय, कॅबिनेटची बैठक सुरु आहे. ती संपल्याबरोबर कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित राहतील.

तालिका सभापती : माननीय सदस्य ॲड.रामहरी रूपनवर यांचे भाषण पूर्ण होऊ द्यावे.

ॲड.रामहरी रूपनवर : सभापती महोदय, संविधानामुळे आपल्या सर्वांना समान न्याय मिळाला. संविधान झाले त्यावेळी असे वाटले होते की, हे एकसंघ राज्य कसे चालणार आहे, केंद्र आणि राज्य सरकारचे संबंध कसे राहतील, न्यायालयीन प्रक्रिया नीट चालेल का? अशा अनेक कल्पना मनात होत्या. परंतु भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि संविधान स्वीकारले त्यानंतर लोकशाही राज्य निर्माण झाले.

.....2यू.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रूपनवर....

पण आज 127 देशांमधील कॉन्स्टीटयूशन कोलॅप्स झालेले आहे. भारताचे संविधान मात्र संपूर्ण जगामध्ये आदर्श ठरलेले आहे. जगाने भारताच्या संवधिानाचा अतिशय चांगल्या प्रकारे उल्लेख केलेला आहे. आज जगामध्ये लोकशाही राष्ट्रातील संविधानाबद्दल बोलले जाते त्यावेळी भारताच्या संविधानाचा उल्लेख केला जातो. आपल्या घटनाकारांचे योगदान जगाने मान्य केले आहे. त्याबद्दल आपल्या देशातील लोकांसंबंधी देखील फार मोठी संवेदनशीलता, अतिशय आदर आणि नम्रता प्रतीत केली पाहिजे. त्याचाच एक भाग म्हणून आपण ही चर्चा आयोजित केली आहे.

संविधानामुळे अनेक लोकांना अनेक संधी मिळाल्या, न्याय मिळाला. जगामध्ये कधीच नसलेली राज्य व्यवस्था निर्माण करणे आणि ती राबविणे हे पहिल्यांदा होत होते. त्यामुळे सुरूवातीला शंका होत्या. आपण या संविधानानुसार 100 टक्के हा देश चालविण्यात यशस्वी झालो आहे काय, तर त्याला उत्तर 80 टक्के यशस्वी झालेलो आहोत असे आहे. ही काही साधी जमेची बाजू नाही. हजारो वर्षे राजे-राजवाड्यांच्या नियंत्रणाखाली हा देश राहिला होता. त्यावर झालेले संस्कार सोडून लोकांनी, लोकांसाठी, लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडून चालविलेले राज्य अस्तित्वात येणे हे फार कठीण काम होते. कुठलीही तक्रार न होता रक्ताचा एक थेंब न सांडता आपण केले. रक्ताशिवाय स्वांतंत्र्य नाही आणि रक्ता शिवाय राज्य मिळणार नाही ही ज्या देशामध्ये कल्पना होती, त्या देशामध्ये रक्ताचा एक थेंब न सांडता संपूर्ण देश लोकशाहीमध्ये परिवर्तीत झाला. एक सरकार दुसऱ्या सरकारला राज्य ताब्यात देते आणि विरोधकाची भूमिका स्वीकारते. त्यांना राज्य चांगल्या प्रकारे करू देते. हे संविधानाचे फलित आहे. एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाकडे राज्य जाते आणि त्यांना राज्य करू दिले जाते. मागची कुठलीही सूडबुद्धीची भावना न ठेवता विरोधकही सत्ताधाऱ्यांना सहकार्य करतात आणि पूर्वीचे विरोधक सत्तेत आल्यामुळे कुठेही उन्माद न करता कायद्याच्या चौकटीत बसून राज्य करतात. याचे सर्व श्रेय हे संविधानाला जाते. आपल्या राज्यात अनेक वेळा परिवर्तन झाले. देशात परिवर्तन झाले. पण कोणीही सत्ता हातामध्ये घेऊन बंड करण्याचा प्रयत्न केलेला नाही किंवा दुसऱ्याला चिरडून टाकून आपली सत्ता कशी राहील याचा प्रयत्न केलेला नाही. लोकशाहीला माणून आपापल्या पक्ष संघटना मजबूत करून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रूपनवर....

पुन्हा जनतेमध्ये जाऊन जनादार घेऊन सत्तेत येण्याचा प्रयत्न करतात. ही जगातील सर्वात आदर्श लोकशाही संविधानामुळे आहे. ती परंपरा आपण टिकविली पाहिजे. यात दोष नव्हेत काय तर ते होते. ते दुरूस्त करण्याचा देखील प्रयत्न केला. आपल्याला संविधान घटनाकारांनी दिलेले आहे. पण त्यानंतरच्या लोकांनी सुद्धा यामध्ये सुधारणा करून आणखी बळकट करण्याचा प्रयत्न केला. पुढच्या काळात देखील ते अधिक बळकट करण्याची गरज आहे. आपली घटना कशावर संदर्भीत होती ते मी आपणास सांगणार आहे. "आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस, सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता, निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा गांभीयपूर्वक निर्धार करून, आमच्या संविधान सभेत आज दिनांक 26 नोव्हेंबर 1949 रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहेत." ही आपल्या संविधानाची उद्देशिका आहे. ही उद्देशिका लिहिल्यानंतर एक गोष्ट नमूद केली होती. यात बाबासाहेबांनी भविष्यात काय घडेल हे लिहून ठेवले आहे. त्यावर कोणीच बोलले नाही. काही गोष्टींचा धोका बाबासाहेबांनी भाषणात सांगितला होता. बाबासाहेब आपल्या भाषणात म्हणतात की, "आपल्या समोर असलेल्या अवघड, जिकिरीच्या कामाबद्दल माझ्या या प्रतिक्रिया आहेत. काहींना कदाचित त्या फार आनंददायी वाटणार नाहीत. या देशात राजकीय सत्ता ही मूठ भर लोकांची मक्तेदारी राहिली आहे आणि बहुतांश लोक हे केवळ ओझे वाहणारे प्राणीच नव्हे तर भक्ष्य स्थानी असलेले प्राणी झाले आहेत हे कोणालाही नाकारता येणार नाही. या मक्तेदारीने त्यांना केवळ विकासाच्या संधी पासून वंचित ठेवले आहे असे नव्हे तर मानवी जीवनाचे महत्वही कळणार नाही इतका त्यांचा नि:पात केला आहे." हे पण संविधानानंतर घडते आहे हे ही बाबासाहेबांनी सांगितले आहे. "पददलित वर्ग

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रूपनवर....

त्यांच्यावर होत असलेल्या हुकूमतीला कंटाळले आहेत. स्वत:चे राज्य करण्यासाठी ते आता आतूर झालेले आहेत. पददलित समाजातील लोकांमध्ये निर्माण झालेल्या या तीव्र आकांक्षा, वर्ण संघर्ष आणि वर्ग युद्ध होण्या इतपत वाढू देता कामा नये याची काळजी घेतली पाहिजे. त्याचा परिणाम घर दुभंगण्यामध्ये होईल. तो निश्चितपणे विनाशकारक दिवस असेल. अब्राहम लिंकन याने म्हटल्याप्रमाणे दुभंगलेले घर अधिक काळ टिकू शकत नाही. त्यांच्या आकांक्षापूर्तीसाठी जेवढ्या लवकर संधी उपलब्ध करून देता येतील तेवढे ते मूठभरांच्या हिताचे, देशाच्या हिताचे, त्यांच्या स्वतंत्र्यांच्या रक्षणार्थ आणि लोकसत्ता संघ रचना टिकून राहण्यासाठी अधिक उपयुक्त ठरणार आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात समता आणि बंधुता प्रस्थापित करण्यानेच हे शक्य होणार आहे आणि त्यामुळे मी त्यांच्यावर इतका भर दिलेला आहे." हे बाबासाहेबांच्या भाषणातील वाक्य आहे. आता नेमके तेच घडत आहे. बाबासाहेबांची 125 वी जयंत साजरी करण्यासाठी माझ्याकडे काही जण आले होते. मी त्यांना सांगितले की, आमचा पाठिंबा आहे. आम्ही आपल्या कार्यक्रमाला येणार आहे. पण आपल्या कार्यक्रमातील उद्देश असा असला पाहिजे की, बाबासाहेबांनी ज्या दृष्टिकोनातून काम केले, संविधान लिहिले व ज्या समाजाला उंचावर नेण्याचा प्रयत्न केला ते सगळे प्रयत्न संपलेले नाहीत, ते आपण पूर्ण करावयाचे आहे. वयाच्या मर्यादा असल्यामुळे बाबासाहेबांकडून अनेक गोष्टी राहून गेल्या. बाबासाहेबांमुळे आपण एवढ्या उंचीवर आलो असू तर त्यांचे अपूरे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प तमाम भारतीयांनी त्यांच्या 125 व्या जयंतीनिमित्त केला पाहिजे. जे जे बाबासाहेब प्रेमी आहेत त्यांनी जे जे बाबासाहेब करू शकले नाही ते काम त्यांनी पूर्ण केले पाहिजे असे माझे म्हणणे आहे. बाबासाहेब हे कदाचित मानवजातीच्या कल्याणासाठी परमेश्वराचा अवतार देखील असू शकतील. तेव्हा त्यांचा वारसा घेऊन आपण त्यांचे विचार रेटणार आहात की नाही ? आपण पुन्हा दुसरे बाबासाहेब निर्माण करणार आहात की नाही? तसा संकल्प आपण बाबासाहेबांच्या 125 व्या जयंती निमित्ताने केला पाहिजे. आता जे बाबासाहेबांसारखे वागत आहेत त्यांना आपण सहकार्य केले पाहिजे. बाबासाहेबांना काम करताना अडथळे आले. पण बाबासाहेबांचे विचार घेऊन आज जे चालले आहेत त्यांना आता तरी ताकद देण्याचे काम आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रूपनवर....

करू या. बाबासाहेबांना पाणी दिले नाही. पण आता एखादा काम करीत असेल तर त्याला चहा देऊ या. जे आता बाबासाहेबांच्या विचाराने चालले आहेत त्याला आता चहा द्यायला काय हरकत आहे ? आजही त्या माणसाची तीच अवस्था आहे. आजही समाज फार उंचीवर गेला आहे असे नाही. आजही मागासवर्गीयांकडे बघण्याचा दृष्टिकोन तोच आहे. आज त्याच्याकडे कोणती आर्थिक सुबत्ता आहे ? थोडे घर वेगळे रहायला मिळाले आहे आणि अस्पृश्यता नष्ट झाली एवढेच आहे. पण बाकी समानता कुठे आली आहे ? यात डोंगरा एवढे कार्य करण्याचे राहिलेले आहे. ते आपण करायला सुरूवात केली पाहिजे. बाबासाहेबांच्या ज्या इच्छा-आकांक्षा होत्या त्या आपण पूर्ण केल्या पाहिजेत.

सभापती महोदय, घटनेमध्ये मागासवर्गीयांसाठी बाबासाहेबांनी जो संकल्प केला होता, तरतुदी केल्या होत्या त्या तरी आपण अंमलात आणल्या काय ? ज्यांच्या हातात सत्ता आली तेवढ्या पुरत्याच त्या अमलात आणल्या आहेत. ज्यांचे कोणीच प्रतिनिधीत्व करीत नव्हते, घटनेचा अर्थ काढायला तेथे कोणी बसले नव्हते त्यांच्यावर अन्यायच झाला.

UU-1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

ॲड.रामहरी रुपनवर....

त्यांच्यावर अन्यायच झाला. येरवडा येथे ज्या अस्पृश्य जाती होत्या त्यांची एससीची एक लिस्ट बनविण्यात आली. ज्या आदिवासी सदृष्य जाती होत्या त्यांची एसीसची लिस्ट बनवली गेली त्याला बिबलोग्राफी सूची म्हणतात. घटनेच्या शेड्यूल 2 मध्ये बाबासाहेबांनी त्यांची नावे घातली आहेत. एससी,एसटीमध्ये कोण कोण आहेत त्या सर्वांची नावे घातली. एससी आणि एसटीचे जे 110 टक्के निकष पूर्ण करीत होते त्यांचीच यामध्ये नावे आली. ज्यांचे 100 पेक्षा कमी निकष होते त्यांचा पुन्हा विचार करुन घालता येईल असा निर्णय घेण्यात आला. परंतु जे लायकीचे होते त्यांचीच नावे एससी,एसटीमध्ये घातली गेली. मी आपल्या सर्वांना नम्रपणे निवेदन करतो की, एसटीच्या 47 लोकांची यादी केली त्यातील 36 नंबरला धनगर समाजाचे नाव बाबासाहेबांनी घातले होते. त्यांनी संपूर्ण घटना समितीसमोर धनगर समाज एसटीमध्ये का आहे यासंदर्भात एक डिबेट केले होते. बाबासाहेब स्वत: मेंढरांच्या कळपात झोपले होते. पायगुढे यांनी त्यांना संपूर्ण परिसरात फिरवले होते. स्वातंत्र्यांच्या अगोदरची बाबासाहेबांना दु:खे माहिती होती. धनगर समाजाचे घोडयावरुन धेऊन जाणाऱ्या कोंबडया,लंगोटीवर राहणारी लोकं हे सर्व आदिवासी सदृष्य आहे हे बाबासाहेबांना माहिती होते. धनगर समाज एसटीमध्ये आला पाहिजे यासंदर्भात घटना समितीसमोर त्यांनी एक खास विचार मांडून संपूर्ण घटना समितीला ते पटवून दिले आणि धनगरांचे नाव एसटीमध्ये घातले. नाव घालतांना गुडगाव लिहितांना गुरगाव, एकर लिहितांना एकड, जाकर लिहितांना जाकड तसेच धनगर लिहितांना धनगड लिहिले. त्यामुळे धनगडाला एसटीचा लाभ आहे परंतु धनगराला एसटीचा लाभ मिळालेला नाही. संविधानाचा चुकीचा अर्थ कोणी काढला ? हे सर्व धनगर समाजाला मागे ठेवण्यासाठी करण्यात आले आहे. धनगराचा प्रतिनिधी नसल्यामुळे हे सर्व झालेले आहे. धनगराचा लोकसभेत खासदार नव्हता,विधानसभेत आमदार नव्हता व त्याचा गैरफायदा पुढे घटना चालविणाऱ्यांनी किती घेतला याचा विचार केला पाहिजे. त्यामुळे बाबासाहेबांच्या घटनेला आपण कोठे घेऊन चाललो आहोत हे बघण्याची गरज आहे. बाबासाहेबांच्या घटनेचा अर्थ सगळया समाजाला समानता देण्याचा असताना, बाबासाहेबांच्या म्हणण्याप्रमाणे सर्व समाजाला न्याय देण्याचा अर्थ असताना बाबासाहेबांच्या घटनेचा वापर कोणी एखाद्या समाजावर अन्याय करण्यासाठी करीत असेल तर तो किती चुकीचा आहे यावर खरे म्हणजे चर्चा झाली पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.रामहरी रुपनवर....

सभापती महोदय, काल बिहार सरकारचे मुख्यमंत्री श्री. नितीश कुमार यांनी भाषा विभाग मराठीला आदेश केला की, धनगर आणि धनगड यामधील फरक सांगा. त्यावेळेस त्यांनी धनगर आणि धनगड हे दोन्ही शब्द एकच असल्याचे सांगितले व तेवढयावरच बिहार सरकारने धनगरांना एसटीच्या शिफारसी लागू केल्या. झारखंड,ओरिसा आणि सर्व राज्यात धरगनरांना एसटीच्या सवलती लागू झाल्या आहेत. परंतु इतर राज्यात जे घडते ते महाराष्ट्रात घडते का? अगोदर हे सुध्दा म्हणत होते की, धनगर आणि धनगड एकच आहेत.

सभापती महोदय, घटनेचा अर्थ नीट लावला पाहिजे. आपण जेव्हा संविधानावर बोलतो त्यावेळेस संविधानाने कोणा कोणाला काय दिले आहे ते ज्याच्या त्याच्या नशिबाने किंवा घटनाकारांनी विचार करुन दिलेला आहे. त्यामुळे ते त्यांना मिळाले पाहिजे. हे बाबासाहेबांच्या 125 व्या जयंतीच्या दिवशी तरी बोलले पाहिजे. बाबासाहेबांच्या अनुयायांनी यासाठी पुढे आले पाहिजे आणि जे जे संविधानावर आणि घटनेवर प्रेम करतात त्या सर्वांनी याचा आदर केला पाहिजे, घटनेचा सन्मान केला पाहिजे. संविधान चांगलेच आहे. संविधान नसते तर आपणच नसतो परंतु संविधान चांगले आहे, त्यातून कोणाचे वाईट होते आहे काय, कोणावर अन्याय होतो आहे काय हे आपण बाबासाहेबांच्या 125 व्या जयंती महोत्सवानिमित्त बघितले पाहिजे आणि त्या प्रमाणे कार्यवाही केली पाहिजे एवढेच सांगतो आणि बाबासाहेबांना तसेच संविधानाला वंदन करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद,जय महाराष्ट्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या चर्चेला आपण प्रथम अडीच तासाची वेळ दिली होती परंतु या चर्चेला आपण चार तासापेक्षा अधिक वेळ दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. 26 आणि 27 नोंव्हेबरला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती निमित्त केंद्रामध्ये चर्चा झाली होती. केंद्रामध्ये जी चर्चा झाली ती चर्चा मी ऐकली होती. त्या ठिकाणी बसलेल्या विद्वानांनी चांगली आणि सुदृढ चर्चा केली होती त्याबद्दल त्यांनाही मी धन्यवाद देतो. या ठिकाणी ही चर्चा घडवून आणल्याबद्दल माननीय मुख्यमंत्री, आपल्याला आणि सभागृहाला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, या चर्चेवर केवळ गट नेत्यांनाच बोलू द्यावयाचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु या चर्चेवर जवळपास सर्व सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. गाडगीळ यांनी म्हटल्या प्रमाणे सर्वांनी या चर्चेत भाग घेतला व चांगली चर्चा केली. मी सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड व ॲड.चांदूरकर साहेबांना धन्यवाद देईन. या चर्चेमध्ये आपण लॉजिक आणि स्टॅटेस्टीक मांडले त्यामुळे आपल्यालाही धन्यवाद देतो.

सभापती महोदय, विषयाची पुनरावृत्ती न करता मी माझे विचार थोडक्यात मांडणार आहे. डॉ.बाबसाहेब आंबेडकरांनी घटना समितीपुढे दिनांक 17 डिसेंबर रोजी पहिले भाषण केले होते. तेथे 26 आणि 27 नोव्हेंबरला महत्व आहे तसे या ठिकाणी 17 डिसेंबरलाही महत्व आहे व या चर्चेत माझे विचार व्यक्त करण्याची मला संधी मिळाली हे मी माझे भाग्य समजतो.

सभापती महोदय, दिनांक 30.8.1946 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष बनले होते. दि.9.12.1946 रोजी मसुदा समितीच्या कामकाजाला सुरुवात झाली. घटना पूर्ण होण्यासाठी 2 वर्ष 11 महिने व 17 दिवस लागले होते. भारतीय घटनेमध्ये 395 कलमे आणि 8 परिशिष्टये आहेत. दिनांक 26.11.1949 रोजी देशाने घटना स्वीकृत केली आणि 26.11.49 पासून घटनेचा अंमल सुरु झाला. या समितीवर 7 सभासद होते परंतु काही कारणामुळे यातील काही लोक आजारी पडले, काही लोक परदेशात गेले त्यामुळे घटना बनविण्याचा पूर्ण भार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांवर आला. त्यामुळे सर्व समाजाने बाबासाहेबांना घटनाकार किंवा घटना शिल्पकार म्हणून स्वीकारले. घटना समितीच्या सर्व सभासदांनी संविधानाचा गौरव करताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना धन्यवाद दिले. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र प्रसाद यांनी 26 नोव्हेंबर, 1949 च्या अध्यक्षीय भाषणात पुढील उद्गार काढले. "या खुर्चीत बसून संविधान सभेच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर.....

कार्याचे मी प्रत्येक दिवशी निरीक्षण करीत आलो आहे. संविधान सभेचा मसुदा समितीवरील सभासदांनी किती उत्साहाने,चिकाटीने,निष्ठेने कार्य पार पाडले याची खरी जाणीव अन्य कोणापेक्षा मला अधिक आहे. विशेषतः त्या मसुदा समितीचे् अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या प्रकृतीची तमा न बाळगता काम तडीस नेले आहे. मसुदा समितीवर तिचे अध्यक्षपदी त्यांची निवड करण्याचा जो निर्णय आपण घेतला त्याच्या इतका अचूक निर्णय दुसरा कोणताही घेतला गेला नाही."

सभापती महोदय, माझ्या मनात जी खंत आहे ती बहुतेकांनी व्यक्त केली आहे. दुर्दैवाने महाराट्रातून किंवा मुंबई प्रांतातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना निवडून जाता आले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांना राज्यभिषीकेचा योग आला होता त्यावेळे महाराष्ट्रातील पुरोहित पुढे आले नाही. परंतु उत्तर प्रदेशातील गागाभट राज्यभिषकासाठी पुढे आले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितवर बंगाल प्रांतामधून श्री.जोगींद्र मंडल आणि इतर सदस्यांचा पाठिंबा मिळाल्यामुळे निवडून गेले. बाबासाहेब तेथून समितीवर गेले नसते तर बाबासाहेबांना हे परम भाग्य लाभले नसते.

सभापती महोदय, बाबसाहेब आंबेडकरी चळवळीच्या कार्यकर्त्यांच्या मनामध्ये खंत आहे की, एवढा विद्वान मनुष्य, ज्या मनुष्याची 125 वी जयंती होत असतांना एवढा गौरव होतो एवढेच नव्हेतर यावेळेस डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा 159 वा महापरिनिर्वाण दिन साजरा होतो. दरवर्षी महापरिनिर्वाण दिनी लक्षावधी लोक बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येतात, त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची व्यवस्था, कोणत्याही प्रकारचे निमंत्रण, कोणत्याही प्रकारची जाहीरात नसताना कदाचित जगामध्ये एकमेव महापुरुष असेल त्याच्या महापरिनिर्वाण दिनाला चैत्यस्तुपाला अभिवादन करण्यासाठी लाखो बांधव येतात. ज्या प्रमाणे पंढरपूरला वारकरी जातात ते कसलीही अपेक्षा करीत नाहीत. त्या ठिकाणच्या सर्व गैरसोयी स्वीकारून पंढरपूरला जात असतात. कदाचित त्या ठिकाणी पांडुरंगाचे दर्शन झाले नाही तर कळसाचे दर्शन घेतात आणि पावन झाल्यासारखे परत येतात. तशाच प्रकारे याही ठिकाणी पुजनीय डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी आलेले लोक 2 दिवस 3 दिवस रांगेत उभे असतात. दर्शन झाले नाही तर त्या चैत्यस्तूपाला अभिवादन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर.....

करतात आणि निघून जातात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करणाऱ्या लोकांमध्ये त्यांच्या महापरिनिर्वाण दिनाला अजून एक महत्व आहे की, लक्षावधी बांधव या ठिकाणी गंडे दोरे खरेदीला येत नाहीत. सर्वात जास्त पुस्तक विक्री कोठे होत असेल तर ती डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनाला चैत्यभूमित होत असते.

WW-1/....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर...

सभापती महोदय, दोन चार वर्षापूर्वीची गोष्ट आहे. एका आजीबाईला चैत्यभूमीवर डॉ.बाबासाहेबांचे पुस्तक विकत घेताना पाहिले. मी त्या आजीबाईंना विचारले की, आपण शिकलेल्या दिसत नाही, मग आपण हे पुस्तक कशा वाचणार ? त्या आजीबाईंनी स्वाभिमानाने सांगितले की, डॉ.बाबासाहेबांनी आम्हाला शिक्षणाचा मंत्र दिलेला आहे. माझा नातू शिकेल, तो हे पुस्तक वाचेल आणि हे स्वप्न पाहण्यासाठी मी चैत्यभूमीवर आले आहे.

सभापती महोदय, या महामानवाला दैवत्व प्राप्त झालेले आहे. परंतु सन 1954 मध्ये झालेल्या निवडणुकीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर भंडाऱ्यातून निवडून येऊ शकले नाहीत हा क्लेषकारक इतिहास आम्हाला वाचावा लागत आहे. ज्या माणसाने देशाला संविधान दिले त्यांना बिनविरोध निवडून द्यावे असे त्यांच्या विरोधात असलेल्या नेत्यांना वाटले नाही

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब जीवंतपणी असताना अपमानित झालेले आहेत. डॉ.बाबासाहेबांच्या महानिर्वाणानंतरही त्यांना अपमानित व्हावे लागले. डॉ.बाबासाहेबांना भारतरत्न मिळण्यासाठी 34 वर्षे लागली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र संसदेमध्ये लावण्यासाठी 34 वर्षे वाट पहावी लागली. ज्या बाबासाहेबांनी बौध्दधर्माची दीक्षा घेतली त्या नवबौद्धांना अनुसूचित जातीचा दर्जा मिळण्यासाठी 31 वर्षे गेली. सन 1960 मध्ये स्व.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रामध्ये नवबौद्धांना अधिकार दिला. परंतु केंद्र सरकारमध्ये तो अधिकार मिळण्यासाठी 1990 पर्यंत वाट पहावी लागली. नवबौद्धांच्या तीन पिढ्या बरबाद झाल्या. पण नवबौद्धांना अनुसूचित जातीचा दर्जा देण्यात आला नाही. 1991 मध्ये व्ही.पी.सिंग यांचे सरकार आले त्या सरकारला भारतीय जनता पक्षाने त्यांना पाठिंबा दिला होता. तेव्हा या सरकारने बाबासाहेबांना भारतरत्न पुरस्कार दिला, संसदेमध्ये त्यांचे तैलचित्र लावले आणि नवबौद्धांना अनुसूचित जातीचा दर्जा दिला.

सभापती महोदय, आता सहिष्णुता आणि असहिष्णुता असा विषय मांडण्यात येत आहे. असहिष्णुतेवरुन साहित्यिक पुरस्कार परत करीत आहेत. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, डॉ.बाबासाहेबांनी किती सोसले ? ते सातारा येथे जात असताना गाडीवानाने त्यांना अस्पृश्य म्हणून मध्येच गाडीतून उतरविले. शाळेतील शिक्षकांना एक गणित सुटत नव्हते म्हणून त्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर...

बाबासाहेबांना गणित सोडविण्यासाठी बोलाविले. बाबासाहेब पुढे गेले तसे वर्गातील इतर मुले त्यांच्या पुढे धावत गेली आणि त्यांनी फळ्याजवळील आपले डबे उचलून घेतले. कारण त्यांचा हात डब्याला लागला असता. त्या मुलांनी डबे उचलल्यानंतर बाबासाहेबांनी फळ्यावरील गणित सोडविले. बाबासाहेब बडोद्याला आले होते तेव्हा एका कारकुनाने त्यांना स्पर्श होऊ नये म्हणून त्यांच्या हातावर फाईल फेकली. डॉ.बाबासाहेब विल्सन कॉलेजमध्ये शिक्षण घेत होते. त्या ठिकाणी पाणी पिण्यासाठी मडके ठेवले होते परंतु त्यांना पाणी पिता येत नव्हते. ज्यावेळी पाणी देणारा मुनष्य येईल त्यावेळी त्यांना पिण्यासाठी पाणी मिळत होते. एके दिवशी पाणी देणारा मनुष्य आला नाही त्या दिवशी त्यांना पाणी मिळाले नाही. अशावेळी त्यांच्या मनात किती क्रोध निर्माण झाला असेल पण ते शांत राहिले. यावरुन बाबासाहेबांमध्ये किती सहिष्णुता होती हे दिसून येते. तुमच्या आमच्यासारखा कोणी असता तर अशा घटनेने किती क्रोधित झाला असता ? परंतु बाबासाहेबांनी प्रतिशोध घेण्याचा प्रयत्न केला असता.

सभापती महोदय, 1947 साली डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. गुराढोरांना पाणी पिण्याचा अधिकार आहे तर आम्ही तर माणसे आहोत आम्हाला पाणी पिण्याचा अधिकार नाही म्हणून सत्याग्रह केला. बाबासाहेबांनी काळाराम मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह केला. आम्ही सुद्धा माणसे आहोत, आम्हाला सुद्धा रामाचे दर्शन मिळाले पाहिजे. सन्माननीय सदस्य प्रा.जर्नादन चांदूरकर साहेबांनी सांगितले की, डॉ.बाबासाहेब हिंदू धर्माच्या विरुद्ध नव्हते तर ते हिंदू धर्माचे सुधारक होते. त्यांना रामाच्या मंदिरामध्ये प्रवेश मिळाला तर या ठिकाणी जे बाकीचे लोक आहेत त्यांच्यामध्ये राम प्रिय आहे त्या रामाच्या मंदिरात मला प्रवेश मिळाला तर कदाचित त्यांच्या हृदयात आम्हाला स्थान मिळेल आणि असहिष्णुता नष्ट होईल. परंतु हा सत्याग्रह 1930 ते 1935 पर्यंत चालला. हा सत्याग्रह अहिंसक मार्गाने चालला. या सत्याग्रहावर दगडफेकही झाली. मग बाबासाहेबांनी 1935 मध्ये घोषणा केली की, "मी हिंदू म्हणून जन्माला आलो तरी, हिंदू म्हणून मरणार नाही." हा समाज सुधारेल म्हणून त्यांनी 20 वर्षे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर...

वाट पाहिली. माझ्या समाजाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देईल. ही अस्पृशता नष्ट होईल. येथील हिंदू समाज बलशाली होईल. त्यांनी 20 वर्षे वाट पाहिली, परंतु तसे झाले नाही. अनेकांनी त्यांना आमिषे दाखविली. पण बाबासाहेब राष्ट्रभिमानी होते. त्यांना धर्मांतर करायचे होते राष्ट्रांतर करायचे नव्हते. म्हणून त्यांनी या मातीत जन्मलेल्या, वाढलेल्या आणि मातीत रुजलेल्या बौद्धधर्माचा स्वीकार केला. बाबासाहेब म्हणाले की, मी प्रथम भारतीय आहे आणि अखेरही भारतीय आहे. जर तुमच्या आमच्यावर असा अन्याय झाला असता तर आपण काय म्हणालो असतो की, "ईट का जवाब पत्थर से देंगे" परंतु बाबासाहेबांनी तसे केले नाही. त्यांनी प्रतिशोध घेतला नाही. त्यांच्यामध्ये कितीतरी सहिष्णुता होती.

सभापती महोदय, या ठिकाणी खैरलांजी घटनेचा उल्लेख करण्यात आला. खैरलांजी येथे जो प्रकार झाला त्यावरून एका तरी साहित्यकाने पुरस्कार परत केला काय ? दलितांवर अत्याचार झाले, दलित महिलां विवस्त्र केले, त्यांना जाळून मारले तरी कोणाही साहित्यिकांनी आणि विचारवंतांनी पुरस्कार परत केला नाही याचे मला दु:ख होत आहे. त्यावेळी कोणत्या पक्षाचे सरकार होते ही गोष्ट सोडून द्या. त्यावेळी कोणत्या साहित्यिकांनी पुरस्कार परत केला ? परंतु माझा बाबासाहेब सहिष्णुवादी होता. त्यांच्या बाबतीत एवढे होऊनही त्यांनी चळवळीमध्ये कुठेही क्रोध आणि प्रतिशोध घेतला नाही.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेबांना बौद्धधर्म स्वीकारल्यानंतरही त्यांच्यावर अन्याय आणि अत्याचार झाले. परंतु या समाजाचा एकही माणूस अतिरेकी झाला नाही किंवा नक्षलवादी झाला नाही. यासाठी आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कौतुक केले पाहिजे. या समाजावर इतके अन्याय आणि अत्याचार होत आहेत त्याचा प्रतिशोध घेण्यासाठी कुणीतरी पुढे आले पहिजे पण तसे झालेले नाही. आता आपण पाहतो की जरा कुठे काही झाले तर अतिरेकी निर्माण होतात, प्रतिशोध घेण्याचा प्रयत्न करतात. परंतु डॉ.बाबासाहेब आंबडेकरांनी नागपूरमध्ये जी बौद्धधर्माची दीक्षा दिली त्यामध्ये बाबासाहेबांनी गौतम बुद्धाचा शांततेचा, समतेचा आणि बंधुतेचा मंत्र दिला. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता हे शब्द फ्रेंच राज्यक्रांतीतून घेतलेले नाही तर हे शब्द भगवान बुद्ध जो माझा आद्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर...

गुरु आहे, त्या भगवान बुद्धाच्या तत्वज्ञानातून घेतलेले आहे, असे बाबासाहेबांनी सांगितले. बाबासाहेबांनी कधीही प्रतिशोध घेतला नाही. बाबासाहेबांनी कधी सूड घेण्याचा प्रयत्न केला नाही असे असताना आता सूडाची भावना, विरोधाची भावना निर्माण झालेली आहे, ती आपण कुठेतरी थांबविली पाहिजे.

सभापती महोदय, आर्य इकडून आले, आर्य तिकडून आले असे सांगण्यात येते. डॉ. बाबासाहेबांनी 'Who were the Shudras?' मध्ये लिहिले आहे की, आर्य इकडून तिकडून आले नाहीत तर ते या देशाचे नागरिक आहेत. असे असताना मूळ रहिवाशांची चळवळ, समाजाला तोडण्याची चळवळ सुरु आहे, ही चळवळ कुठेतरी थांबविली पाहिजे, आपण बाबासाहेबांचे 'Who were the Shudras?' वाचावे. 'Thoughts on Pakistan' वाचावे. आपण त्यावेळी बाबासाहेबांचे ऐकले असते तर आज देशामध्ये जी परिस्थिती निर्माण झालेली आहे, ती निर्माण झाली नसती.

..... 2X-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय गिरकर....

महोदय, एका सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात सरकार राखीव जागा संपुष्टात आणणार अशा प्रकारचा उल्लेख केला. मी सांगू इच्छितो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राखीव जागांच्या बाबतीत 174 व्या कलमात उल्लेख केला आहे की, जोपर्यंत विषमता आहे तो पर्यंत आरक्षण सुरु राहील. राजकीय जागांमध्ये बाबासाहेबांनी आरक्षण ठेवले आहे. तसेच त्यांनी 10-10 वर्षासाठी त्याला एक्स्टेंश्न ठेवले आहे. त्यांना वाटले होते की, 10 वर्षानंतर माझा समाज सत्ताधारी होईल. इतर लोक त्यांना सत्ता देतील असे त्यांना वाटले होते. परंतु स्वातंत्र्य मिळून 60 वर्षाचा कालावधी उलटूनही या परिस्थितीत बदल झाला नाही. महोदय, मी कोणत्याही पक्षाचे नाव घेत नाही. परंतु आम्हाला राखीव जागांवरच तिकीट दिले जाते. राखीव जागांची तरतूद नसतील तर आमचे लोक या ठिकाणी आलेच नसते. डॉ.बाबासाहेबांना वाटले होते की, 10 वर्षात मागासवर्गीय लोकांना खुल्या जागेवरुन तिकीट दिले जाईल आणि जनता त्यांना स्वीकारेल. परतु स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे होऊन सुध्दा डॉ.बाबासाहेबांना अभिप्रेत असलेला बदल झाला नाही. राखीव जागा नसत्या तर आमचे बांधव विधानसभेत आले नसते. मी सर्व पक्षाच्या नेत्यांना धन्यवाद देऊ इच्छितो की, मागासवर्गीयांची सदस्य संख्या विधानपरिषदेत जास्त आहे, हे विसरुन चालणार नाही. या ठिकाणी राखीव जागा नसताना सुध्दा सर्व पक्षाच्या लोकांनी मागासवर्गीयांना जागा दिलेल्या आहेत. विधानपरिषदेत राखीव जागेची तरतूद नसताना सुध्दा सर्वच पक्षांनी आम्हाला संधी दिलेली आहे. त्यामुळे मी सर्वच पक्षांना विनंती करु इच्छितो की, त्यांनी राखीव प्रवर्गाच्या लोकांना लोकसभा, विधानसभेमध्ये राखीव नसलेल्या ठिकाणी तिकीट देऊन त्यांना निवडून आणावे. असे केले तरच या देशातील राजकीय आरक्षण संपेल.

सभापती महोदय, अनेकदा काही जण म्हणतात की, दलित लोक सर्व सवलती लाटतात, सर्वच गोष्टी या लोकांना मिळतात. हे लोक सरकारचे जावई आहेत, असेही सांगितले जाते. मी सांगू इच्छितो की, आपल्या राज्यामध्ये गेल्या 20 वर्षांपासून राखीव जागांची भरती प्रक्रिया राबविली गेली नाही. शिक्षणातील राखीव जागांची टक्केवारी बघितली तर जनरल पेक्षा सर्वात जास्त गुण मिळवणारे राखीव प्रवर्गातील असतात. ते राखीव जागातून अर्ज करीत असल्यामुळे त्यांना संधी मिळत नाही. कारण राखीव प्रवर्गात मोठ्या प्रमाणावर स्पर्धा असते. त्यांनी खुल्या प्रवर्गातून अर्ज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय गिरकर....

केला असता तर त्यांना संधी मिळाली असती. परंतु आज दुर्दैवाने काय झाले ? आपण म्हणत होता की, दलितांना सर्व मिळते आणि इतरांना काही मिळत नाही. सभापती महोदय, केरळ राज्यातील खासदारांनी लोकसभेत सांगितले की, मागासवर्गीयांना अल्पसंख्याक शिक्षण संस्थांमध्ये आरक्षण देऊ नये. त्यामुळे सामाजिक आधारावरील शिक्षण संस्थांमधील राखीव जागा गेल्या तीन वर्षांपासून नष्ट झालेल्या आहेत. त्यांच्याकडे प्रवेशासाठी गेलो तर त्या संस्था सांगतात की, आमच्या शाळा अल्पसंख्याकासाठी आहेत. मी त्या शाळांची नावे घेत नाही. राजस्थानी समाज किंवा अन्य कोणत्याही समाजाची शाळा असेल तर ते सांगतात की, आमच्या शाळा भाषिक संस्था आहेत. त्यामुळे आम्ही प्रवेश देणार नाही. यामुळे जवळजवळ तीन ते साडेतीन लाख विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. एवढेच नव्हे तर आज सर्वत्र शिक्षणाचा बाजार मांडण्यात आलेला आहे. ज्याच्याकडे पैसा असेल त्या विद्यार्थ्यांना 35 टक्के गुण मिळाले असले तरी तो जर 50 लाख रुपये डोनेशन देऊ शकत असेल तर त्यांना खाजगी महाविद्यालयात डॉक्टरच्या पदवीसाठी प्रवेश मिळतो. परंतु आमच्या समाजाच्या विद्यार्थ्यांना 89-91 टक्के गुण असले तरी त्यांना प्रवेश मिळत नाही. वास्तविक पाहता डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाचा मूलभूत अधिकार दिला होता. त्यामुळे मोफत शिक्षण आणि राखीव जागेची आवश्यकता आहे. हे राष्ट्र बलवान करावयाचे असेल तर शरीरातील एकही भाग दुर्बल राहता कामा नये. म्हणून केवळ अनुसूचित जातीच नव्हे तर जे नंदी बैलवाले असतील, जरीमरी आईवाले असतील, विमुक्त जाती व भटक्या जमातीचे असतील इत्यादी संपूर्ण समाज एका स्तरावर आणला पाहिजे. हा समाज एका स्तरावर आणण्यासाठी अजून काही वर्षे राखीव जागांची आवश्यकता आहे. तुम्हा-आम्हाला विषमतेचे चटके बसलेले आहे. परंतु मला त्याचे या ठिकाणी भांडवल करायचे नाही. म्हणून विषमतेचे चटके जोपर्यंत दूर होत नाही तोपर्यंत यामध्ये काही सुधारणा होणार नाही असे मला वाटते. आम्ही केवळ राखीव जागांमुळे मोठे होत नाही. आमची मागणी आहे की, आपण सर्वप्रथम विषमता दूर केली पाहिजे.

सभापती महोदय, मघाशी कोणी तरी प.पू.भागवतांच्या नावाचा उल्लेख केला. मी काल त्यांच्या व्याख्यानाला गेलो होतो. त्यांनी या विषयी काय मत व्यक्त केले हे आपण तरुण भारत आणि इतर वर्तमानपत्रांमध्ये वाचा. आरक्षणाच्या बाबतीत त्यांनी काय भूमिका घेतली हे बघा. आपण विरोध जरूर करा. परंतु अगोदर वर्तमानपत्रातील बातमी वाचा. ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय गिरकर....

सभापती महोदय, माझ्या भाषणाचा समारोप करताना मी सांगू इच्छितो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 125 व्या जयंती निमित्त पंचतिर्थाची घोषणा करण्यात आली आहे. कधी कधी आमच्या अस्मितेचे प्रश्न असतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म महू गावी झाला तेथील स्मारक, इंदू मिल येथे असलेल्या चैत्यभूमीचे स्मारक, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मूळ गाव आबडवे येथे स्मारक, 26 अलीपूरला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या बंगल्यात संविधान लिहिले तेथे स्मारक अशा अनेक बाबी आहे. 1921-22 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर लंडन येथे वास्तव्यात होते. त्या ठिकाणी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून स्मारक करण्यात येत आहे. याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती निमित्त डॉ.बाबासाहेबांचे चित्र असलेले नाणे काढण्यात येत आहे. त्यांचे छायाचित्र असलेल्या नोटा सुध्दा काढण्यात येतील. डॉ.बाबासाहेबांच्या 125 व्या जयंती निमित्त विविध कार्यक्रम राबविण्यासाठी राज्य शासनाने 125 कोटी रुपये दिले आहेत. ही रक्कम सामाजिक कामे व स्मारकांसाठी राखून ठेवलेली आहे. याचे मला भाग्य लाभलेले आहे.

सभापती आमदार आदर्श गाव योजनेंतर्गत मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या वणन गावाचा विकास मी करीत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक कामामध्ये मातोश्री रमाबाई आंबेडकर यांचा सुध्दा तेवढाच सहभाग होता. सन्माननीय वित्त मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी ते गाव विकसित करण्यासाठी अजून 2 कोटी रुपयांचा निधी दिला आहे. मी पुन्हा सांगू इच्छितो की, आमच्या शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या 125 व्या जयंती निमित्त सामाजिक कामे व स्मारकांसाठी 125 कोटी रुपये राखून ठेवले आहेत. त्याबद्दल मी पुनश्च सरकारचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व येथेच थांबतो.

सभापती : आता या विषयावरील चर्चा संपली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक कंत्राटी संघटना यांनी दि.16/12/2015 रोजी नागपूर येथे काढलेला मोर्चा

मु.शी. : महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक कंत्राटी संघटना यांनी दि.16/12/2015 रोजी नागपूर येथे काढलेला मोर्चा, या संबंधी गृह (शहरे) राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ.रणजित पाटील (गृह (शहरे) राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो..

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..2वाय...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : भुसावळ, जि. जळगांव येथील दिनांक 17.12.2015 रोजी झालेल्या गोळीबाराच्या घटनेच्या संदर्भात

मु.शी. : भुसावळ, जि. जळगांव येथील दिनांक 17.12.2015 रोजी झालेल्या गोळीबाराच्या घटनेच्या संदर्भात गृह (शहरे) राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ. रणजित पाटील (गृह (शहरे) राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L. C. BILL NO. XIII OF 2015 (A BILL FURTHER TO AMEND THE CODE OF CRIMINAL PROCEDURE, 1973, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE SELECT COMMITTEE

(विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाले.)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे यांना विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबतचा आपला प्रस्ताव मागे घ्यावयाचा आहे काय ?

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधी मी जो प्रस्ताव दिलेला आहे तो मागे घ्ेण्यास अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्याबाबतचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 13 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : सन 2015 चे वि.प.वि. क्रमांक 13 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शुक्रवार, दिनांक 18 डिसेंबर, 2015 रोजी सकाळी 10 ते 11.45 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल, या विशेष बैठकीत सकाळी 10 ते 11.15 पर्यंत किटकनाशक व जैविक किडनाशक या विषयावर म.वि.प. 97 अन्वये अल्पकालीन चर्चा व सकाळी 11.15 ते 11.45 पर्यंत अर्धा तास चर्चा घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 08 वाजून 56 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 18 डिसेंबर, 2015 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही